म. ग्रं. सं. ठाणे

विषय काव्य

लेखक शं. रा. हातवळणे

सन १९..

संग्रहालय क्रमांक २७८४

पुस्तकाचें नांव सद्बोधमंदिर



[illegible]

सं. का ७

Presented to the Granthasangrahalaya

Thana.
1st Nov. 1895

मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे.

नं. ८९

# सद्बोधमंदिर.

## सुशिक्षित स्त्री.

ह्या ग्रंथ

शंकर रामचंद्र हतवळणे

ह्यांनीं केला.

मुंबई.

" निर्णयसागर " छापखान्यांत छापिला.

ह्या ग्रंथ इसवी सन १८६७ चा आक्ट २५ अन्वयें नोंदिला आहे.

(ह्या ग्रंथासंबंधी सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपलेकडे राखून ठेविले आहेत.)

सन १८९०.

किंमत एक रुपया.

# प्रस्तावना.

आपलीं मुलें चांगलीं निपजावीं अशी आपली इच्छा आहे, तर सुविचार कोणते हें त्यांस समजून त्याप्रमाणें त्यांचें आचरण असलें पाहिजे. अशा सुविचारांचा संग्रह करण्याच्या उद्देशानें "सद्बोधमंदिर" ह्या नांवाची पुस्तकमाला लिहिण्याचा आह्मीं विचार केला आहे. या पुस्तकाचे सहा भाग करण्याचें योजिलें आहे. पहिल्या भागांत स्त्रियांच्या कर्तव्यांविषयीं, दुसऱ्या भागांत गृहशिक्षणाविषयीं ह्मणजे आईबापांचे कर्तव्यांविषयीं, तिसऱ्या भागांत मुलांचे कर्तव्यांविषयीं, चवथ्या भागांत सामाजिक सुधारणा, पांचव्या भागांत राज्यव्यवहार, व सहाव्या भागांत धर्म ह्यांविषयीं विचार करण्याचा हेतु आहे. त्यांपैकीं हा पहिला भाग आहे. ह्यास सुशिक्षित स्त्री हें नांव दिलें आहे.

नुसत्या नीतीविषयींचे प्रश्नाचा विशेष विचार करून इष्ट हेतु सिद्धीस जाण्याचा संभव कमी आहे. मनुष्य नीतिमान असून गृहशिक्षण, सामाजिक सुधारणा, राज्यव्यवहार वगैरे बाबतींत त्याचे विचार कदाचित् कोते असतील; व त्यामुळें जितका फायदा होणें इष्ट आहे तितका होणार नाहीं. ह्मणून ह्या निरनिराळ्या बाबतींत सुविचार कोणते हें समजण्यास, व त्यांपैकीं आपल्या स्थितीच्या मानानें जे ग्रहण करण्यासारखे असतील ते घेण्यास कांहीं साधन असावें, ह्या हेतूनें प्रस्तुत उद्योग हातीं घेण्याचें मनांत आलें.

नीतिशिक्षणास अथवा इतर शिक्षणास गृहशिक्षणाचें पाठबळ असलें ह्मणजे विशेष उपयोग होतो; गृहशिक्षणांत स्त्रियांची मातबरी फार असते; तेव्हां स्त्रियांचे स्थितींत न्यूनता राहील, तर गृहशिक्षणांत व त्यामुळें इतर शिक्षणांत न्यूनता राहण्याचा

संभव आहे. ह्यासाठीं स्त्रियांविषयीं, ह्मणजे त्यांचीं कर्तव्यें कोणतीं, त्यांनीं मुलांचें संगोपन कसें करावें, त्यांस शिक्षण कसें द्यावें, व त्यांचे विचार कसे असावे ह्याविषयीं प्रथम विचार करणें अवश्य आहे. हें समजून प्रकृत भाग प्रथम हातीं घेतला.

स्त्रियांच्या डोळ्यांपुढें कित्ता असल्यानें सुविचार ग्रहण करण्यास सोपें पडेल, व हे विचार गोष्टीच्या रूपानें कळले असतां ते वाचण्यास त्यांस कंटाळा येण्याचा संभव कमी आहे, असें वाटल्यावरून तशी योजना करण्याचा यत्न केला आहे. हा यत्न कितपत सिद्धीस गेला आहे हें सांगतां येत नाहीं.

मॉरल टेल्स (नीतिकथा) ह्मणून इंग्रजींत एक ग्रंथ आहे. ह्याचा प्रस्तुतच्या पुस्तकास बराच उपयोग झाला आहे, हें येथें सांगणें अवश्य आहे.

धुळें, जुलई १८९०. } शंकर रामचंद्र हतवळणे.

का

... ग्रंथ संग्रहालय
नं. १२०
... न. ४८

# सुशिक्षित स्त्री.

जनार्दनपंत या नांवाचा एक गृहस्थ होता. सर्व लोक त्यास भाऊसाहेब ह्मणत. त्याचे वाडवडील उत्तर हिंदुस्थानांतील संस्थानांपैकीं एका संस्थानांतील मूळचे राहणारे होते. भाऊसाहेब यांस लहानपणीं चांगलें शिक्षण मिळालें होतें. त्यांनीं संस्थानांत बरेच दिवस नोकरी केली. शेवटीं त्यांस मोठ्या हुद्द्याचें काम मिळालें. ते प्रामाणिक असून कामांत चोख असत; ह्मणून संस्थानिकाची त्यांजवर मर्जी होती. ते निस्पृह असल्यामुळें कांहीं लोकांस अप्रिय होते. भाऊसाहेबांवर सरकारची मर्जी असावी, हें दरबारांतील लोकांस बरें न वाटून त्यांनीं त्यांवर कांहीं कुभांड रचिलें. संस्थानिक हा चंचल वृत्तीचा होता. त्यामुळें त्यानें भाऊसाहेबांस कामावरून दूर केलें व त्यांस जें इनाम दिलें होतें तें जप्त केलें. भाऊसाहेबांस संस्थानांत राहण्याचें न आवडून ते आपली पत्नी आनंदीबाई, व मुलगा पुरुषोत्तम यांस घेऊन कलकत्ता, लखनौ, प्रयाग, काशी, दिल्ली, आग्रा, जयपूर, पुष्कर, फरदापूर व वेरूळ येथील लेणीं वगैरे पुष्कळ शहरें व क्षेत्रें पाहत पाहत मुंबईस येऊन राहिले. कांहीं दिवसांनीं त्यांचे मनांत इंग्लंड देशाचा प्रवास करण्याचें आलें. त्यांस प्रवास करण्याची लहानपणापासून फार हौस असे. ती केवळ मौजेसाठीं नसून प्रवासापासून निरनिराळे आचार, विचार व कारखाने यांचें परीक्षण करावयास सांपडून जी माहिती उपलब्ध होते, व जें एका प्रकारचें शिक्षण मिळतें, त्यासाठीं होती. ज्या ज्या वेळेस भाऊसाहेब प्रवास करीत, त्या त्या वेळेस ते आनंदीबाईस आपल्याबरोबर घेऊन जात. इंग्लंड देशाचा प्रवास मोठा खरा, परंतु

आनंदीबाईची इच्छा फार असल्यामुळें त्यांनीं तीस व मुलास घेऊन जाण्याचा निश्चय केला. सांप्रत इंग्लंड देश सर्व जगभर गाजत आहे. कोणता कसाही मनुष्य असला; तथापि त्यास तेथें थारा मिळतो. ज्या ठिकाणीं ३००० कपाशीच्या गिरण्या असून त्यांत ६० लाख लोक काम करीत आहेत, व जगांत जो कापूस पिकतो त्यापैकीं जेथें निमे खपतो, ज्या ठिकाणीं १५०० लोंकरीचे कारखाने असून त्यांत लाख सव्वा लाख लोकांचा उदरनिर्वाह होत आहे, ज्यास लक्ष्मीनिवास व स्वातंत्र्यसुखाचें माहेरघर असें समजतात, तो देश पाहण्याची इच्छा असणें स्वाभाविक आहे. मागील सर्व व्यवस्था करून भाऊसाहेब बोटींत बसले. ती बोट बरीच वेळ सुरक्षित चालली. परंतु कपतान दारूच्या अमलांत असल्यामुळें ती भलत्या मार्गानें जाऊं लागली व बुडेल अशी भीति उत्पन्न झाली. समोरून इंग्लंडाहून दुसरी आगबोट येत होती. तिजवरील कपतानास ही गोष्ट दिसून आल्यावर त्यानें बुडणाऱ्या बोटींतील माणसें आपल्या बोटींत घेण्यासाठीं होड्या पाठविल्या. ज्याला त्याला प्रथम जाण्याची घाई असते; ह्मणून होड्यांत बसण्यासाठीं लोकांची धांदल उडाली. या गर्दींत, भाऊसाहेबांबरोबर जो ब्राह्मण होता तो सामानाचें बोजकें व आनंदीबाई यांसह पुढें गेला. भाऊसाहेब मुलास घेऊन मागाहून येत होते. ब्राह्मण निसटला तो आनंदीबाईसह होडींत बसला. ती होडी सुरक्षितपणें पोहोंचली. भाऊसाहेबांस धक्काबुक्की करणें बरें वाटलें नाहीं; त्यामुळें त्यांस मागें रहावें लागलें. भाऊसाहेब ज्या बोटींत बसले होते तींत पाणी येत आहे असें समजल्यावर पूर्वींच्या होड्या परत आल्या नाहींत. आनंदीबाईनें बक्षीसही देण्याचें कबूल केलें, परंतु कोणी हिंमत धरीना. ती बोट वाऱ्यानें ढकलत ढकलत गेली; व तिचें काय झालें हें सम-

जलें नाहीं. बोट बुडाली असावी असें समजून दुसऱ्या बोटी-वरचे कपतानानें आपली बोट हाकारिली. ती मुंबई बंदरांत येऊन पोहोंचली. अशा प्रकारें आनंदीबाईवर दुःखाचा प्रसंग येऊन गुदरला. आतां जावें कोठें व करावें काय, ही विवंचना तीस उत्पन्न झाली. शेवटीं तीस सुचलें कीं, पुण्यांत आपली मानलेली एक बहीण आहे; तिचे येथें कांहीं दिवस राहून मग पुढील व्यवस्था करावी. हा विचार मनांत येऊन ती पुण्यास आली व बहिणीचे घरीं उतरली. ह्या बहिणीचें नांव यशोदाबाई होतें. तिचा नवरा मरण पावून कांहीं वर्षें होऊन गेलीं होतीं. त्याची मिळकत पुष्कळ होती. शिवाय, साली-नाही त्याचें बरेंच उत्पन्न होतें. यशोदाबाई स्वभावानें चांगली असे; परंतु तिचा नवरा ज्याप्रमाणें रंगेल व चैनी होता, त्याप्रमाणें तीही कांहीं अंशीं तशी होती. तिला सुशील स्त्रियांचा सहवास नसे. मोठ्या शहरांतून चांगल्या गोष्टी दृष्टीस पडतात व वाईटही दृष्टीस पडतात. अशा शहरांत सुधारणा करण्यास जशीं साधनें असतात, तशा नीति बिघडण्यासही पुष्कळ गोष्टी असतात. यशोदाबाईस कोणत्याही गोष्टीची कमतरता नव्हती; व तीस कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध नसल्यामुळें ती आपला काळ घरीं अथवा बाहेर स्वच्छंदानें घालवी. यामुळें तीस स्वतःची सुधारणा करण्यास अथवा मुलांस शिक्षण देण्यास सवड नसे. तीस बहुत करून सकाळीं उठण्यास उशीर होई. उठल्यानंतर वेणीफणी, स्नान, तुळशीला पाणी व जेवणखाण इतकें आटोपतें, तों बारा वाजून जात. मग शेजारिणींबरोबर इकडल्या तिकडल्या गप्पा मारल्यावर ती तास दोन तास झोंप घेत असे. निजून उठल्यावर घरांत उगीच फेरफटका करून ती कांहीं वेळ करमणुकीसाठीं कादंबऱ्यांसारखे ग्रंथ वाचीत बसे. संध्या-

काळीं कधीं तुळशीबाग अथवा बेलबाग, कधीं पर्वती अथवा विठ्ठल-वाडी, कधीं नानाचा बाग अथवा चिमणबाग इकडे, अथवा दुसरीकडे फिरून आल्यावर जेवणखाण करी. नंतर पुनः मैत्रिणींबरोबर नाटकें पाहणें, सोंगट्या खेळत बसणें, संगीताच्या चालीवर ह्मणणारा कथेकरी असल्यास बोवाचे कथेस जाणें, किंवा अशाच प्रकारचे निरुपयोगी कामांत तिचा वेळ जाई. ज्या स्त्रियांचा वेळ असा जातो, त्यांस मुलांकडे लक्ष देण्यास सवड सांपडणें कठीण. परंतु स्त्रिया अथवा पुरुष चैनी असले, तथापि, त्यांस आपलीं मुलें तशीं असावीं असें वाटत नाहीं. ह्मणून मुलांचे शिक्षणासाठीं व विशेषेंकरून आपलें समाधान होण्यासाठीं यशोदाबाईनें शिक्षक ठेविला होता. परंतु तो दुसरीकडे काम लागल्यामुळें नुकताच गेला होता. यशोदाबाईस काशी व माई अशा दोन मुली, व मुलगा बाळ्या अशीं तीन मुलें होतीं. काशी सुमारें तेरा वर्षांची होती, व दुसरीं दोन मुलें अकरा व आठ वर्षांचीं होतीं. काशी दिसण्याला तरतरीत दिसे व हुशार ह्मणून वाखाणलेली होती; तिला थोडें इंग्रजी शिकविलें होतें; तीस संगीताच्या चालीवर कविता ह्मणतां येत असत; ती इतिहासांतील तारखा भराभर सांगे, ह्मणून मंडळीस मोठा अचंबा वाटे. माईस यांपैकीं कांहीं एक येत नव्हतें; ती दिसण्याला गरीब दिसे, ह्मणून तिला मठ्ठ समजत; व तिलाही आपण मंद आहों असें वाटे. बाळ्या मोठा खोडकर व हूड असे; दुसऱ्या मुलांबरोबर अथवा कुळंबिणीबरोबर अथवा स्वयंपाकीणबाईबरोबर त्याचें भांडण नाहीं, असा एकही दिवस जात नसे; त्यास श्रीगणेशाय नमः सुद्धां काढतां येत नसे; तो ज्याचें त्याचें बोलून घेत असे; जो तो त्यास दावीत असे; ह्मणून त्याचा स्वभाव हट्टी व तिरसट होता. शेजाऱ्याच्या मुलांबरोबर कलागती हो-

ऊन रोजचे रोज घरांत फिर्यादी येत; यामुळें यशोदाबाई त्यास नेहमीं रागें भरत असे. अशा प्रकारें यशोदाबाईची गृहस्थिति होती. आनंदीबाई चाणाक्ष होती. तेव्हां तिच्या नजरेस सर्व गोष्टी येऊन चुकल्या होत्या. तीस असें वाटूं लागलें कीं, आपण नुसतें बसून खावें, त्यापेक्षां या मुलांचे शिक्षणाचें काम पतकरावें हें बरें, ह्मणजे यशोदाबाईसही संतोष होईल व आपला वेळही चांगल्या रीतीनें जाईल. आनंदीबाई सुशिक्षित आहे व तिच्या नांवाप्रमाणें तिचा स्वभाव आहे, हें यशोदाबाईस माहीत होतें. ह्मणून आठ पंधरा दिवस होऊं दिल्यावर तिनें एके दिवशीं आनंदीबाईपाशीं मुलांच्या शिक्षणाच्या संबंधानें गोष्ट काढिली. आनंदीबाईच्याही मनांत ही गोष्ट होतीच; तेव्हां तिनें ती मोठ्या आनंदानें कबूल केली. हें चाललें असतां काशी व माई तेथेंच होत्या. बाळ्या शेजारीं चाबकानें खांबाला बडवीत होता. त्यास आनंदीबाईनें बाळ ह्मणून प्रेमानें आपलेकडे बोलाविलें. त्यास 'बाळ्या' ह्या नांवाशिवाय कोणी कधीं हाक मारित नसे; ह्मणून तोही हाक ऐकतांच कोणाकडे लवकर कधीं जात नसे. परंतु आनंदीबाईचे प्रेमाचे शब्द ऐकून तो तिजकडे वळला व ह्मणाला, तुह्मी मला शिकविणार काय ? मला फार वेळ लिहीत नाहींना बसविणार ? असो. यशोदाबाईनें मुलांचे संबंधानें सर्व मुखत्यारी आनंदीबाईकडे सोंपवून ती आपल्या उद्योगास लागली. आनंदीबाईस मराठी भाषेचें चांगलें ज्ञान असून संस्कृत व इंग्रजी ह्या दोन भाषांचेंही बरेंच ज्ञान होतें. हें तीस तिच्या नवऱ्यापासूनच प्राप्त झालें होतें. शिवाय, आल्यागेल्याचा समाचार घेणें, काटकसरीनें संसार करून प्रपंचांत दक्ष असणें, आप्त व इष्टमित्र यांशीं प्रेमानें वागणें व विशेष प्रसंगीं त्यांचा समाचार घेणें, मुलांचें

योग्य प्रकारें संगोपन करणें, जसा प्रसंग येईल तशी पाठ देणें वगैरे गोष्टींचें शिक्षण तीस मिळाल्यामुळें ती सर्वांस प्रिय होती, व नवऱ्यासही तिजपासून फार उपयोग होत असे. याच गुणांमुळें नवीन स्थितींत तीस अवघड असें कांहीं वाटलें नाहीं.

कविता, इंग्रजी धडे व तोंडपाठ केलेल्या तारखा ह्या आनंदीबाईस केव्हां ह्मणून दाखवीन, व लोंकरीच्या तऱ्हतऱ्हेचीं फुलें तीस केव्हां दाखवीन असें काशीस झालें होतें. आनंदीबाई एकटीच दिवाणखान्यांत बसलेली पाहून काशीनें आपलें सर्व भांडार तिजपुढें ओतलें. आनंदीबाईनें हें सर्व ऐकून मात्र घेतलें. तीस अचंबा वाटला नाहीं. हें पाहून काशीस आश्चर्य वाटलें; परंतु ती पुढें कांहीं बोलली नाहीं.

एके दिवशीं काशीनें मुसलमानी राजे, मोंगल बादशहा, व गवरनर जनरल यांनीं हिंदुस्थान देशावर कोठपासून कोठपर्यंत राज्य केलें, हें ओळीनें ह्मणून दाखविलें; छापखाने, आगगाड्या, तारायंत्रें व गिरण्या हीं प्रथम केव्हां सुरू झालीं हें तिनें सांगितलें; व ती ह्मणाली कीं, मावशीबाई, तुमच्या वेळीं अशा तारखा ह्मणून दाखवीत असत का? मी या तारखा ह्मणून दाखवितें त्या वेळेस लोक तोंडांत बोट घालतात. ह्यावर आनंदीबाईनें उत्तर केलें कीं, मी तुझ्या एवढी असतां मला तारखा माहीत नव्हत्या इतकेंच नाहीं, तर आतांसुद्धां कित्येक माहीत नाहींत.

**काशी**—तर मग या सर्व गोष्टी निरुपयोगी आहेत का?

**आनंदीबाई**—नुसत्या तारखा व नांवें पाठ करण्यांत कांहीं अर्थ आहे असें मला वाटत नाहीं. परंतु ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, अमुक गोष्टी उपयोगी किंवा निरुपयोगी हें त्यांचा उपयोग करणारावर अवलंबून आहे. छापखाने वगैरे केव्हां झाले हें तूं सांगितलेंस; परंतु ते सुरू होऊन बरींच वर्षे

लोटलीं, तथापि, त्यांस अवश्य लागणारे पांढरे कागद, या देशांत साधनें असतां, तयार झाले नाहींत. आतां कोठें नुकतीच कागदाची गिरणी स्थापन झाली आहे. परंतु उत्तम कागद निघण्यास किती वर्षें पाहिजेत हें सांगतां येत नाहीं. दुसरें असें कीं, स्वभाषेंत साधारण ग्रंथांपेक्षां पलीकडे मजल पोहांचली नाहीं. विद्वान् लोकांनीं लिहिलेले असे थोडेच ग्रंथ दृष्टीस पडतात. यावरून सुधारणा फार हळू हळू होत आहे व स्वभाषेविषयीं विद्वान् लोकांची अनास्था आहे हें समजून येतें. कपाशीच्या गिरण्या व आगगाड्या सुरू होऊन बरेच दिवस झाले; परंतु या आपणांस आपल्या जबाबदारीवर चालवितां येत नाहींत; व ओबड धोबड कापडापेक्षां आपली मजल पलीकडे पोहोंचली नाहीं व कारखाने उभारण्यास जें शिक्षण अवश्य तें अद्याप मिळालें नाहीं. यावरून महत्त्वाचे गोष्टींसाठीं लोकांस परदेशांवर बरेच दिवस अवलंबून रहावें लागणार व लोकांचे आंगीं स्वपराक्रमावलंबनाचा अभाव हा साधारण दोष अद्याप पुष्कळ अंशीं कायम आहे हें समजतें. या गोष्टी समजण्यास तारखांचा उपयोग आहे. जी गोष्ट तुला मीं इतिहासाचे संबंधानें सांगितली, तीच भूगोलाचे संबंधानें लागू आहे.

तूं आज आठ वर्षें शिकत आहेस; परंतु भूगोलांतील व इतिहासांतील शेंपन्नास नांवें व पांच पंचवीस कविता तुला तोंडपाठ येतात, किंवा अशाच प्रकारचें तुला दुसरें वरवर शिक्षण मिळालें आहे. या पलीकडे तुला विशेष येत नाहीं, हें तुझें तुला समजून येईल.

**काशी**—मी आजपर्यंत इतिहासांतील व भूगोलांतील फक्त नांवें पाठ करीत असें, व कविता एकामागून एक तोंडपाठ

ह्मणवून दाखवीत असें; परंतु तुह्मीं आतां सांगितलें त्याप्रमाणें मला येईल तर बरें होईल.

काशीच्या मनांत नवीन विचारांची थोडी प्रेरणा झाली, हें पाहून आनंदीबाई स्वस्थ बसली; कारण, तीस माहीत होतें कीं, जे लोक हुशार असतात त्यांस विचाराची दिशा फक्त दाखवून स्वत: श्रम करूं द्यावें; त्यांस अगदींच लहान पोरासारखें जवळ बसवून काम करावयास लावूं नये. असें समजून ती माईकडे वळली.

माईला प्रत्येक जण ढ समजत असे; ह्मणून तीस कांहींच उद्योग करण्याची हौस नसे. दिवसांतून तिचा बराच वेळ साडी नेसणें व सोडणें, बाहुलीला नटीवणें, बोळक्यांची उतरंडी मांडणें, व सागरगोटे खेळणें यांत जात असे. शिकण्याकडे अथवा कांहीं उपयुक्त उद्योग करण्याकडे तिचें कमी लक्ष असे.

एके दिवशीं आनंदीबाईनें तिला आपला थोडक्यांत वृत्तांत सांगितला. त्यापैकीं आनंदीबाईनें आपल्या मुलीचे मरणाची जी हकीत सांगितली, तिचा मात्र माईचे मनावर ठसा उमटला. माईनें तिचें नाक, डोळे व वर्ण यांविषयीं सर्व हकीकत विचारली. आनंदीबाईनें तिचे सर्व प्रश्नांचीं उत्तरें दिल्यावर ती ह्मणाली, तुमचीं मुलगी गोदावरी ही कशी असावी, हें मला पूर्णपणें समजून आलें आहे. आनंदीबाई सुस्कारा टाकून ह्मणाली, बेटा, बायका एके ठिकाणीं जमल्या ह्मणजे, नाक, डोळे, शरीराचा रंग, अलंकार व वस्त्रें यांवर त्यांचें भाषण सुरू होतें; व त्यांवरून त्या दुसऱ्या बायकांची परीक्षा करितात. मनाचे गुण व आचरण यांकडे त्यांचें कमी लक्ष असतें. यामुळें त्यांजकडून जशी परीक्षा व्हावी तशी होत नाहीं. मी सौंदर्याबद्दल आपल्या मुलीची फारशी प्रशंसा करीत नाहीं. कारण, सुंदर अ-

सणें ही आपल्या हातची गोष्ट नाहीं. मी गोदावरीच्या गुणां-विषयीं बोलत आहें. इतकें बोलत असतां आनंदीबाईच्या डोळ्यांस पाणी येऊन तीस मोठा गहींवर आला. हें पाहून माई ह्मणाली, मावशीबाई, तुह्माला मी आतां प्रश्न विचारणार नाहीं.

**आनंदीबाई**—माई, तूं मला वाटेल तितके प्रश्न विचार; मी आपले मुलीचे संबंधानें तुला वाटेल तें सांगण्यास तयार आहें.

**माई**—तर मग तुमच्या गोदावरीला मी आवडलें असतें किंवा ताई आवडली असती?

**आनंदीबाई**—तिला तुह्मी दोघी आवडल्या असतां. एकावर कमी व दुसऱ्यावर जास्ती प्रेम करणें हा प्रकार कुटुंबांत फार वाईट आहे, व प्रेमासाठीं मुलांची चढाओढ लावणें अथवा त्यांमध्यें मत्सर उत्पन्न करणें हें वर्तन दोषास्पद आहे हें तिला पूर्णपणें माहीत होतें.

**माई**—मावशीबाई, तुमची गोदावरी असती तर तिची माझी चांगली मैत्री जमली असती; परंतु मला वाटतें कीं, आमची ताई फार हुशार आहे, मला कांहींच येत नाहीं, तेव्हां मजपेक्षां ताईचें व तिचें फार जमलें असतें.

**आनंदीबाई**—जर तुला कांहीं येत नाहीं असें वाटत आहे, तर पुष्कळ येत आहे असें मी समजतें; कारण, ज्यांस आपणांस कांहीं येत नाहीं असें वाटतें त्यांची सुधारणा लवकर होण्याचा संभव असतो. ज्यांस आपणांस सर्व गोष्टी माहीत आहेत असें वाटतें त्यांची सुधारणा होणें कठीण असतें. एके दिवशीं ग्रीस देशांतील प्रसिद्ध तत्त्ववेत्ता साक्रेटीज याजकडे कांहीं लोक गेले; व ते त्यास सांगूं लागले कीं, तुह्मी आपणाला अज्ञान असें

समजतां, परंतु तुह्मी सर्वांत शहाणे आहां असें देवतेचें ह्मणणें आहे, याचा अर्थ काय ? त्यानें उत्तर केलें कीं, "इतर लोक आपणांस सर्वज्ञ समजतात तसें मी आपणास समजत नाहीं; यावरून त्यांची सुधारणा होण्याचा कमी संभव आहे असा देवतेचे ह्मणण्याचा भाव असावा."

माई—तर मग मला कांहीं येईल असें तुह्मास वाटतें.

आनंदीबाई—वाटतें कां ह्मणतेस; माझी पक्की खातरी आहे कीं, तूं श्रम करशील तर वाटेल तें तूं करशील.

माई—तुह्मी ह्मणतां हें खरें, परंतु तुमच्या गोदावरीसारखी मी हुशार व सुशील होईन असें मला वाटत नाहीं. ही गोष्ट मला थोडीशी अशक्य दिसते. बरें तें असो. गोदावरी माझ्या एवढी असतां काय करीत असे, कोणतीं पुस्तकें वाचीत असे, व कोणते उद्योग करीत असे तें मला सांगा.

आनंदीबाईनें हें ऐकून घेऊन उत्तर केलें कीं, ही सर्व हकीकत मी तुला उद्यां सांगेन. चित्रांचें पुस्तक तुला दाखवीन असें मीं बाळाला कबूल केलें आहे. तो माझी वाट पहात बसला असेल.

अशा प्रकारें स्वतःच्या हुशारीविषयीं काशीची वेडेपणाची समजूत घालवून तिचे मनास नवीन वळण लावून दिल्यावर, व माईचे मनांत आपणास कांहीं येईल अशी आशा उत्पन्न करून दिल्यावर, आनंदीबाई बाळ्यास चित्रें दाखविण्याकरितां चित्रबोध पुस्तकें कपाटांतून काढीत होती, तों बाळ्यास दम न निघून तो त्या खोलींत आला व चित्रांचें पुस्तक कोठें आहे ह्मणून त्यानें विचारलें. पुस्तक पाहण्यास मागण्याची त्याची ही प्रथमच खेप होती.

आनंदीबाईनें बाळ्याच्या आंगावरून हात फिरवून त्यास

आपले जवळ बसविलें व त्यास कांहीं चित्रें दाखविलीं. तीस माहीत होतें कीं, मुलांस ऋ, ऌ, छ, झ, ध वगैरे मूळाक्षरें, व श्री, म्र, थ्व, क्ष, ज्ञ, श्य, ह्य वगैरे जोडाक्षरें प्रथमच काढायास लावून त्यांस कंटाळा आणणें व त्यांस तीं काढतां न आलीं ह्मणजे, अथवा र, ञ, ङ्, प, क्ष वगैरे अक्षरांचा बरोबर उच्चार करण्यासाठीं उरस्फोड करून तीं त्यांस बरोबर उच्चारतां न आलीं ह्मणजे, अथवा शांताकारं भुजगशयनं ह्मणतां आला नाहीं ह्मणजे, संताप करून वेणें अथवा त्यांस धोपटीत सुटणें यांत शहाणपणा नाहीं. मुलें वर्ष सहा महिने उशिरां वाचण्यास, लिहिण्यास अथवा ह्मणण्यास शिकलीं असतां फारसें अहित आहे असें नाहीं. प्रथम या गोष्टींविषयीं त्यांच्यामध्यें आवड उत्पन्न करणें, ही महत्त्वाची गोष्ट आहे.

ज्या वस्तूंपासून मुलांस मौज वाटून थोडा बोध होतो त्या वस्तु त्यांस प्रथम देणें चांगलें, असें समजून आनंदीबाईनें कांहीं जिनसा विकत घेण्याचें मनांत आणिलें. जरी यशोदाबाईस, मुलांस स्वतः शिकविण्यास मनापासून कंटाळा होता, तरी, त्यांस लिहितां वाचतां यावें अशी तिची फार इच्छा होती; ह्मणून या कामासाठीं लागेल तो खर्च करण्यास तिची तयारी होती. हें समजून आनंदीबाईनें प्रथम चित्रांचीं पुस्तकें व पत्ते आणिले. मुलांस चित्रें पाहण्याची व पत्ते खेळण्याची मोठी हौस असते.

जीं जनावरें, पक्षी, अथवा झाडें मुलांच्या पाहण्यांत येतात किंवा त्यांस स्वल्पायासानें दाखवितां येतात त्यांचीं चित्रें तिनें पैदा केलीं. तीं कशाचीं आहेत, हें त्यांवर मोठ्या अक्षरांनीं लिहिलेलें होतें; व त्यांचे ठळक ठळक भाग हे अक्षरांनीं दाखविले होते. पत्त्यांवरही नांवें मोठ्या अक्षरांनीं लिहिलीं होतीं. बाळयास या चित्रांचा व पत्त्यांचा नाद लागत चालला. तो

उठल्या बसल्या पत्ते व चित्रें चाळीत असे. यामुळें पुष्कळ अक्षरें रोजचेरोज शेंकडों वेळां त्याचे नजरेखालून जात. त्यांपैकीं त्यास कांहीं येऊं लागलीं. जेवढीं येत नसत, तेवढीं आनंदीबाई कागदावर काढून भिंतीवर डकवून ठेवी. अशा रीतीनें कांहीं दिवस लोटल्यावर, छापखान्यास सुट्टीचा दिवस पाहून सर्व मुलांस छापखाना दाखविण्यास आनंदीबाई घेऊन गेली. तेथें छापण्याचा कारखाना पाहून बाळ्यास कौतुक वाटलें. शेजारील खोल्यांतून कांहीं खिळे जुळलेले व कांहीं सुटे पडले होते. ते पाहून तो कांहीं उचलून घ्यावयास लागला. इतक्यांत आनंदीबाई ह्मणाली बाळ, तूं वेडा का आहेस ? दुसऱ्याच्या जिनसांना विचारल्याशिवाय हात लावणें चांगलें नाहीं. तें काय आहे ह्मणून विचारल्यावर आनंदीबाईनें त्यास खिळ्यांचा उपयोग काय आहे तो समजावून सांगितला; तेव्हां बाळ्या ह्मणाला तुह्मी ते मला घेऊन देत असलां तर मी घरीं येतों. आनंदीबाईनें खिळे घेऊन देण्याचें कबूल केलें. कारण, हें तिच्या मनांत कर्तव्यच होतें. दुसरे दिवशीं बाळ्यानें पुन्हां गोष्ट काढिल्यावर आनंदीबाई मुलांसह बाहेर गेली. ती ह्मणाली, मी आज तुह्मांस मोठी मौज दाखवीन. असें सांगून ती त्यांस एका कारखान्यांत घेऊन गेली. तो नवीनच स्थापन झाला होता. त्यांत मुलांचे निरनिराळे प्रकारचे खेळ, लहान यंत्रें, हत्यारें, चित्रें, वगैरे जिनसा होत्या. त्या दिसण्याला सुबक असून थोड्या किमतींत मिळण्यासारख्या व उपयुक्त होत्या. त्या पाहत पाहत बाळ्या व माई इकडे तिकडे थोडा वेळ हिंडल्या; परंतु त्यांचे मनाजोगी जिन्नस त्यांस सांपडली नाहीं. बाळ्या ह्मणाला, मला येथें कांहीं एक मौज वाटत नाहीं. येथें चाबूक नाहीं, संत्री नाहीं, किरकिरें नाहीं, वाजा नाहीं, घोडा नाहीं, कांहीं एक नाहीं.

माई ह्मणाली या जिनसा काय हिडिस. येथें बाहुली नाहीं, गवळण नाहीं किंवा कांहीं नाहीं. हत्यारें घेऊन काय करावयाचें आहे? आह्मांस कां सुतार बनावयाचें आहे? मावशीबाई ह्मणाल्या मौज दृष्टीस पडेल ह्मणून मी येतें ह्मटलें; परंतु येथें तर कांहींच नाहीं.

अशा प्रकारें मुलांनीं कारखान्यांतील जिनसांवर चरचरीत टीका केली. आनंदीबाईनें ती ऐकली न ऐकल्यासारखें केलें. इतक्यांत एक गाडी बाळ्याच्या दृष्टीस पडली. गाडीला घोडा नव्हता, ह्मणून तोच स्वतः घोडा होऊन आपणाला मारीत मारीत गाडी ओढीत चालला. आनंदीबाईनें बाळ्याला अक्षरें जुळून लिहितां यावीं ह्मणून मोठमोठाले खिळे विकत घेतले. माई-करितां शिवण्याचें यंत्र, दोरा व सुया हीं घेतलीं. तीं अशा साठीं कीं तिला शिवणकलेचा नाद लागावा. स्त्रियांस ही कला येणें फार अवश्य आहे. हें शिक्षण त्यांस मिळाल्यापासून प्रपंचांत फार उपयोग होऊन भूषण असतें, असें आनंदीबाईस अनुभवावरून समजून आलें होतें. बाळ्या व माई यांकरितां जिनसा विकत घेतलेल्या पाहून काशी ह्मणाली मावशीबाई, मजकरितां नाहीं कां कांहींच घेत? काशीस चित्रें काढण्याचा थोडासा नाद होता हें आनंदीबाईस माहीत होतें; ह्मणून तिनें तिजकरितां कांहीं नकाशे, चित्रें व चित्रकलेचें शिक्षण देण्यास जीं साधनें लागतात तीं, असें सर्व सामान कारखान्यांतील नोकराबरोबर पाठवून देण्यास दुकानदारास सांगितलें. हें चाललें असतां मला हें पाहिजे, मी हें खाणार, असे शब्द लांबून ऐकूं आले. तेव्हां काशी ह्मणाली मावशीबाई, तो पहा बाळ्या कारखान्यांतील मनुष्याबरोबर झोंबी घेत आहे, व त्याचे हातांतून कांहीं हिसकावून घेत आहे. हें पाहून आनंदीबाई तिकडे लवकर गेली;

२

व बाळ्या टोमाटोचें बीं खाण्याच्या बेतांत आहे असें तिच्या दृष्टीस पडलें. तेव्हां तिनें त्याचा हात धरिला व सांगितलें कीं बाळ, हें बीं आहे. हें, जमीन खणून तींत पेरिलें असतां चांगलें फळ येतें व तें खाण्याला रुचकर लागतें. बीं खाल्लें तर गोड लागत नाहीं. तुला पाहिजे असल्यास खाऊन पहा. त्यावरून बाळ्यानें तें लागलींच तोंडांत टाकिलें व तोंड वेडें वांकडें केलें. तो रागावून ह्मणाला मावशीबाई, हें नको, तें नको, असें ह्मणून तुह्मी मला कांहींच देत नाहीं, तर मला आतां कांहींच नको. आनंदीबाईनें त्याची समजूत घालून टोमाटोचें बीं, एक लहान कुदळ व खोरें अशा जिनसा घेतल्या. मुलें जी जी चमत्कारिक वस्तु पाहतात ती ती मागत सुटतात, असा साधारण नियम आहे. त्याप्रमाणें मुलांनीं पुष्कळ जिनसा मागितल्या. त्यांपैकीं कांहीं घेऊन देण्याविषयीं आनंदीबाईस मोह उत्पन्न झाला होता; परंतु पूर्वींच ज्या घेतल्या होत्या, त्यांपेक्षां जास्त घेणें तीस प्रशस्त वाटलें नाहीं. कारण, मुलांच्या मनाप्रमाणें आणखी निरनिराळ्या जिनसा घेऊन त्यांचें प्रेम संपादन करणें तीस बरें वाटलें नाहीं. नवीन नवीन जिनसा फार घेऊन दिल्या असतां, मुलांची तृप्ति न होऊन पुनः नवीन जिनसा ते मागतील अशी भीति असते, हें तीस माहीत होतें. मुलांमध्यें उद्योगाविषयीं आवड उत्पन्न करणें व स्वतंत्र व उपयुक्त काम करण्याविषयीं त्यांस गोडी लावणें, हा तिचा मुख्य हेतु होता. हा हेतु मनांत आणून व मुलांचे मनाची स्थिति लक्षांत आणून त्याप्रमाणें तिनें बहुतेक जिनसा विकत घेतल्या होत्या. बाळ्यानें कांहीं चमत्कारिक अथवा खाण्याचा पदार्थ मागितला असतां तो त्यास कोणी घेऊन देत नसे इतकेंच नाहीं, तर, जो तो त्यास दाबीत असे; ह्मणून तो कधीं हट्ट धरून, कधीं लुबाडून, अथवा कधीं चोरून

घेत असे. परंतु या वेळेस आपण मागितलेल्या कांहीं जिनसा आनंदीबाईनें घेऊन दिल्या, हें पाहून त्यास फार आनंद झाला. त्यानें आनंदीबाईचा हात धरिला व शेजारीं एक स्टूल होतें तें पुढें करून ह्मणाला मावशीबाई, तुह्मी यावर थोडा वेळ बसा. मी सर्व कारखाना पाहून लवकर येतों. काशी इकडे तिकडे पाहत फिरत असतां, बाळमित्र व इसापनीति हीं पुस्तकें तिच्या दृष्टीस पडलीं. तीं चाळून पाहून ती आनंदीबाईस ह्मणाली, मावशीबाई, हीं पुस्तकें तुह्मास आवडणार नाहींत असें मला वाटतें; कारण, हीं गोष्टींचीं पुस्तकें दिसतात. आनंदीबाईनें उत्तर केलें कीं, नुसत्या नांवावरून पुस्तकांची परीक्षा करूं नये. कादंबरीचें अथवा गोष्टीचें पुस्तक एवढ्यावरून तें टाकून देणें चांगलें नाहीं; त्यांतील विषय उपयुक्त व व्यवहारास लागू आहे किंवा नाहीं व भाषा सुबोध व सभ्यपणाची आहे किंवा कसें हें पाहिलें पाहिजे. मराठी भाषेंत असलीं पुस्तकें फारच थोडीं दृष्टीस पडतात. हीं मी तुह्मांस घेऊन देणार होतें, परंतु बाळाच्या धांदलींत मला त्यांचें विस्मरण पडलें. तूं त्यांचें नांव काढलेंस हें चांगलें केलेंस. हें बोलणें चाललें असतां बाळ्या धांवत धांवत त्यांजकडे आला. तें पाहून आनंदीबाईस वाटलें कीं, त्याच्या मनांत कांहीं जिन्नस घेण्याचें आलें असावें; परंतु तसा प्रकार कांहीं नव्हता. बराच वेळ झाल्यामुळें त्यास कंटाळा येत चालला होता; व घरीं जाऊन जमीन खणून तींत टोमाटोचें बीं पेरीन केव्हां असें त्यास झालें होतें. घरीं जाऊन पोहोंचतांच त्यानें कोट व टोपी हीं कुळंबिणीचे अंगावर फेंकून दिलीं व तो, आनंदीबाई माजघरांत यशोदाबाईपाशीं बोलत उभी होती तिकडे गेला. तेथें कांहीं वेळ तो उभा राहिला व ह्मणाला मावशीबाई, बियांचा पुडा मीच घेऊन आलों आहें. पाण्याची

झारी व कुदळ आली का? मीच तपास करणार होतों, परंतु नोकरांपाशीं किंवा घरांतील दुसऱ्या माणसांपाशीं तूं कांहीं मागत जाऊं नकोस असें तुह्मीं मला परवां सांगितलें, ह्मणून मी कोणापाशीं बोललों नाहीं. बाळ्या इतक्या नम्रपणानें कधींही बोलला नव्हता; ह्मणून त्याचे आईस फार आश्चर्य वाटलें, व आपण सांगितलेली गोष्ट ऐकून तिजप्रमाणें बाळ्या वागला हें पाहून आनंदीबाईसही फार आनंद झाला. चाकर नोकर अथवा घरांतील मंडळी ह्यांबरोबर बाळ्याचे नेहमीं तंटे होत; व त्यांनीं त्याचें ऐकिलें नाहीं ह्मणजे तो हट्ट धरून बसे. अशा प्रकारें तंटे करण्याचे अथवा हट्ट धरून बसण्याचे प्रसंग वारंवार न यावे ह्मणून, व त्यास जी संवय लागली होती ती हळू हळू नाहींशी व्हावी ह्मणून, आनंदीबाईनें बाळ्यास ताकीद दिली होती. परंतु त्याजपासून कबूल करून घेतलें नव्हतें. कित्येक आईबाप वारंवार मुलांपासून एखादी गोष्ट न करण्याविषयीं कबूल करून घेतात. अज्ञानामुळें वचन देण्यास मुलांची जितकी तयारी असते, तितकी तें मोडण्याविषयींही असते. यामुळें वचनाचें महत्त्व किती आहे हें त्यांचे लक्षांत येत नाहीं. असें होणें फार वाईट आहे, हें आनंदीबाईस माहीत होतें. मुलांस उद्योग नसला ह्मणजे तीं रस्त्यांत जाऊन मुलांबरोबर खेळतात व कलागती करितात, किंवा चाकर नोकरांबरोबर तंटे करितात; ह्मणून तिनें मुलांचे मागें निरनिराळे प्रकारचे उद्योग लावून दिले. चाकर नोकर वगैरे अशिक्षित लोकांच्या सहवासानें मुलांस हांजी हांजी करून घेण्याची संवय लागते. आपणांस पुष्कळ गोष्टी माहीत नाहींत, हें मोठ्यांच्या सहवासानें त्यांस कळून येऊन त्यांच्यांतील ताठरपणा कमी होतो हें लक्षांत आणून आनंदीबाई, काशी वगैरे मुलांस इतर मुलांबरोबर अथवा

नं। ०२

चाकरांबरोबर कारणाशिवाय सहवास ठेवूं देत नसे. तिनें मुलांचे मागें अशा रीतीनें उद्योग लावून दिले होते कीं, क्षणोक्षणीं त्यांजवर नजर ठेवण्याचें कारण न पडतां, तीं काय करीत आहेत हें मात्र आपणास समजावें. मुलांनीं एखादी देण्यासारखी वस्तु मागितली असतां, ती त्यांस लागलींच देत असे; ह्मणून कोणतीही वस्तु लागली असतां यशोदाबाईचीं मुलें प्रथम आनंदीबाईजवळ मागत. बाळ्यानें झारी व खोरें मागितल्याबरोबर आनंदीबाईनें तीं त्यास दिलीं व तो लागलींच खणावयास लागला. यशोदाबाईचे घराचे पिछाडीस मोठें आवार होतें; त्यांत झाडें पुष्कळ होतीं; व एक मोठी विहीर असून रहाट गाडगेंही होतें; परंतु त्याची व्यवस्था नीट नव्हती. जागा पुष्कळ, विहिरीला पाणी पुष्कळ, व काम करण्यास नोकर चाकर पुष्कळ इतकीं साधनें असतां, रोजचे रोज भाजीपाला व फुलें विकत घ्यावीं लागत यांत नवल नव्हतें. कारण, यजमानिणीचेंच घरांत लक्ष नाहीं, तर चाकरमाणसें असल्या कामांकडे कशाला लक्ष देतील? तीं फक्त तिचे पुढें पुढें करून एरवीं स्वस्थ बसतील हें उघड आहे.

शिमगा व ताबूत ह्या दिवसांत लहान मुलांची व अज्ञान लोकांची फारच धांदल असते. ह्या दिवसांत ठिकठिकाणीं जितकी चळवळ असते, तितकी दुसरे दिवसांत बहुतकरून नसते. ह्या दिवसांत शहर जितकें दणदणून जातें, तितकें दुसरे दिवसांत जात नाहीं. यात्रा, रथोत्सव, दसरा वगैरे कारणांमुळें मेळा जमून शहर गजबजून राहतें; परंतु ती धांदल पुष्कळ अंशीं सौम्य प्रकारची असते. ह्या दिवशीं गडबड असते; परंतु ती निराळ्या प्रकारची असते. तींत अचकट विचकटपणा अथवा बीभत्सपणा प्रायः नसतो, किंवा दांडगाईचा प्रकार फारसा न-

सतो. ताबुताचे दिवसांत सोंगें घेऊन नाचणें, हें कित्येक मुसलमान लोकांससुद्धां पसंत नाहीं. ताबूत तयार करणें व ते मिरविणें हेंसुद्धां त्यांपैकीं कित्येकांस संमत नाहीं. हें करणें धर्मकृत्य आहे असें कांहींस वाटत नाहीं, असें असून हिंदु लोकांनीं सोंगें घ्यावीं, शहरांतून नाचत बसावें व तमासगीर जमवावे, व स्वतःचा तमाशा लोकांस दाखवावा व आपलें हसूं करून घ्यावें, यासारखा मूर्खपणा तो कोणता? स्वतःचीं हजारों दैवतें असतां ताबूत दैवत ह्मणून समजावें, फकीर व्हावें, रेवड्या उधळाव्या व तमाशा पहावा हें वेड नाहीं काय? तमाशे करणारे पुष्कळ असले ह्मणजे, तमासगिरांनीं विचार करूं नये का? तमासगिरांपैकीं पुष्कळ समंजस आहेत. त्यांनीं ह्या गोष्टीचा विचार करणें अवश्य आहे. जर ताबूत करून ते मिरविणें हा धर्म आहे असें मुसलमान लोक मानीत असतील, तर ते मानोत; परंतु घरीं सोंगें असतां हिंदु लोकांनीं आणखी सोंगें घेऊन आपला वेडेपणा जगास कां दाखवावा हें समजत नाहीं. मुसलमान लोकांच्या दुसऱ्या कांहीं चांगल्या चाली असतां त्यांचा स्वीकार न करणें, व धिंगाणा करण्याच्या चालीचें अनुकरण मोठ्या हौसेनें करणें बरें आहे का? सोंगें घेऊन धिंगाणा करण्याची तरी चाल त्यांची मूळची असेल असें वाटत नाहीं. ह्या चालीस हिंदु लोकांकडून सहाय्य मिळून ती बलवत्तर होत गेली असावी असें वाटतें. ताबुताच्या दिवसांत जो धिंगाणा हिंदु लोक करितात, त्याचें कौतुक समंजस मुसलमान करीत असतील असें वाटत नाहीं. कारण, त्यांपैकीं जे धार्मिक आहेत त्यांची वृत्ति शांत व गंभीर असते. ते गंभीरपणानें जातात व गंभीरपणानें परत येतात. ताबुतांस तमाशाचें रूप आणण्याचें श्रेय हें प्रायः आमचे लोकांनीं घेतलें आहे. अझूनही आह्मीं या बाबतींत विचार करूं नये का? आतां

जर विचार करूं नये तर करावा तरी केव्हां? मोठा मेळा एकत्र जमणें चांगलें; परंतु नाचण्यासाठीं अथवा तमाशा पाहण्यासाठीं नको आहे. शहरांत चळवळ व हालचाल पाहिजे; परंतु तमाशा करण्यासाठीं व आपलें हसूं करून घेण्यासाठीं नको आहे. जर आपणच मोठ्या हौसेनें तमाशा पाहतों, तर मुलांस ह्याची गोडी वाटेल ह्यांत काय नवल आहे? आपल्या चांगल्या कृतीपेक्षां वाईट कृतीचें अनुकरण मुलें तेव्हांच करितात; सौम्य गोष्टीपेक्षां धिंगाण्याचें त्यांस मोठें कौतुक वाटतें; व सौम्य गोष्टीपेक्षां विलक्षण गोष्टींचा ठसा त्यांचे मनावर लवकर उमटतो.

ताबुताचे संबंधानें जसा प्रकार सांगितला, तसा, किंबहुना जास्ती मूर्खपणाचा प्रकार शिमग्याचे दिवसांत दृष्टीस पडतो. परंतु ह्याबद्दलही समंजस लोकांपैकीं कांहीं कैवारी दृष्टीस पडावे हें आश्चर्य आहे. आंगाला राख फासणें, मातीनें आंग भरविणें, गुलालानें कपडे व आंग लाल करणें, गोवऱ्या व लांकडें चोरणें, कमेटीचे खांब उपटणें व कंदील फोडणें, लोकांच्या सामानाची नासधूस करणें, तांबेचेतांबे रंग उडवून कपडे व आंग खराब करणें, शंखध्वनि करून घसा कोरडा करून घेणें, अचकट विचकट शब्द उच्चारून जिव्हा विटाळणें, मातृत्रयी अथवा पितृत्रयी ह्यांचा उद्धार करणें अथवा करवून घेणें, व तमाशे करण्यांत अथवा पाहण्यांत पुरुषार्थ मानणें, तात्पर्य, ज्या गोष्टी रानटी लोकांस देखील शोभत नाहींत, किंवा जें आचरण पशुवत् आहे असें आपण एरवीं समजतों व त्याचा तिटकारा करतों, त्या गोष्टी व तें आचरण ह्या वेळीं करण्यास आपणास हौस वाटावी, ह्या गोष्टी झाल्या नाहींत ह्मणजे शिमगा गाजला नाहीं असें समजून आपण खेद मानावा, व आपल्या घाणेरड्या कृतीचें अनुकरण

मुलांस करावयास लावावें व तीं चटोर निघालीं ह्मणून रडगाणें गात बसावें, हें वर्तन शहाणपणाचें आहे असें कोणी ह्मणेल का ?

हे सर्व विचार आनंदीबाईचे मनांत घोळत असत. वरील बहुतेक प्रकार धर्मांच्या नांवानें होत आहे, हें समजून तीस आश्चर्य वाटे; व हिंदु लोकांच्या मनाची निकृष्ट स्थिति फार झाली आहे हें समजून तीस वाईट वाटत असे. लोकांनीं सण करूं नयेत किंवा विश्रांति घेऊं नये असें तिचें मत नसे. सण करावा, विश्रांति घ्यावी व आनंदोत्सव करावा; परंतु त्यास मर्यादा आहे; व तें रीतीनें करावें. पशुवत् आचरण करणें ही रीत नाहीं, ही मर्यादा नाहीं, किंवा हा आनंद नाहीं. संक्रांत, दसरा, दिवाळी वगैरे सणांचे संबंधानें नांव ठेवण्यासारखें कांहीं नसतें. मग शिमग्याचे दिवसांत आपलें मनुष्यपण कां विसरावें, व ह्याविषयीं लोकांनीं अद्याप विचार कां करूं नये, ह्याबद्दल राहून राहून तीस नवल वाटत असे. इतर बहुतेक सण व शिमगा ह्यांविषयीं विचार करतां, शिमग्याचा सण व इतर बहुतेक सण हे मूळचे एकाच लोकांचे असावेत असें दिसत नाहीं. हिंदुस्थान देशांत आर्य लोक येण्यापूर्वीं मूळचे लोक राहत असत. भिल्ल, खोंड, सोंठल वगैरे हे मूळचे लोक होत. शिमगा हा सण मूळच्या लोकांचा असून आर्य लोकांपैकीं कांहीं अज्ञान लोकांस तो बरा वाटून प्रचारांत येत येत तो पसंत पडला असावा; व लोकसमाजास पसंत पडल्यामुळें त्याचा शास्त्रांत प्रवेश झाला असावा. ज्या लोकांस सौम्य गोष्टीपासून आनंद होतो व जे लोक दिवाळी, दसरा वगैरे सौम्य प्रकारचे सणांत आनंद मानतात, तेच लोक धिंगाणा करण्यांत व रानटी लोकांप्रमाणें आचरण करण्यांत आनंद मानीत असतील हें कमी संभवतें. शिमग्याचा सण हा मूळचा आहे असें जरी घेऊन

चाललें, तरी तो मूळचा आहे एवढ्याच कारणावरून त्याचें अवलंबन करणें व त्यांतील बीभत्स व मूर्खपणाचा प्रकार न मोडणें हा असमंजसपणा आहे असें आनंदीबाईस वाटे. वरील सर्व विचार तिचे मनांत येण्यास कारण उत्पन्न झालें. ती यशोदाबाईचे घरीं आल्यावर व तिचे मुलांचे शिक्षणाचें काम तिनें हातीं घेतल्यावर थोडे दिवसांनीं शिमग्याचा सण आला. पौर्णिमेचे दिवशीं आकाश निरभ्र होतें; चांदणें शुभ्र पडलें होतें; ठिकठिकाणीं होळ्या पेटल्या होत्या; होळ्यांभोंवतीं मुलें जमा होऊन मोठ्यानें ध्वनि करीत होतीं; जाणाऱ्या येणाऱ्याच्या नांवाचा उद्धार चालू होता; कांहीं लोक पागोटीं घालून व कांहीं तसेच होळ्या पाहण्याकरितां घराबाहेर पडले होते. अशी रस्तोरस्तीं एकच गर्दी चालू होती. यशोदाबाईचे घरची होळी संध्याकाळींच झाली होती व ती जेवणखाण करून आपले शेजारणीचे घरीं गेली होती. आनंदीबाई वाचीत होती; काशी व माई निजल्या होत्या; परंतु बाळ्या जागा होता, कारण त्यास होळ्या पाहण्याची फार इच्छा होती. तो, आई बाहेर जाण्याची वाट पाहत होता. आनंदीबाई नुकतीच आल्यामुळें त्यास तिचा विशेष धाक नव्हता. खालून वर, व वरून खालीं, असें त्याचें भ्रमण चालू होतें. इतक्यांत त्याचे दारावरून मुलांचा मेळा चालला. मुलांचा ओरडा ऐकून बाळ्या बाहेर आला. त्यास पाहतांच मुलांनीं ध्वनीवर ध्वनि चालविला. या मेळ्यांत बाळ्याचे खेळगडी होते. त्यांपैकीं एकानें त्याचा हात धरून त्यास खालीं ओढिलें. दुसऱ्यानें त्यास गचांडी देऊन एका मुलाच्या आंगावर लोटून दिलें, तेव्हां तो बाळ्याच्या आंगावर चवताळून आला. बाळ्या जात्या हूड होता. त्याचे खाण्यापिण्याविषयीं चांगली व्यवस्था असल्यामुळें, व घरांतील माणसांचा अथवा

शाळेचा धाक नसल्यामुळें त्याचे वयाचे मानानें पाहतां त्याचें शरीर मजबूत होतें. मुलगा त्याचे अंगावर आल्याबरोबर त्यानें धिंगामस्तीस सुरुवात केली. परंतु मुलें पुष्कळ असल्यामुळें त्याचा इलाज चालला नाहीं. मुलांनीं त्यास ओढीत नेलें. मी आईला विचारून आलों नाहीं, मावशीबाई मला रागें भरतील असें त्यानें सांगितलें, परंतु व्यर्थ. मुलांस बाळ्याचे आईची अथवा मावशीबाईची भीति बाळगण्याचें कारण नव्हतें. त्यांनीं त्यास ओढीत नेलें. बाळ्याचे मनांत जावयाचें होतें, ह्मणून त्यानें फारसे आढेवेढे घेतले नाहींत. नंतर मुलांचा मेळा होळ्या पाहत पाहत मोठा रस्ता सोडून गल्लींतून चालला. बोळांत गेल्यावर मुलांनीं पुनः दांडगाई करण्यास सुरुवात केली. त्यांपैकीं चौघांनीं एका मुलास उचलून नदीचा रस्ता धरिला. त्यांबरोबर आणखी कांहीं मुलें गेलीं. बाकीच्या मुलांना हें पसंत पडलें नाहीं. गल्लींत दोन तीन गाढवें उभीं होतीं. त्यांपैकीं एकावर एक मुलगा बसला. बाकीचे बिचाऱ्या गाढवास मारीत मारीत मागून चालले. पाळीपाळीनें बहुतेक मुलगे गाढवावर बसले. बाळ्याची पाळी आल्यावर तोही गाढवावर बसला; परंतु बसतां बसतां खालीं पडला. तेव्हां मोठा हशा पिकला. मोठ्या मुलांनीं बाळ्यास उचलून गाढवावर बसविलें. बाळ्या चालला असतां मुलांनीं धूळ उडविण्यास आरंभ केला. अशा रीतीनें मुलांनीं बराच वेळ दांडगाई केली. शेवटीं तीं आपआपल्या घरीं गेलीं. बाळ्याही मागल्या वाटेनें घरांत आला व निजला. वरील कांहीं प्रकार एका गृहस्थाचे दृष्टीस पडला होता. हा गृहस्थ यशोदाबाईचे नवऱ्याचा स्नेही होता. हा प्रकार पाहून त्यास फार वाईट वाटलें. दुसरे दिवशीं त्यानें यशोदाबाईस ही सर्व हकीकत कळविली. तीस फार राग आला. तो

गृहस्थ गेल्यावर यशोदाबाईनें बाळ्यास बोलाविलें. बाळ्या आल्यावर तिनें त्याचे थोबाडींत मारिलें. नंतर झाडाचा फोक काढून दोन तीन फोक त्याचे पाठीवर ओढिले. तो मोठ्यानें ओरडूं लागला; परंतु यशोदाबाई फार रागावलेली असल्यामुळें त्यास सोडविण्याची कोणाची छाती झाली नाहीं. बाळ्याचें ओरडणें ऐकून आनंदीबाई खालीं आली; व पाहते तों बाळ्या घामाघूम होऊन जमिनीवर पडला आहे व त्याचे आंगावर वळ उठले आहेत असें तिचे दृष्टीस पडलें. तेव्हां तीस फार वाईट वाटलें. तिनें प्रथम बाळ्यास उठवून दूर केलें. नंतर ती यशोदाबाईस ह्मणाली, काय हा अविचार? बरें तर बरें, नाहीं तर, छडी वर्मी लागून मुलाची काय स्थिति झाली असती? यशोदाबाई रागांतच होती. तिनें उत्तर केलें, तुह्मास ह्या पोराची कृति माहीत नाहीं; नाहीं तर, तुह्मी असें बोललां नसतां. असला पोरगा असण्यापेक्षां नसला तर बरें. चांगलीं मुलें असलीं तर बरें, नाहीं तर, असलीं मुलें असून काय करावयाचें आहे? आज हा गाढवावर बसला; उद्यां लोकांचीं घरें जाळील. हा काय करील ह्याचा नियम सांगवत नाहीं. ह्यास कोणाचा धाक नाहीं. असें बोलून यशोदाबाईनें सर्व हकीकत सांगितली.

यशोदाबाईनें सांगितलेली हकीकत ऐकून आनंदीबाईस वाईट वाटलें. ती ह्मणाली यशोदाबाई, तुह्मी ह्मणतां हें सर्व खरें आहे; परंतु मुलांस अविचारानें शिक्षा करणें चांगलें नाहीं. त्यांस धोपटीत सुटणें हें तर फारच वाईट आहे. मुलांस धाक असावा व त्यांस जरब असावी, ह्या गोष्टी खऱ्या आहेत; परंतु ह्यांस तरी मर्यादा आहे व ह्या तरी रीतीनें झाल्या पाहिजेत. दुसरें असें कीं, मुलांस शिक्षा करण्यापूर्वी त्यांचा स्वतःचा दोष कितपत आहे, ह्याविषयीं विचार केला पाहिजे. ज्या ठिकाणीं त्यांचा स्व-

तःचा दोष आहे, त्या ठिकाणीं त्यांस शिक्षा करणें बरोबर आहे; परंतु ज्या ठिकाणीं सामाजिक स्थितींतील दोषामुळें त्यांचे हातून अपराध झाला आहे, त्या ठिकाणीं त्यांस धोपटीत सुटण्यांत अर्थ नाहीं. त्यांस स्वतःस त्या दोषाविषयीं वाईट वाटलें पाहिजे. रथ ओढणें हें पुण्यकर्म आहे व हें करणें चांगलें आहे, असें समजून मोठालीं माणसें ओढावयास लागतात, तर मुलांसही तीच इच्छा होणें स्वाभाविक आहे. पोरस्वभावाप्रमाणें बाललीला करण्याची हौस वाटणें स्वाभाविक आहे. तुह्मी दांडगाई करा असें सांगावयास नको. रथ ओढावयास लागलें असतां धक्काबुक्की अथवा हिसकाहिसक व्हावयाचीच, व ह्यांत कौतुक वाटून त्यांचे हातून थोडीशी दांडगाई होणें हें आश्चर्य आहे असें नाहीं; न होणें हें आश्चर्य आहे. त्याचप्रमाणें ताबुताचे अथवा शिमग्याचे संबंधानें गोष्ट आहे. शिमग्याचे दिवसांत बीभत्स प्रकार करण्यांत अथवा मूर्खपणाचें आचरण करण्यांत कित्येक मोठ्या माणसांस हौस वाटते, निदान तीं कानाडोळा करतात, अथवा ह्याबद्दल आपणांस वाईट वाटतें असें दाखवीत नाहींत, ह्मणून मुलांस हौस वाटते व तीं दांडगाई करतात ह्यांत आश्चर्य नाहीं. बाळानें काल जो अपराध केला, त्यास तो कारण नसून सामाजिक स्थिति कारण आहे. ही स्थिति सुधारली पाहिजे, ह्मणजे असले अपराध होण्याचे प्रसंग कमी येतील; किंवा त्यासच वाईट वाटलें ह्मणजे त्याचे हातून दोष होण्याचा संभव कमी होईल. सामाजिक स्थिति एक दोन दिवसांत सुधारेल अशी आशा नाहीं. ही स्थिति सुधारण्यास लोकमतांत बदल झाला पाहिजे. लोकमत ह्मणजे समाजांतील बऱ्याच व्यक्तींचें मत होय. हें मत बदलण्यास काल लोटला पाहिजे. हें मत बदलणें एकट्याचे स्वाधीन नाहीं. परंतु ज्यानें त्यानें आपल्या मुलांवि-

षयीं विचार करणें व त्यांस वाईट वाटविणें ही गोष्ट स्वाधीनची आहे. हें प्रत्येकास करितां येण्यासारखें आहे. मुलांस धोपटीत सुटण्यांत अर्थ नाहीं. मार खाऊन खाऊन तीं कित्येक वेळां कोडगीं होतात. मार खाण्याचें भय नसलें ह्मणजे, तीं मूर्खपणाचें आचरण करण्यास पुनः प्रवृत्त होतात; व जें कार्य व्हावयाचें तें होत नाहीं, किंवा क्षणिक असतें. ज्या गोष्टींमुळें त्यांची वृत्ति चंचल होते व त्यांस मूर्खपणाचें आचरण करावेंसें वाटतें, त्या गोष्टी त्यांच्या नजरेपुढें असूं नयेत. असें होण्यासारखें नसेल, तर त्या गोष्टींविषयीं त्यांचे मनांत तिरस्कार उत्पन्न झाला पाहिजे. असें झालें ह्मणजे, त्यांचें त्यांस वाईट वाटून निरंतरचें कार्य होण्याचा संभव विशेष असतो.

**यशोदाबाई.**—तुमची समजूत काय असेल ती असो. मुलांना मार मिळाल्याशिवाय तीं वठणीवर येत नाहींत. मार मिळण्याची भीति त्यांस असली पाहिजे. बाळ्यासारखे मुलांना वाईट वाटणें ही गोष्ट कठीण आहे.

**आनंदीबाई.**—मारण्यापासून कधींच उपयोग होत नाहीं असें मी ह्मणत नाहीं. मुलांना भीति असूं नये असेंही मी ह्मणत नाहीं. परंतु पुष्कळ वेळां असें घडून येतें कीं, ज्या गोष्टीबद्दल मारावयाचें अथवा भीति असावयाची, त्या गोष्टीचा तिटकारा न वाटतां मारणाराविषयीं तिटकारा उत्पन्न होतो. असें होणें चांगलें नाहीं, इतकेंच नाहीं, पण वाईट आहे. वाईट गोष्टीबद्दल तिरस्कार उत्पन्न व्हावा व मुलाची सुधारणा व्हावी अशी आपली इच्छा असते; मारणाराविषयीं तिटकारा वाटावा अशी आपली इच्छा नसते.

**यशोदाबाई.**—तुह्मी ह्मणतां हें सर्व खरें दिसतें; परंतु लहान मुलांस स्वतः वाईट वाटून तीं निवळल्याचें मला अनुभ-

वावरून माहीत नाहीं. मग तुमचे अनुभवास कसें आलें असेल कोण जाणे.

**आनंदीबाई.**—तुमचे उलट माझा अनुभव आहे. लहान मुलांस वाईट कर्माविषयीं वाईट वाटत नाहीं असें नाहीं. इतकेंच कीं, वाईट कर्माविषयीं तिटकारा उत्पन्न करणें तो युक्तीनें केला पाहिजे.

आनंदीबाईचे ह्या भाषणावरून यशोदाबाईची खात्री झाली नाहीं. आनंदीबाईनें सुचविलेल्या उपायावर तिचा भरंवसा पटला नाहीं. तथापि असें ह्मणणें तीस चांगलें दिसलें नाहीं. ह्मणून तुह्मास जें योग्य दिसेल तें तुह्मी करा असें बोलून ती आंग धुवावयास गेली.

आनंदीबाईनें आपणास सोडविलें नसतें, तर आपणास आईच्या हातचा फार मार खावा लागला असता, ही गोष्ट मनांत घेऊन बाळ्याच्या मनांत आनंदीबाईविषयीं प्रेम उत्पन्न झालें. आनंदीबाई त्यास घेऊन वर गेली. बाळ्यानें हूं का चूं केलें नाहीं. तो मुकाट्यानें तिचेमागून गेला व त्यादिवशीं शांत रीतीनें राहिला. अशा रीतीनें दोन तीन दिवस गेले. परंतु ही स्थिति सदोदित राहील असें आनंदीबाईस वाटलें नाहीं; ह्मणून काय उपाय करावा ह्या विचारांत ती होती. शेवटीं तीस एक उपाय सुचला व तो करण्याचें तिनें मनांत आणिलें. तिनें तीन चित्रें काढविलीं. एक, बाळ्या गाढवावर बसून चालला आहे व मुलें गाढवास मारीत मारीत त्याचे मागून चाललीं आहेत असें; दुसरें, तो गाढवावर बसून चालला असतां मुलें त्याचे आंगावर धूळ उडवीत आहेत; व तिसरें, तो गाढवावरून खालीं पडत आहे व मुलें त्यास उचलून पुनः बसवीत आहेत असें. हीं चित्रें आनंदीबाईनें तीन ठिकाणीं टांगून ठेविलीं. एक ओसरी-

वर, दुसरें माजघरांत व तिसरें माडीवर. हीं चित्रें पाहून बाळ्यास, त्या दिवसाची आठवण होत असे. ओसरीवरील चित्रावर "बाळ्या, गाढव" असें काशीनें लिहिलें होतें; व कोणीं विचारलें ह्मणजे ती सर्व हकीकत सांगत असे. यामुळें, व घरांतील कांहीं जण बाळ्या गाढव असें ह्मणत यामुळें, त्यास वाईट वाटे. त्यास या गोष्टीचा राग येत असे; परंतु त्याचा इलाज चालत नसे. त्यास त्वेप येई; परंतु आह्मी तुला कोठें गाढव ह्मणतों; बाळ्या, गाढव पहा असें आह्मी ह्मणतों, ह्याबद्दल तुला वाईट का वाटतें असें लोक ह्मणत; ह्मणून त्यास उगीच बसावें लागे. अशा रीतीनें कांहीं दिवस लोटले. आपणास गाढव ह्मणावें हें बाळ्यास आवडलें नाहीं; ह्मणून त्यानें हीं चित्रें काढून टाकण्याविषयीं आनंदीबाईस सांगितलें.

---

बाळ्यास बरेंच वाईट वाटलें आहे असें समजून आनंदीबाईनें तीं चित्रें काढून टाकिलीं. परंतु ज्या ज्या वेळेस तो मूर्खपणा करी, त्या त्या वेळेस ती पुनः चित्रें टांगून ठेवी.

एके दिवशीं यशोदाबाईचे मैत्रिणींनीं बागेंत जेवणाचा बेत केला. तेथें यशोदाबाईस जावयाचें होतें, ह्मणून ती पोषाक करून जाण्याच्या बेतांत होती. इतक्यांत माई तिजकडे धांवत धांवत गेली व ह्मणाली आई, आई, मी चोळीला कशी टीप भरली आहे ती पहा, व मग बाहेर जा.

इतक्यांत बाळ्या हातांत झारी घेऊन पळत आला व आईचा पदर धरून ह्मणाला आई, अगोदर परसांत चल. मीं हातानें खणून टोमाटोसाठीं कसा छानदार वाफा तयार केला आहे. पहा, कसा मी लाल होऊन गेलों आहें व घामाच्या धारांनीं निथळून गेलों आहें. हात पाय मातीनें काळे झालेले, तोंड लाल, व सर्वांगांतून घामाच्या धारा चालल्या आहेत, असें

बाळ्याचें रूप पाहून यशोदाबाई मागें सरली; कारण, तिनें उत्तम पोषाक केला होता व तीस वाटलें कीं, आपली छानी बिघडेल. ती ह्मणाली बाळ्या, दुरून बोल. अंगाला शिवूं नकोस. इतक्यांत तांगा दारापुढें आला आहे असें सांगण्यास काशी दिवाणखान्यांत आली. तिलाही दुसरीं चित्रें पुढें ठेवून आपण काढलेलीं चित्रें आपल्या आईस दाखविण्याची इच्छा होती. माई ह्मणाली ताई, दमधर. आईला अगोदर माझें शिवणकाम पाहूं दे; मग तूं आपलें काम दाखीव. यशोदाबाई माईचें काम पाहत क्षणभर उभी असतां तिला आनंद झाला; व आपणासाठीं मैत्रिणी वाट पाहत बसल्या असतील याचें तिला भान राहिलें नाहीं. इतक्यांत तांगेवाला वर येऊन सांगूं लागला बाईसाहेब, तांगा दारापाशीं आला आहे. हें ऐकून यशोदाबाई चपापली व मनांत ह्मणाली "काय मी वेडी; मला उशीर झाला नाहीं का ? रमाबाई व राधाबाई मला नांवें ठेवणार नाहींत का ? मला लवकर गेलें पाहिजे." परंतु मुलांस पाहून ती गोंधळल्यासारखी झाली. ती पुनः मनांत ह्मणाली, "मुलें आज किती आनंदांत दिसत आहेत. आपलें काम मला दाखविण्याची त्यांस उत्कंठा असून तें मला पाहण्याची सुद्धां फुरसत नाहीं. त्यांस घरीं टाकून मी बागेंत जेवण्यासाठीं जाणें मला शोभतें काय ? लोक मला नांवें नाहीं का ठेवणार ? बरें मला त्यांशिवाय जेवण गोड लागेल का" ? हे विचार मनांत घोळत असतां, मैत्रिणी नांवें ठेवतील ही गोष्ट लक्षांत येऊन ती जावयास लागली. हें पाहून बाळ्यानें हिरमुसल्यासारखें तोंड केलें. तें पाहून यशोदाबाई ह्मणाली बाळ्या, तूं आनंदीबाईपाशीं ऐस, मी आज लवकर येईन. असो.

यशोदाबाई गेल्यावर मुलें आपआपल्या उद्योगास लागलीं.

मुलांस नवीन खेळ, नवीन चित्रें, अथवा नवीन पोषाक, या योगानें एक दोन दिवस आनंद होतो. परंतु तेंच तें त्यांच्या दृष्टीस पडल्यामुळें त्यांस त्याचा कंटाळा येतो; व त्यांचा आनंद व त्यांची गोडी हीं कायम कशीं ठेवावीं ही पंचाईत पडते. परंतु संवयीच्या योगानें ही अडचण बरेच अंशीं दूर होते. मुलांस उद्योग करण्याची गोडी लागावी ह्मणून, आनंदीबाईनें कांहीं दिवस मुलांसाठीं निरनिराळीं कामें हुडकून काढिलीं, व जेव्हां त्यांस गोडी लागत चालली, तेव्हां उद्योग नसला ह्मणजे मनास कसा त्रास होतो हें त्यांस समजावें ह्मणून, ती त्यांस मधून मधून उद्योगाशिवाय ठेवी. तीस माहीत होतें कीं, मोठीं माणसें थोडा वेळ स्वस्थ बसतात, परंतु मुलांस उगीच स्वस्थ बसणें ही मोठी शिक्षा वाटते.

कित्येक अज्ञान स्त्रिया मुलांनीं वस्त घेतल्याबरोबर ती त्यांचे हातची हिसकावून घेतात, त्यांस रागें भरतात, शिव्या देतात, अथवा मारतात. यामुळें मुलांची वृत्ति क्षुब्ध असते व तीं सांगितलेलें ऐकत नाहींत, हें त्यांस कळत नाहीं. आनंदीबाई तसें करीत नसे. ज्या वस्तु अथवा गोष्टी त्याज्य असतील त्या त्यांच्या नजरेस न पडतील, अशी ती व्यवस्था करी. यामुळें त्यांस वारंवार दाबण्याचे व त्यांनीं न ऐकण्याचे प्रसंग कमी येऊं लागले. काशी व माई या समजूतदार होत्या, ह्मणून त्यांस रागें भरण्याचे प्रसंग वारंवार येत नसत. परंतु बाळ्या मोठा हूड व झोड होता. तो वाटेल त्याची वस्त लुबाडून घेत असे, ह्मणून आनंदीबाईनें त्याचे स्वतःसाठीं निराळ्या वस्तु घेऊन दिल्या व ती त्यांस हात लावीत नसे. काशी व माई यांनीं आनंदीबाईचा कित्ता उचलला. त्याही बाळ्याच्या जिनसाला हात लावीत नसत. यामुळें बाळ्यास आपल्या जिनसांस जपण्याची व दुस-

त्याचे जिनसांस विचारल्याशिवाय हात न लावण्याची संवय लागत चालली. आपलें व दुसऱ्याचें, असा भेद त्यास समजूं लागला. ही गोष्ट मुलांस कळणें फार महत्वाची आहे. सहिष्णुता व पराङ्मुखता हें कांहीं अंशीं सद्गुणांचें सार होय. हे गुण तरी मुलांचे स्वभावाप्रमाणें समजावयाचे. जीं मुलें थंड, मंद अथवा आळशी असतात त्यांमध्यें सहिष्णुत्व हा मोटासा गुण समजतां येत नाहीं; परंतु जीं तरतरीत, अचपळ व सळो का पळो करून सोडणारीं असतात, त्यांमध्यें सहिष्णुत्व व पराङ्मुखता असणें हा मोटा गुण आहे. कारण, त्यांस सहन करण्याचे जितके प्रसंग येतात तितके थंड मुलांस येत नाहींत.

बाळ्या बाहेर जाण्यास फार उत्सुक असे; परंतु आनंदीबाई त्यास शांतपणें उत्तर देई कीं, "तुला बाहेर नेलें ह्मणजे, तूं न विचारतां दुसऱ्याची जिन्नस उचलून घेतोस, व मला दे, मला दे असें ह्मणतोस; ही तुझी संवय जोंपर्यंत जाणार नाहीं, तोंपर्यंत तुला बाहेर घेऊन जाणें बरोबर नाहीं." हूडपणापासून आपणास गैरसोय होते, व आपणास आनंद वाटावा अशी जर आपली इच्छा आहे, तर आपणाला कांहीं नियम पाळले पाहिजेत, व आपणही आपलें कर्तव्य केलें पाहिजे, हें बाळ्यास थोडथोडें समजूं लागलें. हें शिक्षण सामाजिक शिक्षणाचा ओनामा आहे. ज्या वेळेस ही गोष्ट बाळ्याचे लक्षांत येऊन त्याप्रमाणें त्याचें वर्त्तन दिसून येऊं लागलें, त्या वेळेस प्रतीति पाहण्यासाटीं आनंदीबाई त्यास बाहेर घेऊन जाई. बाहेर निरनिराळे पदार्थ त्याचे दृष्टीस पडत; परंतु पूर्वीप्रमाणें त्याचा हूडपणा नसे, व हें मी घेऊं का, हें पाहूं का, असें विचारल्याशिवाय तो कोणत्याही जिनसेला हात लावीत नसे.

कांहीं दिवसांनीं आनंदीबाईनें बाळ्याकरितां एक पुस्तक वि-

कत घेतलें. त्यांत इमारतींचीं, यंत्रांचीं वगैरे चित्रें होतीं. तीं चित्रें पाहण्याची बाळ्यास मोठी हौस वाटे; परंतु एका घटकेंत तीं सगळीं केव्हां पाहून टाकीन असें त्यास होई. यामुळें एकाही चित्राचें स्वरूप त्याचे लक्षांत येत नसे; ह्मणून आनंदीबाई त्याला रोज एक एक चित्र दाखवी. त्यास चित्राचें नांव समजून घेण्यासाठीं मधून मधून माईस किंवा काकीस विचारावें लागे. त्या बहुतकरून सांगत; परंतु केव्हां केव्हां कंटाळा करीत. यामुळें त्यास वाटूं लागलें कीं, आपणास वाचतां आलें पाहिजे. ह्मणून तो आनंदीबाईस ह्मणाला मावशीबाई, तुह्मी मला वाचण्यास शिकवाल तर मी मोठ्या आनंदानें शिकेन. मुलाची शिकण्याची इच्छा व आनंदीबाईसारखी शहाणी व आस्थेवाइक शिक्षक असल्यावर काय कार्य होणार नाहीं? थोडेच दिवसांत बाळ्यास साधारण वाचतां येऊं लागलें. तें पाहून घरांतील मंडळीस व यशोदाबाईचे मैत्रिणींस आश्चर्य वाटलें; आनंदीबाईचा शिक्षणप्रकार त्यांस पसंत नसे; चित्रें, यंत्रें व हत्यारें विकत घेणें, कारखान्यांत जाणें वगैरे गोष्टी त्यांस विलक्षण दिसत; हीं सर्व सोंगें आहेत असें त्या ह्मणत; आनंदीबाई मुलांशीं प्रेमानें वागे, हा त्यांस मूर्खपणा वाटे; त्या ह्मणत कीं, यशोदाबाईस वेड लागत चाललें आहे; हीं मुलें कांहीं दिवसांनीं डोक्यावर बसतील; मुलांच्या इतक्या नादानें चालणें बरोबर नाहीं.

आह्मीं वर सांगितलें आहे कीं, आनंदीबाई बाळ्यास चाकर नोकर अथवा अशिक्षित लोक ह्यांबरोबर सहवास ठेवूं देत नसे; परंतु यामुळें त्यांस वाईट वाटे.

बाळ्याची शेंडी बरेच दिवसांत न विंचरल्यामुळें तिच्या जटा झाल्या होत्या. यशोदाबाईस मुलाची शेंडी विंचरणें, मुलींची

वेणी घालणें, मुलांस स्नान घालणें वगैरे गोष्टींचा मोठा कंटाळा असे. बाळ्याची शेंडी विंचरण्याचें अथवा मुलींची वेणी घालण्याचें कारण पडलें, तर ती त्यांचे केस खसा खसा विंचरी; यामुळें मुलेंही तिजकडे जाण्यास कंटाळा करीत. हें काम बहुतकरून यशोदाबाईची एक मामेबहीण करीत असे; परंतु पूर्वीप्रमाणें मुलें तिजकडे जात नसत, ह्मणून तिलाही वाईट वाटत असे. एके दिवशीं बाळ्यास तिनें बोलाविलें व ती ह्मणाली बाळ्या, चल ये इकडे; तुझ्या आनंदीबाईची परवानगी असेल तर मी तुझी शेंडी विंचरतें.

ही बहीणही थोडीशी शिकलेली होती. तिचें नांव वेणूबाई होतें. आनंदीबाई येण्यापूर्वी तीच मुलांची व्यवस्था पाहत असे; व तिचा मुलांस थोडासा लळाही होता. परंतु आपणापेक्षां आनंदीबाईची मातबरी जास्त असावी, हें तीस बरें वाटलें नाहीं; ह्मणून मुलांची व्यवस्था पूर्ववत् करावयास लागावें या हेतूनें तिनें वर सांगितल्याप्रमाणें बाळ्यास केस विंचरण्यासाठीं हाक मारिली, व प्रथम आनंदीबाईची निंदा करण्यास प्रारंभ केला. बाळ्यास ह्या निंदेचा हेतु जरी समजला नाहीं, तरी, वेणूबाईपेक्षां आनंदीबाई विशेष प्रेमानें वागविते हें त्यास माहीत होतें, ह्मणून त्यास तिच्या ह्मणण्याचा राग येऊन त्यानें उत्तर केलें कीं, तुझ्यापेक्षां आनंदीबाई पुष्कळ बरी आहे; तूं माझे केस विंचरूं नकोस; मला वाटेल तर मीच विंचरीन. असें ह्मणून तो तडक आपले आईकडे गेला. बाळ्याची मुद्रा रागीट दिसत होती, ह्मणून यशोदाबाईनें, काय झालें ह्मणून विचारिलें. आनंदीबाई तेथें होती, ह्मणून बाळ्या थोडासा गोंधळल्यासारखा झाला. परंतु आनंदीबाईच्या कानावर थोडेसे शब्द आले होते, ह्मणून तिनें त्याचे रागाचें कारण ताडिलें व

वाल्यास वेणूबाईकडे जाऊं देण्यास आपण सवड दिली हें बरें केलें नाहीं असें तिला वाटूं लागलें.

हा सर्व प्रकार ऐकून वेणूवाईस अधिक वाईट वाटलें, व तिनें आनंदीबाईस घरांतून घालविण्याचा विचार मनांत आणला. ती शेजारणींपाशीं बोलत असे कीं, " घरांत यजमानीण काय ती आनंदीबाई; ती मुलींस वाटेल तेव्हां बाहेर घेऊन जाते; वाटेल तेव्हां परत येते; व त्यांस वाचावयास व लिहावयास शिकविते; अशा कृतीनें त्या शिरजोर होतील, सासुसासऱ्यांचें ऐकणार नाहींत, फार काय, नवऱ्याची सुद्धां भीड धरणार नाहींत. आनंदीबाई घरांत शिरल्यापासून मुली विघडत चालल्या आहेत; त्यांचें ठीक चिन्ह दिसत नाहीं. " खरोखर पाहतां अशा स्थितींत राहण्यापेक्षां आपण कोठें तरी जावें हें बरें असें तीस वाटे; परंतु जावें कोठें असा विचार मनांत येऊन, व यशोदाबाईचे घरासारखें घर मिळावयाचें नाहीं ही गोष्ट मनांत येऊन, तिनें आनंदीबाईस घालवून देण्याचा विचार केला. ही गोष्ट आनंदीबाईस माहीत नव्हती. तिचा रोजचा क्रम चालू होता. एके दिवशीं काशी व माई वाचीत होत्या व तें ती ऐकत होती. इतक्यांत यशोदाबाई तेथें आली. आईस पाहून मुली थांबल्या. कारण, त्यांस वाटलें कीं, आईस कदाचित् ऐकण्याचा कंटाळा येईल. परंतु यशोदाबाईनें त्यांस वाचावयास सांगितल्यावरून त्या मोठ्या आनंदानें वाचूं लागल्या. यशोदाबाई तें लक्षपूर्वक ऐकत होती. मुलींमध्यें सुधारणा झालेली पाहून ती ह्मणाली, ' आनंदीबाई, मी तुमची फार ऋणी आहें. काशी इंग्रजी चांगलें वाचते. माईस मी इतके दिवस मंद समजत होतें; परंतु तसा प्रकार नसून तिचे शिक्षणाची प्रथमपासून मीं योग्य तजवीज ठेविली असती, तर ती खरोखर चांगलें शिकली असती.' हें ऐकून दोन्ही मुली ह्मणाल्या आई, मावशीबाई एकूण तुला आवडतात ?

'मावशीबाई खरोखर'—हे शब्द मुलींच्या तोंडांतून निघतांच यशोदाबाई ह्मणाली, आनंदीबाई, पाहिलेंतना तुह्मांवर माझ्या मुलींचें किती प्रेम आहे तें ? परंतु याबद्दल मला बिलकूल वाईट वाटत नाहीं. हें ऐकून आनंदीबाईस संतोष झाला; परंतु मुलांचें प्रेम आईबापांपेक्षां दुसऱ्यावर जास्त असणें ही गोष्ट इष्ट नाहीं; शिवाय ही गोष्ट पुष्कळ आईबापांस आवडत नाहीं; ह्मणून तिनें यशोदाबाईचे मनांतील मत्सरभाव दूर केला. आपण व यशोदाबाई एके ठिकाणीं असतां आपणापेक्षां मुलांचें लक्ष आईकडे विशेष असावें, ह्मणून तिनें मुलींस चित्रकाम व शिवणकाम यशोदाबाईस दाखविण्यास सांगितलें. असें करण्याचा हेतु यशोदाबाईस समजला किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं. कारण, सभ्यपणामुळें कित्येक वेळां मनांतील विचार बोलून दाखवितां येत नाहींत. हे विचार कालांतरानें कळून येतात.

मुलांचें काम पाहून यशोदाबाईस समाधान वाटलें. जों जों तिचें लक्ष मुलांकडे लागत चाललें, तों तों तिजविषयीं मुलांचें प्रेम वाढत चाललें. यामुळें घरीं राहून जें सुख होतें, त्याचा तिला थोडा थोडा अनुभव येत चालला, व मैत्रिणींबरोबर उगीच भटकत फिरण्याचा कंटाळा वाटूं लागला. यशोदाबाईंत जो हा बदल झाला त्याचें कित्येकांस आश्चर्य वाटेल. कित्येक ह्मणतील कीं, अद्याप आमच्या स्त्रियांची स्थिति सुधारली नाहीं, तेव्हां आनंदीबाईचे आंगीं कांहीं विलक्षण सामर्थ्य असल्याशिवाय मुलांमध्यें व यशोदाबाईमध्यें असा बदल होणार नाहीं. आमचें ह्मणणें काल्पनिक आहे असें कित्येकांस वाटेल; परंतु थोडा विचार केला असतां, अथवा थोडा अनुभव घेतला असतां, यांत कांहीं विलक्षण अथवा काल्पनिक नाहीं, असें दि

सून येईल. इतकेंच कीं, हल्लीं जो शिक्षणप्रकार अथवा संगोपन प्रकार चालू आहे त्यांत थोडासा बदल केला पाहिजे. आनंदीबाईनें कांहीं विलक्षण उपाय योजिले असें नाहीं. काशीची स्मरणशक्ति चांगली होती; यामुळें नुसतें पाठांतर करण्याकडे तिचें लक्ष असे. पाठ केलेल्या गोष्टी सदोदित सारख्या कायम राहत नाहींत; यामुळें ज्ञान वरवर असतें; व वरवर माहितीचा चांगला उपयोग होत नाहीं. अशा प्रकारची माहिती मिळविण्याविषयीं मुलांची इच्छा जितकी कमी असेल तितकें चांगलें, हें समजून आनंदीबाईनें काशीची विचारशक्ति जाग्रत केली. ती तिजकडून कर्मणुकीचीं, परंतु बोधपर पुस्तकें वाचून घेत असे. थोर कवींच्या निवडक उक्ति, थोर पुरुषांचे व स्त्रियांचे चरित्रांतील उत्तम वेंचे व थोर पुरुषांचे भाषणांतील निवडक वेंचे हे तीस नेहमीं वाचून दाखवून त्यांचा अर्थ समजून सांगे.

माई वाचावयास, लिहावयास अथवा शिवावयास बसली असतां आनंदीबाई सर्व काम एकीकडे ठेवून तिजकडे लक्ष देई. तिनें थोडेंसें चांगलें वाचलें असतां ती तीस शाबासकी देई; व अशा रीतीनें उत्तेजन देत देत तिनें माईस इतकें भासविलें कीं, एखादे गोष्टींत यश संपादन करण्यास विलक्षण बुद्धि असली पाहिजे असें नाहीं. एके दिवशीं गोगलगाय भिंतीवर चढत होती. ती वर जाई व खालीं घसरे. तिजकडे आनंदीबाई पाहत बसली; ह्मणून माईही पहावयास लागली. हा क्रम आनंदीबाईनें पांच सहा दिवस चालविला. सहावे दिवशीं गोगलगाय भिंतीवर १२ फूट उंच गेली होती. तें पाहून माई ह्मणाली मावशीबाई, पहा, ही गोगलगाय किती उंच गेली आहे. त्यावर आनंदीबाईनें उत्तर केलें कीं, माई, तूंच पाहिलेंसना गोगलगाय घसरत खालीं येत होती, तथापि,

ती तशीच नेट धरून रोज थोडी थोडी वर जात जात सहावे दिवशीं बारा फूट वर गेली. ह्यावरून तुला ही गोष्ट कळून येईल कीं, गोगलगाईसारखे यःकश्चित् प्राण्यास रोज थोडें थोडें जाऊन शेवटीं पुष्कळ वर जातां येतें, तर, मनुष्य कितीही मंद असला तथापि, तो जर रोज थोडें थोडें स्थिरपणें काम करील, तर त्यास शेवटीं यश आल्यावांचून रहाणार नाहीं; मग, ज्यास बुद्धि आहे तो जर स्थिरपणें काम करील, तर त्याचे ह्यातून मोठमोठालीं कृत्यें होतील हें सांगावयास नको. गोगलगाईसारख्या प्राण्यांचीं उदाहरणें ज्या ज्या वेळेस दिसून येत, त्या त्या वेळेस आनंदीबाई माईच्या अथवा दुसऱ्या मुलांचे मनांत कांहीं नवीन कल्पनेचा अंकूर उत्पन्न करीत असे. तीस माहीत होतें कीं, योग्यकालीं प्रत्यक्ष उदाहरणें दाखविल्यानें नवीन कल्पना चांगली ठसते; व अशा रीतीनें शिक्षण देण्याविषयीं यत्न करणें हें फार श्रेयस्कर असतें.

माईस एक वाईट खोड असे. ती ही कीं, ती लिहावयास लागली असतां वांकून बसत असे. ही गोष्ट आनंदीबाईचे लक्षांत आली. ही संवय पुष्कळ मुलांस असते. ही संवय वाईट आहे, असें समजून ती माईस ह्मणाली, माई, वांकून कधीं लिहूं नये. हें ऐकून बाळ्या ह्मणाला मावशीबाई, कां बरें ?

**काशी.**—अरे, वांकून बसण्यानें पोंक येतें; नाहीं हो मावशीबाई ?

**आनंदीबाई.**—वांकून बसण्याची अथवा लिहिण्याची संवय असली, तर पोंक येतें हें तर खरें आहे; परंतु वांकून लिहित न बसण्याचें दुसरें कारण आहे.

**काशी.**—दुसरें कारण कोणतें ?

**आनंदीबाई.**—पाण्यानें आंग स्वच्छ होतें, हें तुह्मांस माहीत आहे. त्याचप्रमाणें हवेनें शरीराच्या आंतील भाग स्वच्छ होतो. पोटांत हवा गेली असतां घाणेरडा अंश जाऊन आंतील भाग स्वच्छ होतो. पाण्यानें बाहेरचा व हवेनें आंतला भाग स्वच्छ होणें हें, हवा व पाणी ह्यांपासून मोठें कार्य होतें.

**काशी.**—पण हवेचा आणि वांकून बसण्याचा संबंध काय ?

**आनंदीबाई.**—माझें बोलणें संपलें नाहीं, तोंच तूं प्रश्न विचारण्यास सुरुवात केलीस.

हें ऐकून काशी थोडीशी लाजली. नंतर आनंदीबाई ह्मणाली, हवेचा व वांकून बसण्यापासून काय तोटा आहे या गोष्टीचा निकट संबंध आहे. पाण्यानें आंग स्वच्छ होतें, परंतु पुष्कळ पाण्याची जरूरी असते. त्याचप्रमाणें हवेनें आंतला भाग स्वच्छ होतो, परंतु पोटांत पुष्कळ हवा गेली पाहिजे. वांकून बसल्यानें कमी हवा पोटांत जाते.

**माई.**—ती कशी ?

**आनंदीबाई.**—हा पहा स्पंज. हा दाबला, तर ह्यांत जास्त पाणी राहील, किंवा न दाबतां ताठ ठेविला तर पाणी जास्त राहील ?

**माई.**—ताठ ठेविला तर जास्त पाणी राहील.

**आनंदीबाई.**—हीच गोष्ट आपल्या शरीरास लागू आहे. ज्या इंद्रियांच्या योगानें आपण श्वासोच्छ्वास घेतों तीं फुप्फूसें होत. हीं स्पंजासारखीं असतात. ज्याप्रमाणें स्पंज दाबला नाहीं, ह्मणजे त्यांत जास्त पाणी राहतें, त्याप्रमाणें फुप्फूसें दाबलीं नाहींत, ह्मणजे त्यांत जास्त हवा राहते व त्यामुळें रक्त चांगलें शुद्ध होतें. ह्मणून लिहितांना किंवा दुसरें काम करितांना वांकूं नये; ताठ

बसून काम करणें चांगलें. निजतांनाही उरावर पडून निजूं नये असें ह्मणतात, त्याचेंही हेंच कारण आहे.

एके दिवशीं मंडळी बसली असतां आनंदीबाईनें मुलांस हिशेब विचारला. तो असा कीं, वाटसरू रोज पांच कोस जातो, व चार कोस परत येतो; तेव्हां त्यानें दहा दिवसांत किती प्रवास केला. या प्रश्नाचें उत्तर काशीस व बाळयास सांगतां आलें नाहीं. माईनें हळूच आनंदी बाईचे कानांत सांगितलें. तें बरोबर होतें. त्यावरून आनंदीबाईनें असे आणखी प्रश्न विचारले. त्यांपैकीं बहुतेकांचीं उत्तरें माईनें बरोबर सांगितलीं. काशीस तितकीं सांगतां आलीं नाहींत. त्यावरून आनंदीबाईस कळून आलें कीं, माईस गणित शिकविलें असतां त्यांत तिची बरीच मति चालेल. वर ज्या प्रकारचे हिशेब सांगितले, त्या प्रकारचे हिशेब मुलांस शिकविण्याचें महत्व थोड्या आईबापांस माहीत असतें, ह्मणून ते त्यांकडे तादृश लक्ष देत नाहींत. मुलांनीं हिशेब शिकावेत, परंतु मुलींना शिकून काय करावयाचें आहे असा त्यांचा समज असतो. परंतु हें शिक्षण गणितशिक्षणाचा पाया असून या योगानें मुलांची बुद्धि विकास पावते, हें त्यांचे लक्षांत न येऊन त्यांचें त्याकडे दुर्लक्ष असतें.

मुलांचे बुद्धीचा विकास व्हावा व मुलींचे बुद्धीचा विकास होऊन काय करावयाचें आहे, मुलें व्यापारी व्हावयाचीं असतील तर त्यांनीं हिशेब शिकावेत, एरवीं त्यांस काय करावयाचें आहे, अशी आनंदीबाईची समजूत नव्हती. व्यवहारांत पुरुषांस व स्त्रियांस हिशेबाचें कारण वारंवार पडतें, हें तीस अनुभवावरून माहीत होतें. ह्मणून तिनें माईस थोडेंसें गणितशिक्षण दिलें. माईची गति गणितांत होऊं लागली, तेव्हां आनंदीबाई माईस ह्मणाली कीं, ज्या गोष्टी तुझ्या ताईस कठीण वाटतात, त्या ज्या

अर्थ तुला समजतात, त्या अर्थी तिला ज्या कठीण वाटत नाहींत, त्या कांहीं दिवसांनीं तुला समजूं लागतील हें उघड आहे. माईनें कांहींच उत्तर केलें नाहीं. नंतर काशी ह्मणाली, मावशीबाई, आईच्या मैत्रिणी मला हुशार ह्मणतात, परंतु माईनें ज्या प्रश्नांचीं उत्तरें दिलीं त्यांचीं मला देतां आलीं नाहींत. माईला कांहीं यावयाचें नाहीं, असें मला वाटत होतें; परंतु तिची बुद्धि स्थिर आहे. तिला समजावयास थोडा उशीर लागतो; परंतु एखादी गोष्ट तीस समजून सांगितली असतां ती विसरत नाहीं; तींत ती आपली मति चालविते. आनंदीबाईनें कांहीं एक उत्तर दिलें नाहीं. उभयतां बहिणींमध्यें मत्सरभाव उत्पन्न न होतां त्या एकमेकींस मदत करतील, व परस्परांविषयीं उभयतांचें मन शुद्ध राहील, अशा प्रकारें उभयतांचे उद्योगाविषयीं तिनें योजना केली.

आनंदीबाई बाळ्यास शेजारच्या पाजारच्या मुलांत फारशी मिसळूं देत नसे. या वयांत मुलांस फारसें कळत नसतें. मनाचें आकलन करणें व दुसऱ्यांबरोबर आपण सहवास केला असतां आपलें कर्तव्य काय वगैरे गोष्टी त्यांस माहीत नसतात; ह्मणून त्यांस कारणाशिवाय एकत्र ठेवणें प्रशस्त नसतें. तीं परस्परांपासून जितकीं दूर असतील तितकें चांगलें. ज्या वेळेस तीं सारख्या वयाचीं नसतात, किंवा त्यांचे व्यवसाय भिन्न असतात, त्या वेळेस तर होतां होईल तितकें करून त्यांस दूर ठेवणें इष्ट असतें, हें आनंदीबाईस माहीत होतें; ह्मणून तिनें त्याप्रमाणें व्यवस्था ठेविली होती. यामुळें घरांत बाळ्याचे संबंधानें कलागती येण्याचे व त्यामुळें त्यास आईचे हातचा मार खाण्याचे प्रसंग कमी येऊं लागले. बाळ्याचे मागें बागेचा उद्योग होताच; त्यास आतां वाचतां येऊं लागलें होतें; ह्मणून तो कांहीं वेळ वा-

चीत असे. आनंदीबाई त्यास बाळमित्र व इसापनीतींतील गोष्टी सांगत असे. गोष्टींच्या द्वारें बोध करण्यास मोठें साधन असतें. कोणत्या गोष्टी सांगावयाच्या व त्यांचें पर्यवसान काय, हें मात्र लक्षांत ठेविलें पाहिजे. गोष्टी सांगावयाच्या, त्या केवळ कर्मणुकीकरितां नसून बोध करण्यासाठीं सांगावयाच्या, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. एकदां मुलें जमलीं असतां आनंदीबाईनें त्यांस एक गोष्ट सांगितली. ती अशी कीं:—

हैदराबाद येथें अमीरखा या नांवाचा गृहस्थ राहत असे. तो घरचा श्रीमंत असून त्यास शिकारीचा फार नाद असे. एके दिवशीं तो आपल्या मित्रमंडळीसह शिकारीस गेला. त्याच्या दृष्टीस एक हरण पडलें. त्यावर त्यानें गोळी घातली. परंतु गोळी चुकून हरण निसटलें. हरणाला मारल्याशिवाय घरीं परत जावयाचें नाहीं, असा अमीरखा यानें निश्चय केला; व तो, बरोबर कुत्रे घेऊन हरणामागें लागला. मंडळी मागें राहिली. बराच वेळ झाला, तथापि हरण सांपडलें नाहीं; ह्मणून खासाहेबाची तब्बेत गेली. तो हरणामागें जात असतां समोरून एक मुलगा येत होता. त्याचें नांव रामा. तो एका पाटलाचा मुलगा होता. रामाच्या मुद्रेवरून तो शांत परंतु दृढनिश्चयाचा असावा असें दिसत होतें. तूं हरण पाहिलेंस कां ह्मणून खासाहेबानें रामास विचारिलें. रामानें हरण पाहिलें होतें, व तें कोठें लपून राहिलें होतें हें त्यास माहीत होतें; ह्मणून त्यानें होय ह्मणून सांगितलें. अमीरखा ह्मणाला, तर मग सांग लवकर. त्यावर रामानें उत्तर केलें कीं, मीं हरण पाहिलें; व तें कोठें आहे हेंही मला माहीत आहे; परंतु तें सांगणें मला बरें वाटत नाहीं. हें उत्तर ऐकून खासाहेबाची मर्जी गेली. त्यानें रामावर चाबूक उगारला. परंतु रामा शांत उभा होता. हें पाहून खा-

साहेबास अधिक राग आला; व तो ह्मणाला सांग, नाहीं तर तुला चाबकानें मारितों. रामानें उत्तर केलें, साहेब, तुह्मी कांहीं करा, परंतु मी विश्वासघात करणार नाहीं. हरण गरीब प्राणी आहे. कसाही प्रसंग आला, तथापि, विश्वासघात करूं नये, कारण, विश्वासघात करणें अधमपणाचें काम आहे, असें माझे बापानें मला सांगितलें आहे. हें ऐकून खासाहेब संतापला व ह्मणाला तुला कसें बरें वाटत नाहीं तें पाहतों. असें बोलून त्यानें रामाच्या पाठीवर दोन चाबूक ओढिले. परंतु रामानें कांहीं उत्तर केलें नाहीं. ह्मणून खासाहेब आणखी मारण्याच्या बेतांत होता; इतक्यांत मागील मंडळी येऊन मिळाली. त्यापैकीं एका सुज्ञ मनुष्यानें खासाहेबाची फजिती केली व रामास सोडविलें.

कांहीं दिवस लोटल्यावर आनंदीबाईनें बाळयास आणखी एक गोष्ट सांगितली. ती अशी:—

कोंकणांत गुहागर येथें एक सुखवस्तु गृहस्थ राहत होता. त्यास कृष्णा ह्मणून एक मुलगा होता. त्यास साधारणपणें थोडेंसें शिक्षण मिळालें होतें. परंतु शिकण्याकडे त्याचें लक्ष नव्हतें. त्यास पोहोंतां येत असे. वेळ सांपडला ह्मणजे तो समुद्रावर जात असे. त्याचे मनांत खलाशी होऊन दूर देशीं जावें, अचाट कृत्यें करून पैसे मिळवावे, व शेफर्ड कंपनीस धुळीस मिळवावें असें आलें. ही गोष्ट बापास समजतांच त्यास फार वाईट वाटलें. त्यानें कृष्णास सांगितलें कीं, साहसकर्में करून उदयास येणें हें आपणासारख्या गरीब लोकांस नको. मध्यम स्थितीसारखी दुसरी उत्तम स्थिति नाहीं. तुला कोणत्याही गोष्टीचें कमी नाहीं. कायद्याचा अथवा वैद्यकीचा अभ्यास कर, अथवा धंद्याचें शिक्षण देण्यासाठीं मुंबईंत एक नवीन विद्यालय स्थापन झालें आहे, त्यांत अभ्यास कर. परंतु बापाचें ह्मणणें कृष्णास रुचलें नाहीं, त्यानें बाहेर जाण्याविषयीं आईपाशीं गोष्ट

काढिली. आईचा रुकार त्यास मिळाला नाहीं. ह्मणून त्यानें पळून जाण्याचा निश्चय केला. त्याचा मित्र जहाजांत बसून वेंगुरल्यास जाणार होता. त्यानें तुला प्रवासाबद्दल कांहीं एक पडणार नाहीं; अशी लालूच दाखविली. कृष्णाचे मनांत जाण्याचें आलें. परंतु बंदर सोडून तो गेला नाहीं, तोंच तुफान झालें व मरतों कीं काय, असें त्यास वाटलें. त्याचें तारूं जेमतेम पुढच्या बंदराला लागलें. तेथून कृष्णा घरीं परत आला. कांहीं दिवसांनीं त्याचे मनांत पुन: वेड शिरलें. आईनें व बापानें त्यास पुष्कळ प्रकारें सांगितलें. परंतु त्याचे डोक्यांतील वेड जाईना. मुलाचें टीक चिन्ह नाहीं, हें मनांत येऊन बापास फार वाईट वाटे. आपण मिळविलेली अब्रू व कवडी कवडी करून जोडलेला पैसा, हा पोरगा घालविणार, हें समजून त्यास पराकाष्ठेचें दु:ख होई. जर त्यास कमजास्त बोलावें तर तो उठून निघून जाईल व लोकांचे हंसू होईल याबद्दल त्यास भय वाटे. अल्पवयांत आपण त्याचें लग्न करून दिलें नसतें, तर बरें होतें असें त्यास वाटूं लागलें. कारण पोरीची वाट काय करावी, ही विवंचना त्याचे मनांत उभी राही. कांहीं दिवस होऊं दिल्यावर कृष्णानें आईपासून कांहीं निमित्त करून पैसे घेतले व तो जहाजांत बसून गेला. परंतु पूर्वीप्रमाणें त्यास तुफान लागून जहाज बुडण्याचे बेतांत आलें. सर्वांची पांचांवर धारण बसली. कांहींनीं उड्या टाकिल्या. त्यांत कृष्णानें उडी टाकिली. ज्यास जिकडे वाट फुटली तिकडे तो पोहत गेला. या वेळेस कृष्णास बापाचे ह्मणण्याची आठवण झाली; परंतु उपयोग काय. कृष्णाचें काय झालें, हें त्याचे आईबापांस समजलें नाहीं. आज येईल, उद्यां येईल, अशा आशेवर बापानें तीन वर्षे काढिलीं. शेवटीं त्याची निराशा होऊन व भाविस्थिति लक्षांत येऊन तो दिवसेंदिवस खचत चालला; व थोडेच दिवसांनीं मरण पावला.

या दोन गोष्टींपैकीं बाळ्यास पहिली गोष्ट आवडली, हें पाहून खरा निश्चय व दुराग्रह अथवा हट्ट यांमध्यें भेद काय, हें बाळ्यास समजून सांगण्याचा आनंदीबाईनें विचार केला. बाळ्याचा स्वभाव हट्टी असे, असें आह्मीं मागें सांगितलेंच आहे; परंतु तो आनंदीबाईपाशीं हट्ट करीत नसे. कारण, ज्या गोष्टी त्यास आवडत नसत त्या ती त्यास करावयास लावीत नसे. ज्या त्यास आवडत असत त्याच करावयास सांगे. असें करण्याचा तिचा हेतु हा होता कीं, प्रथम त्यास हट्ट करण्याचे प्रसंग कमी येऊन त्याची वाईट खोड जावी. त्यास चांगली संवय लागावी ह्मणून ती चांगल्या व नवीन गोष्टी त्या पुढें ठेवी. असो. आनंदीबाईनें बाळ्यास खरा निश्चय व हट्ट यांमध्यें भेद काय आहे, हें समजून सांगण्यासाठीं वरील दोन्ही गोष्टी सांगितल्या व ती ह्मणाली बाळ, तुला रामाचें करणें बरें वाटतें, का कृष्णाचें करणें बरें वाटतें. त्यावर बाळ्यानें उत्तर केलें तें असें:—

**बाळ्या.**—मावशीबाई, मला पहिली गोष्ट फार आवडली. हरण कोणीकडे गेलें हें रामानें त्या दुष्ट खासाहेबास सांगितलें नाहीं, हें फार चांगलें केलें. रामानें मार खाल्ला; परंतु त्याचे मनांत जें सांगावयाचें नव्हतें तें त्यानें सांगितलें नाहीं; ह्मणून तो फार चांगला मुलगा. मावशीबाई, तुह्माला नाहीं का तो आवडत?

**आनंदीबाई.**—रामा मला आवडतो. परंतु तूं जें कारण सांगितलेंस त्यासाठीं नाहीं.

**बाळ्या.**—तर मग तो तुह्माला आवडत नाहीं? त्यानें गरीब प्राण्याचा जीव वांचविला; स्वतः मार खाल्ला; परंतु विश्वासघात केला नाहीं. इतकें असूनही तो तुह्मास आवडत नाहीं?

**काशी व माई**--मावशीबाई, बाळ्यानें जें उत्तर दिलें तें तुह्माला आवडलें नाहीं ?

**आनंदीबाई.**—मला बाळाचें उत्तर आवडलें नाहीं, असें मी ह्मणत नाहीं. तुह्मी प्रथम स्वस्थ बसा व मी काय ह्मणतें तें सर्व ऐकून घ्या.

**बाळ्या** (आनंदानें)—मग माझें उत्तर तुह्माला आवडलें ?

**आनंदीबाई.**—होय. रामा मला आवडतो. परंतु गरीब प्राण्याचा विश्वासघात करणें मला आवडत नाहीं असें तो ह्मणाला, ह्मणून मला आवडतो. त्याचे मनांत जें सांगावयाचें नव्हतें, तें त्यानें सांगितलें नाहीं, ह्मणून तो चांगला मुलगा असें मी समजत नाहीं. कोणतेही मनुष्याचें कृत्य बरें किंवा वाईट समजण्यापूर्वी, त्याचा निश्चय होण्यास कोणतीं कारणें आहेत हें मी समजून घेतें. एखादें कृत्य करणें बरें किंवा वाईट वाटतें, हें योग्य कारण नाहीं. नुसतें बरें वाटतें किंवा वाटत नाहीं या ह्मणण्यांत अर्थ नाहीं. बरें वाटण्यास अथवा न वाटण्यास काय कारणें आहेत हें समजलें पाहिजे.

**बाळ्या.**—रामानें जें कारण सांगितलें तें बरोबर होतें व त्याचें वर्तन धैर्याचें होतें; तेव्हां तो चांगला मुलगा आहे.

**आनंदीबाई.**—होय. योग्य कारण असून जे निश्चयी असतात त्यांची नेहमीं प्रशंसा करणें योग्य आहे; परंतु जे आपण अमुक कृत्य कां करतों, याचीं कारणें न सांगतां आह्मांला हें करणें बरें दिसतें, एवढें ह्मणून करावयास लागतात, त्यांचें वर्तन तिरस्कारास पात्र असतें.

**काशी.**—बाळ्या, ऐकिलेंस ना. तूं नेहमीं ह्मणत असतोस मी हें करणार, मी तें करणार; मला हें आवडत नाहीं, तें आवडत नाहीं; याच बोलण्याचा मला नेहमीं राग येतो.

**आनंदीबाई.**—काशी, तुला नेहमीं राग येतो ह्मणून बाळ सांगत नसेल. तुला नेहमीं राग येणार नाहीं तर, तो कदाचित् केव्हां केव्हां कारण सांगेल.

**बाळ्या.**—होय. माझें कारण नेहमीं बरोबर असतें; परंतु तें सांगणें मला आवडत नाहीं.

**आनंदीबाई.**—तर मग तुझ्या वहिणीस तुझें कृत्य नेहमीं आवडत नाहीं, यांत तिचा दोष नाहीं.

**बाळ्या.**—नाहीं. पण मला कारण सांगत बसणें आवडत नाहीं. क्षुल्लक गोष्टींमध्यें काय कारण सांगावयाचें आहे? दुपारीं जेवण झाल्यावर घोडा घोडा खेळूं, चेंडू खेळूं, आपण आतां चित्रें पाहूं, यांत कारण काय सांगावयाचें आहे?

**आनंदीबाई.**—तूं ह्मणतोस तें खरें आहे. क्षुल्लक गोष्टींत निश्चय करण्यांत शहाणपणा नाहीं. परंतु शहाणे लोक क्षुल्लक गोष्टींत हेकटपणा करीत नाहींत.

**बाळ्या.**—मावशीबाई, आई, ताई, व वेणुबाई मला हट्टी ह्मणत असत; परंतु तुह्मी आल्यापासून मी हट्ट करितों का? वेणुबाई मला नेहमीं रागें भरत असे; माझ्या आंगावर येत असे; ह्मणून मी हट्ट करीत असें. तुह्मी माझ्याशीं गोड बोलतां, ह्मणून मी तसें वागतों.

**आनंदीबाई.**—बाळ, मनुष्याला काय, किंवा पशुपक्ष्यादि-प्राण्याला काय, वागविण्याचे दोन प्रकार आहेत. प्रेमानें व सक्तीनें. ज्यांस विचार आहे अथवा जे गरिबीनें वागतात, त्यांस प्रेमानें वागविणें हें चांगलें. ज्यांस बिलकूल विचार नाहीं अथवा जे विचाराचा उपयोग करीत नाहींत, त्यांस प्रथम गोडीनें वागवून पहावें; परंतु त्यापासून जर उपयोग होत नाहीं असें दिसून येईल, तर त्यांस सक्तीनें वागविणें जरूर आहे.

**बाळ्या.**—मला जुलमानें वागवून घेणें आवडत नाहीं.

**आनंदीबाई.**—तर मग तुला विचारानें वागलें पाहिजे; ह्मणजे तुला कोणी सक्तीनें वागविणार नाहीं व तुला कोणी हट्टी ह्मणणार नाहीं. तुला क्षुल्लक गोष्टीसाठीं हट्ट धरून बसतां कामा नये.

**बाळ्या.**—पण अमुक गोष्ट विचाराची हें मला कसें समजावें.

**आनंदीबाई.**—हें तुला समजावयाचें नाहीं हें खरें आहे; परंतु हें तुझ्यापेक्षां वडील माणसांस समजतें; ह्मणून ते सांगतील तें तूं ऐकत जा. तुझें हित कशांत आहे हें त्यांस चांगलें समजतें. त्यांचें ऐकिलें असतां तुझें कल्याण आहे. तूं कृष्णासारखा भलत्याच कामांत आपलाच हट्ट धरून बसलास तर तुला सुख होणार नाहीं.

**बाळ्या**--पण वेणुबाई मला नेहमीं गाढव ह्मणते. मी गाढव आहें का? गाढवाला देखील नीट वागविलें तर तें चांगलें असतें. बरें मावशीबाई, याविषयीं मी तुह्माला गोष्ट वाचून दाखवूं का? ती कोणत्या पुस्तकांत आहे हें मला माहीत आहे. असें बोलून बाळ्यानें पुस्तक उघडून गोष्ट वाचिली व तो ह्मणाला मावशीबाई, मी गाढव आहें का? बरें तें असो. वेणुबाईनें मला सांगितलें कीं, तुझ्या केंसाच्या जटा झाल्या आहेत व पाय फुटले आहेत; तेव्हां तुझे केंस विंचरण्यास व पाय घासण्यास आईनें सांगितलें आहे. मला तिजकडे जाणें आवडत नाहीं; परंतु आईची इच्छा आहे ह्मणून मी जातों. तुह्मी येतां का? पहा मी कसा उगीच बसतों.

आपल्या उपदेशाचा आपल्या शिष्याचे मनावर किंवपत ठसा उमटला आहे, हें पाहण्याकरितां आनंदीबाई बाळ्याबरोबर गेली. बाळ्या, वेणुबाई होती तेथें जाऊन स्वस्थ उभा राहिल

व ह्मणाला वेणुबाई, हा मी फणी घेऊन आलों आहें. बाळ्या पुढें बसला, तेव्हां वेणुबाईनें त्याचे केंस खसा खसा विंचरले; परंतु बाळ्या कांहीं एक बोलला नाहीं. हें यशोदाबाईनें पाहिलें. ती ह्मणाली वेणुबाई, अंमळ हळू कां नाहीं विंचरीत. तूं माझे केंस इतके जोरानें विंचरले असतेस, तर मला बरें वाटलें नसतें. वेणुबाईनें उत्तर केलें तुमच्या केंसांची गोष्ट निराळी आहे. बाळ्याचे केंसांची गुंतागुंत झाली आहे. असें ह्मणून तिनें बाळ्याचे केंस पूर्ववत् विंचरले; तथापि, बाळ्या चकारशब्द बोलला नाहीं. तो आनंदीबाईकडे पाहून ह्मणाला मावशीबाई, झालें ना? मीं दम धरिला ना? हे शब्द ऐकून आनंदीबाईस संतोष झाला. तिनें बाळ्याचा हात धरून त्यास यशोदाबाईजवळ नेलें व ती ह्मणाली आज बाळाचें वर्तन तुह्मीं पाहिलें ना? याला आज खाऊला पैसे द्या. जो बाळ्या नुसता अंगाला हात लाविला असतां माकडासारखी हातभर उडी मारणारा, नुसती फणी केंसाला लागल्याबरोबर थैमान करून सोडणारा, व कोणी त्याचे पाय घासावयास लागलें असतां ओरडण्यानें घर दणाणून टाकणारा, त्या बाळ्याचें शांत वर्तन पाहून यशोदाबाईस आश्चर्य वाटलें; व बाळ्याची मुद्रा पाहून ती आनंदीबाईस ह्मणाली, आनंदीबाई, आज बाळ्यास खाऊस पैसे तर मिळतीलच; शिवाय मुंबईहून हपूसचे आंबे आणिले आहेत, त्यांपैकीं प्रथम दोन त्याला मिळतील. असें बोलून तिनें एका नोकरास आंबे आणण्यास सांगितलें व ती बाळ्याकडे वळून ह्मणाली, बाळ्या, वेणुबाई असें कां करिते? तुला स्वतः नाहीं का केंस विंचरतां येत?

**बाळ्या.**—आई, मला केंस विंचरतां येतात; पाय घासतां येतात; अंघोळ करितां येते; हें सर्व मीं करावें असें मला वाटतें.

**यशोदाबाई.**—तर मग आनंदीबाईची हरकत आहे कीं काय ?

**आनंदीबाई.**—छे, छे, असें कसें होईल ? माझी हरकत नाहीं इतकेंच नाहीं, तर त्याला जी जी गोष्ट करितां येण्यासारखी आहे, ती ती त्यानें स्वतः करावी अशी माझी इच्छा आहे. क्षुल्लक कामासाठीं कारणावांचून दुसऱ्यास त्रास देऊं नये हें त्यास कळूं लागलें आहे. तो स्वतःवर जितका अवलंबून राहील तितकें चांगलें, असें त्यास माझें सांगणें आहे. परंतु तो ह्मणाला कीं, तुह्मी त्यास वेणुबाईकडे जाऊन शेंडी विंचरून घेण्यास सांगितलें, त्यावरून मीं त्यास जाऊं दिलें. कारण, आईबापांनीं साधारण गोष्ट अथवा महत्त्वाची गोष्ट सांगितली असो, ती मुलांनीं ऐकिली पाहिजे. मग ती त्यांस आवडो अथवा न आवडो. अमुक गोष्ट सांगावयाची, हा विचार आईबापांचा आहे अशी माझी समजूत आहे; व त्याप्रमाणें बाळाकडून करविणें हें माझें कर्तव्य आहे असें मी समजतें. तुमचे आज्ञेप्रमाणें चालण्याविषयीं आज त्यानेंहून गोष्ट काढिली. त्याप्रमाणें न चालणें ह्मणजे आईच्या इच्छेप्रमाणें न वागण्यास त्यास उत्तेजन देणें होय. यदाकदाचित् तुह्मीं त्यास सांगितलेली गोष्ट मला पसंत पडली नाहीं तर, दुसरे वेळीं तुमची गांठ घेऊन तुह्मास सांगणें शहाणपणाचें आहे; परंतु प्रथम त्याजकडून हुकूम पाळविणें ही महत्त्वाची गोष्ट. जे लोक आईबाप, गुरु, देव व सत्पुरुष यांची आज्ञा न पाळण्याविषयीं मुलांस उत्तेजन देतात ते दोषास पात्र आहेत असें मी समजतें. मग तुमची काय समजूत असेल ती असो.

हें कळकळीचें भाषण ऐकून यशोदाबाई कांहीं वेळ स्तब्ध राहिली. काय बोलावें हें तीस सुचेना. आपण आपल्या पोटच्या

पोरासाठीं कळकळ बाळगीत नाहीं, इतकी आनंदीबाई बाळगिते, हें मनांत येऊन तिची वृत्ति गोंधळल्यासारखी झाली. शेवटीं ती आनंदीबाईस ह्मणाली आनंदीबाई, मी तुमची फार ऋणी आहें. बाळ्याचा स्वभाव फार हट्टी; तो नेहमीं लोकांचें बोलून घेई; जो तो त्याला पाण्यांत पाही; त्याच्याएवढीं दुसरीं मुलें कशीं हुशार; तो नऊ वर्षांचा झाला तरी त्यास ओनामा काढण्याची पंचाईत. तेव्हां हा मुलगा चांगला निपेल असें मला वाटत नसे. माझी स्वतःची स्थिति तुह्मी पाहत आहां. घरांत दोन पैसे आहेत; परंतु आतांनीं डोकें उठविलें आहे. आस्थेचा मनुष्य जवळ कोणी नाहीं. जीं माणसें आहेत त्यांचा यत्न लुबाडण्याविषयीं आहे. पदरीं माणसें न ठेवावीं, तर पसारा मोठा आहे. शिवाय, नांवलौकिकाप्रमाणें वागलें पाहिजे. मुली दोन दिवसांच्या सोबती. त्यांचें लग्न झालें ह्मणजे त्या दुसऱ्याच्या घरीं जावयाच्या. मग त्यांच्यांवर सत्ता नाहीं. घरच्यांची तशी स्थिति झाल्यापासून कसें होईल, काय होईल, याविषयीं मला नेहमीं काळजी असे; परंतु बाळ्या मोठा झाल्यावर आपणास काळजी राहणार नाहीं; आपण पंढरपुर, काशी, गोकुळ वृंदावन वगैरे ठिकाणीं यात्रा करून स्वस्थ बसूं, असें मला प्रथम वाटत असे; परंतु बाळ्या मोठा होत चालला तों निराशा होत चालली. हा हिरवट पोर आपणाला विचारणार नाहीं, असें कधीं कधीं मनांत येऊन वाईट वाटत असे. परंतु मजविषयीं आतां त्याचें प्रेम पाहून मला संतोष होतो. हें प्रेम तुह्मीं उत्पन्न केलें, तेव्हां तुमचे मजवर फार उपकार आहेत.

साधारण गोष्ट असो किंवा महत्त्वाची गोष्ट असो, तिजविषयीं सर्व मुखत्यारी तुमचेकडे आहे. बरें पण, बाळ्याचे संबंधानें अलीकडे वेणुबाईची वृत्ति अशी कां आहे हें मला समजत नाहीं.

इतक्यांत वेणुबाई तेथें आली व यशोदाबाईस ह्मणाली, तुह्मी नाहीं का मला बाळ्याचे केंस विंचरण्यास सांगितलें? त्यावर यशोदाबाई ह्मणाली वेणु, मीं काय बोललें त्याचा तुला अर्थ समजला नाहीं. बरें, तें असो. आज तुला मी स्पष्ट सांगतें कीं, मुलांचे संगोपनाच्या संबंधानें आनंदीबाईचे व माझे विचार एक आहेत. आह्मां उभयतांचे सांगण्यांत जर फरक पडला, तर आनंदीबाईचे ह्मणण्याप्रमाणें घरांतील माणसांनीं चाललें पाहिजे. हें ऐकून वेणुबाई मनांत बडबडत रागावतच निघून गेली. नंतर यशोदाबाई बाळ्याकडे वळून ह्मणाली, बाळ्या, आजपासून आंघोळ करणें, शेंडी विंचरणें वगैरे कामें तूं आपलीं करीत जा.

आईच्या तोंडचे हे शब्द ऐकून बाळ्यास फार आनंद झाला; व तो बोलणार, इतक्यांत यशोदाबाई त्यास ह्मणाली, बाळ्या, तूं काय बोलणार हें मी समजलें; परंतु तूं माझे आभार मानण्यापूर्वीं आनंदीबाईचे मान. आईची आनंदवृत्ति पाहून बाळ्यास आनंद झाला; व आईनें अपणास आंबे दिले व तिनें आपणास जवळ बोलाविलें, हें सांगण्यासाठीं तो काशी व माई ह्यांकडे धांवत गेला.

कांहीं दिवस लोटल्यावर यशोदाबाईची आनंदवृत्ति पाहून आनंदीबाई ह्मणाली, आज मी तुह्माला विनंति करणार आहें. ती माझे स्वतःचे संबंधानें नाहीं. ती, काशी व बाळ यांचे वतीनें आहे. असें ह्मणून तिनें चिट्ठी पुढें केली. या चिट्ठींतील मजकूर काशीनें सांगितला होता, व तो बाळ्यानें लिहिला होता. काशीच्या आंगीं मजकूर जुळवून लिहिण्याचें सामर्थ्य कितपत आलें आहे, व बाळ्याचें अक्षर कसें काय आहे हें यशोदाबाईस दाखवावें, व अदबीनें कांहीं गोष्ट मागावयाची असल्यास प्रत्यक्ष न मागतां चिठ्ठीच्या द्वारें विनंति करावी, हें शिक्षण मुलांस

मिळावें या हेतूनें आनंदीबाईनें चिठी लिहविली होती. चिठींतील मजकूर वाचून यशोदाबाईस फार आनंद झाला. आज विशेष काय कारण आहे, असें यशोदाबाईनें विचारल्यावरून आनंदीबाईनें सर्व हकीकत सांगितली. ती ह्मणाली, आह्मी कांहीं दिवसांपूर्वीं एका दुकानांत गेलों होतों. तेथें टोमाटोचें बीं बाळाचे दृष्टीस पडलें. तो तें घेऊन खावयास लागला. त्यावरून त्यास मीं सांगितलें कीं, हे पेरल्यावर चांगलें फळ येतें; तें मग खाण्यालाही चांगलें लागतें, व त्याची भाजीही चांगली होते. नुसतें बीं खाल्लें असतां गोड लागत नाहीं. तो ह्मणाला मी तें पेरीन मग आपण फळाची भाजी खाऊं. त्यावरून मीं त्यास बीं घेऊन दिलें व लहान खोरें व कुदळ हीं घेऊन दिलीं; त्याजकडून जमीन चांगली तयार करवून तींत तें पेरविलें; परंतु रोजचेरोज तें किती वर आलें आहे, हें पाहण्याचा त्यास नाद लागेल व तो रोज मला विचारून त्रास देईल असें समजून त्याजकडून वांगी, मेथी, कोथिंबीर व मिर्च्या वगैरेचे वाफे तयार करविले. बाळास एकट्याला काम करण्याचा कंटाळा येईल, ह्मणून नोकरांकडून आणखी वाफे तयार करविले. त्यांत माईनें तुळशी, गुलछबु, मोगरा वगैरे झाडें लाविलीं आहेत; शिवाय तिनें घोसाळें, पडवळें, कारलीं व भोंपळे ह्यांचे वेल लाविले आहेत. काशीस टापटीप फार आवडते, ह्मणून तिजकडून कुंड्यांत निरनिराळ्या प्रकारचीं रंगीबेरंगी झाडें लाविलीं आहेत. कुंड्यांवर तिनें सुबक अक्षरांनीं चिठ्या मारिल्या आहेत. त्या तिनें सारख्या अंतरावर ठेविल्या असून एका जातीच्या दोन अशा समोरासमोर ठेविल्या आहेत.

ऊन कमी झालें ह्मणजे तुमचीं तिन्हीं मुलें प्रथम झाडाला-

ल्चा अथवा वाफ्यांतील केर कचरा काढून जागा साफ करितात. नंतर नोकरांनीं पाणी लाटून कुंडींत सोडल्यावर मुलें झारीनें आपआपल्या वाफ्यांस व झाडांस पाणी घालितात. मधून मधून मी त्यांस मदत करितें. या योगानें त्यांचा वेळ चांगले प्रकारें जाऊन त्यांस कर्मणुक होते व वेतावाताचा व्यायाम होतो. दुसरें असें कीं, लहानाचे मोटे करण्यास आंगीं उतावीळपणा उपयोगीं नाहीं, व कांहीं गोष्टी वेळचे वेळेवर काळजीपूर्वक कराव्या लागतात वगैरे गोष्टींचें शिक्षण आपोआप मिळून पुढें त्या शिक्षणाचा प्रपंचांत फार उपयोग होतो. बागेंत जीं झाडें, वनस्पति, भाजीपाला वगैरे आहेत त्यांची यादी तयार करून ठेविली आहे. झाडांचा उपयोग काय, वनस्पतींचा उपयोग काय, असे प्रश्न विचारण्यास मुलांस कारण उत्पन्न होऊन त्यांचीं उत्तरें देण्यास मला संधी सांपडते; व त्यांच्या मनांत ज्या ज्या कल्पना भरवून देणें इष्ट आहे त्या त्या भरवून देण्यास सवड सांपडते. काशीनें कांहीं झाडांचीं चित्रें काढून ठेविलीं आहेत. तेव्हां यावरून तुमच्या लक्षांत येईल कीं, मुलांनीं श्रम करून जें काय केलें आहे, तें तुह्मास दाखविण्याची त्यांस इच्छा असणें स्वाभाविक आहे, व आज तसें करण्याचें त्यांचे मनांत आहे.

ही हकीकत ऐकून यशोदाबाईस फार आनंद झाला. ती उत्तर देणार, तों आनंदीबाई ह्मणाली, माझी हकीकत संपली नाहीं. अद्याप कांहीं सांगावयाची राहिली आहे; परंतु तुह्माला कंटाळा येईल कीं काय अशी मला भीति वाटते.

**यशोदाबाई.**—तुह्मास अशी शंका तरी कशी आली, याचें मला आश्चर्य वाटतें.

**आनंदीबाई.**—खरोखर पाहतां शंका येण्याचें कारण असूं नये, परंतु मी जी हकीकत सांगणार ती मनोरंजक नाहीं असें

मला वाटतें. बहुतेक स्त्रियांची प्रवृत्ति मनोरंजक विषयाकडे फार असते; मग त्यापासून कांहीं एक उपयोग झाला नाहीं तरी हरकत नाहीं; व त्यांत वेळ व्यर्थ गेला तरी हरकत नाहीं. यावरून मनाचें रंजन करूं नये असें मी ह्मणत नाहीं; परंतु उपयुक्त विषयाकडे लक्ष देण्याची व तत्वदृष्ट्या विचार करण्याची मनास संवय पाहिजे. ही संवय फक्त पुरुषांस असावी व स्त्रियांस नसली तरी चालेल अशी माझी समजूत नाहीं. स्त्रिया पोरकट व निरुपयोगी गोष्टींत आपला वेळ न घालवितां उपयुक्त गोष्टींकडे लक्ष देतील, तर त्यापासून त्यांसच उपयोग आहे असें नाहीं, तर त्यांचे मुलांस व यामुळें इतरांसही उपयोग आहे. खऱ्या हिताकडे लक्ष देणाऱ्या फारच थोड्या स्त्रिया दृष्टीस पडतात; कित्येकांस तर उपयुक्त गोष्टी ऐकण्याचा सुद्धां कंटाळा वाटतो; मग त्याप्रमाणें वर्तन करण्याचें तर नांव नको. ही गोष्ट केवळ स्त्रियांसच लागू आहे असें नाहीं. पुष्कळ पुरुष असेच दृष्टीस पडतात. चमत्कार हा कीं, ज्यांस खरोखर या गोष्टी समजाव्या त्यांपैकीं कित्येकांची अशीच शोचनीय स्थिति दृष्टीस पडते, ह्मणून मला शंका वाटली.

**यशोदाबाई.**—तुह्मी ह्मणतां तें खरें आहे; माझा स्वभाव आळशी आहे; त्याचप्रमाणें माझे मैत्रिणींचाही आहे. काम करण्याचा आह्मांस कंटाळा वाटतो. कांहीं मौज नसेल तर ऐकावेंसें अथवा पहावेंसें वाटत नाहीं. या सर्व गोष्टी खऱ्या आहेत; परंतु अलीकडे माझे मनाची चलबिचल झाली आहे. घटकेंत वाटतें आपण कांहीं उपयुक्त वाचावें; कांहीं उपयुक्त काम करावें; पुनः वाटतें व्यर्थ शीण कां करावा; आपणास काय करावयाचें आहे; घरांत पैसे आहेत तोंपर्यंत खावें, प्यावें, स्वस्थ असावें. परंतु मुलांची हल्लींची स्थिति पाहून पुनः

वाटतें कीं ही स्थिति अशी चालेल, तर आपणासारखी भाग्यशाली कोण आहे? मुलांचे कल्याणाशिवाय आह्मा स्त्रियांस आणखी दुसरी प्रिय गोष्ट कोणती असावी? त्यांकडे लक्ष न देतां आपणच आपल्या सुखावर नजर द्यावी हा शहाणपणा नाहीं. ही गोष्ट माझे मनांत येऊन माझे विचार बदलत आहेत. आतां माझें लक्ष मुलांकडे थोडें थोडें लागत चाललें आहे. तेव्हां तुह्मीं मुलांचे संबंधानें गोष्ट सांगितली असतां, मला कंटाळा वाटणार नाहीं इतकेंच नाहीं, तर मला उलट आनंद होईल.

**आनंदीबाई.**—बरें तर, मलाही ती हकीकत सांगण्यास आनंद वाटतो. ती आतां मी सांगतें. अलीकडे स्त्रियांस शिक्षण द्यावें असें पुष्कळांस वाटूं लागलें आहे, परंतु हें शिक्षण काय द्यावें याविषयीं बराच वाद आहे. मी आतांच सर्व हकीकत सांगत बसत नाहीं. आजपर्यंत मीं तुमच्या मुलांस जें काय शिकविलें आहे त्यावरून तुह्मांस कांहीं अंशीं कळून आलें असेल. आज तुह्मांस एक गोष्ट सांगणार आहें. ती ही कीं, स्त्रियांस पाकशास्त्राची माहिती चांगली असली पाहिजे; व त्यांच्या आंगीं सुग्रणपणा अवश्य असला पाहिजे. हें शिक्षण त्यांस लहानपणीं मिळालें नाहीं, तर पुढें त्यांस कंटाळा येतो. हें श्रीमंतांच्या बायकांससुद्धां पाहिजे. चाकरनोकर असले ह्मणजे त्यांस काय करावयाचें आहे, ही समजूत चमत्कारिक आहे. ऐपत आहे ह्मणून माहिती नसावी किंवा सुग्रणपणा नसावा असें नाहीं. नोकरचाकरांस विशेष काळजी असत नाहीं. त्यांचें ढपळशाई काम असतें. यामुळें पदार्थांची नासधूस होऊन नुकसान होतें. ह्मणून ज्यांस ऐपत आहे त्या स्त्रियांनीं सुद्धां देखरेख ठेवणें अगत्याचें आहे. परंतु ज्या यजमानास अथवा यजमानिणीस कामाची माहिती नाहीं त्याच्या अथवा

तिच्या हातून देखरेख करण्याचें काम बरोबर होणार नाहीं. शिवाय कांहीं जिनसा अशा आहेत कीं, त्या स्वस्थपणें तयार केल्या पाहिजेत. कामांत नोकरचाकरांचें फारसें लक्ष नसतें. दुसरें असें कीं, हें शिक्षण स्त्रियांस मिळाल्यामुळें त्यांचें लक्ष प्रपंचांत लागून त्यांचे आंगीं टापटीप व व्यवस्थितपणा हे गुण येतात. हे गुण स्त्रियांचे आंगीं असल्यापासून फार फायदा होतो. हें समजून माईस व काशीस निरनिराळ्या प्रकारचीं लोणचीं, गुळांबा मुरंबा, हलवा, निरनिराळ्या प्रकारचीं पक्वान्नें, निरनिराळ्या प्रकारच्या भाज्या, व कोशिंबिरी कशा कराव्या हें शिकविलें आहे. त्यांपैकीं बऱ्याच जिनसांची माहिती काशीस चांगली झाली आहे. आज रात्रीं फराळाचा बेत केला आहे; व काशी स्वत: फराळाच्या जिनसा तयार करणार आहे. मुलांनीं श्रम करून ज्या भाज्या लाविल्या आहेत त्या सर्व फराळाचे वेळीं तुमचे दृष्टीस पडतील. हा बेत तुह्मांस पसंत आहे का?

**यशोदाबाई.**—आनंदी बाई, या गोष्टीस माझी पूर्ण संमति आहे. मुलांनीं स्वत: श्रम करून बागेंत लावलेल्या जिनसा व मुलीनें स्वत: तयार केलेले पदार्थ खाण्याची संधि सांपडावी, यापेक्षां आनंदाची गोष्ट कोणती? आज कांहीं असो, मी घरीं राहणार. हें भाषण संपतें आहे तों यशोदाबाईकडे राधाबाईची कुळंबीण आली. तीस पाहून यशोदाबाईनें विचारिलें ठमाऊ, आज या वेळेस तूं कशी आलीस. त्यावर ठमाऊनें उत्तर केलें कीं, बाईसाहेबांनीं तुह्मांस जेवण लवकर आटोपून बसण्यास सांगितलें आहे.

**यशोदाबाई.**—आज काय आहे? कोणी हरदास आला आहे काय?

**ठमाऊ.**—मला तें माहीत नाहीं; परंतु बाईसाहेब व दुसऱ्या बायका नाटकाविषयीं कांहीं बोलत होत्या.

**यशोदाबाई.**—होय, होय, बरोबर आहे. मंडळी आज रामविजयाचा शेवटचा खेळ करून दुसरीकडे जाणार आहे; आजचा खेळ अखेरचा होणार आहे; तेव्हां अशी संधि पुनः यावयाची नाहीं. बाहेरगांवचे लोक मुद्दाम पैसे खर्च करून पुण्यांत येतात, व आपण पुण्यांतले पुण्यांत असून जाऊं नये हें चांगलें नाहीं, असें तुझ्या बाईसाहेब काल ह्मणत होत्या.

**ठमाऊ.**—बरें मग आतां बाईसाहेबांस काय सांगूं? हें ऐकून यशोदाबाई थोडी विचारांत पडली. परंतु आपण थोडेच वेळापूर्वीं आनंदीबाईपाशीं काय ह्मटलें याची आठवण होऊन ती ह्मणाली, ठमाऊ, आज माझा येण्याचा विचार नाहीं, असें तूं आपल्या बाईसाहेबांस सांग.

**आनंदीबाई.**—यशोदाबाई, तुह्मी आज गेला नाहीं, तर तुमच्या मैत्रिणींस वाईट तर वाटणार नाहींना?

**यशोदाबाई.**—त्यांस वाईट वाटो किंवा न वाटो. रामविजय पाहून जो मला आनंद होईल, त्यापेक्षां आज घरीं राहून मला फार आनंद होईल असें मला वाटतें. इतकें बोलून यशोदाबाई ठमाऊस ह्मणाली ठमाऊ, तूं आपल्या बाईसाहेबांस सांग कीं, आज माझें येणें होणार नाहीं. आज मला घरींच राहिलें पाहिजे.

**ठमाऊ** हिनें हा निरोप राधाबाईस कळविला.

यशोदाबाई नाटकाला येत नाहीं, हें ऐकून राधाबाईस फार आश्चर्य वाटलें. तिच्याजवळ दुसऱ्या बायका बसल्या होत्या. त्या ह्मणूं लागल्या कीं, हा खेळ सर्व आनंदीबाईचा आहे. ती यशोदाबाईच्या घरांत शिरल्यापासून यशोदाबाईची वृत्ति चंचल झाली आहे. आनंदीबाईनें तीस कांहीं तरी मोहनी घातली असावी. अशा रीतीनें आनंदीबाईच्या वर्तनावर बरीच टीका झाली; परंतु

आपणास ह्या गोष्टीकडे लक्ष द्यावयाचें नाहीं. यशोदाबाईचे घरांत काय प्रकार झाला ह्याविषयीं आपण विचार करूं.

आनंदीबाईस यशोदाबाईचा रुकार मिळाल्यावर ती मुलांकडे गेली. आईची परवानगी मिळाली व ती आज घरीं राहणार हें ऐकून मुलांस फार आनंद झाला. त्यांनीं फराळाची तयारी चालविली. आनंदीबाईची देखरेख होतीच. तेव्हां सर्व व्यवस्था चांगली होती हें सांगावयास नको. यशोदाबाईनें आपल्या कांहीं मैत्रिणींस बोलाविलें होतें. सर्व मंडळी आपापल्या ठिकाणीं बसल्यावर टोमाटोचे भाजीची रुचि केव्हां घेईन, असें बाळ्यास झालें होतें.

मंडळी फराळास बसल्याबरोबर बाळ्यानें प्रथम भाजीचा घास घेतला; व लागलींच पाण्याचा घोंट घेतला. तें पाहून मंडळीस फार हसूं आलें. बाळ्या आनंदीबाईच्या तोंडाकडे पाहूं लागला. तेव्हां ती ह्मणाली बाळ, तूं थोडा उतावीळपणा केलास. प्रथमच कां कोणी भाजी खातो? भूक लागली असतां मनुष्याचा कोठा रुक्ष असतो. भाजीसारखे पदार्थ प्रथम खाऊं नयेत. स्निग्ध पदार्थ प्रथम खाऊन नंतर तिखट पदार्थ खावेत व पाणी प्यावें हें चांगलें.

फराळाचे वेळीं प्रथम यशोदाबाईनें बोलण्यास सुरवात केली. काशीची सुग्रणता पाहून तीस आनंद झाला व काशीची व आनंदीबाईची स्तुति केल्यावांचून तीस राहवेना. ती ह्मणाली, नुसते पदार्थ चांगले तयार करून उपयोग नाहीं, तर ते वाढण्यांत सुद्धां अलगरजीपणा व घामटपणा उपयोगीं नाहीं, ही गोष्ट तुह्मीं माझ्या मुलींस शिकविली हें फार चांगलें केलें. पदार्थ वाढण्यावरून सुद्धां बायकांचे आंगीं टापटीप किती आहे व त्या घामट आहेत किंवा कसें याची परीक्षा होते.

अशा प्रकारच्या बऱ्याच गप्पा झाल्या. मंडळीचा फराळ आटोपला. सर्व मंडळी दिवाणखान्यांत बसली. तेथील टेबलावर एक पुस्तक पडलें होतें. तें काशी वाचूं लागली. तें स्त्रियांकरितां केलेलें होतें. परंतु त्याची भाषा चमत्कारिक होती; ह्मणून काशीस तें आवडलें नाहीं. तिनें तें ठेवून दिलें. हें पाहून आनंदीबाई ह्मणाली अलीकडे स्त्रीशिक्षणाविषयीं बरीच चर्चा होत आहे; परंतु स्त्रियांस समजण्यासारखीं उपयुक्त पुस्तकें करण्याविषयीं विशेष काळजी दिसून येत नाहीं. कित्येक पुस्तकांची भाषा मलासुद्धां समजत नाहीं.

हें ऐकून बाळ्याही पुढें सरसावून ह्मणाला मावशीबाई, मलाही बालबोधांतील पुष्कळ गोष्टी समजल्या नाहींत. त्यावरून मंडळी हसूं लागली. यशोदाबाईस व मुलांस ती रात्र मौजेची वाटली. बाळ्या संध्याकाळीं जेवण झाल्याबरोबर निजत असे; परंतु तोही बराच वेळ जागा होता.

एके दिवशीं आनंदीबाईनें बाळ्यास चित्रांचें पुस्तक दिलें. तें जर्मन व फ्रेंच लोकांमध्यें जी लढाई झाली, तिची वेळोवेळीं जीं चित्रें आलीं होतीं त्यांचें होतें. बाळ्या तें पाहत असतां माई तेथें आली. परंतु तो भराभर पानें चाळी, यामुळें तीस बरोबर पाहतां येईना. तीस नेपोलियन बादशाहाचें चित्र पाहवयाचें होतें; ह्मणून ती पुस्तक हिसकावून घेऊं लागली. त्यावरून बाळ्या तें ओढावयास लागला. अशा रीतीनें नेपोलियन बादशाहाचे मधल्यामध्यें हाल होऊन त्याचे तुकडे होतात कीं काय, अशी भीति उत्पन्न झाली. परंतु आनंदीबाईस तें समजतांच तिनें बादशाहाची मुक्तता केली व नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें मुलांस निरनिराळ्या खोलींत बसविलें. बाळ्याचा अपराध असतां मावशीबाई बाळयास रागें भरली नाहीं, व आपला अ-

पराध नसतां आपणास निराळे खोलींत बसावयास सांगितलें, ह्मणून माई रुसून बसली. ही संधी पाहून वेणुबाईनें माईस फणसपोळी दिली व तिची समजूत करून ती चालती झाली. मुलांस रुसण्यासही वेळ लागत नाहीं; व गोडींत येण्यासही उशीर लागत नाहीं. वेणुबाईनें तीस जी पोळी दिली होती ती बाळ्यास देण्याकरितां ती त्याकडे गेली व त्यास ती देऊं लागली. पूर्वीं, बाळयास खाण्याची मोठी चटक असे व त्याचें लक्ष खाण्याकडे असे. परंतु नवीन उद्योग व नवीन आनंद, यांमुळें आतां खाण्याकडे त्याचें कमी लक्ष असे; ह्मणून त्यानें ती घेतली नाहीं. तो ह्मणाला मला नको. तूं वेणुबाईस परत देऊन टाक. मावशीबाईस ही गोष्ट समजली, तर त्या रागें भरतील. तूं जर परत करशील, तर मावशीबाईस सांगून तुला मी दुसरी छानदार फणस पोळी देईन. माझी पक्की खात्री आहे कीं, त्या नाहीं ह्मणणार नाहींत. माईचे डोक्यांतील वेड गेलें होतें. मावशीबाईस न कळतां आपण खाऊची जिन्नस घेतली, ही गोष्ट मनांत येऊन तिनें वेणुबाईस फणसपोळी परत केली. माईनें जी हकीकत सांगितली ती ऐकून वेणुबाईस फार आश्चर्य वाटलें, व आपला हेतु सिद्धीस नेण्यासाठीं दुसरी कांहीं तरी तोड काढिली पाहिजे, असें तीस समजून आलें.

आदले दिवशीं जी हकीकत झाली होती ती, व माईस आपण जें वचन दिलें होतें तें, बाळ्यानें आनंदीबाईस कळविलें. तें ऐकून तीस फार समाधान वाटलें. जें काय पाहिजे, तें बाळ्या मोकळ्या मनानें मागतो, व नाहीं ह्मटलें तरी वेड्यासारखा रुसून बसत नाहीं, हें पाहून आनंदीबाईनें त्यास उत्तम फणसपोळी दिली. ती, तो व माई खात असतां त्यांच्या दारापुढें एक तमाशा आला. बाळ्या तो पाहण्यासाठीं खिडकींत बसला. या

तमाशांत एक मुलगा काठीवरून चालत होता. त्याची दृष्टि बाळ्याकडे गेली. काठीवर उभा राहून त्यानें बाळ्यापुढें हात पसरला. मुलगा भुकेनें व्याकुळ झाला होता. तें पाहून बाळ्या ह्मणाला मजजवळ पैसा नाहीं, पोळी आहे; तुला पाहिजे असल्यास ती देतों. त्यावरून आनंदीबाईनें त्याचा हात मागें घेतला व ती ह्मणाली बाळ, या पोळीनें त्या मुलाच्या भुकेचें कसें निवारण होईल ? तुला त्याची करुणा आली असेल, तर तूं त्याला कांहीं पैसे दे, ह्मणजे त्यास खरा संतोष होईल. असें ह्मणून तिनें त्याचे हातीं पावली दिली. ती त्यानें मुलास दिली. नंतर मुलाच्या बापानें व मुलानें तीन वेळां जोहार केला व ते चालते झाले.

एके दिवशीं आनंदीबाईनें बाळ्यास नऊ लक्ष चार हजार तीनशें चाळीस, पंधरा हजार तीन, आठशें सात, व पंचावन या रकमांची बेरीज करून आणण्यास सांगितलें. ती त्यानें केली; परंतु त्याचें उत्तर चुकलें होतें; ह्मणून आनंदीबाईनें त्यास ती पुन: करून आणण्यास सांगितलें. तेव्हां तो हिरमुसल्यासारखें तोंड करून चालता झाला. त्यानें ती पुन्हा केली व आनंदीबाईस दाखविली. परंतु ह्याही वेळेस त्याचें उत्तर बरोबर नव्हतें. हें पाहून आनंदीबाई ह्मणाली बाळ, तुझें उत्तर चुकलें आहे; ह्यासाठीं फिरून यत्न करून पहा. हे शब्द ऐकून बाळ्यास झटका आला; त्यानें कावरीबावरी मुद्रा केली व मला येत नाहीं असें तो ह्मणणार, इतक्यांत आनंदीबाई ह्मणाली, बाळ, तुझा तापटपणा गेला नाहीं. तुला मी रीत शिकविली आहे. आतां उदाहरण तूं स्वत: केलें पाहिजे. तें तुला करितां येण्यासारखें आहे. दोनदां उदाहरण चुकलें ह्मणून तूं स्वस्थ बसणें चांगलें नाहीं. तुला पुढें पुष्कळ गणित शिकावयाचें आहे. अद्याप तुला पुष्कळ गोष्टी करावयाच्या आहेत. यांत दोनदां नाहीं, अनेक वेळां चुकण्याचा

संभव आहे; तर उतावळेपणा करून उपयोग काय ? ही बेरीज तुला केली पाहिजे. तूं फिरून यत्न करून पहा; ह्मणजे तुला ती खास येईल. हें ऐकून बाळ्या पुन्हा हिरमुसल्यासारखें तोंड करून आपल्या खोलींत गेला. तेथें वेणुबाई आली. बाळ्याचें तोंड हिरमुसल्यासारखें पाहून ती ह्मणाली, बाळ, आज तुला बरें वाटत नाहीं काय ? तुझी आई तुला खालीं बोलावीत आहे. वेणुबाईच्या तोंडचे हे प्रेमाचे शब्द ऐकून बाळ्यास फार आश्चर्य वाटलें. कारण वेणुबाई त्याशीं अशा प्रेमळ रीतीनें कधींच बोलली नाहीं.

आईनें बोलाविलें आहे, असें समजतांच बाळ्या लागलींच खालीं गेला. परंतु त्याची आई खालीं नव्हती व तिनें त्यास बोलाविलेंही नव्हतें. तेव्हां तो पाणी पिऊन वर आला. येतां येतां त्यास रीत आठवली. परंतु पाटी हातांत घेऊन पाहतो तों बेरीज केलेली त्याचे दृष्टीस पडली. तेव्हां त्यास वाटलें कीं, हें काम वेणुबाईशिवाय दुसरे कोणाचें नसावें. ह्मणून त्यानें रागानें ती बेरीज पुसून टाकिली, व स्वतः ती लक्षपूर्वक करून तो आनंदीबाईपुढें पाटी घेऊन उभा राहिला. हातचें काम एकीकडे ठेवून आनंदीबाईनें ती पाटी पाहिली; त्याचे पाठीवरून हात फिरवून त्यास शाबासकी दिली; व ती ह्मणाली बाळ, पाहिलेंस ना, फिरून यत्न करण्यापासून काय नफा आहे तो ? तूं त्या वेळेस माझें न ऐकतां डोक्यांत राख घालून आपलाच हेका धरून बसतास, तर आतां जितका तुला आनंद होत आहे तितका झाला नसता.

वेणुबाईनें हा सर्व प्रकार पाहिला, व तिला अधिकच वाईट वाटलें. आनंदीबाईनें कांहीं गौडबंगाल केलें आहे कीं काय, असें तीस वाटूं लागलें. परंतु तिनें आपले मनांतील विचार दोन तीन मैत्रिणींशिवाय दुसऱ्या कोणास कळविले

नाहींत. ती आनंदीबाईस पूर्वींपेक्षां जास्त मान देऊं लागली; परंतु तिचें वजन कमी कसें करावें या विचारांत ती रात्रंदिवस असे. तिला यशोदाबाईच्या मैत्रिणींची अनुकूलता होती. तिला आपला हेतु सिद्धीस नेण्यासाठीं लवकरच संधि सांपडली. ती अशी:—

एके दिवशीं एका मैत्रिणीचा फारच आग्रह पडल्यामुळें यशोदाबाई तिचे घरीं रात्रीं जेवावयास गेली. तेथें आग्रह फार करण्यांत आला, ह्मणून तिनें श्रीखंड वाटीभर जास्त खाल्लें. श्रीखंडावर पाणी पिऊं नये, अशी समजूत असल्यामुळें ती जेवतांना पाणी प्याली नाहीं; व नंतरही तिला पाणी पिण्याचें स्मरण राहिलें नाहीं. ती घरीं उशिरां आली व निजली. सकाळीं उठल्यावर तिच्या पोटांत कळ निघाली. श्रीमंतांच्या बायकांना थोडें दुखणें आलें ह्मणजे, त्या घाबरून जातात व दुसऱ्यास घाबरून सोडतात. त्याप्रमाणें यशोदाबाई फार घाबरली. परंतु तीस पाणी पिण्याचा सोपा उपाय सुचला नाहीं. वेणुबाईस ही गोष्ट समजतांच ती वर आली व तिनें, पोट चोळूं का ह्मणून यशोदाबाईस विचारिलें. यशोदाबाई हो ह्मणतांच वेणुबाई गडबडीनें खालीं धांवत गेली व मिरपूड व तेल घेऊन येऊन पोट चोळूं लागली; परंतु पोटदुखणें राहिलें नाहीं. नंतर ओवा खाण्यास दिला; हिंग व तूप खावयास दिलें; तथापि गुण आला नाहीं. हें पाहून वेणुबाईनें यशोदाबाईस विचारिलें कीं, डाक्टरला बोलावणें पाठवूं का? यशोदाबाईनें मान हालविली. त्यावरून वेणुबाईनें डाक्टर विनायकराव यांकडे मनुष्य पाठविला. विनायकराव लागलींच आले. त्यांनीं यशोदाबाईची नाडी पाहिली; परंतु त्यांस विशेष कांहीं दिसून आलें नाहीं. त्यांनीं सर्व हकीकत विचारून

घेतली व मनुष्य पाठवा ह्मणजे औषध पाठवितों, असें सांगितलें. ते गेल्यावर यशोदाबाईची धालमेल चालली. ती ह्मणाली वेणू, आज काशी व माई घरांत नाहींत काय? आनंदीबाई कोठें आहेत? मी अजारी आहें हें त्यांस माहीत नाहीं काय? आज या सर्वांचें झालें तरी काय?

**वेणुबाई.**—सर्वजण बाहेर गेले आहेत.

**यशोदाबाई.**—सर्वजण?

**वेणुबाई.**—मला वाटतें सर्वजण बाहेर गेले आहेत. मीं फारशी चौकशी केली नाहीं. त्यांच्या कारभारांत तूं पडत जाऊं नकोस, असें तुह्मीं सांगितल्यापासून मी त्यांविषयीं पूसतपाससुद्धां करीत नाहीं.

**यशोदाबाई.**—आनंदीबाई घरांत सांगून गेल्या आहेत का?

**वेणुबाई.**—त्या मला विचारून गेल्या नाहींत.

खरोखर पाहतां आनंदीबाई वेणुबाईस खुद्द सांगून गेली नव्हती. परंतु ज्या वेळेस ती घरांत एका नोकरास कळवून गेली त्या वेळेस वेणुबाई तेथें होती, व आनंदीबाई कोठें गेली होती हें तीस माहीत होतें. वेणुबाई यशोदाबाईस ह्मणाली आज सकाळीं तुह्मीं गोंगाट ऐकिला का?

**यशोदाबाई.**—(घाबरून) कसला?

**वेणुबाई.**—कांहीं विशेष नाहीं. तुह्मास घाबरण्याचें कारण नाहीं. गाणें व नाचणें यांशिवाय दुसरें कांहीं नव्हतें.

**यशोदाबाई.**—गाणें आणि नाचणें, आणि इतक्या पहांटेस!! वेणू, तूं अर्धवट बोलूं नकोस. काय असेल तें सर्व सांग. तुझे संशययुक्त भाषणानें माझे मनांत भलभलत्या कल्पना येतात.

**वेणुबाई.**—तें सर्व सांगण्याला हरकत नाहीं; परंतु तुह्मास राग येईल कीं काय, अशी मला भीति वाटते. तुह्मी दि-

बाणखान्यांत आहां, तेव्हां पुढल्या दारीं काय चाललें आहे हें तुह्मास ऐकूं येणार नाहीं, असें काशी, माई व आनंदीबाई यांस वाटलें असावें.

**यशोदाबाई.**—काय ऐकूं जावयाचें व पुढल्या दारीं काय चाललें होतें ?

**वेणुबाई.**—कांहीं ह्मणण्यासारखें नव्हतें. एक तमाशा आला होता; त्यांत एक मनुष्य ढोलकें वाजवीत होता व दुसरा हातांत पुंगी घेऊन ती वाजवीत होता व तालावर नाचत होता. तें पाहून बाळ्या मोटमोठ्यानें उड्या मारीत होता.

**यशोदाबाई.**—पण मी आजारी आहें, असें तूं त्यास सांगितलें नाहींस काय ?

**वेणुबाई.**—मी बाळ्यास सांगितलें; परंतु काशी व माई यांजवळ आनंदीबाई होत्या, ह्मणून मी त्यांजवळ कांहीं बोललें नाहीं; तथापि त्यांस ऐकूं जाईल असें बोललें.

हें भाषण चाललें आहे, तों माई थेट आईच्या बिछान्यापर्यंत आली. तेव्हां यशोदाबाई तीस ह्मणाली माई, आज तूं घरीं कशी ? काशी कोठें आहे ? ती कांहीं वाचीत बसली आहे का ? माझें पोट दुखत आहे, हें तुह्मांस माहीत नाहीं वाटतें. बरें तें असो. आनंदीबाईपाशीं तुमचें कांहीं काम असल्यास तुह्मांस येथें खोळंबवून ठेवणें बरोबर नाहीं. या बोलण्याचा अर्थ माईस समजला नाहीं. ती ह्मणाली आज मावशीबाईशीं आमचें कांहीं एक काम नाहीं. आई, तूं आजारी आहेस हें मावशीबाईस माहीत आहे का ? त्यांस माहीत असतें, तर त्या येण्यास चुकल्या नसत्या. वेणुबाईच्या सांगण्यावरून यशोदाबाईचें मन आनंदीबाईविषयीं निर्मळ नव्हतें. ज्या मनुष्याविषयीं आपलें मन शुद्ध नसतें, त्याची स्तुति कोणीं केली असतां ती फारच अ-

प्रिय वाटते. त्याप्रमाणें यशोदाबाईस माईचें बोलणें रुचलें नाहीं. ती उगीच बसली. औषध घेऊन मनुष्य कां आला नाहीं ह्मणून तिनें वेणुबाईस विचारिलें. वेणुबाईनें औषध आणण्यासाठीं डाक्टराकडे दुसरा मनुष्य पाठविला. विनायकराव भला मनुष्य होता. तो लोकांस काळजीपूर्वक औषध देत असे. पैशावर त्याची फारशी नजर नसे, ह्मणून त्याचे घरीं रोग्यांची गर्दी फार असे. विनायकराव यशोदाबाईच्या घराहून परत आल्यावर त्यानें घरीं आलेल्या रोग्यांस वाटेस लाविलें. इतक्यांत यशोदाबाईकडील दुसरा मनुष्य औषध मागण्याकरितां आला.

ह्या नोकरास पाहून विनायकरावानें आपल्या दवाखान्यांतील मनुष्यास खालीं जाऊन स्वच्छ पाणी घेऊन येण्यास सांगितलें. नोकर पाणी घेऊन आल्यावर विनायकरावानें तें बाटलींत घालून तिचें तोंड बुचानें बंद केलें. नंतर तिच्यावर चिठ्ठी मारिली. चिठ्ठीवर "आक्वा प्यूरा फॉर यशोदाबाई, आ वाइन ग्लास एवरी फिफटीन मिनिटस," असे शब्द इंग्रजींत लिहिले होते. हा सर्व प्रकार विनायकराव याचे येथें त्याचा स्नेही बसला होता त्यानें पाहिला. त्याचे मनांतून प्रश्न विचारावयाचा होता; परंतु तो गृहस्थ थोडा वेळ स्वस्थ बसला. यशोदाबाईकडील मनुष्य बाटली घेऊन परत गेल्यावर विनायकरावांचा स्नेही मोठ्यानें हसून ह्मणाला, तुह्मीं आतां औषध ह्मणून जें दिलें तें तर नुसतें पाणी होतें. डॉक्टरसाहेब, ज्या रोगावर स्वच्छ पाणी हें औषध चालतें, असा रोग कोणता आहे ! बरें स्वच्छ पाणीच पाहिजे होतें, तर तें यशोदाबाईचे घरीं नव्हतें का ? मग तिचे नोकरास इतका वेळ तुह्मीं कां बसवून घेतलें ? विनायकराव ह्मणाले अहो, तुह्माला काय सांगावें. या श्रीमंतांच्या बायका किती वेड्या असतात ह्मणून सांगूं. थोडेंसें कपाळ दुखलें, डाक्टराला घेऊन या, पडसें आलें

डाक्टराकडे जा, ठेंच लागली डाक्टराला बोलवा. यांस उठल्या बसल्या डाक्टरचें कारण लागतें. यांत आमचें नुकसान नाहीं; परंतु या वेड्या लोकांपुढें इलाज नाहीं. यशोदाबाईचे घरीं गेल्यावर मीं तिची नाडी पाहिली; कारण नाडी पाहिली नाहीं, तर डाक्टर चांगला नाहीं अशी समजूत आहे. आमच्या धंद्यांत जीं सोंगें शिरलीं आहेत त्यांपैकीं नाडी पाहणें हें मोठें सोंग आहे. ज्याप्रमाणें परीक्षा करावयाची त्याप्रमाणें केली; परंतु मला कांहीं एक विशेष दिसून आलें नाहीं. नंतर यशोदाबाईस सर्व हकीकत विचारिली. तिजवरून मला उघड दिसून आलें कीं, तिचे खाण्यांत श्रीखंड जास्त आलें व ती पाणी न पितां निजली; तेव्हां तिला अजीर्ण झालें आहे; तिला पाणी प्यावयास मिळालें असतां तिचें पोटदुखणें बंद होईल. परंतु तुला कांहीं विशेष झालें नाहीं, असें मी तेथें बोललों असतों, तर तें पटलें नसतें. याविषयीं मला चार पांच वेळ अनुभव येऊन चुकला आहे. तेथेंच पाणी आणून प्यावयास दिलें असतें, तर अनशीं पोटीं, सकाळीं, त्यांतून पोट दुखत असतां पाणी कसें प्यावें, अशा हजार कल्पना निघून माझें सांगणें पटलें नसतें. ह्मणून घरीं येऊन बाटलींत पाणी घालून व तिच्यावर चिठ्ठी मारून ती मनुष्याबरोबर पाठविली असतां तीस विशेष महत्व येऊन असल्या लोकांची समजूत होईल, असें मला वाटल्यावरून त्याप्रमाणें मीं केलें. ही गोष्ट ऐकून विनायकरावांचे मित्रास फार हसूं आलें. तो पुण्यांतील वकिलांपैकीं एक प्रसिद्ध वकील होता. त्यानेंही आपल्या धंद्याचे संबंधानें आलेला अनुभव सांगितला. आपणास या अनुभवाशीं कांहीं करावयाचें नाहीं. डाक्टरसाहेबांकडे जाऊन औषध आणण्यासाठीं जो मनुष्य गेला होता तो परत येत असतां, दारापाशीं त्याची व आनंदीबाईची गांठ पडली.

आनंदीबाई घरांत गेली व तिनें त्यास लगबगीनें जाण्याचें कारण विचारिलें. तो ह्मणाला मावशीबाई, आज बाईसाहेबांची प्रकृति फार बिघडली आहे. त्यांनीं तुमची दोनदां आठवण केली होती. मीं डाक्टरसाहेबांकडून औषध आणिलें आहे व तें घेऊन वर चाललों आहें. हें ऐकून आनंदीबाईस आश्चर्य वाटलें. ती ह्मणाली मी गेलें तेव्हां कांहीं एक नव्हतें, व आतां इतक्यांतच काय झालें? औषध काय दिलें आहे तें तिनें पाहिलें; तों आक्का प्यूरा असें बाटलीवर लिहिलें होतें. नंतर तिनें नोकरास जावयास सांगितलें व ती मनांत ह्मणाली आक्का प्यूरा! हें औषध काय आहे! परंतु थोड्याच वेळानें तीस आठवलें कीं, आक्का प्यूरा ह्मणजे स्वच्छ पाणी. बरें पण, येथें स्वच्छ पाणी असतां डाक्टरसाहेबांनीं घरून नुसतें पाणी पाठविलें याचा अर्थ काय? यावरून त्यांनीं यशोदाबाईची समजूत घालण्यासाठीं अशी योजना केली असावी असें तीस वाटलें. नंतर ती लागलींच यशोदाबाईचे खोलींत गेली. यशोदाबाई औषध घेऊन अंथरुणावर पडली होती. शेजारीं माई व काशी होत्या. आनंदीबाईनें तिच्या प्रकृतीविषयीं विचारपूस केली; व हें सर्व अजीर्णामुळें झालें आहे, असें तेव्हांच तीस कळून आलें. बाळ्या कोठें आहे ह्मणून यशोदाबाईनें विचारिलें; तों बाळ्या आरोग्य विषयावर नवीन झालेलें पुस्तक घेऊन येत होता. आई अंथरुणावर निजलेली पाहून त्यानें पुस्तक एकीकडे ठेविलें; व तुला बरें वाटत नाहीं का ह्मणून आईस विचारिलें.

**यशोदाबाई.**—बाळ्या, तूं इतका वेळ कोठें होतास? माझें पोट दुखत आहे हें तुला माहीत नाहीं का?

**बाळ्या.**—आई, मी आरोग्य नांवाचें पुस्तक आणण्यासाठीं गेलों होतों. तूं आजारी आहेस असें मला समजलें असतें,

तर मी बाहेरच गेलों नसतों. मावशीबाई मला नेहमीं सांगत असतात कीं, आईबाप आजारी असतां मुलांनीं त्यांच्या जवळ असावें.

**यशोदाबाई.**—आनंदीबाई, तुह्मी का बरोबर गेलां होतां ?

**आनंदीबाई**—होय. हें पुस्तक घेऊन देण्याचें मीं काल बाळास कबूल केलें होतें. हें फार उपयुक्त आहे. ह्यांतील गोष्टी माई व काशी ह्यांनींही लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत.

आनंदीबाई असें बोलत आहे तों, काशी व माई ह्मणाल्या, बाळ्या, पाहूं तें पुस्तक कसें आहे तें ? बाळ्या तें घेऊन ह्मणाला आई, तुझ्या कर्मणुकी करितां मीच वाचून दाखवूं कां ? त्यावर काशी ह्मणाली, बाळ्या, तुला अद्याप चांगलेंसें वाचतां येत नाहीं; तूं वाचतांना मधून मधून अडखळतोस. मीच आईला वाचून दाखवितें. तेव्हां माई ह्मणाली ताई, तूं भरभर वाचतेस व बाळ्या फारच सावकाश वाचतो, असें मावशीबाई तुह्मां दोघांस ह्मणत असतात; ह्मणून मीच आईला वाचून दाखवितें. असें ह्मणून ती बाळ्याचे हातचें पुस्तक घेणार, तों बाळ्यानें तें आपल्या काखोटीस मारिलें. यामुळें त्याचा चुरगळा मुरगळा झाला. वाचण्याचे संबंधानें मुलांची टीका ऐकून व बाळ्यानें पुस्तक काखोटीस मारलेलें पाहून आनंदीबाई ह्मणाली "बाळ, काय हा वेडेपणा. तूं पुस्तकाचे इतक्यांतच किती हाल मांडिले आहेस ? अशाच प्रकारानें तुह्मां मुलांस वर्षांतून तेंच तें पुस्तक तीन तीन वेळां घेऊन द्यावें लागतें. बरें तें असो. या पुस्तकापासून तुमचे आईस सध्यां फारशी कर्मणूक वाटावयाची नाहीं. तुमच्या आईची प्रकृति बिघडली आहे व तिनें औषध घेतलें आहे, ह्मणून सध्यां तिला स्वस्थ पडूं द्या. मी तुह्मांस ह्या पुस्तकांतील गोष्टी समजून सांगेन;

मग तुह्मी तें वाचून दाखवा. आतां आपण सर्व दुसरे खोलींत जाऊन बसूं. काशी ह्या ठिकाणीं बसेल व डाक्टरसाहेबांनीं सांगितल्याप्रमाणें औषध देईल. मधून मधून आपणही समाचार घेत जाऊं." इतकें बोलून आनंदीबाई माईस व बाळ्यास घेऊन आपले खोलींत गेली. जाण्यापूर्वी तिनें यशोदाबाईंचे अंथरुणासभोंवतीं लावलेले पडदे वगैरे सर्व काढून टाकविले व शेकण्यासाठीं शेगडी, टोले वगैरे आणिले होते ते खालीं नेण्यास सांगितलें.

पोटांत पाणी गेल्यावर व कांहीं वेळ डोळा लागल्यावर यशोदाबाईची प्रकृति पहिल्याप्रमाणें साफ झाली. ती अंथरुणावर उठून बसली व पहाते तों काशी उशाशीं स्वस्थ बसली आहे. हें पाहून ती ह्मणाली काशी, तूं अद्याप बसली आहेस का ? तूं अझून वेणीफणी कशी केली नाहींस ! तुह्मी जेवलां नाहीं कां ? काशीनें उत्तर केलें, आई, मावशीबाईनें सांगितल्याप्रमाणें मी व माई पाळीपाळीनें बसलों होतों. बाळ्या दोन चारदां थोडथोडा वेळ बसून गेला. मावशीबाईही कांहीं वेळ बसून गेल्या. मीं वेणीफणीची गोष्ट काढिली होती, परंतु त्या ह्मणाल्या आज कांहीं घाई नाहीं; ती दुपारून होईल. जेवण्याकरितां वेणुबाईनें दोन तीन वेळां हाक मारिली व तुह्मी आपलें उरकून घ्या, ह्मणजे घरांतील मंडळीची मोकळीक होईल असें ती ह्मणाली; परंतु मावशीबाई ह्मणाल्या तुमची आई निजून उठल्यावर आपण सर्वजण एकदम बसूं. आह्मांस तें बरें वाटलें. आई, तूं आतां जेवावयास येतेस ना ? हें ऐकून यशोदाबाईस प्रथम संतोष वाटला. परंतु वेणुबाईनें सकाळीं तिचे मनांत जें भरवून दिलें होतें त्यामुळें, व आपणापेक्षां आपल्या मुलांवर आनंदीबाईचें जास्त वजन असावें, हें तीस न आवड-

त्यामुळें, ती ह्मणाली काशी, तुह्मी जेवण उरकून घ्या; आज मी लंघन करणार आहें; परंतु खालीं जाण्यापूर्वी आनंदीबाईकडे जा, व त्या कामांत नसतील तर त्यांस पाठवून दे. मला त्यांपाशीं कांहीं बोलावयाचें आहे. काशीच्या निरोपाप्रमाणें आनंदीबाई आली. परंतु आपल्या मनांतील खरे विकार बाहेर प्रदर्शित न करितां यशोदाबाई सभ्यपणानें ह्मणाली, आनंदीबाई तुह्मास एक विनंति आहे. ती तुह्मी कबूल कराल अशी माझी खात्री आहे. आजपावेतों यशोदाबाईचें असें कधींच भाषण नव्हतें, ह्मणून आनंदीबाईस थोडेसें आश्चर्य वाटलें; परंतु सभ्यपणामुळें तीस हो ह्मणणें भाग पडलें. नंतर यशोदाबाई ह्मणाली आनंदीबाई, विनायकराव डाक्टर व त्यांची बायको हीं तुह्मास माहीत आहेत. तुमच्याशीं बोलण्याची विनायकरावांची फार दिवसांपासून इच्छा आहे, परंतु योग घडून आला नाहीं. त्यांचा व आमच्या घरच्यांचा फार स्नेह असे. त्यांच्या बायकोचा व तुमचा थोडाबहुत परिचय झाला आहे. आज तिनें तुह्मास व मला संध्याकाळीं जेवावयास बोलाविलें आहे. मी आलें असतें, परंतु आज माझी प्रकृति बरी नाहीं. तुह्मी गेलां असतां तीस फार समाधान वाटेल. मुलें मजपाशीं राहिलीं असतां तुमची कांहीं हरकत आहे का ?

हें भाषण ऐकून आनंदीबाईस मोठा अचंबा वाटला. तिला वाटलें कीं, जर आपण होय ह्मणावें, तर आपणावर असा प्रसंग आल्यापासून आपण कोणाचे घरीं कधींच जेवावयास गेलों नाहीं, इतकेंच नाहीं, तर मुलांशिवाय आपण कधींच बाहेर पडलों नाहीं. मला जाणें गोड वाटत नाहीं असें सांगावें, तर यशोदाबाईला वाईट वाटेल. आजपर्यंत तिला वाईट वाटेल असें आपण कांहीं केलें नाहीं; व तिनेंही आपला असंतोष हो-

ईल असें कांहीं केलें नाहीं. येथें फार दिवस राहण्याचा आपला विचार नाहीं. तेव्हां थोडक्यासाठीं तिचें मन दुखविणें बरें नाहीं. बरें पण, डाक्टरसाहेबांनीं मुलांस जेवावयास बोलाविलें नसेल असें संभवत नाहीं; ह्मणून मुलांस घरीं राहूं द्या असें ह्मणण्यांत यशोदाबाईचा कांहीं तरी हेतु असला पाहिजे. आपणाविषयीं तिचा कांहीं तरी गैरसमज झाला असावा. अशा प्रकारें आनंदीबाईचे मनांत विचार घोळत होते. शेवटीं, नाहीं ह्मणणें तिच्या जीवावर येऊन ती ह्मणाली, यशोदाबाई, तुमच्या मर्जीबाहेर मी नाहीं. मुलें तुह्मापाशीं असण्यास माझी हरकत नाहीं. आढेवेढे घेतल्याशिवाय आनंदीबाईनें आपल्या ह्मणण्यास रुकार दिला, हें पाहून यशोदाबाईस थोडीशी लाज वाटली. कारण, तीस वाटलें कीं, आनंदीबाईस आपले मनांतील हेतु समजला असावा. आपले मनांत आनंदीबाईविषयीं भलताच ग्रह झाला याविषयीं तिला वाईट वाटलें.

कांहीं निमित्तानें त्या रात्रीं आनंदीबाईस पाठविण्याचें कारण हें होतें कीं, आपल्या मुलांवर तिचें जें वजन आहे तें कमी करून आपणच त्यांचे शिक्षणाची सर्व व्यवस्था आपल्या हातीं घ्यावी, ह्मणजे आपणास विशेष सुख होईल असें यशोदाबाईला वाटलें. परंतु मुलांस ज्यांचा विशेष लळा असतो त्यांपासून त्यांस जितकें सुख होतें, तितकें दुसऱ्यापासून होत नाहीं, हें तीस चांगलें माहीत नव्हतें. कित्येक पुरुष व स्त्रिया बुद्धिमान असतात; त्यांस काळजीही विशेष असते; परंतु मुलांस कसें शिक्षण द्यावें याचा त्यांस चांगला अनुभव नसल्यामुळें त्यांचे हातून चुका होतात, व त्यांचा प्रयत्न प्रथम निष्फल होऊन त्यांस वाईट वाटतें. परंतु यांत वाईट वाटण्याचें अथवा आश्चर्य करण्याचें कारण नाहीं. या बाबतींत उतावळेपणा करून उपयोगीं नाहीं. असो.

आनंदीबाई संध्याकाळीं जेवण्यास गेल्यावर यशोदाबाईनें आरोग्य विषयावरील पुस्तक बाळ्यास वाचावयास सांगितलें. बाळ्यानें तें बरेंच चांगल्या रीतीनें वाचलें; परंतु एक वाक्य वाचल्यावर त्याचा अर्थ काय हें समजण्यासाठीं तो थोडा वेळ थांबत असे. मधून मधून वातावरण ह्मणजे काय, प्राणवायु काय असतो, असे तो आईस प्रश्न विचारीत असे; व जेथें जेथें त्यास समजत नसे तेथें तेथें तो तीस विचारीत असे. ही संवय त्यास आनंदीबाईनें लाविली होती. परंतु ज्यांस अशा प्रकारच्या गोष्टीचा अनुभव नसतो त्यांस संतोष न होतां उलट त्रास मात्र होतो. त्याप्रमाणें बाळ्या वाचतांना मधून मधून थांबे व वारंवार प्रश्न विचारी यामुळें यशोदाबाईस त्रास वाटला. ती त्रासून ह्मणाली बाळ्या, एकसारखें वाच. मध्यें मध्यें मला विचारूं नकोस. बाळ्या वाचूं लागला. परंतु वाचतां वाचतां त्यास "पाणी हें मनुष्याचें जीवन होय; ह्मणून त्याविषयीं काळजी घेणें हें प्रत्येक मनुष्याचें काम आहे" असें वाक्य आढळलें. त्यावरून तो ह्मणाला आई, मावशीबाईनीं मला एकदां जीवन या शब्दाचा अर्थ पाणी असें सांगितलें आहे. तेव्हां पाणी हें पाणी आहे ह्मणजे काय ग ? त्यावर काशी ह्मणाली बाळ्या, जीवन या शब्दाचा एक अर्थ पाणी असा आहे, परंतु या ठिकाणीं जीवन ह्मणजे जगण्याचें साधन असा अर्थ आहे. यशोदाबाई उतावीळ होऊन ह्मणाली, आपण मराठी भाषेंतील एकेका शब्दाचे किती किती अर्थ आहेत याविषयीं विचार करूं लागलों, तर कांहींच वाचन होणार नाहीं. बाळ्याला पाहिजे असल्यास तो कोश पाहील किंवा कोणास तरी विचारील. बाळ्या, तूं अर्धा तास वाचतो आहेस; परंतु तुझें अर्धें पानसुद्धां संपलें नाहीं; यामुळें मला फारच कंटाळा आला आहे व तुझें वाचन नको असें वाटूं लागलें आहे.

आईस आपले वाचनाचा कंटाळा आला, असें समजून वाळ्यास वाईट वाटलें; ह्मणून तो भरभर वाचूं लागला. आपण काय वाचीत आहों, हें त्यास कांहींच समजलें नाहीं. तो शब्दचे शब्द सोडून देऊं लागला. लवकर वाचण्याचे नादांत चिन्हांकडे त्याचें मुळींच लक्ष नव्हतें. यामुळें सर्व घोटाळा होऊन कोणास कांहींच समजलें नाहीं. यशोदाबाई त्रासून ह्मणाली वाळ्या, पुरें आतां तुझें वाचन; जा आतां जाऊन नीज. हें ऐकून वाळ्यास फार वाईट वाटलें. माई व काशी स्तब्ध बसल्या. कोणी कांहींच बोलेना. शेवटीं यशोदाबाई ह्मणाली काशी, तूं तरी वाच, ह्मणजे कांहीं करमणुक होईल. शेजारीं तुकारामाचा गाथा पडला होता; तो काशीनें घेतला व आनंदीबाईनें उत्तम अभंग ह्मणून जो सांगितला होता, तो ती पाहूं लागली. तीस तो सांपडेना, ह्मणून ती माईस ह्मणाली माई, तुला तो माहीत आहे का ? तो आईस फार आवडेल, असें मावशीबाई ह्मणाल्या होत्या; परंतु तीस आठवण होऊन तिनें अभंग पाहून काढिला व तो ह्मणून दाखविला. तो अभंग असा:—

आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥
सकळांचे पायां माझे दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥
हित तें करावें देवाचें चिंतन । करूनियां मन एकविध ॥
तुका ह्मणे लाभ होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥

काशीचा गळा फार चांगला होता, असें मागें सांगितलेंच आहे. तिनें हा अभंग फार मधुर स्वरानें ह्मणून दाखविला; त्यामुळें यशोदाबाईस फार समाधान वाटलें. ती नंतर माईस ह्मणाली माई, तुला कांहीं येत आहे काय ? माईनें होय ह्मणून ह्मटलें व कांहीं ओव्या ह्मणून दाखविल्या.

जन्मा आलीयाचें फळ । कांहीं करावें सफळ ॥
ऐसें न करितां निर्फळ । भूमीभार होय ॥

नरदेहाचें उचित । कांहीं करावें आत्महित ॥
यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं लावावें ॥
हें कांहींच न धरी जो मनीं । तो मृत्युप्राय वर्ते जनीं ॥
जन्मा येऊन तेणें जननी । वायांच कष्टविली ॥

माईनें ह्या ओव्या ह्मणून दाखविल्यावर बाळ्या ह्मणाला आई, मला मावशीबाईनीं जे श्लोक शिकविले आहेत त्यांपैकीं एखादा मी ह्मणून दाखवूं का? तूं मला दसऱ्याचे दिवशीं कंठी, कडीं व मंदील हीं घालावयास दिलींस. त्यावेळेस मी तीं माईस दाखवावयास लागलों. ती रुसली होती, ह्मणून कांहींच बोलली नाहीं. तेव्हां मी तिच्यावर रागावलों. तें पाहून मावशीबाई ह्मणाल्या बाळ, मधुर व सभ्य भाषणानें पुरुषाला जी शोभा येते ती डागडागिन्यांनीं येत नाहीं. असें सांगून त्यांनीं मला एक श्लोक लिहून दिला, व तो तूं पाठ करून नेहमीं लक्षांत ठेव ह्मणून सांगितलें. तो मला चांगला येतो. यशोदाबाईनें रुकार दिल्यावर बाळ्यानें तो ह्मणून दाखविला. तो असा कीं—

मद्रत्न-हार मणि ताइत बाहुदंडीं ॥
कीं स्नान चंदन फुलें आणि लांब शेंडी ॥
यांनीं खरी घडतसे पुरुषा न शोभा ॥
वाणीच भूषण सु-शिक्षित-शब्दगर्भा ॥

मुलांनीं ह्मटलेल्या बोधपर कविता ऐकून यशोदाबाईनें काशीस विचारिलें, तुह्मांला या सर्वांचा अर्थ येतो का? काशी ह्मणाली आई, मावशीबाईनीं त्यांचा अर्थ आह्मांस समजून सांगितला आहे. त्यांनीं आह्मांस तुकारामाचे अभंगांपैकीं कांहीं निवडक अभंग, व दासबोधांतील ओव्यांपैकीं कांहीं निवडक ओव्या लिहून दिल्या आहेत. तीं आह्मी सर्वजण ह्मणत असतों. माई ह्मणाली आई, मावशीबाई रोज कांहीं लिहीत

वसतात; त्यावरून त्यांच्या मनांतून आह्मांस आणखी सांगावयाचें आहे असें वाटतें.

हें ऐकून यशोदाबाई ह्मणाली, मुलींनो, तुह्मांला माझे वयांत जास्त येईल असें वाटतें. तुह्मांस ज्याप्रमाणें शिक्षण मिळत आहे त्याप्रमाणें आमच्या वेळीं नव्हतें. मी तुमच्याएवढी असतां स्त्रियांस निराळ्या प्रकारचें शिक्षण मिळत होतें. आपल्या आईस मावशीबाईची स्तुति आवडणार नाहीं, हें माईचे लक्षांत न येऊन ती ह्मणाली आई, त्यावेळीं मावशीबाईसारख्या शिक्षक नसतील; नाहीं बरें ?

मुलांचे तोंडांतून आनंदीबाईची पुनः पुनः स्तुति ऐकून यशोदाबाईस वाईट वाटलें; परंतु तें तिनें दाखविलें नाहीं. ती ह्मणाली होय, कांहीं अंशीं तें खरें आहे. माझ्या वेळीं आनंदीबाईसारख्या स्त्रीशिक्षक नव्हत्या. आह्मांस आरोग्य वगैरे विषय शिकवीत नसत; व हल्लीं ज्याप्रकारें नीतिशिक्षण व प्रपंचांत लागणाऱ्या उपयुक्त गोष्टींचें शिक्षण चालू आहे, तो प्रकार माझ्या वेळीं नव्हता. बरें तें असो. माई, आतां रात्र बरीच झाली आहे, ह्मणून तूं व बाळ्या निजावयास जा.

काशी, तूं खालीं जाऊन वेणुबाईला घेऊन ये. आईची आज्ञा होतांच बाळ्या व माई निजावयास गेली व काशी वेणुबाईस घेऊन वर आली. तेव्हां यशोदाबाई तीस ह्मणाली, आज त्र्यंबककर बोवाचें कीर्तन आहे. ते संगीताचे चालीवर फार उत्तम पदें ह्मणतात अशी त्यांची ख्याति आहे. काशी, तूं कीर्तनास येतेस का ? आपण लवकरच परत येऊं. मुलांस कीर्तनास व नाटकास जाण्याची फार हौस असते. त्याप्रमाणें काशीचे मनांत जाण्याचें आलें. परंतु आपण रात्रीचे बाहेर गेलों, तर आनंदीबाईस बरें वाटणार नाहीं, हें लक्षांत येऊन ती ह्मणाली आई,

उद्यां मावशीबाईस समजलें, तर त्या मला रागें नाहीं का भरणार ? यशोदाबाई ह्मणाली काशी, आनंदीबाई तुला रागें भरूं लागल्या, तर माझें नांव सांग.

**काशी**—आई, बाळ्याला व माईला उठवूं का ? त्यांस न बोलाविलें, तर तीं मजवर रुसतील. ज्या वेळेस कांहीं मौजेची गोष्ट असते त्या वेळेस आह्मी सर्वजण ती पाहतों. बाळ्या तर, कांहीं मौजेची गोष्ट असली ह्मणजे, ती मला दाखविल्याशिवाय राहत नाहीं.

यशोदाबाई धूर्त होती, ह्मणून आपल्या मुलांचे मनावर आनंदीबाईचे शिक्षणाचा काय परिणाम झाला आहे, हें तीस कळून आलें. परंतु त्या वेळीं तिचें मन आनंदीबाईविषयीं शुद्ध नसल्यामुळें काशीचे बोलण्याचा विशेष विचार न करितां ती ह्मणाली, तुला यावयाचें असेल तर चल, नाहीं तर मी चाललें. काशीनें लागलींच हो ह्मणून सांगितल्यावर यशोदाबाई वेणुबाईस ह्मणाली वेणू, तूं आज घर सांभाळ. आनंदीबाई घरांत नाहींत व मीही घरीं नाहीं; तेव्हां मुलांवर तुझी नजर असूं दे. बाळ्या केव्हां केव्हां पाणी पिण्यासाटीं उठतो. त्यास थोडें स्वच्छ पाणी दे. मी परत येईपर्यंत तूं निजूं नकोस. बासनांतून माझें महेश्वरी कोरें लुगडें व काशीची अमदाबादी कोरी चिरडी घेऊन ये. आज कोरीं लुगडीं नेसून गेलें पाहिजे. कारण, आज गर्दी फार होईल व शिवाशिव होऊन विटाळ होईल.

यशोदाबाई आज काशीसह बाहेर जाणार, हें समजून वेणुबाईस आनंद झाला. तीस वाटलें कीं, आनंदीबाईच्या संबंधानें आपली जी खटपट चालू होती तिचा परिणाम यशोदाबाईचे मनावर थोडाबहुत तरी झाला आहे यांत संशय नाहीं. आतां आपल्या मनाप्रमाणें लवकरच गोष्ट घडून येईल. हें मनांत येऊन

आनंदाच्या भरांत ती ह्मणाली आज काशीबाई फार सुंदर दिसत आहेत. त्या रात्रीच्या आज कीर्तनास जात आहेत हें मोठें नवल आहे. या भाषणाकडे यशोदाबाईनें विशेष लक्ष दिलें नाहीं. कारण तीस ठाऊक होतें कीं, वेणुबाईचा बडबड करण्याचा स्वभाव आहे.

यशोदाबाई गेल्यावर वेणुबाईस आपला बेत सिद्धीस नेण्यास पुष्कळ वेळ सांपडला. बाळ्याला गाढ झोंप लागली होती. माई अर्धवट जागी होती; ह्मणून वेणुबाईनें तिला उठविलें. वेणुबाई व दुसऱ्या कांहीं बायका सोंगट्या खेळत बसल्या. माईचे मनांतून खेळावयाचें नव्हतें. ती ह्मणाली मावशीबाईंना हें आवडणार नाहीं. त्यावर दुसऱ्या बायका ह्मणाल्या आनंदीबाईला कोण सांगावयाला जाणार आहे ? तुला आनंदीबाईचा इतका धाक कशाला पाहिजे? माईनें कांहीं उत्तर केलें नाहीं. ती स्वस्थ खेळ पाहत बसली. हा खेळ बराच वेळ लांबला. इतक्यांत आनंदीबाई विनायकराव यांचे घरून जेऊन आली. तिनें प्रथम मुलांविषयीं चौकशी केली. परंतु बाळ्या व माई हीं निजलीं आहेत, व काशी आईबरोबर कीर्तनास गेली आहे असें तीस समजलें. यशोदाबाई मुलीस घेऊन रात्रीची बाहेर गेली, हें समजतांच आनंदीबाईस फार वाईट वाटलें. ती निजावयास गेली, परंतु तिला झोंप येईना. तिचें मन भ्रमण करूं लागलें. ती ह्मणाली, काय हा यशोदाबाईचा शहाणपणा ? आज सकाळीं हिची प्रकृति बिघडली असून, व काल रात्रीं जाग्रण झालें असून, पुनः जाग्रण करण्यास तिचे मनांत शंका आली नाहीं, हें आश्चर्य आहे. बरें, गेली तर गेली व मुलीला घेऊन गेली ! काय हें आईचें शिक्षण ! आह्मीं मुलींना नांवें कां ठेवावीं? आमचें आचरण कोठें पायाशुद्ध आहे?

आमच्या स्त्रियांचें लक्ष गमतीकडे फार. अलीकडील कीर्तनापासून वस्तुतः मनाला किती बोध होतो ? बोध व्हावा ह्मणून किती स्त्रिया कीर्तनास जातात ? अलीकडे कीर्तनांत सुद्धां संगीताचें किती वेड शिरत चाललें आहे ? नकला करून व ठरीव कोट्या सांगून हसविणारा बोवा असला ह्मणजे, लोकांच्या झुंडीच्या झुंडी जमतात. बोवा जर संगीताच्या चालीवर गाणारा असला, तर मग विचारावयास नको. बोवाचें एक सात्रक होवो अथवा दोन सात्रकें होवोत, नादी पुरुष व स्त्रिया कीर्तनास आहेतच. नकला करून लोकांस हसविणें अथवा गाऊन त्यांचें मनरंजन करणें हा कीर्तनाचा खरा हेतु नाहीं. या गोष्टी करण्यासाठीं देवालयें हीं स्थलें नाहींत. अनीतीचे आचरणाविषयीं पराङ्मुखता व तिरस्कार, व सन्मार्ग व सदाचार ह्यांविषयीं आसक्ति व प्रेम उत्पन्न करणें, हा कीर्तनाचा खरा हेतु आहे. हा हेतु ज्या हरिकीर्तनानें सिद्धीस जात नाहीं तें कीर्तन नाहीं, व ती हरिकथा नाहीं. कीर्तनाचा खरा हेतु लक्षांत न आल्यामुळें त्याचें मातेरें होईल कीं काय कोण जाणे. लोकांस आवडणाऱ्या व बोध करण्यास साधन, अशा संस्था फार थोड्या असतात. आमच्यांमध्यें कीर्तनाचे द्वारें सद्बोध करण्यास उत्तम साधन आहे; व विद्वान, शहाणा व प्रेमळ असा बोवा असेल, तर त्याचे बोधाचा ठसा लोकांचे मनावर उमटल्याशिवाय राहणार नाहीं. असला मनुष्य समाजास हळू हळू वळण देईल यांत शंका नाहीं. परंतु हल्लीं कीर्तनास जें वळण मिळत आहे त्यावरून कीर्तन, मनरंजन करण्याचें मात्र साधन होऊन बसेल कीं काय हें सांगवत नाहीं. ग्रामसमाज, पंचायत वगैरे उपयुक्त संस्था फार दिवस चालल्या होत्या; परंतु त्यांचा लय झाला आहे असें ह्मटलें तरी चालेल. त्याप्रमाणें कीर्तनाची स्थिति होईल असें दिसतें.

लोकांचे डोळे वेळेवर उघडत नाहींत. अगदीं लय होण्याची वेळ दिसूं लागली, ह्मणजे पुनरुज्जीवन करण्याचें त्यांचे मनांत येतें, ही दुःखाची गोष्ट आहे. हे विचार आनंदीबाईचे मनांत येऊन तीस झोंप येईना. आपणाविषयीं यशोदाबाईचा भलता ग्रह झाला आहे हें मनांत येऊन, पतिवियोग व पुत्रवियोग ह्यांची आठवण होऊन, व पुढें व्यवस्था काय करावी व लोकांचे घरीं किती दिवस रहावें वगैरे विचार तिच्या मनांत एकामागून एक येऊन, तिचें मन फारच वहकलें व नानाप्रकारच्या कल्पना मनांत येऊन तिचें डोकें तापून गेलें. तीस कांहीं केल्यानें झोंप येईना. शेवटीं ती उठून बसली व दिवा लावून भगवद्गीतेंतील वेंचे वाचीत बसली. कांहीं वेळानें यशोदाबाई व काशी ह्या कीर्तनाहून परत आल्या. आनंदीबाईच्या खोलींत दिव्याचा उजेड पाहून काशी ह्मणाली आई, मावशीबाईच्या खोलींत दिवा दिसत आहे. त्यावरून त्या घरीं आल्या असाव्या व कांहीं तरी वाचीत बसल्या असाव्या.

आपण सकाळीं आजारी असतां रात्रीस मुलीस घेऊन बाहेर गेलों, ही गोष्ट आनंदीबाईस कळूं नये, अशी यशोदाबाईची इच्छा होती. जरी ती स्वतंत्र होती व तीस कोणाचा धाक बाळगण्याचें कारण नव्हतें, तरी आनंदीबाईचे आचरणामुळें तिला तिचा पुष्कळ वचक वाटत असे. आनंदीबाई येण्यापूर्वी आपण घरीं परत येऊं, असें तीस वाटलें होतें. परंतु त्या दिवशीं कीर्तनास उशिरां प्रारंभ झाल्यामुळें व बोवांनीं मंडळीचा रंग पाहून हास्यरसाची गर्दी करून सोडल्यामुळें कीर्तन उशिरां आटोपलें. यशोदाबाई काशीस घेऊन आनंदीबाईच्या खोलींत गेली. आनंदीबाई वाचण्याचे नादांत होती.

न जायते म्रियते वा कदाचि-
न्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो
न हन्यते हन्यमाने शरीरे ॥

हा श्लोक वाचून ती "कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । मा कर्मफलहेतुरभूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥" हा श्लोक पुनः पुनः वाचीत होती, तों तिची दृष्टि यशोदाबाईकडे गेली. तीस पाहून ती पुस्तक दूर ठेवून उठून बसली. तीस यशोदाबाई ह्मणाली, मला वाटलें होतें कीं, आज बहुतकरून तुमचें येणें होणार नाहीं; डाक्टरसाहेबांची बायको तुह्मास राहण्याविषयीं आग्रह करील.

**आनंदीबाई**—होय. तुह्मी ह्मणतां तें खरें आहे. डाक्टरसाहेबानें व त्यांच्या बायकोनें मला फार आग्रह केला; परंतु रात्रीस दुसऱ्याचे घरीं राहणें मला बरें वाटलें नाहीं. दुसरें असें कीं, मुलांच्या आज फार दिवसांच्या सहवासानें त्यांशिवाय मला झोंप येत नाहीं. बाळ व माई यांस माझ्याशिवाय चैन पडत नाहीं. तेव्हां मुलांस टाकून आपण दुसऱ्याचे येथें फार वेळ रहावें हें सर्व प्रकारें मला गैर वाटलें, ह्मणून मी लवकर आलें; परंतु येथें येऊन पहातें तों, बाळ व माई हीं निजलीं आहेत, व वेणुबाईस त्यांकडे लक्ष देण्यास तुह्मीं ताकीद दिली आहे असें समजलें. यावरून असें करण्यांत तुमचा कांहीं उद्देश असावा असें समजून मी येथें येऊन निजलें; परंतु झोंप न आल्यामुळें मी वाचीत बसलें.

हें भाषण ऐकून यशोदाबाईस वाटलें कीं, आपले मनांतील हेतु आनंदीबाईस समजून चुकला असावा. वेणुबाईच्या सांगण्यावरून या साध्वीविषयीं आपला ग्रह वाईट झाला, हा आ-

पला कृतघ्नपणा आहे, असें तीस वाटूं लागलें. ती मनांत ह्मणाली, आपण करतों हें चांगलें करीत नाहीं, असें मला वाटतें; परंतु वेळ आली ह्मणजे भूल पडून जाते. याला इलाज चालत नाहीं. तथापि, पहिल्यापेक्षां माझी बरीच संवय कमी झाली आहे.

आपले मनांत जे विचार चालले होते ते आनंदीबाईस न समजावे, ह्मणून यशोदाबाईनें गोष्ट बदलली व ती आनंदीबाईस ह्मणाली, बरें पण, इतक्या रात्रीं तुह्मी काय वाचीत होतां ?

**आनंदीबाई**—नुकतेंच एक पुस्तक छापून प्रसिद्ध झालें आहे. त्यांत थोर पुरुषांच्या उक्तींचे वेंचे दिले आहेत. त्यांपैकीं भगवद्गीतेंतील वेंचे मी वाचीत होतें. त्यांत " न जायते म्रियते वा कदाचित् " ह्मणजे ईश्वरास जन्म मरण नाहीं, तो नित्य, शाश्वत, व पुराण आहे वगैरे जें ईश्वराविषयीं निरुपण केलें आहे तें वाचून, " जया मानला देव तो पूजिताहे ॥ परी देव शोधून कोणी न पाहे ॥ जगीं पाहतां देव कोट्यानुकोटी ॥ जया मानली भक्ति जे तेचि मोठी ॥ तिन्ही लोक जेथून निर्माण झाले ॥ तया देवरायासि कोणी न बोले " या रामदासाचे वचनाची मला आठवण होऊन खरी स्थिति एक आहे, व सध्यां लोकांत प्रचार निराळा आहे, व दुराग्रह व अज्ञान यांनीं लोकांचें मन ग्रासून जाऊन धर्माचे बाबतींत बखेडा झाला आहे. अशी स्थिति असतां मुलांस धर्मसंबंधीं शिक्षण द्यावयाचें असल्यास कसें द्यावें या विचारांत मी होतें; परंतु या विषयाविषयीं आणखी विचार करून व तुमचें काय ह्मणणें आहे तें ऐकून घेऊन उद्योगास लागणें बरें, असें मला वाटलें. परंतु सध्यां या पुस्तकांतील वचनांचा बोध करण्यास हरकत नाहीं, असें समजून त्याप्रमाणें मीं मुलांस कांहीं वचनें शिकविलीं आहेत व आणखी

शिकवावीं असें मला वाटतें. कारण, नरदेहाची खरी योग्यता, सप्रेमभक्ति, हितोपदेशश्रवण, विवेक, चित्तशुद्धि, दृढभाव, मनोनिग्रह, इंद्रियदमन, ईश्वरनिष्ठा व परोपकार हें धर्माचें सार होय. हें साधारणपणें नव्यांस व जुन्यांस मान्य आहे. याविषयींचा उपदेश या वचनांत केलेला दिसून येतो. तेव्हां या वचनांचा उपदेश करण्यास सध्यां मला कांहीं हरकत दिसत नाहीं. स्थलपरत्वें कदाचित् यांत कांहीं ठिकाणीं दोष असतील, परंतु त्यांविषयीं सावकाश विचार करण्याचें माझे मनांत आहे.

यावर काय उत्तर द्यावें हें यशोदाबाईस सुचेना. आपण नेहमीं भाकड कथा ऐकतों, त्यापेक्षां जर घटका घटका आनंदीबाईजवळ बसलों, तर विशेष फायदा होईल असें तीस वाटलें. ती ह्मणाली बरें पण आनंदीबाई, आह्मी आलों त्या वेळेस तुह्मी दुसरेंच कांहीं वाचीत होतां.

**आनंदीबाई**—बरें आटवलें. मी जें मुख्यत्वें तुह्मास सांगणार होतें तें विसरलें. “ कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ” हा श्लोक मी वाचीत होतें. याचा भावार्थ असा आहे कीं, कोणतेंही काम फलाच्या आशेनें करूं नये. कित्येक वेळां फल मिळेल, कित्येक वेळां मिळणार नाहीं; पण फल मिळणार नाहीं ह्मणून स्वकर्म न करणें हें वेड आहे. तुमच्या भयास्तव, अथवा तुमची मर्जी संपादन करण्याकरितां, अथवा तुमच्यापासून कांहीं प्राप्ती व्हावी या हेतूनें, माझें जें कर्तव्य तें न करणें हा वेडेपणा आहे, असा या श्लोकाचा भावार्थ आहे. हें महातत्त्व मुलांचे मनांवर ठसविणें फार अगत्याचें आहे. कारण आजपर्यंत मी जें त्यांचें वर्तन पाहत आहें, त्यावरून मी रागें भरेन ह्मणून, किंवा मला आवडणार नाहीं ह्मणून, किंवा मी शाबासकी देईन ह्मणून, तीं पुष्कळ गोष्टी करितात; आपलें कर्तव्य समजून तीं

थोड्या गोष्टी करितात. हें चांगलें नाहीं असें मला वाटतें. कारण मी आज आहें; उद्यां नाहीं. मी कांहीं त्यांच्या जन्माला पुरवलें नाहीं. स्वकर्माविषयीं आवड त्यांचे मनांत उत्पन्न झाली, ह्मणजे मग पदोपदीं त्यांजवर नजर ठेवण्याचें कारण नाहीं. वरें हें असो. सध्यां याविषयीं पाल्हाळ करण्याचा हा काळ नाहीं. तुह्मास कालचें व आजचें जागरण झालें आहे, ह्मणून तुह्मी निजा. मीही झोंप आली तर पाहतें. आतां माझें डोकें उतरलें आहे असें मला वाटतें. स्वकर्म या विषयावर एक निबंध माझे पाहण्यांत आला आहे. तो मी तुह्मास सवडीप्रमाणें वाचून दाखवीन.

यशोदाबाई व काशी ह्या हें भाषण लक्षपूर्वक ऐकत होत्या. आनंदीबाईनें स्वकर्माविषयीं जे विचार सांगितले ते काशीचे मनांत घोळूं लागले. आनंदीबाईचे कळकळीविषयीं यशोदाबाईची आतां पूर्ण खात्री झाली. आपणापासून कांहीं एक मिळावें अशी तिची बिलकुल इच्छा नसतां, व ती निष्कामबुद्धीनें व प्रेमळ अंतःकरणानें आपले मुलांची व्यवस्था करीत असतां, आपण तिजविषयीं परोपकारबुद्धि न दाखवितां उलट हलक्या लोकांच्या नादीं लागून तिला पाण्यांत पाहतों, यास काय ह्मणावें ? लोक तरी आपणाला काय ह्मणतील ? हे विचार मनांत येऊन यशोदाबाईस फार खेद वाटला, व आपण आपल्या वर्तनाबद्दल आनंदीबाईची क्षमा मागावी असें तीस वाटलें. इतक्यांत बाळ्याचें ओरडणें तीस ऐकूं आलें. तो कां ओरडतो तें पाहून ये, असें ती काशीस सांगणार, तों तीस व आनंदीबाईस पुनः आरोळी ऐकूं आली, ह्मणून त्या घाबरल्या. प्रथम यशोदाबाईस वाटलें कीं, तो झोंपेंत भ्याला असेल. नंतर तीस वाटलें कीं, त्यास कदाचित् कांहीं चावलें असेल. आनंदी-

बाईचा तर्क निराळाच होता. परंतु ती विचार करीत न ब-सतां लागलींच उठली व दिवा घेऊन बाळ्या जेथें निसला होता तेथें गेली, व पाहते तों तेथें माई मात्र रडत बसली आहे, असें तिचे दृष्टीस पडलें. बाळ कोठें आहे ह्मणून तिनें माईस विचारल्यावर माईनें भीत भीत उत्तर केलें कीं, बाळ्या वेणुबाईच्या हातून निसटून खालीं पळत गेला व वेणुबाई त्याच्या पाठोपाठ गेली. हें ऐकून आनंदीबाईसही भय वाटून ती बाळ्याच्या शोधार्थ गेली. वेणुबाईच्या खोलींत बाळ्या नाहीं, असें काशीनें यशोदाबाईस सांगितल्यावर यशोदाबाई फारच घाबरून गेली. इतक्यांत बाळ्या तेथें आला व त्यानें आपलें आंग धाडकन् बिछान्यावर टाकून दिलें. बाळ्या आला ह्मणून काशीनें यशोदाबाईस सांगितलें, तरी ती शुद्धीवर आली नाहीं.

आतां हा सर्व प्रकार कां झाला, हें समजण्याविषयीं वाचकांची इच्छा असेल हें उघड आहे. आह्मीं मागें सांगितलेंच आहे कीं, वेणुबाईच्या मनांतून आनंदीबाई नकोशी होती; व तिला घालवून देण्याविषयीं तिचा उद्योग चालू होता. वेणुबाईनें अनेक उपाय केले; परंतु प्रत्येक मसलत तिच्या आंगावर आली. यामुळें तीस वाईट वाटून तिनें व दुसऱ्या बायकांनीं असें मनांत आणिलें कीं, आपणांस आनंदीबाई शिकवावयास नको, असें मुलांकडून यशोदाबाईस सांगवावें. आनंदीबाईविषयीं यशोदाबाईचें मन शुद्ध नाहीं; तेव्हां हा उपाय केला असतां आपलें काम होईल असें त्यांस वाटलें; परंतु मुलें नेहमीं आनंदीबाईपाशीं असतात, तेव्हां त्यांस आपलींशीं कसें करून घेतां येईल या फिकिरींत त्या होत्या. परंतु आनंदीबाई त्या रात्रीस जेवावयास गेल्यामुळें व यशोबादाईही कीर्तनास गेल्यामुळें त्यांस संधि सांपडली. यशोदाबाई गेल्यावर वेणुबाईनें आपल्या नेहमींच्या मे-

त्रिणी जमविल्या व ती त्यांबरोबर सोंगट्या खेळत बसली. बाळ्या हिरवट आहे तेव्हां तो आपलें ऐकणार नाहीं, असें समजून वेणुबाईनें माईस खेळण्यासाठीं उठविलें. कांहीं केल्यानें माई तें कबूल करीना. शेवटीं इतर बायकांनीं पुष्कळ सांगितल्यावरून ती खेळ पाहत बसली. खेळ चालू असतां मधून मधून बायकांनीं आनंदीबाईची निंदा चालविली. त्यांपैकीं एक ह्मणाली, इतक्या दिवस लोकांचे घरीं राहण्यास हिला लाज कशी वाटत नाहीं ? यशोदाबाई भिडस्त ह्मणून बोलत नाहीं; मी असतें तर हीस केव्हांच घालवून दिलें असतें. बरें पण, हिनें गरिबीनें रहावयाचें; परंतु तसें न करितां हिचा घरामध्यें सर्वांत्र पगडा आहे. दुसरी ह्मणते, मुलींस शिकविण्यासाठीं ही पाहिजे आहे कशाला ? हिला येतें आहे काय ? आजपर्यंत जें आह्मीं पाहिलें नाहीं, तें ही शिकवीत बसते. मुलींना शिकून काय करावयाचें आहे ? त्यांना रोजगार करावयाचा आहे कीं काय ? त्या उद्यां मोठ्या झाल्या ह्मणजे, नवऱ्यालासुद्धां जाबसाल करण्यास चुकणार नाहींत. तिसरी ह्मणते, मुली कोणाच्या आणि हिचा त्यांस इतका धाक कां ?

अशा प्रकारें वेणुबाईच्या मैत्रिणींनीं आनंदीबाईची बरीच निर्भर्त्सना केली; परंतु माई स्वस्थ बसली. शेवटीं वेणुबाई तीस ह्मणाली, माई, तुला आनंदीबाईचा इतका धाक कशाला पाहिजे ? उद्यांपासून तुझी सर्व व्यवस्था मीच करीत जाईन. आनंदीबाई आह्मांस शिकवावयास नको, असें आईस तूं सांग, ह्मणजे झालें. हें ऐकून माईनें उत्तर केलें कीं, तुह्मी मला भलभलतें शिकवूं नका. मी आईला सांगेन. असें ह्मणून ती स्वस्थ बसली. हें चाललें आहे, तों आनंदीबाई परत आली, असें वेणुबाईस समजलें. परंतु तिनें तिच्याविषयीं विचारपूस

केली नाहीं. ती मनांत ह्मणाली, हिची इतकी प्रतिष्ठा कशास पाहिजे? आली असेल तर निजेल. हिच्या पुढें पुढें करण्याचें मला काय कारण आहे? असें ह्मणून ती खेळावयास लागली. तिनें व इतर बायकांनीं माईचें मन वळविण्याविषयीं होती तेवढी पराकाष्ठा केली; परंतु त्यांस यश आलें नाहीं. बाळ्या आपल्या संवयीप्रमाणें पाणी पिण्यास उठला. वेणुबाईनें त्यास पाणी प्यावयास दिलें. परंतु माई खेळत बसली आहे, असें त्याच्या दृष्टीस पडतांच तो ह्मणाला, माई, तूं अद्याप निजली नाहींस का? तूं सोंगट्या खेळत बसली आहेस वाटतें? मावशीबाईना समजलें, तर त्या तुला रागें नाहीं का भरणार?

**माई.**—बाळ्या, मी खेळत आहें, कां उगीच पाहत बसलें आहें रे.

**बाळ्या.**—तूं निजली होतीस, मग उठलीस कां?

**माई.**—मी निजलें होतें, परंतु वेणुबाईनें मला उठविलें व खेळावयास चल ह्मणून सांगितलें. मी कवड्यांस शिवलें सुद्धां नाहीं. मी उगीच पाहत बसलें आहे.

**बाळ्या.**—पण तूं कां रडत आहेस? जर तूं आतां निजशील, तर मी मावशीबाईस सांगणार नाहीं.

हें भाषण ऐकून त्या बायकांपैकीं एकजण ह्मणाली "काय त्या मावशीबाईचा दिमाक दाखवितो आहे."

हे शब्द बाळ्यास सहन झाले नाहींत. तो बोलणार, तों आपल्या तापटपणाबद्दल आनंदीबाईनें काय सांगितलें, हें त्यास आठवून तो स्वस्थ बसला व निजावयास गेला; परंतु माई रडत आहे, असें त्याचे दृष्टीस पडल्यावर तो पुनः उठून बसला व त्यानें माईस रडण्याचें कारण विचारिलें. माई ह्मणाली, मी निजत होतें, परंतु वेणुबाई मला मघापासून भलभलतें ह्मणण्यास

शिकविते. मावशीबाई शिकवावयास नकोत, मीच तुह्मांस उद्यांपासून शिकवीत जाईन असें तूं आईस सांग, असें ती ह्मणते. मी असें कधीं ह्मणणार नाहीं, असें मीं तीस सांगितलें; परंतु तिनें माझा पिच्छा पुरविला आहे व ती मला निजूं देत नाहीं. ही हकीकत ऐकून बाळयास फार राग आला. वेणुबाई त्यास पूर्वी शिकवीत असे. त्या वेळेस त्याला तिचा पूर्ण अनुभव आला होता; ह्मणून, मावशीबाई नकोत असे शब्द ऐकून तो खवळला व वेणुबाईस ह्मणाला, तूं भलभलतें आह्मांस शिकवितेस. मी आईला जाऊन सांगतों. असें ह्मणून तो चटकन उठून जावयास लागला.

यशोदाबाई परत आली हें वेणुबाईस माहीत नव्हतें. बाळ्या खरोखर आपल्या आईकडे जाईल व ती दृष्टीस पडली नाहीं, तर आनंदीबाईस सर्व प्रकार सांगेल, व हें चांगलें होणार नाहीं, असें तीस वाटलें; ह्मणून बाळ्या जावयास निघाला असतां तिनें त्याचा हात धरून त्यास मागें ओढिलें. तो नेटानें पुढें जाऊं लागला. ती त्यास मागें ओढूं लागली. तो ओरडूं लागला. हें ओरडणें आनंदीबाईस ऐकूं जाईल या भीतीनें वेणुबाईनें बाळ्याचें तोंड दाबून धरिलें. तेव्हां तो पूर्वीपेक्षां जास्त मोठ्यानें ओरडूं लागला. वेणुबाईस भीति वाटली. तिनें त्याचे तोंडावरचा हात काढिला व ती त्यास समजवायास लागली, परंतु तो तिचे हातून निसटून जिन्याकडे पळत गेला. हा अंधेराचा कोठें तरी पडेल व भलतेंच कांहीं तरी होईल, ह्मणून ती त्याचे मागोमाग गेली. तो, जिना उतरून खालीं आला व माजघरांतून पुढील चौकांत गेला. तेथें आनंदीबाईच्या खोलींत दिवा पाहून तो वर गेला; व आईला पाहून मागें सांगितल्याप्रमाणें त्यानें आपलें आंग धाडकन बिछान्यावर टाकून दिलें.

यशोदाबाई आल्यामुळें नोकर चाकर जागे झाले होते. त्यांनीं यशोदाबाई आल्याची खबर वेणुबाईस सांगितली. त्यावरून वेणुबाई वर न जातां मागच्या मार्गे गेली. आनंदीबाई बाळ्याचा तपास करीत करीत आपले खोलींत आली, व पाहते तों, बाळ्या व यशोदाबाई अंथरुणावर पडलीं आहेत, असें तिचे दृष्टीस पडतांच ती घाबरली. तिनें पाणी आणून प्रथम तें बाळ्याचे डोळ्यांस लाविलें, व त्यास सावध केलें. तो खरोखर बेशुद्ध नव्हता. संतापानें लाल होऊन व आईस बेशुद्ध पाहून त्यानें आंग टाकून दिलें होतें. नंतर आनंदीबाईनें यशोदाबाईस सावध केलें. यशोदाबाई उठून बसली. तिची बाळ्याकडे नजर गेली. परंतु बाळ्याची कावरी बावरी मुद्रा पाहून तिनें, काय झालें ह्मणून विचारिलें. तो कांहीं एक बोलेना. आपण रुसलेलों आहों हें आनंदीबाईनें पाहिलें, ह्मणून त्यास लाज वाटली. दुसरें असें कीं, आपण ओरडलों व वेणुबाईच्या हातून निसटून पळून आलों याबद्दल आनंदीबाईस वाईट वाटेल, किंवा आपल्या वर्तनाबद्दल त्या आपणास शाबासकी देतील, हें न समजून तो स्वस्थ बसला. यशोदाबाईनें त्यास पुनः विचारल्यावरून त्यानें सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून तीस फार संताप आला व तो न आवरून तिनें वेणुबाईची निर्भर्त्सना केली. त्या वेळेस आनंदीबाई ह्मणाली आतां रागावण्यांत काय उपयोग आहे ? खरी हकीकत काय आहे ती अगोदर समजून घेतली पाहिजे. बाळ मात्र येथें आहे. त्यास जी हकीकत सांगावयाची होती ती त्यानें सांगितली आहे. परंतु त्याच्याच ह्मणण्यावरून वेणुबाईविषयीं निकाल करणें बरोबर होणार नाहीं.

**यशोदाबाई.**—तर मग बाळ्यानें सांगितलें तें सर्व खोटें, असें तुह्मास वाटतें काय ?

Tohi..o?



**आनंदीबाई.**—नाहीं, नाहीं. बाळ खोटें सांगेल, असें मला मुळींच वाटत नाहीं. परंतु कदाचित् रागाच्या सपाट्यांत त्याचा गैरसमज झाला असेल. तेव्हां वेणुबाईचें ह्मणणें काय आहे, हें ऐकून घेणें चांगलें. माईही तेथें होती, ह्मणून ती काय सांगते, तें आपण ऐकून घेऊं.

**यशोदाबाई.**—वेणुबाई अधिक काय सांगणार ?

**आनंदीबाई.**—वेणुबाई अधिक कांहीं सांगेल ह्मणून तीस बोलवावयाचें नाहीं, तर कोणतेही गोष्टींत व विशेषेंकरून महत्त्वाचे गोष्टींत, उभयपक्षांचें ह्मणणें ऐकून घेतल्याशिवाय एकादी गोष्ट करण्यास प्रवृत्त होणें योग्य नाहीं. असें करणें अविचाराचें आहे. तुह्मास जें योग्य दिसेल तें तुह्मी करा; परंतु उभयपक्षांस आपआपली हकीकत सांगण्यास सवड देणें, हें आवश्यक आहे.

**यशोदाबाई.**—आनंदीबाई, तुमची वृत्ति नेहमीं शांत असते, यामुळें तुमचे हातून अविचार फार होत नसेल. रागाच्या भरांत ही सोपी गोष्ट मला सुचली नाहीं. तुह्मी ह्मणतां हें खरें आहे. कारण, रागाच्या भरांत मी जर वेणुबाईस आज घरांतून जा ह्मणून सांगितलें असतें, तर मोठा अविचार झाला असता. मुलांच्या सांगण्यावरून हा अविचार केला, असें तीस वाटलें असतें व लोकांसही त्याप्रमाणें वाटलें असतें.

असें बोलून यशोदाबाईनें लागलींच वेणुबाई व माई ह्यांस बोलवावयास सांगितलें. काशी दाराशीं गेली, तों वेणुबाई आडून ऐकत आहे, असें तिचे दृष्टीस पडलें. तेव्हां ती मोठ्यानें ह्मणाली, आई, ही पहा वेणुबाई येथेंच आहे. हें ऐकून यशोदाबाईचे मनांत संशय आला कीं, आपण जें बोलत होतों, तें सर्व हिनें ऐकिलें असावें. वेणुबाई लागलींच आंत आली व दीन मुद्रा करून उभी राहिली. हें पाहून यशोदाबाई ह्मणाली, वेणु,

बोलणीं मानभावाचीं व करणी कसाबाची, अशी तुझी वागणुक आहे. तूं आडून कशाकरितां ऐकत होतीस? येथें आह्मी चोरून का बोलत होतों? तूं फारच कृतघ्न आहेस. आनंदीबाईचे मनांत तुजविषयीं कांहीं वैरभाव नाहीं. परंतु तूं तर त्यांना घालवून देण्यास तयार झाली आहेस. असें असून त्या तुझ्या तर्फेनें बोलत आहेत. तेव्हां माझ्या पायां पडण्यापेक्षां तूं त्यांच्या पायां पडली असतीस, तर बरें झालें असतें.

हें ऐकून वेणुबाईस फारच शरम वाटली. यशोदाबाईचे पायां पडण्याविषयीं तिचे मनांत कांहीं आलें नाहीं. परंतु जिला आपण घालवून देण्याचे उद्योगांत आहों, तिच्या उपकारामुळें आपली सुटका व्हावी, ही गोष्ट तिचे मनाला फार खाऊं लागली. आनंदीबाईनें हें तेव्हांच ताडिलें, ह्मणून ती स्वस्थ बसली. इतक्यांत काशी माईस घेऊन आली. माई फारच भ्याली होती; व आनंदीबाईस पाहून तिला लाज वाटून ती खालीं मान घालून मुकाट्यानें बसली; ह्मणून यशोदाबाई ह्मणाली, माई, तुला काय माहीत आहे तें सांग. तूं भिऊं नकोस.

माईनें सर्व हकीकत सांगितल्यावर वेणुबाईनें आपली चूक कबूल केली व यशोदाबाईपुढें पदर पसरला. यशोदाबाईस वेणुबाईच्या वर्तनाचा तिटकारा आला व ती तिला रागें भरणार, इतक्यांत आनंदीबाई ह्मणाली, आतां रात्र फार झाली आहे. उद्यां सावकाश या गोष्टीचा निकाल करितां येईल.

यशोदाबाईस हें बरें वाटलें नाहीं. तिच्या मनांतून लागलींच निकाल करावयाचा होता. परंतु आनंदीबाईपुढें तिचा इलाज चालला नाहीं. रागाच्या सपाट्यांत मनुष्याचे हातून अविचाराचें वर्तन होण्याचा संभव असतो. राग निघून गेला, ह्मणजे पोक्त विचार करून काय तें करण्यास मनुष्यास सवड

सांपडतें. प्रथम जे विचार मनांत येतात त्यांत झटका फार असतो; परंतु कांहीं वेळ जाऊं दिला असतां त्यांत बदल होतो व पूर्वी, उतावळेपणानें केलेल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप होतो, हें समजून वेणुबाईविषयींचा निकाल तिनें मुद्दाम दुसरे दिवसावर टाकला. सर्वजण निजावयास गेले. परंतु वेणुबाईस झोंप आली नाहीं. तिचें मन तिला खाऊं लागलें. जर यशोदाबाईनें आपणास घालवून दिलें, तर आपणास कोठेंही थारा मिळणार नाहीं, व लोकांच्या घरीं मोल मजूरी करून पोट भरण्याचा प्रसंग येईल, ही गोष्ट मनांत येऊन तीस आपल्या कर्माबद्दल पश्चात्ताप झाला व बायकांच्या नादीं लागून आपण आपलीमात्र फजिती करून घेतली, असें तीस वाटूं लागलें. लोक आपणास हसतील, बायका नामानिराळ्या राहतील, व प्रसंगवशात् मौज पहावयास तयार होतील. हे विचार तिचे मनांत येऊन तीस झोंप येईना. उजाडल्यावर आनंदीबाईची गांठ घेऊन तिची क्षमा मागावी, असा विचार तिनें मनांत आणिला. आनंदीबाई थोर मनाची आहे, तेव्हां ती आपणास क्षमा करण्यास व आपणाबद्दल यशोदाबाईपाशीं रदबदली करण्यास अनमान करणार नाहीं, असें तिच्या मनांत आलें. परंतु हा विचार तिला बरोबर वाटला नाहीं, हें योग्यच होतें. कारण, सुंभ जळेल पण पीळ नाहींसा होणार नाहीं, या म्हणीप्रमाणें आनंदीबाईविषयींचा तिचे मनांतील पीळ नाहींसा झाला नव्हता. ती अंथरुणावर बराच वेळ पडून राहिली. इतक्यांत कोंबडा आरवला; कावळे ओरडूं लागले; पहाट झाली; चांगलें फटफटलें; घरांत माणसांची चाऊल सुरू झाली; रस्त्यांत गाड्यांचे चाकांचा व माणसांचा शब्द ऐकूं येऊं लागला; तथापि, तिचे डोळ्याशीं डोळा लागला नाहीं. शेवटीं जें होणें असेल तें होईल, असें समजून ती उठली व आपल्या कामाला लागली.

दिवस बराच वर आल्यावर यशोदाबाई उठली. वेणी घालण्यासाठीं यशोदाबाईचें आतां बोलावणें येईल, मग येईल, ह्मणून वेणुबाईनें बरीच वाट पाहिली; परंतु बोलावण्यास ठिकाण नाहीं. शेवटीं वेणुबाईस वाटूं लागलें कीं, जर यशोदाबाई आपल्या हातानें वेणीफणी करील, तर आपलें कांहींच कारण राहणार नाहीं. अझून बोलावणें आलें नाहीं, तर आपणहून तरी जाऊन विचारावें, असें मनांत आणून ती यशोदाबाईचे खोलींत गेली; व मला आंग धुवावयाचें आहे तेव्हां तुह्मांस कांहीं पाहिजे का, ह्मणून तिनें यशोदाबाईस विचारिलें.

यशोदाबाईनें उत्तर केलें 'मला कांहीं एक नको. तूं खुशाल आंग धू. काशीला व माईला मात्र इकडे पाठवून दे.' त्या आल्या. त्यांस पाहून यशोदाबाई ह्मणाली, चला आपण आनंदीबाईकडे जाऊं. त्या सर्वजणी आनंदीबाईचे खोलीजवळ गेल्या; तेव्हां बाळ्या हातांत पाटी घेऊन उभा होता. त्यास विचारतांच त्यानें सांगितलें कीं, मावशीबाई कांहीं कामांत आहेत, ह्मणून मी उभा राहिलों आहें. हें उत्तर ऐकून यशोदाबाईस फार आनंद झाला. ती तशीच आंत गेली व आनंदीबाईस ह्मणाली तुमचा शिष्य दाराशीं उभा आहे; त्याला आंत घेऊन येऊं का ? सावकाश वाचण्याबद्दल काल मी त्याला उगीच रागें भरलें. त्यांत त्याचा कांहीं एक दोष नव्हता. माझें मन स्वस्थ नव्हतें, यामुळें मला त्रास वाटला. आतां त्याला काय पाहिजे तें विचारा. काल रात्रीं त्याचें वर्तन जसें असावें तसें होतें. तो ओरडला, हा त्याचा दोष नव्हता. त्याजकडे कांहीं अपराध होता, असें मला वाटत नाहीं.

आईचे तोंडचे हे शब्द ऐकून बाळ्याची मुद्रा प्रफुल्लित झाली. परंतु माईवर सर्वांची नजर आहे व तिनें वेडेंवांकडें

तोंड केलें आहे, हें पाहून त्यास वाईट वाटलें. आनंदीबाईनें त्यास आंत येण्याला सांगितलें. तो आल्यावर, तुझी रीत व उत्तर हीं दोन्हीं बरोबर आहेत व तूं आंकडे नीट मांडिले आहेस, ह्मणून तिनें सांगितलें.

यशोदाबाई आनंदीबाईकडे कांहीं कामासाठीं आली होती व तिचे मनांतून कांहीं बोलावयाचें होतें. परंतु बाळ्यानें तें ऐकावें हें तीस बरें वाटलें नाहीं, ह्मणून तिनें आनंदीबाईस हळूच सांगितलें कीं, बाळ्याचें सध्यां येथें कारण नसल्यास त्यास जाऊं द्या.

एकादा मनुष्य जवळ नको असला ह्मणजे, कित्येक लोक नानाप्रकारच्या बतावण्या करून त्याला वाटेस लावितात. असें करणें त्यांस चांगलें वाटतें. दुसऱ्यास जा ह्मणून सांगितलें असतां त्यास राग येईल, असें त्यांस वाटतें. परंतु आपलें वर्तन कांहीं अंशीं लबाडीचें होतें, हें त्यांचे मनांत येत नाहीं. मुलें आपलें वर्तन पाहून तोच कित्ता गिरवितील व आपल्याच कृतीचें अनुकरण करतील, हें त्यांचे लक्षांत येत नाहीं. कोणी आपणास नकोसा असल्यास त्यास स्पष्टपणें व गोड शब्दांनीं जाण्याविषयीं सांगणें हें असभ्यपणाचें वर्तन आहे, व बतावण्याकरून जाण्याविषयीं सूचना करणें हें सभ्यपणाचें वर्तन आहे, असें आनंदीबाई समजत नव्हती; ह्मणून ती बाळ्यास ह्मणाली बाळ, आतां आह्मांला कांहीं बोलावयाचें आहे; तें तूं ऐकावें हें बरें नाहीं; तूं मग येशील तर बरें होईल. जरी बाळ्याचे मनांतून ऐकावयाचें होतें, तरी आनंदीबाईनें सांगतांच तो खोलीबाहेर गेला; परंतु जातांना तो आनंदीबाईस ह्मणाला, मावशीबाई, तुमचें बोलणें आटोपल्यावर मला बोलवाल ना ? आनंदीबाईनें लागलींच होय ह्मणून सांगितलें.

बाळ्या गेल्यावर आनंदीबाईनें बोलण्यास सुरवात केली. ती ह्मणाली यशोदाबाई, मला आतां माईचा भरंवसा वाटत नाहीं. मला वाटलें होतें कीं, तुमच्या सर्व मुलांत माई चांगली निघेल, परंतु तिला कोणीं फणसपोळी दिली असतां अथवा खेळण्याची लालूच दाखविली असतां ती लोकांचे नादीं लागते; व जें करणें योग्य नाहीं, तें करिते. नादीं लावणारे लोक पुष्कळ असतात; परंतु त्यांच्या नादीं लागणें हें चांगलें नाहीं, हें मीं तिला दोन तीन वेळ सांगितलें. परंतु तें तिचे लक्षांत राहत नाहीं असें दिसतें. आज फणसपोळी घेतली, उद्यां खेळण्याचे नादीं लागली, परवां तिसरेंच कांहीं केलें, तर हिचा भरंवसा कसा धरावा ? हिच्या देखत आपण कांहीं गुप्त गोष्ट बोलतां कामा नये. असें बोलून आनंदीबाईनें माईस दूर जावयास सांगितलें.

आपणावर सर्वांची गैरमर्जी झाली आहे, हें पाहून माईस वाईट वाटलें. ती कांहीं एक न बोलतां दूर गेली. नंतर यशोदाबाई हसून काशीस ह्मणाली. काशी, काल जसा तूं गोंगाट ऐकिलास तसा तुला पूर्वीं कधीं ऐकूं आला होता का ? अलीकडे गोंगाटानें माझें डोकें उठून गेलें आहे.

**काशी.**—( जवळ येऊन ) गोंगाट ?

**यशोदाबाई.**—तुला त्या गोंगाटामुळें भिण्याचें कारण नाहीं. तो रात्रीस नव्हता. सकाळीं ऐकूं येत होता. काल माझें पोट दुखत होतें, तेव्हां गाणें व नाचणें यांचा धिंगाणा नव्हता का चालला ?

**काशी.**—होय. काल एक तमाशा आला होता; तो आह्मी पाहत होतों, व बाळ्या उड्या मारीत होता. आई, तुझें पोट दुखत आहे, असें आह्मांला समजलें असतें, तर आह्मी तमाशा पाहत न बसतां तुझ्याकडे आलों असतों. बाळ्यास जाण्याची

घाई होती ह्मणून तो भरभर जिन्यावरून उतरत होता. इतक्यांत वेणुबाईनें त्यास गोंगाट करूं नकोस ह्मणून सांगितलें. मला त्यांत विशेष कांहीं वाटलें नाहीं. मावशीबाई बाळ्यास पुस्तक घेऊन देण्याकरितां बाहेर गेल्या. तूं आजारी आहेस असें नंतर आह्मांस समजलें; ह्मणून आह्मी लागलींच तमाशा पाहण्याचें सोडून तुजकडे आलों. जर आह्मांस अगोदर समजलें असतें, तर आह्मी अगोदर आलों असतों.

**यशोदाबाई.**—एकूण वेणुबाई किती तरी लबाड आहे? तिनें मला भलभलतेंच सांगितलें. तिनें तुह्मांस उशिरां कळविण्यापेक्षां मुळींच कळविलें नसतें, तर बरें झालें असतें; ह्मणजे तुह्मांस आनंदीबाईबरोबर बाहेर जाण्यास सांपडलें असतें.

**काशी.**—आई, तूं असें कसें ह्मणतेस. आह्मी वेणुबाईच्या सांगण्यावरून अथवा मावशीबाईच्या सांगण्यावरून घरीं राहिलों, असें नाहीं; आह्मीहूनच राहिलों. तुला पुस्तक वाचून दाखवावें किंवा कांहीं काम लागल्यास तें करावें, ह्मणून राहिलों.

**यशोदाबाई.**—एकूण तुह्मी काल घरीं राहिलां, त्या आनंदीबाईच्या सांगण्यावरून राहिलां नाहीं?

ह्या शेवटील भाषणावरून यशोदाबाईचे मनांत काय चाललें असावें, ह्याविषयीं आनंदीबाईची खात्री झाली. तिनें बराच वेळ कांहीं भाषण केलें नाहीं. शेवटीं ती ह्मणाली यशोदाबाई, मला खरोखर बोलण्याचें कारण नव्हतें. मजविषयीं तुमचा कांहीं गैरसमज झाला आहे, असें मला समजून चुकलें आहे. परंतु त्याविषयीं मीं स्वतः खुलासा करण्यापेक्षां परभारें तुमचे मनाची खात्री व्हावी, असा माझा हेतु होता. तुमचीं मुलें तुमच्यावर आपणहून प्रीति करितात; माझे सांगण्यावरून क-

रीत नाहींत. तुह्मी धूर्त आहां, तेव्हां माझ्या सांगण्यावरून तीं कोणत्या गोष्टी करितात व स्वत:हून कोणत्या गोष्टी करितात हें तुह्मास कळून आलें असेल. आनंदीबाई, पुढें बोलणार, तों यशोदाबाई तीस ह्मणाली, आनंदीबाई, तुमच्याविषयीं माझा कांहीं चमत्कारिक ग्रह झाला होता, हें मी आतां कबूल करतें. अलीकडे कांहीं कारणानें तुमचेविषयीं माझें मन शुद्ध नव्हतें ही गोष्ट खरी आहे. तुह्मी माझें खरें हित करीत असतां तें मला बरोबर समजलें नाहीं. मी लोकांच्या नादीं लागून मत्सरभावानें मनांत किंतु आणिला, ही माझी चूक आहे. याबद्दल मला फार वाईट वाटतें. मी कालच तुमची क्षमा मागणार होतें; परंतु बाळ्याच्या गडबडींत तें तसेंच राहिलें. तुमचे उपकार मजवर फार असून मीं त्यांची फेड अशा रीतीनें केली, याबद्दल तुह्मीं मला क्षमा केली पाहिजे. असें ह्मणून यशोदाबाईनें आनंदीबाई-पुढें पदर पसरला. आनंदीबाईनें तिचा हात धरून ह्मटलें यशोदाबाई, तुह्माला वेड लागलें आहे काय? तुमच्याकडून कांहीं अपराध झाला आहे, असें मला वाटत नाहीं. मीं आपलें कर्तव्य केलें. यापेक्षां मीं कांहीं अधिक केलें, असें मला वाटत नाहीं. तुह्मी कांहीं एक मनांत आणूं नका. जें झालें, तें एकापरी बरेंच झालें, असें मी समजतें. कारण, खरोखर मी कशी आहें व माझे विचार काय आहेत, हें मी आपल्या तोंडानें सांगण्यापेक्षां तुह्मास अनुभवानें व परीक्षा करून समजून आलें, हें चांगलें झालें आहे. आज परस्परांविषयीं परस्परांचे काय ग्रह आहेत हें कळविण्यास तुह्मीं संधि आणिली, याविषयीं मी तुमची आभारी आहें.

हें भाषण ऐकून यशोदाबाई स्तब्ध बसली. काशी मुकाट्यानें बसली होती. बराच वेळ झाला, पण कोणी कांहींच

बोलेना. शेवटीं यशोदाबाई ह्मणाली, आनंदीबाई, तुह्मी नेहमीं असेंच ह्मणतां. उपकार केले असून मीं आपलें कर्तव्य केलें, असें बोलून तुह्मी माझी समजूत करतां. असो. हा तुमचा थोरपणा आहे. बरें पण, आज तुह्मास दुसरी गोष्ट विचारावयाची आहे. तुमच्या व माझ्या संबंधानें खुलासा झाला, हें चांगलेंच झालें; परंतु वेणूस तुह्मी नकोशा झालां, हें मला समजत नाहीं. तुह्मी तिच्या आंगावर नाहींत. तुह्मी तिजविषयीं कांहींच बोलत नाहीं. तुमचें काम बरें, कीं तुह्मी बऱ्या, असें तुमचें वर्तन मी पाहत आहें. असें असून तुमच्याविषयीं तिचें मन शुद्ध नसावें व तिनें तुह्मास घालवून देण्याचा विचार मनांत आणावा, याचें मला मोठें नवल वाटतें.

**आनंदीबाई.**—यशोदाबाई, तुह्मास नवल वाटतें, परंतु मला याचें कांहींच वाटत नाहीं. या बाबतींत कांहीं बोलण्याची माझी इच्छा नव्हती; परंतु ज्याअर्थी तुह्मीं हा विषय काढिला आहे, त्याअर्थी न बोलणें हें बरोबर नाहीं. तुह्मी वेणुबाईस एकटीस दोष देतां हें बरोबर नाहीं. कारण, तिचें शिक्षण तें किती व तिची बुद्धि ती काय ? तिचें कृत्य दृष्टोत्पत्तीस आलें, ह्मणून ती दोषास अधिकारी झाली आहे. खरोखर पाहतां तुमच्या सोबतिणींची तिला फिसात आहे. कारण, मी आल्यापासून वेणुबाईची व तुमच्या मैत्रिणींची मुखत्यारी कमी झाली आहे. तुमचे येथें तुमच्या मैत्रिणींचें येणें जाणें कमी झालें आहे. पूर्वी ज्याप्रमाणें तुमचें घर त्यांस करमणुकीचें ठिकाण वाटत होतें, त्याप्रमाणें आतां वाटत नाहीं; तुह्मी गमतीसाठीं फारशा बाहेर जात नाहींत; किंवा मौजेखातर त्यांस जेवणखाण्यास फारशा बोलावीत नाहींत. यामुळें त्यांस जो आनंद व जी करमणूक होत असे, ती नाहींशी झाली आहे. या सर्व गोष्टींस मी कारण आहें, असें त्यांस वाटून

मजविषयीं त्यांचा भलता ग्रह होणें स्वाभाविक आहे. हा झाला नसता तर नवल आहे. दुसरें असें कीं, मत्सर व गैरसमज ह्यांनीं पुष्कळांचें मन ग्रासून टाकिलें असतें. लहान मोठे, विद्वान अविद्वान, स्त्रिया पुरुष हीं, यांच्या आधीन असतात. यांचे तडाक्यांतून निसटलेले फार थोडे सांपडतात. तुम्ही घरीं असा अथवा बाहेर जा, हे दोन महारिपु तुमच्या दृष्टीस पडतात. भावाभावांमध्यें, वहिणीवहीणींमध्यें, अथवा बापलेकांमध्यें, पैशावरून, सौंदर्यावरून अथवा मानापमानावरून गैरसमज व मत्सरभाव उत्पन्न होऊन परस्परांचीं मनें दूषित होतात, तर इतर लोकांचीं होतात यांत नवल तें काय ? दुसऱ्याचें बरें न पाहणें व दुसऱ्याची स्तुति न आवडणें हा, साधारणपणें मानवी स्वभावांत मोठा दोष आहे असें दिसतें. आपणापेक्षां दुसरा चांगला लिहिणारा, चांगला शिकविणारा अथवा चांगला बोलणारा आहे हें ऐकून, व दुसऱ्यास विशेष मान मिळतो व त्यास पैसे फार मिळतात हें समजून, लोक दुसऱ्याचा सल्ला विचारतात, किंवा दुसऱ्याचे घरीं मंडळी जमते, परंतु मला कोणी विचारीत नाहीं किंवा मला पैसा मिळत नाहीं हें समजून, समंजस लोकांससुद्धां वाईट वाटावें व त्यांनीं दुसऱ्याचा पाडाव करण्यासाठीं हलकट उपाय योजावेत, हें केवढें वेड आहे ! एकादी नवीन गोष्ट, नवीन पद्धत अथवा नवीन रीत निघाली असतां तिच्या विरुद्ध लोक आहेतच. तिजपासून खरोखर हित असो, सुख होत असो, अथवा सर्व प्रकारें फायदा होत असो, नांवें ठेवणारे व मत्सर करणारे विघ्नसंतोषी सांपडतातच. जुनें तेवढें सर्व चांगलें व नवीन तेवढें सर्व वाईट, असा पुष्कळांच्या मनाचा ग्रह असतो. दोन्हींमध्यें खरोखर चांगलें कोणतें, हें शोधून काढून त्याचें अवलंबन करणारे थोडे. "परप्रत्ययनेयबुद्धिः" असे फार. तुमच्या मुलांच्या

संबंधानें जो शिक्षणप्रकार हल्लीं चालू आहे, त्यांत खरोखर पाहतां नवीन ह्मणण्यासारखें कांहींच नाहीं. त्यांत नव्यांस प्रिय व जुन्यांस अप्रिय असें कांहीं नाहीं. परंतु गैरसमजामुळें कित्येकांस तो नवीन व चमत्कारिक वाटल्यामुळें त्यांस संतोष होत नाहीं. कांहींस तो पसंत पडला आहे, हें त्यांस ऐकवत नाहीं. ज्याप्रमाणें आपला अभिप्राय आहे, त्याप्रमाणें दुसऱ्यांचाही असावा, असें त्यांस वाटतें. कांहीं लोक तुह्माला बरें ह्मणतात याबद्दल तुह्मास दोष कां ठेवावा, तुह्मास शिक्षा कां असावी, अथवा तुमचें नुकसान कां व्हावें, हें समजत नाहीं. हा मनुष्यस्वभावांतच दोष आहे कीं काय, कोण जाणे. जर या स्वभावाप्रमाणें वेणुबाईचें व दुसऱ्या स्त्रियांचें आचरण आहे, तर त्यांत विशेष तें काय? तें मनांत न आणणें, व आपल्या आसपास विघ्नसंतोषी आहेत ही गोष्ट लक्षांत ठेवून शहाणपणानें व नेटानें आपलें कर्तव्य करणें, हा उत्तम मार्ग आहे. तुह्मीही हीच गोष्ट लक्षांत ठेवून त्याप्रमाणें वागावें, अशी माझी इच्छा आहे. कारण, आज नाहीं उद्यां, तुह्मास माझें काम करण्याचा प्रसंग येईल, व ज्याप्रमाणें कांहीं लोक मला नांवें ठेवितात, त्याप्रमाणें तुह्मासही ठेवितील. तुमचीं मुलें परस्परांचा व दुसऱ्यांचा मत्सर न करतील, अशा रीतीनें आजपर्यंत मीं व्यवस्था केली आहे; व तीच व्यवस्था तुह्मीं पुढें चालू ठेवावी, असें तुह्मास माझें सांगणें आहे. बरें हें असो. बोलण्याचे नादांत बाळास बोलाविण्याचें मला भान राहिलें नाहीं. तो वाट पाहत असेल. असें बोलून आनंदीबाई दारापाशीं गेली व तिनें दार उघडलें. वेणुबाई फटींतून ऐकत होती. तीस दार लागलें. त्यामुळें शब्द झाला. तो ऐकून यशोदाबाई दारापाशीं गेली, व पाहते, तों वेणुबाई डोकें चोळीत आहे, असें तिच्या दृष्टीस पडलें. तेव्हां ती तीस ह्मणाली वेणू, तुला

आडून चोरून ऐकण्याची काय घाणेरडी संवय लागली आहे. तुला कालच मीं वजावलें; परंतु तुझी खोड गेली नाहीं. तुझ्या आंगांत दुर्गुण तितके भरले आहेत. तुझ्या ताब्यांत मुलें दिलीं असतां त्यांस दुसरा तर उपयोग व्हावयाचा नाहीं; परंतु तुझ्या वाईट खोडी मात्र त्यांस लागतील. तुला आमचें भाषण ऐकावयाचें होतें, तर आंत कां आली नाहींस ?

**वेणुबाई.**—माझेविषयीं बोलणें चाललें होतें, ह्मणून मी ऐकत होतें. अलीकडे माझ्या वाईटावर पुष्कळ लोक आहेत.

**यशोदाबाई.**—अग, पण चोरून कां ऐकत होतीस ? लोक तुझ्या वाईटावर आहेत, एवढेंच का तुला सांगावयाचें आहे ?

**वेणुबाई.**—मला पुष्कळ बोलावयाचें आहे, परंतु फळ काय ? माझें बोलणें कोणाला खरें वाटणार आहे ? अलीकडे ज्याला त्याला माझा कंटाळा आला आहे. परकी माणसें आवडीचीं झालीं आहेत. आतां घरांत माझा कांहीं उपयोग आहे, असें मला वाटत नाहीं. तुमची मर्जी असेल, तर वाट फुटेल तिकडे मी जातें.

**यशोदाबाई.**—मीहून तुला जा ह्मणून सांगत नाहीं, परंतु जाण्याचीच तुझी मर्जी असेल, तर रस्ता मोकळा आहे.

**वेणुबाई.**—बरें तर, तुमची इच्छा असल्यास आतांच मी जातें.

**यशोदाबाई.**—तुझी इच्छा असल्यास तूं जा; त्यास आमची हरकत नाहीं.

हें उत्तर ऐकून वेणुबाई रडावयास लागली. ती ह्मणाली, आजपर्यंत तुह्मीं माझा सांभाळ केला; व या थराला हें येऊन पोहोंचेल हें मला वाटलें नाहीं. आतां माझें दैव फुटलें. त्याबद्दल तुह्मास दोष देण्यांत अर्थ नाहीं. तुह्मी कांहीं करा; परंतु तुमचे बऱ्याकरितां अंबाबाईपाशीं मी प्रार्थना करीन.

पुणे.

यशोदाबाई.—तूं आमच्या कल्याणासाठीं प्रार्थना कर किंवा नको करूस; ती तुझ्या मर्जीची गोष्ट आहे. मुलांचे वावर्तींत गडबड न करण्याविषयीं मीं व आनंदीबाईनीं तुला सक्त ताकीद दिली असून तूं तिकडे लक्ष दिलें नाहींस. तूं करतेस तें चांगलें करीत नाहींस, असें मीं वारंवार सांगितलें, परंतु तूं तें ऐकलें नाहीं. तूं मला भलभलतें सांगून फसविलेंस. आतां यापुढें तूं घरांत राहिलीस, तर मुलांना माझें न ऐकण्यास व मला फसविण्यास शिकविशील; यांत काडीमात्र संशय नाहीं. ह्मणून, ज्याअर्थीं तूं माझ्या इच्छेवर सोंपविलें आहेस, त्याअर्थीं तूं आपला पाय घरांतून काढावा हें बरें. यापासून तुला व आह्मांला सुख होणार आहे. तुझ्या आंगावर सरी, पाटल्या, ठुशी, डोर्कीतलीं वगैरे मिळून सात आठशांचा विषय आहे. हा तुला दिला आहे. ह्याचें तूं वाटेल तें कर. तूं चांगल्या रीतीनें राहिलीस, तर ओली कोरडी भाकरी तुला मिळेल. परंतु लुच्चे लोकांचे अथवा मूर्ख स्त्रियांचे नादीं लागलीस, तर अन्नास महाग होऊन लोकांचे घरीं मोलमजूरी मात्र करण्याचा प्रसंग येईल, हें तूं लक्षांत ठेव.

हें भाषण ऐकून वेणुबाईनें दीनमुद्रेनें क्षमा मागितली, पदर पसरला, व माझे हातून असें कधीं होणार नाहीं ह्मणून सांगितलें; परंतु व्यर्थ. यशोदाबाईनें तीस साफ सांगितलें कीं, जें झालें तें झालें. असें ह्मणून ती चालती झाली. निरुपायास्तव वेणुबाईस घरांतून जावें लागलें. ती गेल्यापासून कोणासही असंतोष न होतां उलट सर्वांस आनंद झाला. घरांतील मंडळीस तिचा मोठा सासुरवास असे; ती तोंडाची मोठी फटकळ असे; यामुळें मंडळी तीस कंटाळून गेली होती.

वेणुबाईच्या सहवासानें माईस थोडथोड्या वाईट खोडी

लागत चालल्या होत्या. त्या घालविण्याविषयीं आनंदीबाईनें प्रथम प्रयत्न चालविला. आपणावर कोणाचा विश्वास नसल्यामुळें आपणास काय त्रास होतो, हें आनंदीबाईनें तीस भासविलें. घरांत आपणावर काय ती सर्वांची नजर आहे, हें पाहून माईस लाज वाटूं लागली. तिला आपल्या संवयींविषयीं वाईट वाटून ती आनंदीबाईचा भरंवसा आपल्यावर राहील, अशा रीतीनें वागूं लागली. थोडक्याच दिवसांनीं तिची खोड नाहींशी झाली व सर्व मंडळी तिजवर पहिल्याप्रमाणें भरंवसा ठेवूं लागली.

अशा रीतीनें यशोदाबाईच्या मुलांचा शिक्षणक्रम बरेच दिवस चालला. एके दिवशीं बांगड्या भरण्याकरितां यशोदाबाईनें कासारास बोलावणें पाठविलें. कासार आला; परंतु नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें नुसते बिलवर न भरतां यशोदाबाईनें कांहीं काळ्या बांगड्या व कांहीं बिलवर भरले. काशी आनंदीबाईपाशीं शिकत बसली होती. तिला बांगड्या भरावयाच्या होत्या, ह्मणून ती खालीं आली. ज्या दिवशीं ती कीर्तनास गेली होती, त्या दिवशीं तिनें एका मुलीच्या हातांत कांहीं चमत्कारिक बिलवर पाहिले होते. तशा प्रकारचे बिलवर तिच्या मनांतून भरावयाचे होते. कासारापाशीं तसले नव्हते, ह्मणून ते घेऊन येण्यास तिनें सांगितलें. तो ते घेऊन आला. त्यांची किंमत फार होती, ह्मणून तिनें आईस विचारलें. यशोदाबाईनें तीस सांगून पाठविलें कीं, इतक्या किंमतीचे बिलवर आपणास नकोत; कांहीं बांगड्या व कांहीं बिलवर भर, ह्मणजे झालें. हें ऐकून काशीची मर्जी गेली. तिनें रागारागानें नुसत्या बांगड्याच भरल्या व ती खालींच बसली. ही गोष्ट यशोदाबाईस समजली. ती आनंदीबाईपाशीं घरांतील स्वच्छतेच्या संबंधानें बोलत होती. काशीस वेळ फार लागला, ह्मणून आनंदीबाईनें बाल्यास तीस

बोलवायास सांगितलें. काशी रुसली होती, ह्मणून ती बाळ्याशीं कांहीं एक बोलली नाहीं. बाळ्या तसाच वर गेला. काशी त्याचे मागोमाग गेली व मुकाट्यानें बसली. तीस पाहून बाळ्या ह्मणाला, ताई, तूं येणार नव्हतीस ना ? काशीनें कांहीं एक उत्तर दिलें नाहीं.

आपण काशीस बांगड्या व बिलवर भरावयास सांगितलें असून तिनें फक्त बांगड्या भरल्या, हें पाहून यशोदाबाई तीस रागें भरूं लागली. तेव्हां आनंदीबाई ह्मणाली, काशीनें नुसत्या बांगड्या भरल्या यांत काय बिघडलें ? यासाठीं तीस रागें भरावें, असें मला वाटत नाहीं. बिलवरांपासून स्त्रियांस मोठें भूषण असतें व नुसत्या बांगड्यांपासून कमी असतें, असा माझा समज नाहीं. सुशीलता व स्वकर्तव्याविषयीं दक्षता हे स्त्रियांचे मोठे अलंकार होत. हे बिलवराप्रमाणें कधीं पिचत नाहींत.

**यशोदाबाई.**—काशीनें नुसत्या बांगड्या भरल्या याबद्दल मी तीस रागें भरलें नाहीं. हातांत नुसत्या बांगड्या असल्या ह्मणजे, स्त्रियांची प्रतिष्ठा कमी होते, असें नाहीं. ह्मणूनच मीं नुसते बिलवर भरण्याचें सोडून दिलें आहे. काशीनें परवां एका मुलीच्या हातांत बिलवर पाहिले. तिला तसले भरावयाचे होते. ते तिनें कासाराकडून मुद्दाम आणविले. त्यांस किंमत फार पडूं लागली. परंतु पोरीचा नाद ह्मणून कांहीं बांगड्या व कांहीं बिलवर तीस भरावयास सांगितलें. पण तिनें रागा रागानें नुसत्या बांगड्या भरिल्या, ह्मणून मला राग आला.

**आनंदीबाई.**—मग बरोबर आहे. मुद्दाम कासारास परत लावून काशीनें बिलवर आणिले हें चांगलें केलें नाहीं; व तिनें तुमचें ऐकिलें नाहीं, हें तर फारच अयोग्य केलें. दुसऱ्या स्त्रियांच्या हातांत चमत्कारिक बिलवर पाहून तसले भरण्याविषयीं

इच्छा करणें चांगलें नाहीं. आज चमत्कारिक बिलवर भरण्याची इच्छा झाली; उद्यां सुंदर व तरतऱ्हेचीं फुलें डोक्यांत घालण्याची इच्छा होईल; परवां मोत्यांचे काप असावेसे वाटतील. तात्पर्य, ही हौस केव्हां पूर्ण होईल हें सांगतां येत नाहीं. हीं सर्व, चैनी व निरुद्योगी बायकांचीं सोंगें आहेत. चैनी बायकांस निरनिराळया प्रकारचे डागिने घालून नटण्यांतच मोठें भूषण वाटतें. खऱ्या भूषणाकडे त्यांचें लक्ष नसतें.

**यशोदाबाई.**—मलाही अलीकडे डागिने घालण्याचा कंटाळा येऊं लागला आहे. जी गोष्ट सदोदित निभावेल तीच आपण करावी, असें मला वाटूं लागलें आहे. आपणापाशीं लाख पन्नासहजार रुपये असते, तर गोष्ट निराळी.

यशोदाबाई व आनंदीबाई ह्यांचें भाषण चाललें असतां काशी उगीच बसली होती. तीस दोन गोष्टी सांगण्याची ही संधि चांगली आहे, असें समजून आनंदीबाई मोठ्या गंभीरपणानें ह्मणाली, काशी, तूं सर्वांत मोटी, तूंच रुसून बसूं लागलीस, तर माईस व बाळास काय नांवें ठेवावीं ? तूंच भिकार गोष्टीसाठीं हट्ट धरून बसूं लागलीस, तर माई व बाळ त्याचप्रमाणें करावयास लागतील. तुझा सुग्रणपणा, तुझ्या हातचीं सुंदर चित्रें, तुझें उत्तम शिवणकाम व तुझें सुंदर अक्षर, हेच तुझे बिलवर, हेच तुझे गोठ, ह्याच तुझ्या सोन्याच्या बांगड्या व हेच तुझे मोत्यांचे जवे. बाह्य अलंकारांपेक्षां आंगचे गुणांची योग्यता फार आहे, असें थोर स्त्रिया समजतात. दुसऱ्या कारागिरानें घडविलेले अलंकार आंगावर घालून भूषण मानणें हा शहाणपणा, किंवा स्वतःच्या कृतीनें जे गुण संपादन केले असतील त्यांविषयीं भूषण मानणें हा शहाणपणा ? सात आठ दिवसांपूर्वी तूं, माई व शेजारच्या दुसऱ्या मुली फुगड्या खेळत

होतां. त्या वेळेस बांगड्या पिचून कांहीं कलागत झाल्याचें माझे कानावर आलें. त्याच वेळेस तुझी कानउघाडणी करावयाची होती; परंतु तुझें तुला वाईट वाटून तुझी संवय जाईल, असें मला वाटलें. आतां झिमा, फुगड्या, सागरगोटे, वगैरे खेळ खेळून धिंगाणा करण्याचे तुमचे दिवस आहेत का? यांत तुह्मांला अद्याप गोडी वाटत आहे का? तुला लोकाच्या घरीं नांदावयाचें आहे, ही गोष्ट तुला माहीत नाहीं का? सासू कशी मिळते, सासरा कसा मिळतो व नवरा कसा मिळतो, या विवंचनेंत तुझी आई असते; व तुला तर असले पोरखेळ सुचतात. असले पोरखेळ सासरच्या मंडळीस आवडत नाहींत, हें तुझे लक्षांत येत नाहीं, असें दिसतें. त्यांची सढळ नजर कमी असते. असला प्रकार त्यांचे दृष्टीस पडला, तर ते आईला दोष देतील व मुलीला मोळा नाहीं असें ह्मणतील. तुला, सासरा तामसी मिळाला व सासू कजाग मिळाली, तर त्यांना असलें वर्तन अगदीं खपणार नाहीं, इतकेंच नाहीं, तर तीं तुला घालून पाडून बोलतील; तुझ्या आईचा व काकाचा वारंवार उद्धार करतील; व तुला जाच होईल. सासू, सासरा व नवरा हीं समंजस असलीं, तरी त्यांसही हें वर्तन आवडणार नाहीं. तीं बोलणार नाहींत; परंतु त्यांस वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं. तेव्हां हट्ट धरून बसण्यांत, कांहीं जिन्नस मिळाली नाहीं ह्मणून रुसण्यांत, व असले पोरखेळ खेळण्यांत शहाणपणा नाहीं.

आनंदीबाईनें हा जो उपदेश केला त्याचा परिणाम हळू हळू दृष्टोत्पत्तीस येऊं लागला. काशीच्या वाईट खोडी हळू हळू जात चालल्या. स्वच्छ राहणें, स्वच्छ कपडे घालणें, कोणतेंहीं काम करणें झालें तरी तें टापटिपेनें करणें, हट्ट धरून न बसणें, व पोरकट खेळ खेळण्यांत वेळ न घालवितां उद्योग क-

रणें यापासून काय सुख होतें, हें तीस कळून येऊं लागलें. अशा रीतीनें कांहीं दिवस लोटले. आनंदीबाईचा लौकिक आसपास पसरत चालला. शेजारपाजारच्या बायका यशोदाबाईच्या घरीं येऊं लागल्या व घटका घटका आनंदीबाईशीं बोलत बसूं लागल्या. त्यांबरोबर त्यांच्या मुलीही येत असत. पूर्वी सांगल्या खेळण्यासाठीं अथवा गप्पा मारण्यासाठीं बायका येत असत; परंतु हा सर्व व-खेडा मोडून जाऊन त्या निराळ्या प्रकारच्या गप्पा मारण्या-साठीं व निराळ्या प्रकारच्या करमणुकीसाठीं येत असत. त्यांपैकीं कांहीं कुचेष्टाही करण्याचे हेतूनें येत; परंतु आनंदीबाई व यशो-दाबाई त्या सर्वांचें आदरातिथ्य योग्य प्रकारें ठेवीत असत. त्यां-बरोबर बोलण्याचा कंटाळा करीत नसत. त्यांपैकीं कांहींची ब-सण्याची तऱ्हा, आचावाचा बोलण्याची हौस, निष्कारण मो-ठ्यानें हसण्याचा प्रकार, ग्राम्य विषयावर बोलण्याची उत्कंठा, शेजाऱ्यापाजाऱ्याची निंदा करण्याविषयीं हौस, पोषाकाच्या सं-बंधानें कांहींचा डामडौल व कांहींचा घामटपणा, पदोपदीं अ-गबाई, हा मेल्यांनो, जळलं मेलं हे शब्द उच्चारण्याची लकब, मिथ्या बोलण्याविषयीं निःशंकपणा, त्यांबरोबर आलेल्या मुलांचा कलकलाट व धिंगाणा, न विचारतां जिनसा उचलून घेण्याची व चमत्कारिक वस्तु दृष्टीस पडली असतां ती मागण्याची त्यांची संवय, ह्या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टी पाहून आनंदीबा-ईस वाटे कीं, स्त्रियांस शिक्षण मिळाल्याशिवाय त्यांच्यांतील व त्यांच्या मुलांतील हे दोष नाहींसे होण्याचा कमी संभव आहे. हें शिक्षण ह्मणजे पुस्तकी ज्ञान, असें नाहीं. स्त्रियांस व पुरुषांस पुस्तकी ज्ञानाचा फार उपयोग होतो; परंतु एवढ्यानेंच त्यांचा कार्यभाग होत नाहीं; व एवढ्यानेंच तीं सुशिक्षित होत नाहींत हें ज्ञान, शिक्षणाचा एक भाग आहे; परंतु ज्यांस एवढेंच कार

तें शिक्षण मिळालें आहे, त्यांस सुशिक्षित ह्मणणें, ह्मणजे सुशिक्षित या शब्दाचा संकुचित अर्थ करणें आहे. सुशिक्षित ह्मणजे ज्याला चांगली शिक्षा अथवा वळण लागलें आहे तो. ज्याच्या आंगीं मनोनिग्रह व इंद्रियजय हे दोन गुण वास करीत आहेत, (ह्मणजे जो मनोविकारांचे आधीन नाहीं) जो कधींही 'निरुपाय' व 'निराश्रित' नाहीं, त्याला चांगलें शिक्षण मिळालें आहे व तो सुशिक्षित आहे असें समजावें. पुस्तकी ज्ञान, व्यवहारज्ञान व सदाचरण हीं शिक्षणाचीं मुख्य आंगें होत. हीं तिन्हीं ज्यांस आहेत तो सुशिक्षित या नांवास पात्र आहे. ज्यास हीं तिन्हीं नाहींत तो सुशिक्षित आहे असें मानणें चूक आहे. अशा प्रकारचें शिक्षण स्त्रियांस मिळाल्याशिवाय त्यांचे मुलांची व त्यामुळें समाजाची उन्नति होणार नाहीं. चार लोक आपले मुलगे अथवा मुली शाळेंत पाठवितात ह्मणून आपण पाठवावें, असें समजून खरा उपयोग व्हावयाचा नाहीं. असें करून स्वस्थ बसल्यानें इष्ट कार्य होणार नाहीं. नुसते पैसे खर्च करून इष्ट कार्य होणार नाहीं. उन्नति होण्यास मुलांचे आंगीं एका प्रकारचें सामर्थ्य यावें लागतें. शरीर व मन अथवा बाह्य सजीव व निर्जीव वस्तु ह्यांच्या आधीन न होतां, त्यांस आपल्या आधीन करून त्यांपासून उपयोग करून घेण्याचें सामर्थ्य यावें लागतें. तात्पर्य, परवश न होतां स्वपराक्रमावर अवलंबून राहून पाऊल पुढें टाकण्याचें सामर्थ्य यावें लागतें. हें सामर्थ्य एक दोन दिवसांत येत नाहीं. हें बरेंच दिवसांच्या सतत अभ्यासानें प्राप्त होतें. हा अभ्यास लहानपणापासून चालू असला, तर पुढें जड वाटत नाहीं. हा अभ्यास करण्यास गृह ही उत्तम शाला आहे; ह्मणून सर्व शिक्षणापेक्षां गृहशिक्षणाची फार मातब्बरी आहे, असें आनंदीबाईस वाटलें.

स्त्रियांस हें शिक्षण जसें मिळावें तसें न मिळाल्यामुळें त्यांची अशी निकृष्ट स्थिति झाली आहे, हें पाहून तीस वाईट वाटलें. गृहशिक्षण ह्मणजे घरीं पुस्तकी विद्येचे संबंधाचें अथवा दहा पांच गोष्टींच्या संबंधाचें शिक्षण, तें नाहीं, तर स्वत:चे संबंधानें, ईश्वराचे संबंधानें, समाजाचे संबंधानें व राज्यव्यवहार संबंधानें जीं कर्तव्यें आमरणांत करावयाचीं, तीं करण्यास घरच्या ज्या शिक्षणाचा उपयोग होतो अथवा तीं करण्याविषयीं बीजरूपानें सामर्थ्य येतें, तें गृहशिक्षण असें आनंदीबाई समजत असे; व या समजुतीप्रमाणें तिचें वर्तन होतें. ज्या गृहशिक्षणापासून घरांतील मनुष्यें अथवा वस्तु सजीव दिसत नाहींत व त्यांपासून जो उपयोग व्हावयाचा तो वक्तशीर व व्यवस्थेनें होत नाहीं, त्या गृहशिक्षणाची ती मातब्बरी मानीत नसे. घरांतील प्रत्येक सजीव व निर्जीव वस्तूवर विचारी मनुष्याची नजर असून त्यास योग्य प्रकारचें वळण मिळालें आहे, असें ज्या शिक्षणावरून दिसतें, तें खरें गृहशिक्षण असा तिचा समज होता.

गृह हें लहानसें राज्य आहे. या राज्याची व्यवस्था करितां येणें हा स्थानिकस्वराज्यशिक्षणाचा व त्यामुळें राज्यव्यवस्थेच्या शिक्षणाचा ओनामा आहे. ज्यांस घरांतील घाणीपासून अथवा मुलांच्या घामट संवयींपासून किती अपाय होतो, स्वच्छतेपासून काय सुख होतें, कोंजट अथवा गैरसोयीच्या घरांपासून शरीरास काय त्रास होतो, खुलास व हवेशीर घरापासून काय सुख होतें, घरांतील जिनसांविषयीं टापटीप व व्यवस्थितपणा नसेल, तर काय त्रास होतो, घरांतील मंडळीकडून अथवा नोकर चाकरांकडून आपआपलीं कामें वेळच्या वेळेवर व्यवस्थित रीतीनें करवून न घेतलीं, तर काय नुकसान होतें, कोठें पैसा खर्च करावा व कोठें करूं नये, ह्या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टी

ज्यांस चांगल्या माहीत नाहींत, त्यांचे हातून स्थानिकस्वराज्याची व्यवस्था चांगले रीतीनें होणें कठीण; व स्थानिकस्वराज्याची चांगली व्यवस्था करितां येत नसेल, तर राज्यव्यवस्था करितां येणें त्याहून कठीण, असा साधारण नियम आहे. हा नियम लक्षांत आणून आनंदीबाईनें घरांतील व्यवस्था ठेविली होती. या व्यवस्थेपासून काय सुख होतें व काय फायदा होतो, हें यशोदाबाईस कळून आलें होतें, ह्मणून या बाबतींत तिचें अनुमोदन होतें, इतकेंच नाहीं, तर आनंदीबाईस तिची सर्व प्रकारें मदत होती. यामुळें यशोदाबाईचें घर हें कांहीं अंशीं गृहशिक्षणाचें खरें शालागृह होतें, असें ह्मटलें तरी चालेल.

आह्मीं वर सांगितलेंच आहे कीं, शेजारपाजारच्या पुष्कळ स्त्रिया आनंदीबाईकडे रोज येत. आनंदीबाई त्यांस वायफळ गप्पा मारूं देत नसे. कांहीं तरी योग्य प्रसंग पाहून ती त्यांबरोबर उपयुक्त विषयावर बोलत असे. तिचा मुख्य विषय ह्मटला ह्मणजे, स्त्रियांनीं कसें वागावें, मुलांचें संगोपन कसें करावें व त्यांस शिक्षण कसें द्यावें, हा असे. हा विषय सर्वांस गोड वाटत नसे; यामुळें प्रथम ज्या स्त्रिया गप्पा मारण्यासाठीं येत, त्या येईतनाशा झाल्या.

एके दिवशीं यशोदाबाईची मैत्रीण आपल्या दोन मुलींसह मुंबईहून तिजकडे आली. ती घरची बरी होती. तिच्या नवऱ्यास मोठा रोजगार होता. ती साधारण शिकलेली होती. तिच्या मुलींसही बरेंच शिक्षण मिळालें होतें; यामुळें त्यांस अंमळसा अभिमान वाटे. त्यांस वाटत असे कीं, दुसऱ्या मुलींस आपल्या इतकें येत नाहीं. त्यांच्या आईचीही अशीच समजूत होती. त्या मुली दिसण्याला सुंदर असत. त्यांची आई फार हौशी असे; यामुळें मुलींना नटविणें, हें ती मुख्य काम समजत असे.

यशोदाबाईनें त्या सर्वांचें योग्य आदरातिथ्य केलें. जेवणखाण झाल्यावर यशोदाबाई व तिची मैत्रीण ह्या स्वस्थ सुखदु:खाच्या गोष्टी सांगत बसल्या. बोलतां बोलतां मुलींच्या शिकण्यावरून गोष्ट निघाली. तेव्हां यशोदाबाईची मैत्रीण ह्मणाली, मुलींच्या विद्याभ्यासाचे संबंधानें आह्मांस फार खर्च आला. माझ्या मनांतून मुलींना इंग्रजी शिकवावयाचें नव्हतें. परंतु अलीकडे मुंबईत मुलींना इंग्रजी शिकविण्याचा प्रघात पडल्यामुळें मुली इंग्रजी शाळेंत न पाठविल्या, तर लोक हंसतील ह्मणून त्यांस शाळेंत पाठविण्याविषयीं मीं रुकार दिला. असें करण्यापासून त्यांस कांहीं फायदा होईल, असें मला वाटलें नव्हतें. परंतु आतां त्यांस कविता ह्मणतां येतात, गातां येतें, वाद्यें वाजवितां येतात, तऱ्हतऱ्हेचीं लोंकरीचीं फुलें तयार करितां येतात, व इंग्रजींत बोलतां येतें.

हें ऐकून प्रथम यशोदाबाईस वाटलें कीं, आपल्या मैत्रिणीच्या मुलींच्या आंगीं चांगले गुण असले पाहिजेत. असें वाटण्यास दुसरें कारण असें होतें कीं, त्या मुली दिसण्याला तरतरीत दिसत व चुरचुर बोलत. परंतु हा ग्रह लवकरच नाहींसा झाला. तिच्या मैत्रिणीचें नांव रमाबाई होतें. रमाबाईच्या मुलींच्या बोलण्याचालण्यावरून यशोदाबाईस तेव्हांच कळून आलें कीं, आपल्या मुलींचें शिक्षण रमाबाईच्या मुलींच्या शिक्षणापेक्षां पुष्कळ बरें आहे. यास दुसरे दिवशीं प्रत्यंतरही आलें. रमाबाई व तिच्या मुली रोजच्या संवयीप्रमाणें दिवस बराच वर आल्यावर उठल्या. उठल्यावर घटका दोन घटका वेणीफणी करण्यांत व नटण्यांत त्यांचा वेळ गेला. जेवणखाण झाल्यावर त्या यशोदाबाईबरोबर बोलत बसल्या. त्यांचा मुख्य विषय डागडागिनें, पोषाक वगैरे हा होता. यशोदाबाईस त्याचा कं-

टाळा आला. परंतु कधीं नव्हत आपली मैत्रीण आपले येथें आलेली आहे, असें समजून ती तिजबरोबर बोलत बसली. रोजच्याप्रमाणें दुपारीं चार वाजतां शेजारपाजरच्या बायका आल्या. यशोदाबाई व आनंदीबाई त्यांबरोबर बोलत बसल्या. त्यावेळेस रमाबाई व तिच्या मुली, मधून मधून बोलत असत. आमच्या मुंबईस वाटेल तीं फळें मिळतात, आमच्या मुंबईस हवी ती जिन्नस मिळते, हें त्यांचें पालुपद चालत असे. आनंदीबाईनें त्याकडे लक्ष दिलें नाहीं. साडेपांच वाजल्याबरोबर बाळ्या ह्मणाला, मावशीबाई, साडेपांच झाले. बैल जुंपून ग्यानू विहिरीपाशीं उभा आहे. आह्मी बागेंतील झाडांस पाणी घालावयास जाऊं का ? तुह्मी येतांना ? बाळ्याची उत्सुकता पाहून आनंदीबाई लागलींच उठली व परसांत गेली. तिच्या मागोमाग काशी व माई हातांत लहानशा कळश्या घेऊन गेल्या. ज्या बायका आल्या होत्या त्या उठून आपआपल्या घरीं गेल्या. स्वयंपाकीणबाई उठून आपल्या कामास लागली. मोलकरीण केरसुणी घेऊन माड्या झाडावयास गेली. दुसरा नौकर दारा पुढील जागा साफ करूं लागला. हें झाडणें आटोपल्यावर तो कुंडींतील पाणी घेऊन झारीनें रस्ता शिंपडूं लागला. हा सर्व प्रकार शांतपणें चालला होता. तें पाहून रमाबाईस व तिच्या मुलींस आश्चर्य वाटलें. रमाबाई यशोदाबाईस ह्मणाली, आज तुमच्या येथें कांहीं गडबड आहे वाटतें ?

**यशोदाबाई.**—ही गडबड आमच्या येथें बारा मास असते.

**रमाबाई.**—बारा मास !

**यशोदाबाई.**—होय, बारा मास.

**मुली.**—बारा मास ! सकाळीं संध्याकाळीं सुद्धां !

**यशोदाबाई.**—होय.

**मुली.**—सकाळीं तर आह्मी सावकाश उठतों; नंतर सावकाश वेणीफणी करितों; संध्याकाळीं शाळेंतून आल्यावर कंटाळा येतो, ह्मणून गात बसतों, किंवा विलायतेहून बाबानें आमच्याकरितां पियानो आणिला आहे, तो वाजवीत बसतों; व जेवणखाण आटोपल्यावर निजतों.

**यशोदाबाई.**—कांहीं दिवसांपूर्वी तुमच्याप्रमाणें माझी संवय होती; परंतु अलीकडे ती पुष्कळ मोडिली आहे. उशिरां उठण्याची व स्वस्थपणें बसून गप्पा मारण्याची आतां मला लाज वाटते; ह्मणून मीही बागेंत जाऊन मुलांबरोबर काम करितें. त्यामुळें मुलांस आनंद वाटून मलाही चांगली करमणुक होते व श्रम होऊन चांगली भूक लागते. अलीकडे डोकें दुखण्याचा अथवा पोट दुखण्याचा वगैरे माझा कांहीं बोभाटा नाहीं.

**रमाबाई.**—आह्मी असलीं कामें कधींही करीत नाहीं. माझ्या मुलींना तीं कधींही आवडावयाचीं नाहींत. घरच्यांसही तीं आवडत नाहींत. आह्मांस त्यांचें नेहमीं सांगणें असतें कीं, हीं कामें गड्यामाणसांचीं आहेत. मलाही तसेंच वाटतें. असलीं कामें मुलींनीं केलीं, तर त्यांचा सुकुमारपणा नाहीं का कमी होणार ?

**यशोदाबाई.**—माझ्या मुलींना हींचशीं काय, परंतु असल्या प्रकारचीं दुसरीं कामें करण्यास मोठी हौस वाटते. या कामांमुळें त्यांचा सुकुमारपणा कमी न होतां त्यांच्या तोंडावर उलट जास्त टवटवी दिसत आहे.

**रमाबाई.**—ह्मणजे ?

**यशोदाबाई.**—ह्मणजे काय ? मला प्रथम तुमच्याप्रमाणें वाटत होतें. परंतु अनुभवावरून माझी समजूत निराळी झाली आहे. नुसत्या सुकुमारपणापेक्षां शरीरप्रकृति साफ असणें चांगलें, असें मला वाटूं लागलें आहे. बागेच्या संबंधानें अली-

कडे मजकडेही कांहीं कामगिरी असते. अलीकडे काम करण्याचें मला कांहींच वाटत नाहीं. उलट, काम करीत न वसलें तर कंटाळा येतो. तुह्मांस या गडबडीचें जितकें आश्चर्य वाटतें, तितकें आह्मांस वाटत नाहीं. ही आमचे पाठांतली आहे, ह्मणून ही गडबड आहे, असें आह्मांस वाटत नाहीं. सर्व कामें व्यवस्थितपणानें व्हावींत ह्मणून आनंदीबाईनें मुलांच्यामागें रोज क्रम लावून दिला आहे. त्याप्रमाणें मुलांचें वर्तन असतें.

**मुली.**—तो कोणता ?

**यशोदाबाई.**—आनंदीबाई पहाटेस साडेचार वाजतां उठतात. त्यामुळें नोकर चाकर त्यावेळेस आपोआप उठतात. पांच वाजण्याचे सुमारास त्या मला व मुलांना उठवितात. मुलांचें मुखमार्जन वगैरे आटोपल्यावर तीं थोडा वेळ भजन करितात. सहा वाजल्याबरोबर बाळ्या घोड्यावर बसून रपेट करण्यास जातो, व सात वाजतां परत येतो. या वेळांत आह्मी वेणीफणी वगैरे उरकून घेतों. बाळ्या फिरून परत आल्यावर गाईचें धारोष्ण दूध पितो. नंतर आह्मी सर्वजण बागेंत जातों. मुलें आपआपल्या वाफ्यांतील केरकचरा काढून टाकितात. मी फुलें तोडून नंतर भाजी काढितें. हें काम संपल्यावर आनंदीबाई मुलांसह घरांत चोहोंकडून हिंडून येतात. पाणी टाकून पायखाना साफ झाला आहे किंवा नाहीं, गोठ्यांतील शेण व तबेल्यांतील लीद काढून तेथील सर्व जागा साफ केली आहे किंवा नाहीं, परसांतील व बागेंतील केरकचरा काढून नेमलेल्या ठिकाणीं टाकून दिला आहे किंवा नाहीं, घरांतील मोऱ्या धुऊन साफ केल्या आहेत किंवा नाहींत, पुढलें अंगण झाडून त्यांत सडा टाकिला आहे किंवा नाहीं, स्वयंपाकघर, माजघर व माड्या झाडून स्वच्छ ठेविल्या आहेत किंवा नाहींत, तात्पर्य, चोहोंकडे साफ

करून जेथल्या जिनसा तेथें ठेवल्या आहेत किंवा नाहींत, हें त्या पाहून येतात; व मुलांकडून आपआपल्या खोल्यांतील पुस्तकें, चित्रें वगैरे साफ करवितात. या वेळांत मी डाळ तांदूळ वगैरे काढून तयारी करून ठेवितें. नंतर आह्मी सर्व जण स्नान वगैरे उरकून घेतों. या कृत्यास साडेआठ होतात. साडेआठ वाजल्यापासून साडेदहांपर्यंत मुलें शिकत बसतात व मी देवपूजा आटोपून घेतें व नारायणस्तोत्र ह्मणतें. अकरांचे सुमारास आ-

१—पूजा केल्यावर यशोदाबाई जें नारायणस्तोत्र ह्मणत असे, तें श्रीमच्छंकराचार्य ह्यांनीं केलेलें होय. हें स्तोत्र वाचकांचे माहितीकरितां येथें देतों:—

॥ नारायण नारायण जय गोविंद हरे ॥ नारायण नारायण जय गोपाल हरे ॥ ध्रु ॥ करुणापारावारा वरुणालयगंभीरा ॥ नारायण० ॥ १ ॥ घननीरदसंकाशा कृतकलिकल्मषनाशा ॥ नारायण० ॥ २ ॥ यमुनातीरविहारा धृतकौस्तुभमणिहारा ॥ नारायण० ॥ ३ ॥ पीतांबरपरिधाना सुरकल्याणनिधाना ॥ नारायण० ॥ ४ ॥ मंजुलगुंजाभूषा मायामानुषवेषा ॥ नारायण० ॥ ५ ॥ मुरलीगानविनोदा वेदस्तुतभूपादा ॥ नारायण० ॥ ६ ॥ बर्हिनिबर्हापीडा नटनाटकफणिक्रीडा ॥ नारायण० ॥७॥ जलरुहदलनिभनेत्रा जगदारंभकसूत्रा ॥ नारायण० ॥ ८ ॥ वारिजभूषाभरणा राजीवरुक्मिणीरमणा ॥ नारायण० ॥९॥ पातकरजनींसंहर करुणालय मामुद्धर ॥ नारायण० ॥ १० ॥ अघबकक्षय कंसारे केशव कृष्ण मुरारे ॥ नारायण० ॥११॥ हाटकनिभपीतांबर अभयं कुरु मे मावर ॥ नारायण० ॥१२॥ दशरथराजकुमारा दानवमदसंहारा ॥ नारायण० ॥ १३ ॥ शरयूतीरविहारा सज्जनऋषिमंदारा ॥ नारायण० ॥ १४ ॥ विश्वामित्रमखत्रा त्रिविधपरा सुचरित्रा ॥ नारायण० ॥ १५ ॥ ध्वजवज्रांकुशपादा धरणीसुतसहमोदा ॥ नारायण० ॥ १६ ॥ जनकसुताप्रतिपाला जय जय संस्मृतिलीला ॥ नारायण० ॥ १७ ॥ दशरथवाग्धृतिभारा दंडकवनसंचारा ॥ नारायण० ॥ १८ ॥ मुष्टिकचाणूरसंहारा मुनिमानसविहारा ॥ नारायण० ॥ १९ ॥ वालिनिग्रहशौर्या वर-

मचें जेवण आटोपतें. नंतर मी व आनंदीबाई बोलत बसतों. कधीं कधीं त्या वर्तमानपत्रें वाचीत बसतात व मी झोंप घेतें. मुलें खेळतात, चित्रें अथवा नकाशे पाहतात, किंवा त्यांस वाद्य घेऊन दिलें आहे तें वाजवीत बसतात. एक वाजल्यापासून तों चार वाजेपर्यंत मुलें पुनः शिकत बसतात. मी वाचीत बसतें किंवा प्रपंचसंबंधीं कांहीं काम करावयाचें असल्यास करतें. मुलें इकडे तिकडे पुनः खेळतात. बाळ्यासाठीं कांहीं पदार्थांचा संग्रह करून दिला आहे. त्याचे व्यवस्थेंत तो असतो. मुली कधीं शिवणकाम व लोंकरीचें काम करितात, किंवा कधीं मोरावळा, हलवा वगैरे जिनसा तयार करावयाच्या असल्यास त्या करीत बसतात. नंतर तीं फराळ करितात. साडेपांच वाजल्याबरोबर आह्मी सर्वजण पुनः बागेंत जाऊन झाडांना पाणी घालतों. हें आटोपल्यावर कांहीं वेळानें आमचें जेवण होतें. जेवणानंतर मुलें शतपावली करितात. हें होतें, तों साडेआठांचा सुमार होतो. नंतर आनंदीबाई मुलांस वर्तमान पत्रांतील अथवा दुसऱ्या गोष्टी सांगतात. साडेनऊ वाजल्याबरोबर मुलें निजतात. आनंदीबाई व मी वाचीत बसतों. नंतर घरांत झाकापाक बरोबर झाली आहे किंवा नाहीं, कडी कुलपें लाविलीं

---

सुग्रीवहितार्या ॥ नारायण० ॥ २० ॥ मा मुरलीकरधीवर पालय पालय श्रीधर ॥ नारायण० ॥ २१ ॥ जलनिधिबंधनधीरा रावणकंठविदारा ॥ नारायण० ॥ २२ ॥ ताटिकामददलनाढ्या नटगुणविविधधनाढ्या ॥ नारायण० ॥ २३ ॥ गौतमपत्नीपूजन करुणाघनावलोकन ॥ नारायण० ॥ २४ ॥ सीतासंभ्रमहारा साकेतपुरविहारा ॥ नारायण० ॥ २५ ॥ अचलोद्धृति चंचत्कर भक्तानुग्रहतत्पर ॥ नारायण० ॥२६॥ नैगमगानविनोदा रक्षसुतप्रह्लादा ॥ नारायण० ॥ २७ ॥ भारतियतिवरशंकर नामामृतमखिलांतर ॥ नारायण नारायण जय गोविंद हरे ॥ नारायण नारायण जय गोपाळ हरे ॥

आहेत किंवा नाहींत, व गुरांची व्यवस्था नीट झाली आहे किंवा नाहीं, हें पाहून सर्व बंदोबस्त करून आह्मी निजतों. असा आमचा रोजचा क्रम आहे.

**रमाबाई.**—तुमचीं रोजचीं कामें पुष्कळ दिसतात.

**यशोदाबाई.**—होय, कागदावर पुष्कळ दिसतात; परंतु रोजच्या परिपाठामुळें तीं आह्मांस फारशीं वाटत नाहींत. प्रथम प्रथम त्यांचा मला फार कंटाळा वाटत असे; परंतु आतां कांहीं एक त्रास होत नाहीं.

**रमाबाई.**—तुह्मी इतकीं कामें करितां, मग नोकरचाकर काय करितात?

**यशोदाबाई.**—नोकरचाकरांस दिवसांतून फक्त दोन तीन तास विसावा सांपडतो; बाकी सारा वेळ त्यांस काम पुरवतें. ज्या वेळेस मी घरांत पाहत नव्हतें, त्या वेळेस त्यांस फार गमावयास सांपडे; परंतु हल्लींच्या व्यवस्थेनें त्यांस गमण्यास वेळ सांपडत नाहीं किंवा कुटाळ्या करण्यास सवड होत नाहीं. अलीकडे त्यांचीं गाऱ्हाणीं माझे कानावर येत नाहींत.

**रमाबाई.**—तुमच्या आनंदीबाईला तर बिलकुल विसावा सांपडत नसेल. त्यांस इतक्या कामांचा उरक तरी कसा आहे, याचें मला नवल वाटतें.

**यशोदाबाई.**—आनंदीबाईस श्रम करण्याचें कांहींच वाटत नाहीं. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, "उगीच स्वस्थपणें बसून गप्पा मारण्यांत अथवा अंथरुणावर स्वस्थ पडून राहण्यांत खरी विश्रांति नसून उद्योगवैचित्र्यांत आहे. मनुष्यास पुष्कळ कामें करावयाचीं असलीं, तरी, तो तीं कामें व्यवस्थेनें वेळचे वेळीं करूं लागेल, तर त्यास त्यांचें कांहींच वाटणार नाहीं. व्यवस्थितपणा व नियमितपणा हे दोन गुण मनुष्याचे आंगीं अवश्य असले पाहिजेत."

अशा प्रकारें यशोदाबाई व रमाबाई ह्यांचें संभाषण बराच वेळ चाललें. आनंदीबाई व मुलें काम करून घरांत आलीं. यशोदाबाईनें आपल्या गृहस्थितीचें जें वर्णन केलें, तें रमाबाईस व तिच्या मुलींस खरें वाटलें नाहीं. मनुष्यानें आपणास इतकें बांधून घेऊन काम करावें, हेंही त्यांस पसंत पडलें नाहीं. तथापि, यशोदाबाईची गृहस्थिति आहे काय, हें स्वतः पाहण्याचें व गृहशिक्षणाचे संबंधानें आनंदीबाईचे विचार काय आहेत, हें समजून घेण्याचें त्यांचे मनांत आलें. परंतु मोठ्या पहाटेस उठावें कोणीं, ही त्यांस पंचाईत पडली. शेवटीं मायलेकींचें असें ठरलें कीं, उठल्यावर जें पहावयाचें तें पाहूं; झोंप बुडवून पाहण्यांत अर्थ नाहीं.

दुसरे दिवशीं जेवणखाण आटोपल्यावर सर्व मंडळी एके ठिकाणीं बसली. त्या वेळेस रमाबाई यशोदाबाईस ह्मणाली, घरांतील तुमची व्यवस्था चांगली असते, असें मला समजलें, तर तुमचें घर कसें आहे तें आपण पाहूं. घर पाहण्याविषयीं रमाबाईनें इच्छा प्रदर्शित केल्यावर, यशोदाबाई हंसून ह्मणाली, माझें घर का नानाचा वाडा, का माणकेश्वराची हवेली, ह्मणून पहावयाची; माझें घर बोलूनचालून शेराबाशांचें; त्यांत काय पहावयाचें आहे? तथापि, तुमची मर्जी आतांच तें पाहण्याची असेल, तर माझी हरकत नाहीं. परंतु घरांत आनंदीबाईचे हातची सर्व व्यवस्था असल्यामुळें मजपेक्षां त्यांस विशेष माहिती आहे.

हें ऐकून आनंदीबाईस मोठें आश्चर्य वाटलें. ती ह्मणाली, यशोदाबाई, घराच्या संबंधानें तुमची समजूत कांहीं चमत्कारिक दिसते. मोठमोठाल्या हवेल्या मात्र पहाव्या, व शेराबाशांचीं घरें पाहूं नयेत, हें ह्मणणें मला विलक्षण वाटतें.

**यशोदाबाई.**—मला वाटतें माझे ह्मणण्याचा भाव तुह्मी

समजलां नाहीं. माझें ह्मणणें असें आहे कीं, आमचें घर मोठें भव्य नाहीं किंवा दिसण्याला शोभायमान नाहीं. माणकेश्वराचा अथवा नानाचा वाडा बांधून किती दिवस झाले आहेत? परंतु त्याचा अद्याप कोपरासुद्धां ढळला नाहीं. असलीं घरें उन्हाळ्याला अथवा पावसाळ्याला जुमानीत नाहींत. तीं पिढ्यानपिढ्या टिकतात. एकदां बांधिलीं कीं दुरुस्तीचें नांव नको. त्यांतील भिंती किती मजबूत व तुळया किती जाड असतात! मोरोबादादाचा अथवा नानाचा वाडा अथवा माणकेश्वराची हवेली तुह्मीं आंत जाऊन पाहिली असती, तर तुमचा समज निराळा झाला असता. बुधवारचा वाडा जळाला. तो तुमचे पाहण्यांत असता, तर तुह्मांस आश्चर्य वाटलें असतें.

**आनंदीबाई.**—कोणत्या एकाद्या व्यक्तीच्या घराच्या संबंधानें बोलण्याची माझी इच्छा नाहीं. जे गर्भश्रीमंत आहेत त्यांविषयीं मला सध्यां बोलावयाचें नाहीं. घराच्या बाबतींत ज्याप्रमाणें तुमचा समज आहे, त्याप्रमाणें पुष्कळ लोकांचा समज आहे. लठ्ठ खांब व जाड भिंती यांची मी फारशी मातबरी समजत नाहीं; घरें एका पिढीला टिकतील किंवा पिढ्यानपिढ्या टिकतील याचें मी विशेष महत्त्व समजत नाहीं; किंवा तीं सुशोभित आहेत अथवा नाहींत, ह्याही गोष्टीचें मी विशेष कौतुक करीत नाहीं. जे लोक असल्या गोष्टींचें गौरव करितात ते चूक करितात; व जे त्यांप्रीत्यर्थच हजारों रुपये खर्च करून बसतात ते अविचार करतात, असें मला वाटतें. घराच्या भिंती जाड असाव्या व त्याचे खांब लठ्ठ असावेत; अथवा घरें तीन तीन मजले उंच असावींत ह्मणून त्यांची विशेष खटपट असावी, व त्यांत राहणारीं मुलें शरीरानें मजबूत व उंच असावींत ह्मणून तितका उद्योग नसावा; धोंडा, लांकूड व चुना पिढ्यानपिढ्या टिकावा ह्मणून उत्तम प्रकारची निवड

करावी व त्यांची मशागत चांगली करावी; तात्पर्य, घरें फार दिवस टिकावींत ह्मणून दूरदर्शीपणा दाखवावा, व त्यांत जे नांदणारे त्यांस पिढ्यानपिढ्या टिकणारें शिक्षण देण्याविषयीं, व पिढ्यानपिढ्या राहणारें सामर्थ्य त्यांमध्यें उत्पन्न करण्याविषयीं त्यांची दूरदृष्टि नसावी, ह्याहून आश्चर्य तें कोणतें? मुलांकरितां घरें हा प्रश्न महत्त्वाचा किंवा घरांकरितां मुलें हा प्रश्न महत्त्वाचा? लठ्ठ खांब व जाड भिंती यांप्रीत्यर्थ जो उत्साह व पैसा खर्च करावयाचा, त्याच्या निम्मे जर मुलांचे ज्ञानाबद्दल, आचरणाबद्दल व शारीरबलाबद्दल खर्च झाला, तात्पर्य, या तिहींच्या योगानें आंगीं जें सामर्थ्य येतें, तें त्यांजमध्यें आणण्याविषयीं मुख्यत्वें उद्योग केला, उत्साह दाखविला, व पैसा खर्चिला, तर त्यांस व आपणांस फार सुख होईल; व त्यांचें व आपलें निरंतरचें कल्याण होईल. मुलांचे आंगीं सामर्थ्य असेल, तर तीं मोठीं झाल्यावर एक सोडून दहा मोठालीं घरें बांधतील; परंतु जर त्यांस संभाळण्याचें ज्ञान व जास्ती मिळविण्याचें शहाणपण नसेल, तर तीं आहे तें घालवून बसतील; मग जास्ती मिळविण्याविषयीं बोलावयास नको. आज शेंकडों घरांचा इतिहास पाहिला, तर बांधणारा एक व त्यांचा उपभोग घेणारा दुसरा, असें पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडतें. ह्यावरून मोठालीं घरें बांधूं नयेत, असें मी ह्मणत नाहीं. ज्यांच्यापाशीं पुष्कळ पैसा आहे अथवा ज्यांस मोठें ऐश्वर्य प्राप्त झालें आहे ते खुशाल बांधोत; परंतु मध्यम स्थितींतील लोकांनीं लठ्ठ खांब, जाड भिंती अथवा शोभा यांविषयीं जास्त काळजी घेणें व मुलांमध्यें सामर्थ्य उत्पन्न करण्याविषयीं बेफिकिर असणें अथवा कमी काळजी घेणें हें शहाणपणाचें नाहीं.

**रमाबाई.**—एकूण आजपर्यंत ज्यांनीं मोठमोठाल्या हवेल्या बांधिल्या आहेत ते सर्व वेडे, व ज्यांनीं लहान घरें बांधिलीं आ-

हेत ते शहाणे, असा तुमचे ह्मणण्याचा भाव दिसतो. मला वाटतें कीं, घरासारख्या स्थावर मिळकतींत पुष्कळ पैसे घातले असतां एका प्रकारचा संचय होतो, व मुलांस पैसे लवकर उडवून टाकण्यास सवड नसते.

**आनंदीबाई.**—मोठाल्या हवेल्या बांधणारे शहाणे, किंवा लहान घरें बांधणारे शहाणे, याविषयीं तूर्त विचार करावयाचा नाहीं. माझें ह्मणणें एवढेंच आहे कीं, घरांत जीं मुलें नांदावयाचीं त्यांमध्यें सामर्थ्य येईल अशाविषयीं दूरवर नजर न देतां, व प्रथमपासून योग्य तजवीज करून न ठेवितां, जे माती व लांकूड ह्यांचे पिढ्यांविषयीं काळजी घेतात, त्यांचें वर्तन शहाणपणाचें नाहीं. प्रथम विचार नांदणाऱ्या मुलांचें शिक्षण व त्यांची शरीरप्रकृति ह्यांविषयीं होय. ही गोष्ट लक्षांत ठेवून जें आचरण करावयाचें तें शहाणपणाचें, व ज्या वर्तनानें या गोष्टीस बाध येतो तें अविचाराचें आहे.

हे विचार लक्षांत न आणितां घरें पिढ्यानपिढ्या टिकावींत ह्मणून जे पैशाचा चुराडा करितात, ते एक चूक करितात असें मला वाटतें. ती ही कीं, ते आपल्या कृतीनें आपल्या मुलांस बांधून टाकितात व त्यांस कमजास्त सोय करण्यास सवड ठेवीत नाहींत. जी सोय आपणांस बरी वाटते ती कदाचित् मुलांस बरी वाटणार नाहीं. ज्याप्रमाणें आचार विचार पोषाक वगैरे बाबतींत फेरफार होत चालला आहे, त्याप्रमाणें घरांच्या रचनेंतही फेरफार होत चालला आहे. असा फेरफार होणें हें स्वाभाविक आहे. परंतु पिढ्यानपिढ्या टिकणारीं घरें बांधून ठेविलीं ह्मणजे अर्थात् मुलांचे हातपाय बांधले जातात व कित्येक वेळां त्यांस गैरसोयीचे घरांत जन्म काढावा लागतो. ही गोष्ट चांगली नाहीं, हें कोणीही कबूल करील. आतां जें मी विशेष सां-

गत आहें तें केवळ घराच्याच संबंधानें सांगत आहें असें नाहीं. आपल्या एकंदर कृतीचे संबंधानें बोलत आहें. आपली प्रत्येक कृति नेहमीं शहाणपणाची असते, असें घेऊन चालणें हें कांहीं अंशीं साहस आहे; ह्मणून आपल्या कृतीनें आपल्या मुलांचे हातपाय निरंतर जखडून न टाकितां, त्यांस योग्य शिक्षण देऊन त्यांस योग्य दिसतील त्या सोयी करण्यास, व देश, काल, वर्तमान ह्यांस अनुसरून आचरण करण्यास सवड ठेवणें, हें विशेष शहाणपणाचें आहे असें मला वाटतें.

घरांत पैसा घातला असतां एका प्रकारचा संचय होतो, असें तुमचेंच ह्मणणें आहे असें नाहीं. पुष्कळ लोकांची अशीच समजूत असल्यामुळें ते घरांत पैसे घालून नंतर पस्तावा पावतात. याच संचयाविषयीं काय, परंतु एकंदर निरनिराळ्या प्रकारच्या संचयाविषयीं पुष्कळ लोकांची चमत्कारिक समजूत आहे. ओढाताण करून डागडागिन्यांत, घरांत, शेतांत अथवा व्यापारांत पैसा घातला, ह्मणजे आपण चांगला संचय केला व यामुळें आपण कृतकृत्य झालों, असें समजणारे पुष्कळ लोक दृष्टीस पडतात. परंतु खऱ्या संचयाविषयीं काळजी वाहणारे थोडे दृष्टीस पडावे हें आश्चर्य आहे. ज्यांच्यांसाठीं आपल्या जीवाचा आटापिटा करून व केव्हां केव्हां पोटाला चिमटा घेऊन सोनेंनाणें खरेदी करावयाचें, घरदार बांधून ठेवावयाचें, शेतवाडी संपादन करावयाची, अथवा उदीमव्यापार करावयाचा, ती जर शक्तिहीन, ज्ञानहीन व विचारहीन असतील, तर असल्या संचयापासून विशेष उपयोग आहे काय? प्रसंगीं असला संचय विशेष कामास येईल काय? यावरून असला संचय बिलकूल करूं नये, असें मी ह्मणत नाहीं. या संचयाची आवश्यकता आहे ही गोष्ट खरी आहे; या संचयावांचून व्यवहार चालावयाचा नाहीं

हें खरें आहे; परंतु हा संचय पुढें मुलांच्या उपयोगीं पडावा ह्मणून रात्रंदिवस कष्ट करून त्याचेच मागें न लागतां आरोग्य, ज्ञान, सद्वर्तन व प्रसंग पडला असतां त्यांतून पार पडून जाण्याचें सामर्थ्य ह्या गोष्टी मुलांमध्यें असण्याविषयीं तजवीज केली, तर त्यांचें व त्यामुळें समाजाचें विशेष हित होणार आहे. शारीरिक व मानसिक बलसंचय हा प्रथम संचय होय. हा संचय मुलांजवळ असेल, तर थोडे दिवसांत तीं दुसऱ्या प्रकारचा संचय करितील. परंतु डागडागिने, घरदार, शेतवाडी वगैरे संचयानें आरोग्य, सद्वर्तन, उद्योगसातत्य, प्रसंगीं धैर्य, व पैसा मिळविण्याचें शहाणपण वगैरे गुण येण्याचा संभव कमी असतो. मुलांच्या शरीरांत व मनांत सामर्थ्यसंचय करून ठेवणें, हा महत्वाचा संचय करणें आहे; हा हेतु मनांत धरून उद्योग करणें शहाणपणाचें आहे; हा हेतु सिद्धीस नेण्यासाठीं जो संचय जरूर आहे तो करणें श्रेयस्कर आहे. देशांत भांडवल पुष्कळ खेळूं लागलें ह्मणजे, व लक्षावधि रुपयांचा माल बाहेर जाऊं लागला ह्मणजे, अथवा देशांत येऊं लागला ह्मणजे, लोकांची स्थिति चांगली आहे, व देशाचा भरभराट आहे, असें समजणारे पुष्कळ लोक आहेत; परंतु येवढ्याच कारणावरून विशेष गौरव करणें ही कांहीं अंशीं चूक आहे. धनसंचय करणें तो प्रसंगीं उपयोगीं पडावा ह्मणून आहे. परंतु लोकांजवळ सामर्थ्यसंचय नसेल, तर लाखों रुपयांच्या घडामोडी होऊन लाखों रुपयांचा संचय झाला तरी त्यांस वस्तुतः प्रसंगीं फारसा उपयोग होणार नाहीं. सामर्थ्यसंचय असेल, तर लोक प्रसंगांतून पार पडून जातील. हा संचय असेल, तर शिकंदर बादशाहा अथवा नेपोलियन, व जंगीझखान अथवा तैमूरलंग या सारख्या सत्तालुब्ध अथवा धनलुब्ध महत्वाकांक्षी लोकांस तो एकाएकीं हरण करितां येणार नाहीं. जुलमानें अथवा आकस्मिक

गोष्टीनें पैशाचा संचय हरण झाला अथवा सत्ता हरण झाली, तरी, लोकांत सामर्थ्यसंचय असेल, तर लोक थोडेच दिवसांत वर डोकें काढितील. इ० स० १७२० त साउथ सी बबलमुळें इंग्लंदांतील शेंकडों घरें धुळीस मिळालीं; परंतु थोडेच दिवसांत लोकांनीं डोकें वर काढिलें. इ० स० १८०६ त जीना येथें लढाई करून नेपोलियन बादशाहानें प्रशियन लोकांचा पाय लंगडा केला; परंतु त्यांनीं थोडेच दिवसांत डोकें वर केलें. इ० स० १८६४ शेअरच्या व्यापारामुळें मुंबईचे पुष्कळ व्यापारी धुळीस मिळाले; परंतु मुंबईची हल्लींची स्थिति पूर्ववत् होऊं लागली आहे. इ० स० १८७०।७१ त फ्रेंच व जर्मन लोक ह्यांमध्यें लढाई झाली. त्या वेळेस फ्रेंच लोकांपासून जबर खंडणी घेतली, ह्मणजे त्यांचा पाय लंगडा होईल, असें जर्मन लोकांस वाटलें; परंतु फ्रेंच लोक आतां पूर्वस्थितीवर आले आहेत. याचें खरें बीज पाहूं गेलें असतां या निरनिराळ्या लोकांचें सामर्थ्य हें कारण होय, असें आपणांस दिसून येईल. बरें, उलट पक्षीं हिंदुस्थान देशांतील शेंकडों जहागीरदार, इनामदार व संस्थानिक जे धुळीस मिळाले, त्यांपैकीं थोड्यांनीं वर डोकें केलें. याचें कारण हें कीं, त्यांत व त्यांचे पदरचे माणसांत जो सामर्थ्यसंचय पाहिजे होता तो नव्हता. अशा प्रकारचीं दोन्ही प्रकारचीं पुष्कळ उदाहरणें आहेत. या एकंदर हकीकतीचें तात्पर्य हें कीं, मुलांचे संबंधानें काय, समाजाचे संबंधानें काय, अथवा देशाचे संबंधानें काय, जी मुख्य गोष्ट लक्षांत ठेवावयाची, ती ही कीं, आंगीं सामर्थ्यसंचय पाहिजे. हा संचय ज्या मानानें असतो, त्या मानानें मुलांची अथवा समाजाची अथवा देशाची स्थिति बरी किंवा वाईट आहे असें समजावें. सामर्थ्यसंचय करून धनसंचय करून ठेविला, तर आपण कृतकृत्य आहों व आपण आपलें क-

र्तव्य केलें असें समजावें. सामर्थ्यसंचय करून न ठेवितां फक्त धनसंचय केला, तर आपलें वर्तन दोषास्पद आहे असें समजावें. हें तत्त्व लक्षांत न ठेवितां आपण वर्तन केलें, तर मुलें त्याप्रमाणें करितील व त्यांचें अहित होण्याचा फार संभव आहे. ह्मणून या गोष्टीचा आतां विशेष खुलासा करण्याचें कारण आहे. या गोष्टीचा इतका पाल्हाळ करण्यासाटीं हें स्थल नाहीं किंवा हा काळ नाहीं हें खरें आहे; परंतु वरील तत्त्व लक्षांत न आल्यामुळें किंवा त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळें हजारों लोकांचें नुकसान झालें आहे; व हा चुकीचा समज कायम राहील, तर पुढेंही नुकसान होण्याचा संभव आहे; ह्मणून वरील तत्त्वाची परिस्फुटता जितकी होईल तितकी करणें इष्ट आहे. मी तुह्मास, तुह्मी दुसऱ्यास, दुसऱ्यानें तिसऱ्यास, अशा रीतीनें सर्वत्र या तत्त्वाचा बोध करणें, हें आपणां सर्वांचें कर्तव्य आहे, असें मी समजतें.

घर हें गृहशिक्षणाचें शालागृह आहे. ह्यांत मुलांचा बहुतेक वेळ जातो. लहानपणापासून हें रात्रंदिवस त्यांच्या डोळ्यांपुढें असतें. हें शिक्षणाचें व सुखाचें एका प्रकारचें साधन असतें. जर ह्या साधनांत व्यंग आहे, तर शिक्षणाचे व सुखाचे साधनांत व्यंग आहे असें समजावें. तेव्हां घर बांधण्यापूर्वी प्रत्येकानें चांगला विचार केला पाहिजे. ज्यानें त्यानें आपल्या ऐपतीप्रमाणें घर बांधावें, ही गोष्ट तर निर्विवाद आहे. परंतु ही ऐपत, फक्त घरास लागणाऱ्या लांकूड व माती यांपुरतीच नाहीं, तर त्यासंबंधानें ज्या सोयी अवश्य पाहिजेत, त्यांत ज्या जिनसा अवश्य असल्या पाहिजेत, व त्या जिनसांची नेहमीं चांगली व्यवस्था ठेवण्यास जें सामर्थ्य पाहिजे त्याचाहि विचार करणें अवश्य आहे.

**रमाबाई**—एकूण ह्या गोष्टी लोकांस माहीत नाहींत, असें तुमचें ह्मणणें आहे का ?

**आनंदीबाई**—ह्या गोष्टी पुष्कळांस माहीत आहेत; परंतु ह्यांकडे त्यांचे दुर्लक्ष फार दिसून येतें. कित्येक शहरांत अथवा खेड्यांत अशीं कांहीं घरें आहेत कीं, तेथें सूर्यदर्शन बिलकूल होत नाहीं; कांहीं ठिकाणीं उन्हाळ्यांत दुपारीं शिजतें व रात्रीं जीव गुदमरतो, पावसाळ्यांत गळण्यानें जमिनीला ओल येतें व आंग धरतें, व हिंवाळ्यांत थंडीनें हुडहुडी भरते; कांहीं ठिकाणीं घराला शौचकूप व मोऱ्या नाहींत, व असल्या तरी त्यांचा निकाल नाहीं; कांहीं ठिकाणीं बारानबारा चोवीस वर्षांत घरांचीं जळमटें अथवा दुसरी घाण निघत नाहीं किंवा घरांत चोहोंकडे दिवे लावण्याची मारामार पडते; कांहीं ठिकाणीं निवांत बसून काम करीन ह्मटलें, तर सोय नसते; कांहीं ठिकाणीं घरें दिसण्याला शोभायमान असून त्यांतील सामान इतकें खराब असतें व त्याविषयीं इतका अलगरजीपणा दिसून येतो कीं, त्याबद्दल घराला लाज वाटत असेल. ही शोचनीय स्थिति फक्त गोरगरिबांचे संबंधानें दृष्टीस पडती, तर त्याबद्दल त्यांस फारशीं नांवें ठेवण्यास जागा नसती. परंतु ज्यांस ऐपत आहे व जे समजूतदार आहेत, त्यांचीही अशी स्थिति दिसून यावी, हें आश्चर्य आहे. अशा स्थितींत त्यांनीं जन्मचा जन्म काढावा व मुलांस बाणेरडें वळण लावून देऊन त्यांसही जन्म काढण्याची संवय लावावी, ही दुःखाची गोष्ट आहे. ज्यांस गैरसोयीपासून त्रास होत नाहीं, घाणीचें वाईट वाटत नाहीं, खराब सामानाबद्दल व अव्यवस्थितपणाबद्दल लाज वाटत नाहीं, ज्यांची घाण मेलेली आहे, गात्रें शिथिल झालीं आहेत अथवा बुद्धि मंद झाली आहे, त्यांच्या शरीरांत सामर्थ्य अथवा कुवत किती असणार आहे? व त्यांचे मनाचा ज़ोर अथवा उत्साह किती असणार आहे? ल्हान मुलें हींच पुढें मोठीं होणार. त्यांचें मत तेंच लोकमत

होणार; व त्या मताप्रमाणें पुढें सामाजिक व्यवस्था, स्थानिक राज्यव्यवस्था व राज्यव्यवस्था हीं असणार. या तीन प्रकारच्या संस्थांचीं सूत्रें ज्यांच्या हातीं असतात ते आपल्या इच्छेनुरूप लोकांस वळण लावितात; परंतु लोकमतांत जोर असला, ह्मणजे लोक आपणांस वाटेल त्या रीतीनें सुधारणा करावयास त्यांस लावतात. ज्यांच्या हातीं अधिकारपरत्वें सूत्रें आलीं असतात, त्यांचा लोकांस, व लोकांचा त्यांस, वचक असला पाहिजे; व परस्परांपासून परस्परांस मदत झाली पाहिजे. अशी स्थिति नसली, ह्मणजे खरी सुधारणा होण्याचा व लोकांस खरें सुख होण्याचा संभव कमी असतो. परंतु ज्या लोकमताचें बीजच कुजलेलें आहे अथवा ज्याचा कोंब निस्तेज व कुरटा आहे, तें लोकमत कमजोर असणार, हें सांगावयास नको. जोंपावेतों लोकमत कमजोर आहे, तोंपावेतों त्याचें वजन पडण्याचा व लोकांच्या मनाप्रमाणें सुधारणा होण्याचा संभव कमी आहे. ह्मणून घाणीपासून, गैरसोयींपासून, अव्यवस्थेपासून, अलगरजीपणापासून अथवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टींपासून परिणामीं अहित होतें, हें मुलांस लहानपणापासून भासविलें पाहिजे. हा हेतु सिद्धीस नेण्यासाठीं थोडा जास्त पैसा खर्च झाला असतां व्यर्थ व्यय झाला असें समजूं नये. स्वच्छता व व्यवस्थितपणा हीं आंगमेहनतीनें पुष्कळ अंशीं ठेवितां येतात. तेव्हां हीं ठेवण्याविषयीं गोरगरिबांची कुरकुर असण्याचें कारण नाहीं; व जे सुखवस्तु आहेत त्यांस तर बिलकूल कारण नाहीं.

**रमाबाई.**—मग घरांत व्यवस्था असावी तरी कशी? जर कांहीं नवीन असेल, तर आह्मी आपलेयेथें ठेवूं.

**आनंदीबाई.**—ही व्यवस्था कांहीं नवी आहे असें नाहीं. ही पुष्कळांस माहीत आहे. लोकांची स्थिति निरनिराळी असते व त्यांचे व्यवसाय निरनिराळे असतात; ह्मणून एकच नियम

अथवा एकच व्यवस्था सांगतां येणार नाहीं. तथापि, जी व्यवस्था करावयाची, तिजपासून आरोग्यवृद्धि व सोय होऊन तिजपासून मुलांस शिक्षणही मिळण्याचा मार्ग असला पाहिजे. या संबंधानें जास्ती खुलासा केला असतां तुह्मास कंटाळा येण्याचा संभव आहे. तुह्मास घर पहावयाचें आहे; तेव्हां तें पाहतां पाहतां तुमच्या नजरेस कांहीं गोष्टी येतीलच.

**यशोदाबाई.**—आपल्या घरांत दाखविण्यासारखें काय आहे ?

**बाळ्या.**—आई, माझी खोली पाहण्यासारखी नाहीं काय ? तींतील तसबिरा, लहान यंत्रें, लहान हत्यारें, निरनिराळ्या पदार्थांचा संग्रह, पुस्तकें व पुस्त्या, हीं सर्व पाहण्यासारखीं नाहींत का ? मी आपल्या खोलींतील सर्व वस्तु दाखवीन.

**काशी.**—आई, आमचें शिवणकाम, लोंकरीचें काम, चित्रें, लिहून ठेवलेले धडे वगैरे आह्मी दाखवूं. रोज आह्मी काय करतों, याचें आह्मीं टिपण करून टेविलें आहे. तेंही आह्मी दाखवूं.

**आनंदीबाई.**—यशोदाबाई, मुलांच्या ह्या जिनसा पाहण्यासारख्या असून शिवाय घरांतील दुसऱ्याही गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. एकादें शहर पहावयाचें असल्यास तेथील फक्त चार भव्य व शोभायमान इमारती पाहून स्वस्थ न बसतां, तेथील लोक कसे आहेत, त्यांची स्थिति कशी आहे, त्यांचे आचार विचार काय आहेत, शहरांत स्वच्छता कशी आहे, लोकांच्या सोयीसाठीं, आरोग्यासाठीं व शिक्षणासाठीं काय व्यवस्था केली आहे; त्या शहराची पूर्वीची स्थिति कशी होती व हल्लीं कशी आहे, तात्पर्य, लोकांची जी ऐपत आहे व त्यांजवळ जीं साधनें आहेत त्यांचा त्यांनीं कसा उपयोग केला आहे, हें समजून घेतलें

पाहिजे. हीच गोष्ट घरास लागू आहे. घरांतील जिनसा मौल्यवान असतील तर, अथवा शोभेच्या असतील तर ,त्या पाहण्यास योग्य आहेत, हा समज चुकीचा आहे. ज्या जिनसांपासून अथवा व्यवस्थेपासून सुख होतें, बुद्धीचा विकास होतो व मनास बोध होतो त्यांची मातबरी फार आहे; मग त्या जिनसा फार किंमतीच्या असोत अथवा साधारण किंमतीच्या असोत. घर पहावयाचें, ह्मणजे घरांतील निर्जीव वस्तु मात्र पहावयाच्या असें नाहीं, तर घरांतील लोकांनीं जिनसांची व्यवस्था कशी ठेविली आहे, त्यांचें स्वतःचें आचरण कसें आहे, व त्यांनीं आपल्या ऐपतीप्रमाणें आपल्या उद्योगानें आपल्या आरोग्यासाठीं, आपल्या सोयींसाठीं व आपल्या एकंदर सुधारणेसाठीं काय केलें आहे, हें पाहणें अवश्य आहे. असो. आपला बराच वेळ या बोलण्यांत गेला. आपणांस दुसरीं कामें आहेत.

वर सांगितल्याप्रमाणें भाषण झाल्यावर आनंदीबाई परसांत गेली. त्यावेळेस घराच्या संबंधानें जी व्यवस्था केली होती ती तिनें रमाबाईस दाखविली. ती ह्मणाली, घराच्या बाबतींत जी गोष्ट प्रथम लक्षांत ठेवावयाची ती ही कीं, तें होतां होईल तितकें करून घाणेरड्या ठिकाणीं अथवा दाट वस्तींत असूं नये. घर नदीच्या कांठीं अथवा तलावा जवळ असूं नये. तें दलदलीच्या ठिकाणीं अथवा खोल जागेंत असूं नये. होतां होईल तितकें करून तें उंचवट्याचे ठिकाणीं असावें. नदीचे कांठाजवळ घरें बांधण्याचा प्रघात वाईट आहे. चांगलें ठिकाण मिळण्यासाठीं दोन पैसे जास्त पडले, तरी हरकत नाहीं. चांगलें ठिकाण मिळण्यासाठीं पैसा खर्च करणें, हा अपव्यय होत नाहीं. एक वेळ घराला कमी शोभा असेल अथवा कमी सोय असेल तर चालेल; परंतु जर ठिकाण घाणेरडें असेल, तर घरांतील स्वच्छ-

भा. १०९



तेच्या संबंधानें चांगली व्यवस्था ठेविली, तरी तिचा विशेष उपयोग होणार नाहीं. घरासभोंवतील दूषित हवेमुळें घरांतील हवा खराब होण्याची व आजार उत्पन्न होण्याची भीति राहीलच.

दुसरी गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती ही कीं, सर्व घर खुलास असावें, निजण्याचे जागेच्या संबंधानें विचार करितां घरांतील प्रत्येक इसमास सुमारें ४८ औरस चौरस फूट जागा सांपडेल अशी व्यवस्था असावी. कोंडमाऱ्यानें शरीरास अपाय होतो. स्वयंपाकघर, गोठा, तबेला व पायखाना हीं तर विशेषेंकरून खुलास असलीं पाहिजेत. कारण, हीं जरी एकदां स्वच्छ केलीं, तरी, त्यांतील हवा घाणीमुळें वारंवार दूषित होते. हीं खुलास असलीं, ह्मणजे ह्यांतील हवा कोंडून न राहतां प्रसरण पावते व चांगली हवा आंत येते. वरील चार इमारतींतील हवा दूषित होत असते, ह्मणून त्या बसण्याउठण्याचे जागेपासून थोड्या लांब असल्या तर बरें. ह्या लांब असल्या ह्मणजे धुरामुळें अथवा घाणीमुळें त्रास होणार नाहीं. घराच्या पुढच्या भागीं ह्या असण्यापेक्षां पिछाडीस असल्या तर चांगलें, हें समजून त्याप्रमाणें व्यवस्था केली आहे. ह्या सर्व गोष्टी दिसण्याला क्षुल्लक दिसतात; परंतु त्यांकडे दुर्लक्ष केल्यानें अखेरीस अहित होतें, हें लोकांचे लक्षांत येत नाहीं. कित्येक घरांत धुरापासून इतका त्रास होतो कीं, त्या त्रासामुळें स्त्रियांस शीण येऊन जेवण कमी जातें, त्यांचे डोळे खराब होतात व केव्हां केव्हां मेंदु खराब होऊन डोकें दुखूं लागतें. पुष्कळ लोकांचा हा चमत्कार दृष्टीस पडतो कीं, घराप्रीत्यर्थ त्यांचे शेंकडों रुपये खर्च होतात; परंतु सर्व काटकसर मोऱ्या, गोठा, तबेला, पायखाने वगैरे बाबतींत असते; व या वेडेपणाच्या काटकसरीमुळें त्यांस नेहमीं त्रास होत असतो, तरी त्याकडे त्यांचें दुर्लक्ष असतें. मोऱ्या थोड्या

रुंद व खोल करणें व त्यांतील सांडपाण्याचा निकाल करणें, त्याचप्रमाणें पायखाना विटामातीचा न करितां चोहोंकडून दगडाचा करून पाणी टाकून स्वच्छ करण्यास सोय करणें, तबेल्याची व गोठ्याची जमीन खराब न व्हावी ह्मणून तींत मुरूम टाकून धुमसून सकत करणें व ती स्वच्छ करण्यासाठीं सोय करणें, ह्या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टी करण्यास दोन चार हजार रुपये लागतात असें नाहीं. लोकांच्या घाणेरड्या संवयींची व वेडेपणाच्या काटकसरीची याहून मौज वाटते. दिव्याची घाण फार वाईट असते, हें प्रत्येकास माहीत आहे. दिव्याचे तेलांतील अंगार वायु ( कारबान ) व हवेंतील प्राणवायु ( आक्सिजन ) हें दिव्याचें जीवन होय; परंतु या दोहोंचे संयोगापासून अंगाराम्ल ( करबानिक आसिद ) उत्पन्न होतो. तो फार अपायकारक असतो. त्याची घाण फार असते, ह्मणून तिचा प्रसार न होतां ती वरचेवर परभारें जाईल अशी तजवीज करणें अगत्याचें आहे. परंतु याकडे थोडे लोक लक्ष देतात. कोनाड्यांतील दिवली जाऊन तिच्या ऐवजीं कंदील उंच टांगून ठेवण्याची, अथवा समई जाऊन तिच्या ऐवजीं लामण दिवा किंवा दुसरा दिवा उंच टांगून ठेवण्याची तजवीज होत नाहीं. त्याचप्रमाणें पायखान्यांतील पल्हाटीच्या अथवा तुऱ्हाटीच्या पाट्यांस रजा देऊन त्यांऐवजीं लोखंडाच्या दोणी ( पाट्या ) केल्या असतां व शौचकूपांत शेगडींत राख ठेवून ती, अथवा कोरडी माती थोडथोडी प्रत्येकानें टाकीत गेलें असतां घाण कमी होईल. ज्याप्रमाणें वस्त्र पाण्याचें शोषण करितें, त्याप्रमाणें कोरडी माती घाणीचें शोषण करिते. बहुत करून मातीचें दुर्भिक्ष नसतें, ह्मणून या कामीं मातीचा उपयोग करण्यास हरकत असूं नये. या गोष्टी पुष्कळ लोकांस करितां

येण्यासारख्या आहेत. यांस फार खर्च लागतो असें नाहीं. परंतु त्या करणें लोकांच्या जीवावर येतें किंवा त्यांस कंटाळा येतो. अशा प्रकारच्या गोष्टी करण्यानें घाण कमी होऊन सहजगत्या शिक्षण देण्यास साधन होतें. असो. ही घाण सोडून आपण आतां बागेंत जाऊं.

असें ह्मणून आनंदीबाई बागेंत गेली व तिनें सर्व झाडें, वनस्पति वगैरे दाखविल्या. बागेंतील व्यवस्था पाहून रमाबाईस व तिच्या मुलींस नवल वाटलें. मुली ह्मणाल्या, एकूण तुह्मांस भाजीपाला विकत घ्यावा लागत नसेल, किंवा फुलें वगैरे विकत घ्यावीं लागत नसतील, व यामुळें तुमचे बरेच पैसे वांचत असतील.

हें ऐकून आनंदीबाईनें उत्तर केलें कीं, भाजी व फुलेंच काय, परंतु या लहानशा वाडग्यांत जीं फळझाडें अथवा औषधिवनस्पति होण्यासारख्या आहेत त्या तुमच्या दृष्टीस पडतील. या वाडग्यांतील प्रत्येक झाड अथवा वनस्पति उपयोगाची आहे. दुतर्फा ठेविलेल्या कुंड्यांतील व पायरस्त्याचे बाजूंवरील झाडें मात्र शोभेकरितां लाविलीं आहेत. परंतु चित्रकला शिकवितांना त्यांचाही उपयोग होतो. बागेंतील झाडें केवळ उत्पन्नाकरितां लाविलीं आहेत असें नाहीं, तर आपल्या श्रमानें जिनसा तयार करण्याचें ज्ञान, व रोपें लहानाचीं मोठीं करण्याचें शहाणपण येऊन वनस्पतिशास्त्राचीं मूलतत्वें समजून सांगण्यास साधन असतें. रोपांचें संगोपन करण्यानें टापटिपेचें वळण लागतें; व वेळच्या वेळीं काम न केलें, तर काय तोटा होतो हें समजून येतें. दुसरें असें कीं, मुलांस व वायकांस एका प्रकारची करमणूक होऊन त्यांच्या मागें एक उद्योग असतो. झाडांच्या योगानें हवा थंड व शुद्ध होते; परंतु हे सर्व फायदे होण्यास आंग मोडून

थोडी मेहनत केली पाहिजे; झाडा खालचा केरकचरा काढून टाकिला पाहिजे; व त्यांस वेळचे वेळेवर खेताचें पाणी घातलें पाहिजे. झाडांपासून पुष्कळ फायदे होतात ही गोष्ट लक्षांत आणून मुलांकडून बागेची मुद्दाम व्यवस्था केली आहे. तुमच्या घरीं सोय असल्यास तुह्मी ही त्याप्रमाणें करावें अशी माझी इच्छा आहे. परंतु बागेंत वाटेल तीं झाडें लावावयाचीं असें नाहीं. ज्याप्रमाणें दुसऱ्या कित्येक गोष्टींत निवड करणें जरूर आहे, त्याप्रमाणें झाडांचे संबंधानें निवड करणें अवश्य आहे. कारण आपणांजवळ जागा थोडी असते, पैसे खेतावाताचे असतात व उपयोग तर चांगला करून घ्यावयाचा असतो. या बागेंत झाडें वनस्पति वगैरे कोणतीं आहेत व त्यांचा उपयोग काय आहे हें सर्व टिपून ठेविलें आहे, व तें मुलांस माहीत आहे.

**रमाबाई.**—या बागेंत कोणतीं झाडें आहेत व त्यांचा काय उपयोग आहे हें मुलांस माहीत आहे?

**आनंदीबाई.**—होय. काशी तर ही सर्व माहिती सांगेल.

रमाबाईचे मुलींस हें खरें न वाटून त्यांनीं काशीस ही माहिती ह्मणून दाखविण्यास सांगितलें; तेव्हां काशी आनंदीबाईस ह्मणाली मावशीबाई, प्रत्येक झाडाची सर्व माहिती सांगूं किंवा कांहीं थोड्या झाडांची माहिती सांगूं. आनंदीबाई ह्मणाली कीं, तूं येथील सर्व झाडांची माहिती सांगूं लागलीस, तर कंटाळा येईल. कारण या बद्दलची माहिती पुस्तकांत आहे. लोक निरनिराळ्या झाडांचा काय उपयोग करितात हें सध्यां आपणांस नको आहे. तुह्मी त्यांचा काय उपयोग केला आहे व पुढें तुह्मांस काय उपयोग करितां येण्यासारखा आहे, हें थोड्या झाडांच्या संबंधानें सांग ह्मणजे झालें.

आनंदीबाईनें सांगितल्याप्रमाणें काशीनें ती माहिती सांगितली. ती अशी:—आंब्याच्या पानांच्या आह्मीं पत्रावळी करून ठेविल्या आहेत. पिकल्या आंब्याच्या रसाची साटी घातली आहे. हिरव्या आंब्याचा मुरंबा व लोणचें केलें आहे. हिरवे आंबे वाळवून त्यांची आंबोशी करून ठेविली आहे. चिंचेच्या ऐवजीं भाज्या वगैरे पदार्थांत तिचा उपयोग करितां येतो. आंब्याची कढी चांगली होते. बाळयाला पांच सहा दिवसांपूर्वी आमांश झाला होता; त्या वेळेस तुह्मीं आंब्याची कोय दह्यांत वाटून दिली. आंब्याची छाया दाट असते; ह्मणून तीं उन्हाळ्यांत सकाळीं केव्हां केव्हां आह्मी अभ्यास करीत बसतों.

**आवळी.**—आवळ्याचें लोणचें चांगलें रुचकर होतें. त्याचा मोरंबा पित्तावर चांगला, ह्मणून तो तयार करून ठेविला आहे. लहान लहान आवळयांची आवळकटी औषधासाठीं करून ठेविली आहे.

**कंवट.**—पिकलेल्या कंवठाचा गीर काढून त्यांत गूळ किंवा साखर घालून तो आह्मी केव्हां केव्हां खातों. हा पित्तावर चांगला. बाळयाला तो फार आवडतो. आह्मी कंवठाची चटणी करितों किंवा रायतें करितों. तें खाण्याला फार रुचकर लागतें. थोडे दिवसांपूर्वी ग्यानूच्या सर्व आंगावर पित्त उठलें होतें; तेव्हां तुमच्या सांगण्यावरून त्यानें कंवठीचा पाला वाटून लाविला. त्या वेळेस त्याला गुण आला.

**केळ.**—केळीसारखीं उपयुक्त दुसरीं झाडें क्वचित् दृष्टीस पडतात. आह्मी हिरव्या केळयांची भाजी करितों. त्याचप्रमाणें केळफुलांची व कालाची भाजी करितों. फुलें गुंफावयास व पुडा बांधाव्यास सोपटें उपयोगीं पडतात. पानें जेवणाचे उपयोगीं पडतात. जखम झाली असतां केळीचा चीक उपयोगीं आहे.

पोटांत विष गेलें असतां कालाचा रस काढून घ्यावा, ह्मणजे विष उतरतें. परंतु वैद्य मिळण्यासारखा नसेल किंवा चांगलें औषध संग्रहीं नसेल, तर हा उपाय करावा.

काशी नारिंगाविषयीं पुढें सांगणार, तों आनंदीबाई ह्मणाली, काशी, पुरे कर. तुझ्या मैत्रिणींस कदाचित् कंटाळा येईल. हें ऐकून रमाबाईची मुलगी द्वारका ह्मणाली, मला खरोखरच कंटाळा येत चालला होता. मला ह्यांत विशेष कांहींच वाटलें नाहीं. पुस्तकांतून ह्याहीपेक्षां पुष्कळ माहिती असते.

**आनंदीबाई.**—होय, पुस्तकांत याविषयींचशी काय, परंतु दुसऱ्या शेंकडों गोष्टींविषयीं माहिती दिलेली असते. परंतु ह्या माहितीचा उपयोग कसा करावा हें जर चांगलें समजलें नाहीं, तर काय उपयोग आहे? हातून जितकी क्रिया होऊन जाईल तितकें चांगलें. जीं साधनें आपणापाशीं आहेत त्यांचा उपयोग कसा करावा, हें जर आपणास माहीत नाहीं, तर तीं असून नसून सारखीं आहेत. ज्या गोष्टी आवश्यक असून मुलांस करितां येण्यासारख्या आहेत, त्यांसाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पहात बसण्यास त्यांस लावणें शहाणपणा नाहीं. ज्या गोष्टी त्यांस करितां येण्यासारख्या असून त्या करण्यास सोय आहे, त्यांचीच प्रथम त्यांस माहिती देऊन त्यांकडून त्या करवाव्या, ह्मणजे त्यांस भरंवसा वाटून दुसऱ्या गोष्टी करण्यास उमेद येते. नुसतें पुस्तकांत पुष्कळ आहे, एवढेंच समजून अथवा पुष्कळ पाटांतर करवून उपयोग नाहीं. जीं साधनें आहेत त्यांतून निवड करून त्या साधनांचा उपयोग करण्याचें शहाणपण आलें पाहिजे. पदार्थांविषयीं आतां काशीनें जी माहिती सांगितली ती दिसण्याला थोडी दिसते; परंतु ते पदार्थ तयार करतांना दुसऱ्या पुष्कळ गोष्टींची माहिती होत असते, ही गोष्ट तुझ्या लक्षांत आली नाहीं. बागें-

तील फळझाडें, फुलझाडें, भाजीपाला व दुसऱ्या वनस्पति ह्या केवळ उत्पन्नासाठीं लाविल्या नाहींत; ह्या केवळ शोभेसाठीं नाहींत; ह्या केवळ हवेसाठीं अथवा करमणुकीसाठीं नाहींत; तर हे सर्व फायदे होऊन शिक्षण देण्यासही साधन असावें, ह्मणून हीं झाडें लाविलीं आहेत. वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, व कृषिकर्म, हीं उपयुक्त शास्त्रें होत. या शास्त्रांचीं कांहीं मूलतत्त्वें लहानपणीं शिकविण्यास बाग हें चांगलें साधन आहे. लहान गर्भापासून मोठा मनुष्य होईपर्यंत कोणत्या गोष्टी कराव्या लागतात हें समजणें जितकें महत्त्वाचें आहे, तितकेंच बीं पेरल्यापासून मोठा वृक्ष होईपर्यंत काय केलें पाहिजे, रोपांचीं कोणकोणतीं रूपांतरें होतात वगैरे गोष्टी समजणें फार महत्त्वाचें आहे. ज्याप्रमाणें मनुष्यें नाकाच्या द्वारें श्वासोच्छ्वास करितात, त्याप्रमाणें झाडें पानांच्या द्वारें श्वासोच्छ्वास करितात. हवेंतील अंगाराम्ल वायूचें पृथक्करण करून मनुष्यास उपयुक्त जो प्राणवायु तो तीं सोडून देतात, व आपण अंगारवायु ग्रहण करितात. मनुष्य जें अन्न तोंडाचे द्वारें ग्रहण करितो, त्याचें विक्लेदन पाण्यानें होऊन व त्यावर हवेचा व्यापार होऊन त्याचें रक्त बनतें, व तें सर्व शरीरांत खेळतें. त्याप्रमाणेंच झाडांना पाणी घातलें ह्मणजे, त्यांच्या मुळ्यांच्या आसपास जीं खनिज द्रव्यें असतात त्यांचें विक्लेदन पाण्यानें होतें व झाडांचें जीवन मुळ्यांवाटें त्यांस मिळतें. त्यावर हवेचा व्यापार होऊन रस उत्पन्न होतो. हा रस झाडांचें जीवन होय. हा रस ज्याप्रमाणें असतो त्याप्रमाणें झाडें जोरदार किंवा कुरटीं होतात. झाडें व मनुष्यें ह्यांचा परस्परांस फार उपयोग आहे, ह्मणून झाडांचें संगोपन करणें, हें केवळ मौजेसाठीं नाहीं, तर तें मनुष्याचें संगोपन करण्यासारखें आहे व तो एक शिक्षणाचा भाग आहे.

रमाबाई व तिच्या मुली ह्यांनीं नवलकोल, टोमाटो, करमगड्डा वगैरे भाजीपाला, कुंड्यांतून ठेविलेलीं झाडें, जाई, जुई, मोगरा, शेवती, बकूळ, पारिजातक वगैरे फुलझाडें, आम्र, नारिंगें, लिंबें, वगैरे फळझाडें पाहिल्यावर त्यांची नजर कपाशीच्या झाडांकडे गेली. तीं झाडें पाहून रमाबाई ह्मणाली तुह्मीं हीं झाडें कशाकरितां लाविलीं आहेत? यांपासून शोभा तर कांहींच नाहीं. यापासून कापूस तो किती निघणार?

**आनंदीबाई.**—माझ्या हिशेबानें कपाशीचें झाड तर बागेंतील इतर सर्व झाडांपेक्षां फार उपयुक्त आहे. आजकाल कपाशीचें महत्त्व किती आहे? अलीकडे शेतकरी कपाशी फार पेरूं लागले आहेत, ह्मणून धान्य फार महाग झालें आहे; कपाशीवर त्यांस दोन पैसे मिळतात, परंतु हे पैसे ते उडवून टाकतात व अन्नास महाग होतात, असा कांहीं लोकांचा समज आहे. कांहींचें असें ह्मणणें आहे कीं, धान्यास भाव येणें, हें तर शेतकऱ्यांस चांगलें; मग कपाशी जास्त पेरिली ह्मणून काय झालें? प्रस्तुत कपाशीच्या संबंधाचा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. मांचेस्टर येथील व्यापारी कपाशीचे व्यापारावर किती सधन झाले आहेत? त्यांस काटनलार्ड ह्मणजे कपाशीचे स्वामी हें नांव प्राप्त झालें आहे. कपाशीचे मालावरील जकात उठवावी ह्मणून त्यांनीं दीर्घ प्रयत्न केला व ही उठवूं नये ह्मणून आह्मींही यत्न केला; परंतु आमचा प्रयत्न निर्फल झाला, हें ध्यानांत येतें. येथें जीं कपाशीचीं झाडें लाविलीं आहेत, तीं बोटवाती अथवा फुलवाती यांसाठीं कापूस मिळावा, ह्मणून लाविलीं नाहींत. मुलांस हगवण झाली असतां कपाशीचीं बोंडें उपयोगीं पडतील, ह्मणून हीं झाडें लाविलीं नाहींत. हीं लावण्यांत माझा हेतु निराळा आहे. कपाशी मुख्यत्वें तीन ठिकाणीं फार होते. अ-

मेरिका खंडांत युनायटेडस्टेट्स देशामध्यें, आफ्रिका खंडांत मिसर देशामध्यें व आशिया खंडांत हिंदुस्थान देशामध्यें. परंतु आमच्या कापसाची फारशी मातबरी समजत नाहींत. आमच्या कापसाचीं उत्तम वस्त्रें होत नाहींत; कारण यंत्रानें ह्या कापसाचें बारीक सूत निघत नाहीं असा बोभाटा आहे. आमचा कापूस साधारण वस्त्रें करण्यास किंवा चांगल्या कापसांत मिसळून मग त्याचीं वस्त्रें करण्यास उपयोगीं पडत आहे; व हीं वस्त्रें इकडे येत आहेत. या स्थितीमुळें दरसाल लक्षावधि रूपयांचें नुकसान होत आहे. याविषयीं वेळेवर विचार केला नाहीं, तर पुढेंही नेहमीं नुकसान होण्याची भीति आहे. जाडीं-भरडीं वस्त्रें वापरून निर्वाह करीत जा, असें नुसतें सांगून उपयोग नाहीं. असा प्रयत्न अनेक वेळां ठिकठिकाणीं केला होता; परंतु तो निर्फळ झाला. आतां चांगला कापूस तयार करून उत्तम वस्त्रें तयार करण्याची उमेद बाळगिली पाहिजे. चांगला कापूस तयार करण्यासाठीं अनेक ठिकाणीं अनेक वेळां प्रतीति केली पाहिजे. ज्यांस सोय आहे त्यांनीं प्रतीति करण्याचे हेतूनें आपले घरीं कपाशीचीं झाडें लाविलीं पाहिजेत; व कापसाचे निरनिराळे नमुने जमवून कसकसें सूत निघतें हें पाहिलें पाहिजे. या कामांत एक दोन वर्षें यश येणार नाहीं; कदाचित् दहा पांच वर्षांत येणार नाहीं; परंतु दहा वीस वर्षें ठिकठिकाणीं असा यत्न केला असतां यश यावयाचें नाहीं असें नाहीं. प्रतीति करण्यास फार खर्च लागेल असें नाहीं. या गोष्टीचा छंद मुलांस लावला पाहिजे. हें समजून हीं कपाशीचीं झाडें लाविलीं आहेत.

दुसरें असें कीं, कपाशीचें झाड हें आमच्या मूर्खपणाचें स्मारक ह्मणून लाविलें आहे. आह्मी शहाणे होतों, परंतु आतां मूर्ख बनलों आहों, ह्याची आठवण नित्य असावी ह्मणून हीं

झाडें लाविलीं आहेत. आमचा देश सुधारलेला, आह्मी सुधारलेले व आमची सुधारणा प्राचीन, अशी वढाई मारण्यास आह्मी तयार असतों; आह्मांस कोणीं आळशी ह्मटलें असतां अथवा उत्साहहीन ह्मटलें असतां अथवा दुर्बल ह्मटलें असतां त्यावर तुटून पडण्यास आह्मी तयार असतों; परंतु स्वपराक्रमावलंबन हा गुण आह्मांत नसावा, आमची लज्जा राखण्याचें ज्ञान आह्मांस असूं नये, अन्न व वस्त्र ह्या दोन आवश्यक गोष्टींपैकीं वस्त्रासाठीं आह्मांस लोकांचे तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग यावा, व हें वस्त्र तयार करण्याचें सामर्थ्य आह्मांस अद्याप येऊं नये, यापेक्षां मूर्खपणा तो कोणता ? आपले वाडवडील स्वपराक्रमानें आपलीचशी काय, परंतु दुसरे देशांतील लोकांचीही लाज राखीत. तेव्हां या दृष्टीनें ते शहाणे होते हें ह्मणणें बरोबर आहे. आह्मांस आमची स्वतःची लाज राखतां येत नाहीं, तर आह्मी दुसऱ्याची काय राखणार ? लोकांस बारीक सुताचें वस्त्र नेसण्याची हौस वाटावी; परंतु तीं तयार करण्यासाठीं हिंमत बाळगून व ईर्ष्या धरून नेटानें व एकोप्यानें अश्रांत श्रम करण्याची गोडी त्यांनीं मुलांमध्यें उत्पन्न करूं नये, किंवा त्यांना हौस वाटूं नये; त्यांनीं वडिलांची कीर्ति सांगत बसण्यांतच पुरुषार्थ मानावा हा मूर्खपणा नाहीं, तर दुसरा मूर्खपणा कोणता ? शेतकरी आपापल्या समजुतीप्रमाणें कसा तरी कापूस तयार करीत आहेत; त्यांसाठीं ओबडधोबड कापड कसें तरी तयार होत आहे; हें कापड ते वापरीत आहेत; त्यापासून त्यांस कमीपणा वाटत नाहीं; ह्मणून देशांत धनसंचय होत आहे. परंतु हौशी लोकांस उत्तम कापूस तयार करण्याचें ज्ञान नाहीं; तो तयार करून बारीक सूत काढण्याचें सामर्थ्य नाहीं; व ओबडधोबड वस्त्रें नेसण्याविषयीं व पांघरण्याविषयीं कमीपणा वाटतो; व सुं-

दर वस्त्रें नेसण्याची प्रतिष्ठा वाटून ते तीं वस्त्रें वापरतात व पैसे घालवून देशाचा तोटा करितात. तेव्हां अडाणी लोकांचें वर्तन शहाणपणाचें किंवा हौशी लोकांचें वर्तन शहाणपणाचें? या ठिकाणीं मजूरी स्वस्त आहे व कच्चा माल उत्पन्न होत आहे; परंतु तोच माल बाहेर जाऊन यंत्रादि साधनांनीं निराळ्या रूपानें येथें परत येत आहे व दरसाल लक्षावधि रुपयांचें नुकसान होत आहे. तेव्हां हौशी लोकांची हौस मुलांस भिकेस लावणार नाहीं काय? हे लोक मुलांस भीक मागण्याचें शिक्षण देत नाहींत का? तुह्मी कच्चा माल आह्मांस पुरवीत जा व आह्मी तुह्मांस त्याच मालाच्या जिनसा देत जाऊं असें ह्मणणें, ह्मणजे कांहीं अंशीं आह्मी खोबरें घेत जाऊं व तुह्मांस करवंटी देत जाऊं, असें ह्मणण्यासारखें आहे. हें ह्मणणें ह्मणजे कमी फायद्याचीं कामें तुह्मी करीत जा व जास्त फायद्याचीं आह्मी करीत जाऊं असें आहे. हा, पायावर धोंडा पाडून घेण्याचा व्यवहार आहे. ज्यांस हा हितकर श्रमविभाग वाटत असेल त्यांस तो वाटो. ज्यांस हें व्यापारस्वातंत्र्याचें खरें तत्त्व वाटत असेल त्यांस तें खुशाल वाटो. देशांत कच्चा माल तयार करण्याचीं साधनें असतां व मजूरीचा दर स्वस्त असतां दुसऱ्यास तो कृतीनें तयार करावयास लावून तो आपण वापरणें, हा हितकर श्रमविभाग नाहीं. देशांतील कारखाने बाल्यावस्थेंत असतां व्यापारस्वातंत्र्याचें तत्त्व लागू करणें श्रेयस्कर नाहीं. लहानपणीं मुलांविषयीं काळजी न घेतां व त्यांचें संगोपन न करितां त्यांस स्वातंत्र्याचें तत्त्व लागू करणें चांगलें नाहीं; कारण त्यांचे आंगीं सामर्थ्य नसल्यामुळें त्यांस टिकाव धरितां येत नाहीं. त्यांस स्वातंत्र्यापासून लाभ न होतां त्यांची हानि मात्र होण्याची भीति असते. हीच गोष्ट बाल्यावस्थेंत असणाऱ्या व्यापारास अथवा

कारखान्यांस लागू आहे. व्यापारस्वातंत्र्यामुळें स्पर्धा उत्पन्न होते व फायदा होतो हें खरें आहे; परंतु ज्यांमध्यें स्पर्धा उत्पन्न करावयाची, त्यांची बरोबरी असली पाहिजे. ज्या बाबतींत स्पर्धा करावयाची त्यांत आह्मी मागसलेले व तुह्मी पुढें सरसावलेले; तुह्मी घोड्यावर, आह्मी पायीं; तुह्मी यंत्रादि साधनांनीं सशस्त्र, आह्मी हतवीर्य व निःशस्त्र; अशी स्थिति असतां तुमची आमची बरोबरी कशी होईल ? आह्मी बरोबरी करावयास लागलों असतां आमचा मात्र तोटा होईल व तुमचा फायदा होईल. तुमची बरोबरी करावयास जीं साधनें आह्मांपाशीं पाहिजेत तीं सध्यां आमचेपाशीं नाहींत; तेव्हां सध्यां व्यापारस्वातंत्र्याचें तत्त्व लागू करणें हें आह्मांस हितावह नाहीं. कापसाचे संबंधानें आह्मांस सोय आहे, लोखंडाचें संबंधानें तुह्मांस सोय आहे; ह्मणून कापसाचा माल आह्मी तयार करून तुह्मांस पुरवितों, लोखंडाचा माल तुह्मी देत जा. तुह्मी कोळसा द्या, आह्मी गहूं व तांदूळ देतों. तुह्मी चहा द्या, आह्मी निळी देतों. तुह्मी स्टेशनरीचें सामान द्या, आह्मी वनस्पतींचीं औषधें देतों. तात्पर्य, ज्या जिनसांची सोय आमचेपाशीं आहे, त्या आह्मी देतों; ज्यांची सोय तुह्मांस आहे त्या तुह्मी द्या. अशा समजुतीवर तुह्मी आह्मी व्यवहार करूं; व अशा समजुतीवर परस्परांस मदत करूं. असें होत नसेल, तर व्यापारस्वातंत्र्याचे तत्त्वाप्रमाणें चालण्याची आमची इच्छा नाहीं. ह्याबद्दल अर्थशास्त्रकार आह्मांस मूर्ख समजोत, मुत्सद्दी आह्मांस वेडे ह्मणोत, व व्यापारी नांवें ठेवोत. त्यांकडे लक्ष देण्यांत फायदा नाहीं. साधनें असतां जोंपावेतों देशांतील लोक कच्चा माल परदेशास पाठवून कृतीनें तयार केलेला माल घेत आहेत, व कारखान्यांचा फैलाव न करितां शेतीकडेच जास्त लक्ष देत आहेत, तों-

पावेतों त्या देशाची उन्नति कधींही व्हावयाची नाहीं. या सर्व गोष्टी लक्षांत ठेवून त्या धोरणानें बोध करणें हें अगत्याचें आहे. अशा प्रकारें बोध करणें, हें व्यापारशिक्षणाचा ओनामा शिकविणें आहे. हा ओनामा मुलांकडून घट्ट करून घेतला पाहिजे. हें बाळकडू प्रत्येक आईनें आपले मुलांस पाजिलें पाहिजे. या तत्त्वाचा बोध मुलांस करून त्यांचे मनास व त्यांचे उद्योगास वळण देणें हें पालकाचें कर्तव्य आहे. ही गोष्ट लक्षांत ठेवून अमेरिकन लोकांनीं सांप्रत व्यापारस्वातंत्र्याचें तत्त्व एकीकडे ठेविलें आहे व त्यांचा आतां भरभराट होत आहे. फ्रेंच लोकांस या तत्त्वाचें महत्त्व सध्यां वाटत नाहीं. जर्मन लोकांसही या तत्त्वाचा मोह तूर्त वाटत नाहीं. इंग्लंड देश सुधारलेला, तेथील लोक संपन्न व सामर्थ्यवान, तेथील कारखाने चांगल्या स्थितींत आहेत; असें असतां तेथील लोकसुद्धां या तत्त्वाप्रमाणें सर्वांशीं चालत नाहींत, तर आपल्या या देशांतील लोकांनीं या मोहक तत्त्वास भुलून वागणें हितावह नाहीं. कांहीं दिवस संगोपन याच तत्त्वाचें अवलंबन केलें पाहिजे. इंग्लंड, फ्रान्स, युनायटेडस्टेट्स व जर्मनी यांचा उद्योग आगगाडीचे वेगानें चालला आहे. त्यांच्या उद्योगप्रवाहाचे फांटे चोहोंकडे पसरत चालले आहेत. आपली तर बैलगाडी अद्याप सुटली नाहीं. बैलगाडीची गति फारच मंद असते. असल्या गतीनें मोठी मजल होत नाहीं. मोठी मजल केल्याशिवाय तर सोय नाहीं, अशी सांप्रतची स्थिति आहे. ही स्थिति लक्षांत आणून मुलांस त्याप्रमाणें शिक्षण दिलें पाहिजे. त्यांच्यामध्यें जागृति उत्पन्न केली पाहिजे. त्यांनीं कपाशीचीं झाडें लाविलीं पाहिजेत; त्यांच्या डोळ्यांपुढें कपाशीचे निरनिराळे मासले ठेविले पाहिजेत, त्यांकडून यंत्रानें सरक्या काढून सूत काढविलें पाहिजे; यंत्रानें त्याच्या गुंड्या तयार करविल्या

पाहिजेत. हीं यंत्रें व या संबंधीं लहान पुस्तकें हा त्यांचा खेळ, ही त्यांची करमणूक व हा त्यांचा उद्योग असला पाहिजे. सध्यां यांत्रिक शिक्षण देण्याचा क्रम चालू आहे. परंतु या शिक्षणावरच अवलंबून राहून उपयोगीं नाहीं. या शिक्षणास धरून प्रारंभ झाला असतां इष्टहेतु लवकर सिद्धीस जाण्याचा संभव आहे. दुसऱ्या लोकांनीं आपणांस जागे करून आपणांसाठीं सर्व तयारी करून ठेवण्यापेक्षां आपणच वेळेवर शुद्धीवर यावें व उद्योगास लागावें, हें शहाणपणाचें कृत्य आहे. दुसऱ्यांवर आतां वस्त्रांकरितां व आपली लाज राखण्याकरितां भार घालणें हा शहाणपणा नाहीं. युनायटेडस्टेट्स देशांतील लोक जागे होऊन उद्योगास लागले आहेत. ते अमेरिका खंडास कापसाचीं वस्त्रें पुरवितील. मिसर-देशिय लोक जागे होण्याची आशा दिसत नाहीं. तेव्हां आफ्रिका व युरोप खंडांस कोणीं वस्त्रें पुरवावयाचीं हें, इंग्लिश, फ्रेंच, जर्मन व इटालिअन लोक आपसांत ठरवोत किंवा वाटेल तो घोटाळा घालोत. या तिन्ही खंडांशीं सध्यां आपणांस कांहीं एक करावयाचें नाहीं. एकाहून एक वरचढ, एकाहून एक समर्थ महासमर्थ, अशा ह्या लोकांच्या खटपटींत या देशांतील गरीब लोकांनीं पडण्यांत हित नाहीं. आशिया खंड विस्तृत आहे व यांतील लोकसंख्या पुष्कळ आहे. हिंदुस्थानचे लोक आतां पाश्चात्य विद्येनें जागे होऊं लागले आहेत; तेव्हां आशिया खंडास वस्त्रें पुरविण्याची उमेद त्यांनीं पुन्हां बाळगावी हें चांगलें आहे. अशा प्रकारें वस्त्रें पुरविणें हा त्यांचा हक्क आहे. हा हक्क प्राचीन वडिलोपार्जित आहे. हा हक्क अद्याप मुदतीबाहेर गेला नाहीं. परंतु सुस्तीनें मुदतीबाहेर जाण्याची भीति आहे. याबद्दल मुलें दोषी होणार नाहींत. कारण, आईबाप वेळेवर जागे न होतां मुदत घालवून बसूं लागले, तर

मुलांनीं काय करावें? याबद्दल प्रस्तुतचे आईबाप दोषी आहेत. . आपल्या वाडवडिलांनीं आपल्या कर्तबगारीनें हा हक्क संपादन केला; व तो अडीच तीन हजार वर्षेपर्यंत चालविला. आपण उद्योग न करितां स्वस्थ बसलों, तर आपल्या सुस्तीनें आपण हा हक्क घालविला असा आपणांवर दोष येईल. आपणांविषयीं जगाचें हसूं झालेंच आहे व वेळेवर आपण जागे होऊन स्वतः उद्योग केला नाहीं, तर आपली गणना पढत मूर्खांमध्यें होईल. हे विचार मनांत येऊन उद्योगास लागावें हें चांगलें असें मला वाटलें. उद्योगाचा सर्व भार पुरुषांवर टाकणें योग्य नाहीं. हा गाडा स्त्रिया व पुरुष या दोघांनीं मिळून लोटला पाहिजे. पुरुषांस पोटपाण्याची सोय पाहून व सार्वजनिक कामें करून सर्व भार उचलण्यास सवड होणार नाहीं. त्यांस बायकांनीं व मुलांनीं मदत केली पाहिजे. स्त्रियांचें मुख्य कर्तव्य गृहकृत्याची व्यवस्था पाहणें व गृहशिक्षण देणें हें होय. हें तर त्यांनीं केलेंच पाहिजे. त्यांचा हात नाजुक असतो व त्यांस सूत काढण्याची संवय असते; तेव्हां यंत्रादि साधनांची सिद्धता होईपर्यंत सूत काढण्याचें काम त्यांकडून चांगलें होईल; ह्मणून तें काम त्यांनीं करावें व पुढच्या कामाची व्यवस्था पुरुषांनीं पहावी. सध्यां साधारण कापूस येथें पिकत आहे. त्यांतील सरक्या यंत्रानें काढण्याची व त्याचें साधारण सूत यंत्रानें काढून त्याचीं ओबडधोबड वस्त्रें यंत्रानें तयार करण्याची व्यवस्था सध्यां चालू आहे. हीं वस्त्रें लक्षावधि लोक वापरीत आहेत. ही व्यवस्था सध्यां ठीक आहे. हींत तूर्त बिलकूल ढवळाढवळ करावयाची नाहीं. हल्लीं जो उद्योग करावयाचा, तो चांगला कापूस पिकवून त्याचें चांगलें सूत काढून त्याचीं चांगलीं वस्त्रें या देशांत तयार करविण्यापुरता आहे. ज्यांस या उद्योगाचें महत्त्व वाटत आहे व ज्यांस

आपणांवर जबाबदारी आहे हें समजत आहे, त्या स्त्रियांचे व पुरुषांचे हातीं हें काम कांहीं दिवस असलें पाहिजे; ह्मणजे या उद्योगांत यश येण्याचा जास्त संभव आहे. या उद्योगास फारसा पैसा नको, मेहनत पाहिजे; व ती शहाणपणाची मेहनत पाहिजे. जरी थोडाबहुत पैसा लागला, तरी, तो देण्यास स्त्रियांनीं तयार व्हावें हें शहाणपणाचें कृत्य आहे. लग्नकार्य, डागडागिने, धर्मादाय वगैरे बाबतींत वेडगळ समजुती, व प्रपंचांतील उधळेपणा, यांमुळें शेंकडों स्त्रिया आपल्या नवऱ्यांकडून फाजील खर्च करवीत आहेत व आपले हसूं करून घेत आहेत. जर त्या लग्नकार्यांत हौस कमी करतील, नटण्याचें सोडून देतील व काटकसरीनें खर्च करतील, तर त्यांस पैशाची मदत करितां येईल. हें करणें त्यांस अशक्य आहे असें नाहीं. कार्थेज व रोम यांमध्यें पुष्कळ वर्षांपूर्वीं लढाई झाली. त्या वेळेस कार्थेज येथील स्त्रिया धनुष्याचे दोरीकरितां आपले केस देण्यास तयार होऊन त्यांनीं स्वदेशाचे रक्षणास सहाय्य केलें. फ्रेंच व जर्मन यांमध्यें नुकतीच लढाई झाली; त्या वेळेस जबर खंडणीची रक्कम देण्यासाठीं फ्रेंच स्त्रिया आपले अलंकार देण्यास तयार झाल्या असें कोठें वाचल्याचें मला स्मरतें. आमच्या स्त्रियांनीं कधींच पुढें येऊं नये का ? त्यांनीं आपली हौस अझून कमी करूं नये का ? शहाणपणानें खर्च करून त्यांनीं पैशाची मदत करूं नये का ? जर त्या ही मदत करण्यास तयार झाल्या, तर त्यांचा लौकिक नाहीं काय ? मुलांस निरंतरचें अन्नवस्त्र मिळावें ह्मणून आपणांस ज्या प्रिय वस्तु त्यादेखील सोडून देण्यास त्या तयार झाल्या, अशी त्यांची कीर्ति होणार नाहीं काय ? त्यांनीं मुलांस हा कित्ता घालून देऊं नये, तर दुसरा कोणता द्यावा ? सांप्रतचा काल शांततेचा आहे; राज्यकर्ते सुधारलेले आहेत; व

लोकही हळू हळू जागृत होऊं लागले आहेत. अशा वेळीं स्त्रियांनीं उत्साह दाखविला व मदत केली, तर हित होणार आहे. देशांत कारखाने वाढून धनसंचय होणें हें ज्याप्रमाणें लोकांस इष्ट आहे, त्याप्रमाणें तें सरकारासही इष्ट आहे. तेव्हां यास सरकाराकडून हरकत येईल हें मानणें बरोबर दिसत नाहीं. कारण, तसें असतें, तर मुंबई वगैरे ठिकाणच्या गिरण्या केव्हांच उधळून गेल्या असत्या. मतलबी या शब्दाचा जो वाईट अर्थ आहे, त्या अर्थानें सरकार मतलबी नाहीं. जे मतलबी आहेत ते मुख्यत्वें परदेशस्थ व्यापारी होत. त्यांची काय ती मुख्यत्वें आपणाविरुद्ध खटपट होणार, त्यांपासून काय तो अडथळा येणार व त्यांपासून काय ती भीति उत्पन्न होणार. कोणताही उद्योग, कोणताही प्रयत्न अथवा कोणतेंही काम करावयास लागलें असतां, त्यावद्दल कुचेष्टा करणारे व हरकती आणणारे असावयाचेच. प्रथम तिरस्कारबुद्धि, नंतर गैरसमज, नंतर तडजोड ह्या गोष्टी मोठ्या कृत्याचे संबंधानें घडून येतातच, असें यूल साहेबांनीं नुकतेंच बोलून दाखविलें, त्याप्रमाणें हा सर्व प्रकार होईल हें खरें आहे; परंतु त्याकडे लक्ष द्यावयाचें नाहीं. प्रतीतीचा काल जाईपर्यंत सरकार उदासीन राहील, हें उघडच आहे. कारण, प्रतीति करण्यांत सरकारानें पैसे घालणें हें शहाणपणाचें आहे किंवा कसें, याबद्दल मतभेद आहे. हे सर्व विचार मनांत येऊन व राष्ट्रांतील स्त्रीपुरुषांमध्यें व विशेषेंकरून स्त्रियांमध्यें जागृति उत्पन्न झाल्याशिवाय राष्ट्राची उन्नति होणार नाहीं, हें वाटून या उद्योगास आरंभ करावा असें मला वाटलें. या यत्नांत यश आलें तर उत्तम, नाहीं तर स्वकर्म करण्यास चुकणें शहाणपणाचें काम नाहीं, हें मला वाटलें. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून मी आपल्या मुलीस शिक्षण देण्याचा क्रम आरंभिला;

परंतु थोडेच दिवसांत पटकीचा उपद्रव होऊन मुलगी निवर्तली. ह्या दुःखाचा थोडा विसर पडल्यावर मुलास शिक्षण देण्याचें काम आरंभिलें. त्यास साधारण हत्यारांची व यंत्रांची बरीच माहिती झाली होती. परंतु इंग्लंडांत काय आहे व अमेरिकेंत काय आहे, हें पाहण्याचें घरच्यांचे मनांत आलें. मी मुलास घेऊन जावयास निघालें; परंतु वाटेंत तुफान होऊन मजवर हा प्रसंग गुदरला.

आनंदीबाईवर जो प्रसंग गुदरला होता, त्याची तीस आठवण होतांच आपल्या पतीची व पुत्राची काय स्थिति असेल, हें मनांत येऊन तिच्या पोटांत कालवून आलें; तीस पुढें कांहींच बोलवेना; सर्व मंडळी स्तब्ध बसली; रमाबाई व तिच्या मुली चकित झाल्या; व काशी व माई यशोदाबाईच्या तोंडाकडे पाहूं लागल्या. आनंदीबाईचे डोळे पाण्यानें भरून आलेले पाहून बाळ्या रडूं लागला. कांहीं वेळ कोणीं कांहींच बोललें नाहीं. आनंदीबाई शुद्धीवर आली. तिची नजर बाळ्याकडे गेली. तो रडतांना पाहून तिनें आपलें दुःख आवरून धरिलें व ती शांतपणें हाणाली, मजवर प्रसंग गुदरल्यावर मी यशोदाबाईचे घरीं आलें. त्यांनीं माझा चांगला समाचार घेतला. त्या, वेळेस माझ्या उपयोगीं पडल्याबद्दल मी त्यांची ऋणी आहें. याप्रमाणें मी यशोदाबाईचे घरीं आल्यावर पुढें काय करावें, हा मला विचार पडला. जनापवादाला भिऊन कोठें तरी तोंड लपवून बसावें व व्यर्थ कालक्षेप करावा, किंवा दुःख आवरून धरून आपणास जें उचित दिसतें तें करावें, असा विचार उत्पन्न झाला. शेवटीं, लोकापवादास भिऊन व्यर्थ दिवस घालविण्यापेक्षां आपलें स्वकर्म करणें हें श्रेयस्कर आहे, असें वाटून त्याप्रमाणें ह्या मुलांचे शिक्षणाचें काम मीं हातीं घेतलें व माझ्या मनांत जे विचार घोळत

होते त्याप्रमाणें शिक्षण देण्यास सुरुवात केली. यशोदाबाईची मला अनुकूलता असल्यामुळें व मुलांचे आंगीं ग्राहकशक्ति असल्यामुळें माझे प्रयत्नास थोडें यश येत चाललें आहे. बरें, हें असो. याच विषयावर आपण बराच वेळ बोलत आहों. आतां दुसऱ्या गोष्टी पाहूं. असें ह्मणून आनंदीबाई घरांत गेली. तेथें पुरुषांकरितां व बायकांकरितां केलेल्या निरनिराळ्या न्हाण्या व मोऱ्या, आंग, तोंड व पाय पुसण्यासाठीं खुंट्यांवरून ठेवलेले निरनिराळे रुमाल, व स्नान झाल्यावर आंग गुंडाळून घेण्यासाठीं केलेले धाबळीचे गरम कपडे, पिण्याचें पाणी ठेवण्याची जागा व भांडीं व तें गाळण्याचे रुमाल, भाजीपाला वाढण्यासाठीं केलेले चमचे, उन्हाळ्याकरितां दुपारीं बसावयाची जागा, धान्य वगैरे ठेवण्यासाठीं केलेले डबे, उजेड पडण्यासाठीं सोई वगैरे गोष्टी दाखवून ती पुढें जावयास लागली; तेव्हां रमाबाई ह्मणाली, तुमच्या घरीं मला रुमालच फार दिसतात. ही एकंदर व्यवस्था करण्याचा तुमचा हेतु काय, हें मला बरोबर समजलें नाहीं. हें ऐकून आनंदीबाई ह्मणाली, यांत विशेष कांहीं नाहीं. मर्यादा राखण्यासाठीं निरनिराळ्या न्हाण्या व मोऱ्या केल्या आहेत. स्त्रियांस पुरुषांच्या न्हाणीकडे अथवा मोरीकडे जाण्याचें कारण पडूं नये व पुरुषांस स्त्रियांचे न्हाणीकडे अथवा मोरीकडे जाण्याचें कारण पडूं नये, ह्मणून अशी व्यवस्था केली आहे. अशी व्यवस्था नसली ह्मणजे उभयतांस संकोच उत्पन्न होतो. मर्यादा रक्षण करण्यासाठीं सोय करणें, ही महत्वाची गोष्ट आहे. हिजविषयीं यत्किंचित्‌ही दुर्लक्ष करणें योग्य नाहीं, असें मला वाटतें. स्वच्छता ठेवण्याचे संबंधानें पुष्कळ स्त्रियांचा व यामुळें मुलांचा अलगरजीपणा दिसून येतो. मुलें वाटेल त्या कपड्यानें आंग अथवा तोंड पुसतात; कांहीं पदार्थ खाल्ला असतां तोंडावरून हात

फिरवून तोच हात आंगाला, किंवा जें वस्त्र सांपडेल त्याला पुसतात; नाक शिंकरून शेंबूड कोपऱ्यांत अथवा भिंतीवर टाकितात; व हात आंगाला अथवा नेसावयाच्या वस्त्राला अथवा खांबाला पुसतात. ह्या घाणेरड्या संवयी आहेत. ह्यांपासून दुसऱ्यांस किळस येते, ह्मणून मीं मुलांस अशी ताकीद दिली आहे कीं, स्नान केल्यावर आंगपुसण्याचे रुमालानें आंग पुसावें; कांहीं पदार्थ खाल्ला असतां हात धुवून तोंड पुसावयाचे रुमालानें तोंड व हात पुसावेत; एरवीं तोंड, नाक अथवा घाम पुसण्याचें कारण पडलें असतां जवळ असलेल्या रुमालानें पुसावें. यामुळें अलीकडे त्यांस स्वच्छतेचें पुष्कळ वळण लागलें आहे.

स्नान करण्याचा हेतु पुष्कळांस बरोबर माहीत नाहीं. स्नान केल्यानें आंग स्वच्छ होतें हें खरें आहे; परंतु त्यामुळें रक्त वाहिन्यांचा व्यापार जलद चालून शरीरांत उष्णता उत्पन्न होते, व हुशारी वाटते. जें पाणी रंध्रांच्या वाटें शरीरांत जातें त्याचा, व उष्णतेचा संयोग होऊन घाम उत्पन्न होतो. हा घाम जिरणें चांगलें नाहीं, ह्मणून स्नान केल्याबरोबर आंग गरम कपड्यानें गुंडाळणें चांगलें. असें केल्यानें घाम चांगला येऊन शिरा मोकळ्या होतात; शरीर हल्कें होतें; व स्नान बाधत नाहीं. क्रिया व प्रतिक्रिया या व्यापारानें पूर्वस्थिति प्राप्त होते, हें सर्वांस माहीत आहे. स्नान करून घाम काढून टाकला असतां क्रिया व प्रतिक्रिया ह्या दोन्ही क्रिया होऊन शरीरास सुख होतें. हें समजून धावळीचीं वस्त्रें ठेविलीं आहेत. हीं सोंवळ्याओंवळ्याचेही उपयोगीं पडतात.

स्नान करण्याचा आणखी दुसरा हेतु आहे तो, व स्नान केल्यावर पुढें काय केलें पाहिजे हें, पुष्कळांस माहीत नाहीं. आपल्या शरीराच्या त्वचेला हजारों रंध्रें आहेत. तीं इतकीं लहान

आहेत कीं, एका रुपयाला जेवढी जागा लागते, तेवढ्या जागेंत सुमारें २००० रंध्रें असतात. या रंध्रांच्या द्वारें शरीरांतील घाण बाहेर पडते. प्रत्येक दिवशीं सुमारें अर्धा तोळा विषकारक घाण बाहेर पडते. रंध्रें फारच लहान असल्यामुळें थोड्याशा बाहेरील घाणीनें तीं बुजतात व शरीरांतील घाणेरडा अंश बाहेर पडण्यास मार्ग सांपडत नाहीं. यामुळें केव्हां केव्हां खरूज होते, घाणेरडा अंश कपड्याला लागतो व त्रास होतो. यासाठीं हीं रंध्रें स्वच्छ व उघडीं ठेविलीं पाहिजेत. दोन तांब्ये पाणी डोक्यावरून घेऊन हें कार्य होत नाहीं. वाईट पाण्यानें स्नान करून कार्य होत नाहीं इतकेंच नाहीं, तर त्यापासून नारू हा रोग होण्याची भीति असते. स्नान केल्यावर स्वच्छ रुमालानें आंग पुसणें व गरम कपड्यानें गुंडाळणें अवश्य आहे. गरम कपड्यानें आंग न गुंडाळितां तें उघडें ठेविलें असतां थंड वाऱ्यामुळें ताप येण्याची भीति असते.

पिण्याचे पाण्याविषयीं जितकी काळजी घ्यावी तितकी आपणांपैकीं पुष्कळ घेत नाहींत; यामुळें विकार उत्पन्न होतो. कमिटीनें पाणी आणून पुरवावें, ह्मणून कित्येक ठिकाणीं हजारों रुपये खर्च होतात; तें गाळण्याबद्दल शेंकडों रुपये खर्च होतात; परंतु त्याची पुढें चांगली व्यवस्था ठेवण्याविषयीं थोडकी तसदी घेण्यास लोक आळस करितात, हें आश्चर्य आहे. जेथून शहरांत पाणी आणावयाचें तेथून तें शहरांत येईपर्यंत ज्याप्रमाणें स्वच्छतेच्या संबंधानें व्यवस्था ठेवणें जरूर आहे, त्याप्रमाणें शहरांत तें आणल्यानंतर त्याविषयीं काळजी घेतली पाहिजे. ही काळजी तोंडांत पाणी जाईपर्यंत पाहिजे. कारण, नोकरचाकर अथवा बायका भांड्याचे संबंधानें अलगरजीपणा करितात. रस्त्यांतील जी माती वाऱ्यानें कौलांवर जाऊन घरांत

येते तिजमुळें, किंवा माळवदी घरें असल्यास जी माती पडते तिजमुळें, अथवा घरांतील केर, आगीची धग, धूर, कोंजट जागेंतील घाण, मोऱ्यांची घाण, घाणेरडीं भांडीं वगैरे गोष्टींमुळें, पाणी खराब होऊन विकार उत्पन्न होण्याचा संभव असतो; ह्मणून शहरांत स्वच्छ पाणी आणिलें ह्मणजे आपलें कर्तव्य संपलें असें न समजतां, तें स्वच्छ भांड्यानें आणून, स्वच्छ ठिकाणीं स्वच्छ भांड्यांत व्यवस्थेनें ठेवून तें चांगल्या वस्त्रानें गाळून प्यालें ह्मणजे आपलें कर्तव्य संपलें असें समजावें. नुसतें स्वच्छ पाणी शहरांत आणून उपयोगीं नाहीं. कमेटीनें पाण्याची चांगली व्यवस्था ठेविली नाहीं, तर ती दोपास पात्र आहे; परंतु त्याबद्दल तिच्यावर डोळे वटारावेत व चांगलें पाणी आणिलें असतां आपण स्वतः कांहींच व्यवस्था करूं नये, हा शहाणपणा आहे काय ? स्वच्छता एकपक्षीं असून उपयोग नाहीं. लोकांनीं घरांत व कमेटीनें बाहेर, अशी उभयपक्षीं तजवीज असली पाहिजे. पाण्याचे बाबतींत फारच काळजी घेतली पाहिजे. आपलें शरीर पाणीमय आहे असें ह्मटलें असतां चालेल. एकाद्या मनुष्याचें वजन १५० पाउंड भरलें, तर त्यांत ११० पाउंड पाण्याचा अंश आहे असें समजावें. आपण जें पाणी पितों, तें रक्तांत प्रवेश करितें व रुधिराभिसरण क्रिया चांगली चालते; ह्मणजे शरीराचे सर्व भागास रक्त मिळतें. जर आपण पाणी न प्यालों, तर रुधिराभिसरण चांगलें चालणार नाहीं; व घाणेरडें पाणी प्यालों तर अपाय होईल. कारण शरीरांतील रक्तवाहिन्यांपैकीं बहुतेक, केसापेक्षांही सूक्ष्म असल्यामुळें त्यांतून घट्ट रक्त प्रसरण पावणार नाहीं.

पाण्याचे संबंधानें जी गोष्ट सांगितली तीच धान्याचे अथवा

खाण्याचे दुसरे पदार्थांचे संबंधानें आहे. शेतकरी चांगलें धान्य तयार करण्याविषयीं विशेष काळजी घेत नाहींत, व दाणेवाले तें चांगलें ठेवण्याची व्यवस्था ठेवीत नाहींत. धान्यांत माती खडा फार असतो, ह्मणून घरीं धान्य आणल्यावर पुढें त्याची चांगली व्यवस्था ठेवणें विशेष जरूर आहे. त्यास एकदां पोत्यांत टाकून देऊन स्वस्थ बसणें बरोबर नाहीं. उंदीर पोतीं तोडून धान्याचा खराबा करितात. शिवाय केरकचऱ्यामुळें अथवा कोंजट ठिकाणीं ठेवल्यानें तें खराब होतें. नुसते मावळांतील उत्तम आंबेमोहोर अथवा मुंजावद येथील कमोदी तांदूळ, बक्षी गहूं, बऱ्हाणपुरी तुरीची डाळ अथवा गंगथडीकडील ज्वारी उत्तम परीक्षेनें आणवून ठेवण्यापासून तादृश उपयोग नाहीं. हें धान्य व्यवस्थेनें ठेवण्याचे संबंधानें व निसण्याचे संबंधानें तितकीच काळजी घेतली नाहीं, तर विशेष उपयोग होत नाहीं. नुसता खाण्यांत नेमस्तपणा ठेवून उपयोगीं नाहीं. सर्व गोष्टींची व्यवस्था नीट ठेविली पाहिजे. ज्याप्रमाणें पाणी गाळून नंतर तें पीत जावें त्याप्रमाणें धान्य निसून चांगल्या डब्यांत ठेवून त्याचा उपयोग करीत जावा. ह्या दोन्ही गोष्टी सोप्या असून खर्चाच्या नाहींत.

आपला हा देश कांहीं स्वाभाविक कारणांनीं उष्ण आहे. उन्हाळ्यांत पुष्कळ ठिकाणीं पारा शंभर अंशांपेक्षां जास्ती अंशावर असतो. उष्णतेमुळें मोठ्या मनुष्याचे आंगांत निःशक्तता उत्पन्न होते व मुलांस तर फार त्रास उत्पन्न होतो. महाबळेश्वर अथवा उत्तेकमंड यासारख्या थंड ठिकाणीं हवा पालटण्यासाठीं जाण्यास सर्वांस सोय नसते. उष्णतेमुळें काम कमी होतें, झोंप कमी येते, व पाणी अधिक जातें. हा व अशाच प्रकारचा दुसरा त्रास होऊन मनाला स्वस्थता नसते. यासाठीं ज्यांस ऐपत आहे त्यांनीं

घरांत दुपारीं बसण्याकरितां थंड जागा व रात्रीं घरास लागून उंच ठिकाणीं पश्चिमाभिमुख गच्ची अथवा माळवद ही सोय करणें चांगलें आहे. असें समजून ह्या घरांत ह्या सोयी केल्या आहेत. या सर्व गोष्टी दिसण्याला क्षुल्लक दिसतात; परंतु एवढ्याच कारणावरून त्यांकडे दुर्लक्ष करणें योग्य नाहीं. अन्न, पाणी वगैरे गोष्टींविषयीं आपण काळजी न घेतां चालढकल केली, तर त्यांपासून जितका उपयोग व्हावा तितका होत नाहीं. ज्या मानानें आपण दुसऱ्याची काळजी घेतों त्या मानानें दुसरा आपली काळजी घेतो, असा साधारण नियम आहे. हा नियम फक्त मनुष्यमात्रास लागू आहे असें नाहीं. गाई, बैल, वगैरे जनावरें यांजविषयीं अथवा खाण्यापिण्याचे पदार्थांविषयीं काळजी घेतली, तर तीं आपल्या उपयोगीं पडतात. त्यांची हेळसांड केली, तर तीं आपली हेळसांड करितात. दुसऱ्यांनीं आपणाकरितां खटपट करावी व आपल्या उपयोगीं पडावें व आपण ऐदोबासारखें स्वस्थ बसावें हें चांगलें नाहीं. ही गोष्ट मुलांच्या मनांत चांगली बिंबली पाहिजे. असो. आपण आतां वर जाऊं.

माडीवर सर्वजण गेल्यावर आनंदीबाईनें प्रथम यशोदाबाईची खोली दाखविली. तींतील तरतऱ्हेच्या हौसेच्या जिनसांचें प्रदर्शन पाहून रमाबाईच्या मुलींस बरें वाटलें. त्या यशोदाबाईस ह्मणाल्या, असलें सामान तुह्मास कसें आवडलें ? तेव्हां यशोदाबाई ह्मणाली, या सर्व जिनसा माझ्या पूर्व आश्रमांतील आहेत. यांविषयीं मला आतां हौस वाटत नाहीं. या विकणें चांगलें नाहीं. आतां नवीन घ्यावयाच्या नाहींत, असा मीं निश्चय केला आहे. हें ऐकून आनंदीबाई ह्मणाली, मोहक वस्तु डोळ्यांपुढें असून जर त्यांचा उपभोग घेण्याची इच्छा झाली नाहीं, तर विशेष मोठेपणा आहे; त्यांपासून दूर राहणें यांत विशेष यो-

ग्यता नाहीं. जगांतील मोहक वस्तूंपासून अलग राहण्यासाठीं वनांत अथवा एकांतवासांत राहणें यांत मोठा पुरुषार्थ, किंवा मोहक वस्तु आसपास असून त्यांच्या पाशांत न सांपडणें, हा विशेष पुरुषार्थ ? या खोलींत सर्वच जिनसा चैनीच्या आहेत असें नाहीं. हींत तुह्मांस कित्येक उपयुक्तही दृष्टीस पडतील. ही पहा तिजोरीची पेटी. हिचा उपयोग थोडा आहे का ? ज्यांजवळ दोन पैशाचा अर्थ आहे त्यांनीं अशा प्रकारची पेटी घेणें फार अवश्य आहे. पैसा सांभाळण्यासाठीं जी गोष्ट जरूर, ती करणें शहाणपणा आहे. घरावर दरोडाच पडून हाणमार झाली, किंवा घरांतील मंडळीपैकीं एकाद्यानें ही फोडली, तर हिचा उपयोग नाहीं. परंतु मारहाण करून दरोडे क्वचित् पडतात. नुसत्या चोऱ्या फार होतात.

यशोदाबाईची खोली पाहिल्यावर रमाबाई व तिच्या मुली ह्यांनीं काशी व माई यांच्या खोल्या पाहिल्या. त्यांत शिवण व लोंकरीचे कामाचे नमुने, सूत काढण्याचें लहानसें यंत्र, गुंड्या करण्याचें यंत्र, पुस्तकाचें लहानसें कपाट, चित्रें व तसविरा वगैरे जिनसा काशी व माई यांनीं दाखविल्या. त्यांनीं कापूस घेऊन यंत्रानें सूत काढवून दाखविलें व सुताच्या गुंड्या करून दाखविल्या. तें पाहून रमाबाईची थोरली मुलगी द्वारका ह्मणाली आमच्या शाळेंत असें कांहींच शिकवीत नाहींत. आमच्या शाळेंत तुह्मी याल, तर तुह्मांस कांहीं एक त्रास होणार नाहीं. यावर काशी ह्मणाली आमचें शिकणें चांगलें चाललें आहे. मुंबईस येण्याची आमची इच्छा नाहीं.

मेजावर भाषांतराची वही पडली होती. ती पाहून द्वारका काशीस ह्मणाली, तुह्मी अद्याप भाषांतराचे धडे लिहितां ? मला तर लिहिण्याचा मोठा कंटाळा आहे. मीं आतां शाळा सोडिली

आहे, ह्मणून भाषांतर करण्याचा, पत्रें लिहिण्याचा अथवा निबंध रचण्याचा त्रास चुकला. शाळा सुटल्यापासून आह्मी मोकळ्या आहों. वाटेल तर कांहीं करमणुकीकरितां वाचीत बसतों. आह्मी डोक्याला मुळींच त्रास देत नाहीं. तुह्मांस घरीं शिक्षक असल्यामुळें सुट्टी ह्मणून माहीत नाहीं. तुह्मी नेहमीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत जुंपलेलां असतां. नेहमीं काम करीत बसावें यांत काय मौज आहे? जर तुह्मी आमच्या मुंबईस याल, तर तुह्मांस विशेष आनंद होईल.

स्वस्थ बसून कालक्षेप करण्यांत मोठें भूषण आहे, असें काशीस व माईस वाटत नसे. पुष्कळ स्त्रिया व पुरुष थोडें काम झाल्यावर दमून गेल्याचें उगीच सोंग करून गप्पा मारण्यांत अथवा निरर्थक कांहीं वाचीत बसण्यांत वेळ घालवितात, हें आनंदीबाईस माहीत होतें; ह्मणून ती, काशी व माई यांस उगीच वायफळ गप्पा मारूं देत नसे. निरनिराळे उद्योग करण्याची संवय नसल्यामुळें शेंकडों मुली व हजारों मुलें ह्यांच्या मागची शाळा सुटल्यावर शाळेस निरोप व अभ्यासास निरोप ह्याची एकच गांठ पडते; आणि स्वतःची पुढें जी सुधारणा करावयाची तीसही निरोप मिळतो; यामुळें परिणामीं त्यांचें व देशाचें फार नुकसान होत आहे, हें आनंदीबाईस माहीत होतें. अभ्यास कधींहीं संपावयाचा नाहीं; स्वतःची सुधारणा करणें ह्या गोष्टीचा शाळेशीं व पदव्यांशीं संबंध नाहीं; आपणास रोज कांहींना कांहीं शिकावयाचें आहे; जों पावतों जीवांत जीव आहे, तों पावतों आपण विद्यार्थी आहों; पदव्यांत अथवा किताबांत विशेष मान नाहीं, विशेष भूषण नाहीं किंवा विशेष पुरुषार्थ नाहीं. यांपासून मान, भूषण अथवा पुरुषार्थ ज्यांस वाटत असेल त्यांस वाटो. वस्तुतः पाहतां आपण जन्मभर विद्यार्थी होतों, असें

ह्मणवून घेण्यांत खरा मान, खरें भूषण, खरा पुरुषार्थ व खरी कृतकृत्यता आहे. शाळा सुटली ह्मणजे अभ्यास संपला, अथवा पदवी मिळाली ह्मणजे प्रतिष्ठा झाली, अथवा किताब प्राप्त झाला ह्मणजे पुरुषार्थ झाला, अथवा अधिकार मिळाला ह्मणजे कृतकृत्यता झाली, अथवा पैसे मिळविले ह्मणजे मोक्ष साधन झालें व इतक्या सर्व गोष्टी मिळाल्या ह्मणजे आपल्या जन्माची सार्थकता झाली, हें मानणें चुकीचें आहे, इतकेंच नाहीं, तर, या समजामुळें लोक आपल्या मुलांस भलतेंच वळण देत आहेत, हें समजून अभ्यास कधींही संपावयाचा नाहीं, ही गोष्ट आनंदीबाईनें मुलांचे मनांत ठसविली होती. ह्मणून काशीनें उत्तर केलें कीं, आमचा अभ्यास संपावा अशी आमची इच्छा नाहीं; व आह्मी स्वस्थ बसून वेळ घालवावा, हें आह्मांस बरें वाटत नाहीं. हें ऐकून द्वारका ह्मणाली, तूं भिऊं नकोस, मी कांहीं आनंदीबाईपाशीं सांगणार नाहीं.

आंत एक व बाहेर एक, हा प्रकार काशीस माहीत नव्हता; ह्मणून तिला द्वारकाच्या या असभ्य भाषणाचा राग आला. काशीस वाईट वाटलें, हें पाहून द्वारका ह्मणाली आह्मी ज्यावेळेस एकट्या असतों, त्या वेळेस आमच्या तोंडास येईल तें आह्मी बोलतों. चार मंडळींत असलों ह्मणजे मात्र, काय बोलावें व काय न बोलावें याचा विचार करितों.

हें संभाषण चाललें असतां अहल्याबाई व सावित्री ह्यांचे चरित्रांचीं पुस्तकें आनंदीबाई रमाबाईस दाखवीत होती. परंतु रमाबाईस त्यांत विशेष गोडी लागली नाहीं. तिचें लक्ष एका तसबिरीकडे गेलें. त्या तसबिरींत, चित्र वगैरे कांहीं नसून सुंदर अक्षरांनीं खालीं लिहिलेला श्लोक होता.

न कामये भर्तृविनाकृता सुखं ॥
न कामये भर्तृविनाकृता दिवम् ॥
न कामये भर्तृविनाकृतं श्रियम् ॥
न भर्तृहीना व्यवसामि जीवितुम् ॥

हा श्लोक सुंदर अक्षरांनीं लिहून तो तसबिरींत ठेवण्याचा हेतु काय, हें रमाबाईस न समजून ती आनंदीबाईस ह्मणाली, ही असली कसली तसबीर ? हींत चित्र वगैरे कांहीं नाहीं. हिची शोभा कांहींच दिसत नाहीं. ही दुसरी तसबीर अहल्याबाईची आहेसें वाटतें. परंतु हींत तरी विशेष कांहीं दिसत नाहीं. ही हुबेहूब अहल्याबाईची असेलसें वाटत नाहीं. रमाबाईचें हें भाषण संपत आहे, तोंच तिच्या मुली त्या तसबिरीपाशीं आल्या. त्यांची समजूत त्यांच्या आईप्रमाणें होती; ह्मणून त्यांसही त्या चमत्कारिक दिसल्या. हें पाहून आनंदीबाई ह्मणाली, तुह्मांस यांत विलक्षण काय दिसतें, हें मला समजत नाहीं. तसबिरी केवळ शोभेसाठीं ठेवावयाच्या, ही समजूत चुकीची आहे; व त्यांत चित्रेंच असलीं, तर त्या चांगल्या, हें ह्मणणें चमत्कारिक आहे. स्त्रियांस व मुलांस सत्संगतीची फार आवश्यकता आहे. थोर पुरुषांचा व स्त्रियांचा सहवास घडणें फारच इष्ट आहे. परंतु हें सर्वांस नेहमीं शक्य नसतें. जे थोर पुरुष होऊन गेले त्यांचे कृतीची आठवण होऊन तिचें अनुकरण करण्यास कांहीं साधन असावें, ह्मणून तसबिरी संग्रहीं ठेवावयाच्या; मौजेसाठीं ठेवावयाच्या नाहींत. दुसरें असें कीं, थोर पुरुषांच्या तसबिरीपेक्षां त्यांच्या वचनांचें माहात्म्य फार आहे. कारण, कित्येक दिवसांच्या अनुभवावरून जी गोष्ट त्यांना कळून आली असते, ती त्यांचे वचनावरून समजून येते. अहल्याबाईची तसबीर ठेवण्याचा हेतु तुह्मास बहुतकरून समजला असेल.

अहल्याबाईसारख्या साध्वी स्त्रिया फारच थोड्या होऊन गेल्या. तिनें राज्य चांगल्या रीतीनें केलें याची मी विशेष मातबरी मानीत नाहीं; ती शहाणी व धूर्त होती याचें मी विशेष कौतुक करीत नाहीं. स्त्रियांच्या आंगीं विनय असणें हा मोठा गुण आहे. हा गुण तिचे आंगीं होता ह्मणून मी तिची प्रशंसा करितें. हा गुण स्त्रियांचे आंगीं नसेल, तर त्यांमध्यें मोठा दोष आहे असें समजावें. स्त्रियांच्या आंगीं पुष्कळगुण असून त्यांमध्यें विनय हा गुण नसेल, तर त्यांच्या इतर गुणांची विशेष योग्यता मी समजत नाहीं. त्यांची खरी योग्यता पुष्कळ अंशीं विनयावरून समजावी. अहिल्याबाईस ऐश्वर्य फार असतां व चोहोंकडे मोहजाल पसरलें असतां, तिचे हातून मर्यादेचें कधींही अतिक्रमण झालें नाहीं. शेवटपर्यंत विनय हा गुण उत्तम रीतीनें तिच्यामध्यें वास करीत होता, ह्मणून तिची योग्यता फार. हाच कित्ता आमच्या मुलींनीं आपल्या डोळ्यांपुढें ठेवावा; हेंच अनुकरण त्यांनीं करावें; व असें करण्यांतच त्यांचें व पुरुषांचें हित आहे. कारण, हा गुण स्त्रियांचे आंगीं असल्यानें त्यांस मोहकत्व तर असतेंच; परंतु त्यामुळें पुरुषांसही वचक असतो. वाष्कळपणा, फाजील आंगविक्षेप वगैरे दोषांमुळें स्त्रियांचें वर्तन तिरस्कारास पात्र असतें व पुरुषांसही फाजीलपणा करण्यास सवड सांपडते; यामुळें कित्येक वेळां उभयतांचें वर्तन दोषास्पद होण्याची भीति असते. अलीकडील स्त्रियांचे आंगीं विनय कमी आहे असा त्यांच्यांवर दोषारोप आहे. हा खरा नसला, तथापि, दोषारोपास जागा न ठेवण्याविषयीं जपणें, हें स्त्रियांचें कर्तव्य होय. यावरून त्यांनीं कोठें जाऊं नये अथवा कोणाशीं बोलूं नये असें नाहीं. हें करणें जसें चांगलें नाहीं, तसें वाष्कळपणाचें वर्तनही चांगलें नाहीं. त्यांचें वर्तन मर्यादेचें असलें पाहिजे. सावित्रीचें चरित्र त्यांनीं नेहमीं डोळ्यांपुढें ठेवून जी गोष्ट भर्त्यास प्रिय ती आप-

गास प्रिय, व त्याचें जें सुख तें आपलें सुख, ही जी सावित्रीची इच्छा ती त्यांची इच्छा असली पाहिजे. पति व आपण या उभयतांचें केवळ प्रेम असून उपयोगीं नाहीं, तर उभयतांमध्यें मैत्रीही असली पाहिजे. या व अशाच प्रकारच्या गोष्टींचा 'उपदेश करण्यास सावित्रीचें चरित्र चांगलें आहे. सावित्रीसारख्या दुसऱ्या स्त्रिया होऊन गेल्या असतील; परंतु त्यांचीं चरित्रें उपलब्ध नाहींत, ही गोष्ट दुःखाची आहे. असें बोलून आनंदीबाई आपले खोलींत गेली. तेथें दोन कपाटें होतीं. एक पुस्तकांनीं व दुसरें औषधांनीं भरलेलें होतें. तीं तिनें रमाबाईस दाखविलीं, व ती ह्मणाली, येथें मौजेचें असें तुमच्या दृष्टीस पडणार नाहीं; परन्तु खरोखर येथें उत्तम भांडार आहे, असें मी समजतें. ज्या थोर पुरुषांनीं आपल्या रसाळ वाणीनें अथवा वचनांनीं अथवा कृतींनीं हजारों लोकांचा मानसिक अथवा शारीरिक रोग नाहींसा करून त्यांचे उन्नतीस सहाय्य केलें, त्यांपैकीं येथें पुष्कळ वास करीत आहेत. ते थोर पुरुष शरीरानें गेले आहेत; परंतु त्यांचें मन, त्यांची कृति, व त्यांचा अनुभव येथें आहे.

रमाबाईस ह्या गोष्टीची गोडी न वाटून ती औषधांच्या कपाटांत काय आहे तें पहावयास लागली. त्यांत तिला विशेष कांहींच दिसून आलें नाहीं; ह्मणून ती ह्मणाली, संग्रहीं ठेवण्यासारखीं यांत विशेष औषधें तीं काय आहेत? आह्मांस औषधें जवळ ठेवण्याचेंच कारण पडत नाहीं. आमच्या मुंबईत ठिकठिकाणीं दवाखाने व डाक्तर आहेत. वाटेल त्यावेळेस डाक्तर यास बोलावितां येतें; किंवा कारणपरत्वें दवाखान्यांत जातां येतें. तुमच्या पुण्यांतही रस्तोरस्तीं डाक्तर आहेत; तेव्हां हीं औषधें जवळ ठेवण्यांत काय मतलब आहे?

हें ऐकून आनंदीबाईस चमत्कार वाटला. ती ह्मणाली र-

माबाई, ठिकठिकाणीं दवाखाने असले, ह्मणजे आपण आपल्या येथें औषधि ठेवूं नयेत हें ह्मणणें बरोबर नाहीं. साधारण आजारांसाठीं वैद्य पाहण्याचे नादीं लागावें, हें मला चांगलें वाटत नाहीं. मनुष्यास आपआपल्या प्रकृतीचें मान थोडेंबहुत तरी समजणें, व साधारण आजार उत्पन्न झाला असतां ज्याचें त्यानें वैद्य बनणें, हें गैरशिस्त आहे असें मला वाटत नाहीं. साधारण गोष्टींसाठीं आपण दुसऱ्यावर कां अवलंबून रहावें, व जी गोष्ट आपणास करितां येण्यासारखी आहे तिजसाठीं दुसऱ्याचे तोंडाकडे कां पाहत बसावें, हें मला समजत नाहीं. जेथें निरुपाय आहे अथवा आपल्या उपायांनीं अपाय होण्याचा संभव आहे, तेथें गोष्ट निराळी आहे. परंतु उठल्याबसल्या वैद्यास बोलावण्याची संवय चांगली नाहीं. प्रत्येक आईनें अवश्य लागणारीं औषधें संग्रहीं ठेवून त्यांचा कसा व केव्हां उपयोग करावयाचा, हें समजून घेणें ज़रूर आहे. यास विशेष शहाणपणा लागत नाहीं किंवा यास विशेष पैसा लागत नाहीं. ज्याप्रमाणें स्त्रियांस आरोग्यशास्त्रांतील मूलतत्त्वांचें शिक्षण मिळालें पाहिजे, त्याप्रमाणें साधारण आजारांविषयीं माहिती व त्यांवर जे उपाय करावयाचे त्यांचें ज्ञान, हीं त्यांस असलीं पाहिजेत. ज्याप्रमाणें दोन पैशांचा संग्रह असला ह्मणजे मनुष्यास दम असतो, त्याप्रमाणें जवळ औषधिसंग्रह असून त्यांची योजना करण्याचें ज्ञान असलें ह्मणजे दम असतो, गोरगरिबांच्या उपयोगीं पडण्यास साधन असतें, व थोडक्या गोष्टींसाठीं त्रेधा उडून धांवपळ होण्याचे प्रसंग कमी येतात. थोडेच दिवसांपूर्वी यशोबाईचें पोट दुखत होतें. त्याचें कारण त्यांचे लक्षांत येऊन त्याप्रमाणें त्यांनीं उपाय केला असता, तर त्यांस दुःख सोसावें लागलें नसतें; व खडकवासल्याचे पाण्याचे एका बाटलीबद्दल ५ रुपये द्यावे लागले नसते. य-

शोदाबाईचें मी तुह्मास उदाहरण सांगितलें. असा प्रकार पुष्कळ ठिकाणीं पाहण्यांत येतो. साधारण उपाय असून तो माहीत नसल्यामुळें त्रास होतो. हा त्रास स्त्रियांस व त्यांतून विशेषेंकरून सासूरवाशिणींस फार होतो. त्या दुखणें चोरून ठेवितात. दहा दहा रेच झाले तरी त्या सांगत नाहींत. शेवटीं, जेव्हां त्या गळून जातात तेव्हां बोलतात. दहा पांच रेच झाल्याचें वर्तमान ऐकून घरांतील मंडळीची एकच धांदल होते व रेच पटकीच्या दिवसांत होऊं लागले असतां जी धांदल उडते ती विचारावयास नको. या सर्व गोष्टी लक्षांत आणून मुलींना या सर्व गोष्टींची माहिती व्हावी या हेतूनें व किरकोळ आजार घरांतील मंडळीस झाला असतां त्यावर देण्यासाठीं हा संग्रह केला आहे.

इतकें बोलून आनंदीबाई व दुसरी मंडळी बाळ्याचे खोलींत गेली. जातांक्षणीं रमाबाईची नजर दारावरील तारांच्या जाळीकडे गेली. ती पाहून ती ह्मणाली आमच्या मुंबईत तर खिडक्यांवर रंगीबेरंगी कांचेचीं तावदानें असतात. तीं दिसण्याला सुशोभित दिसतात. तारांची जाळी करण्यांतही तुमचा हेतु आहे काय ?

आनंदीबाईनें उत्तर केलें, होय. तारांच्या असल्या जाळ्या केल्यानें एक उपयोग असतो. थंडीवाऱ्यामुळें आपणांस खिडक्या बंद करण्याचें कारण पडतें व यामुळें आंतील हवा कोंडून जाते. आपण जो उच्छ्वास टाकतों त्याची हवा वाईट असते. ती उष्ण व हलकी असते. ह्मणून ती स्वाभाविक रीतीनें वर जाते; परंतु तीस बाहेर जाण्यास मार्ग नसल्यास ती आंतल्या आंत खेळते व यामुळें आपणांस दूषित हवेचें ग्रहण करावें लागतें. दूषित हवेचें ग्रहण करण्याचें कारण जितकें न पडेल

तितकें चांगलें, ह्मणून ही तारांच्या जाळ्यांची सोय केली आहे. ही सोय मुख्यत्वें निजावयाचे खोलींत तर अवश्य असली पाहिजे. कारण, निजावयाचे खोलीचीं दारें बराच वेळ बंद असतात. ह्या खोल्यांतून हीचशी काय, परंतु उजेडाच्या व खुली हवा येण्याच्या संबंधानेंही सोई केल्या आहेत. त्या, हल्लीं जीं मतें बहुतकरून पसंत आहेत, त्यांस अनुसरून आहेत. उजेडाचे बाबतींत व हवा खुली ठेवण्याचे बाबतींत कांहीं लोकांचें अज्ञान दिसून येतें. ज्या ठिकाणीं आपण काम करावयास बसतों, त्या ठिकाणीं झळ लागण्याची भीति असूं नये; तेथें सावली असूं नये किंवा थोडा देखील अंधार असूं नये. झळईनें डोळ्यांला अपाय होतो व सावलीनें डोळ्यांला ताण बसतो. अशा स्थितींत काम करणें इष्ट नाहीं. उजेड चांगला असावा असें मी बोललें; परंतु ह्यास तरी प्रमाण आहे व हा कांहीं व्यवस्थेनें आला पाहिजे. जर एकादी खोली २० फूट लांब व २० फूट रुंद आहे, तर ८० औरसचौरस फूट ह्मणजे खोलींतील जमिनीचा एकपंचमांश उजेड असला, ह्मणजे चांगला उजेड आहे असें समजावें. पुष्कळ लोक खिडक्या जमिनीसरशा ठेवतात; परंतु ही त्यांची कांहीं अंशीं चूक आहे. होतां होईल तितकेंकरून उजेड वरून यावा व तो डाव्या बाजूनें असावा. आपण लिहीत असतां अथवा वाचीत असतां अथवा दुसरें काम करीत असतां आपल्या दृष्टीची गति बहुधा डावीकडून उजवीकडे असते, ह्मणून उजेडाची गति त्याचप्रमाणें असली तर चांगलें. डाव्याबाजूनें वरून उजेड येणें हें उत्तम आहे. असें न होईल, तर तो उजव्या बाजूकडून येत असावा. आपल्या पाठीमागून उजेड येणें वाईट आहे; कारण, आपण जें काम करीत असतों त्यावर आपल्या आंगाची सावली पडते

व सावलीनें डोळ्यांला ताण बसून डोळ्यांच्या शिरा ताणतात व कांहीं कालानें डोळ्यांस अपाय होण्याची भीति असते. समोरून उजेड येणें, हें तर फारच वाईट आहे. आपल्या समोरून उजेड येत असला ह्मणजे डोळे दिपतात व अपाय होतो. सूर्यकिरणें प्रत्यक्ष येऊं नयेत ह्मणून झडपें (व्हिनिशन शटर्स) असलीं तर चांगलें. अशा प्रकारचीं झडपें असलीं ह्मणजे वाटेल तितका उजेड घेण्यास सवड सांपडते, झळ येत नाहीं, व सुसाट्याचे अथवा थंड वाऱ्यापासून त्रास होत नाहीं. ही गोष्ट मनांत आणून बहुतेक खिडक्यांना झडपें केलीं आहेत. कित्येक लोक खोलींत अथवा दिवाणखान्यांत उजेड पुष्कळ असतां, सफेतीचा रंग देतात; परंतु यामुळें डोळ्याला थोडासा त्रास होतो हें त्यांचे लक्षांत येत नाहीं. अशा ठिकाणीं सफेतीच्या ऐवजीं अस्मानी किंवा अशाच सारखा दुसरा रंग देणें चांगलें.

शरीरप्रकृति साफ असावी अशी जर आपली इच्छा आहे, तर घरांत पुष्कळ हवा असली पाहिजे; परंतु घरें ठेंगणीं असलीं ह्मणजे, त्यांत थोडी हवा असते व थोड्या हवेमुळें कोंडमारा होऊन जीव गुदमरतो. ह्मणून होईल तितकें करून तीं उंच असावींत. दहा अकरा फूट उंच असणें हा मध्यम पक्ष आहे. चांगलें मान ह्मटलें ह्मणजे १४ फूट उंच असणें हें होय. दोन चार फुटांचें अंतर ह्मणजे प्रथम दर्शनीं आपणांस विशेष वाटत नाहीं; परंतु एकंदरीनें जास्त मान होतें, हें आपल्या लक्षांत येत नाहीं. १० फूट लांब, १० फूट रुंद व १० फूट उंच खोली असली, ह्मणजे १००० घन फूट होतात. परंतु तीच खोली १० फूट लांब, १० फूट रुंद व १२ फूट उंच असली ह्मणजे १२०० घन फूट होतात. यामुळें एकंदरीनें २०० फुटांचें अंतर पडतें; व त्या मानानें हवा जास्त असते. हवा व उजेड हीं चांगलीं यावींत

असा जर हेतु आहे, तर खिडक्या चार साडे चार फूट उंचीवर असाव्या; ह्मणजे त्या भुईसपाट नसतां जमिनीपासून बऱ्याच वर असाव्या. असें केलें असतां उजेड वरून पडेल व उन्हाची झळ अथवा थंड वारा ह्यांपासून त्रास होण्याची भीति राहणार नाहीं.

ही सर्व सोय केली असतां उजेड चांगला येऊन हवा चांगली येते. खोलींतील हवा चांगली आहे किंवा नाहीं हें पुष्कळ वेळां वासावरून समजतें; परंतु हें समजण्यास दुसरा थोडा उपाय आहे. एक स्वच्छ बाटली घेऊन तींत १० औंस स्वच्छ पाणी घालावें. तींत हवा जाईल अशा रीतीनें ती हलवावी. तींत सुमारें एक चमचाभर चुन्याचें पाणी टाकून ती बुचानें बंद करावी व पुनः हलवावी. जर बाटलींतील पाण्याचा रंग दुधासारखा पांढरा दिसला, तर खोलींत अंगाराम्ल (कारबानिक आसिड) वायु आहे व त्यामुळे घाण आहे असें समजावें.

बाळ्या हूड असल्यामुळें त्याचे शिक्षणाचे संबंधानें आनंदीबाईनें विशेष काळजी घेतली होती. फ्रोबेल साहेब ह्यांची किंडरगार्टन सिस्टिम (बालोद्यानपद्धत) हिजविषयीं तीस कांहीं माहिती होती. त्या पद्धतीस कांहीं अंशीं अनुसरून आपली बालशिक्षणपद्धत असावी, असा तिचा अभिप्राय असे. झाड लहानपणीं ज्याप्रमाणें वांकवितां येतें त्याप्रमाणें तें मोठेपणीं येत नाहीं असा नियम आहे. हाच नियम मुलांस लागू आहे. ह्या नियमाप्रमाणें तिचें वर्तन असे. कुदळीनें खणणें, वांकस हातीं धरणें, नांगर धरणें, बंडी अथवा आंगरखा शिवणें, वगैरे गोष्टींचा मुलांस कंटाळा वाटतो व असें करणें हा हलकेपणा आहे असें त्यांस वाटतें; परंतु याबद्दल त्यांस दोष न देतां आपण आपलेकडे दोष घेतला पाहिजे, असा तिचा समज असे. कारण, ह्या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टींचें म-

त्व किती आहे व ह्यांपासून उपयोग काय आहे, हें लहानपणींच त्यांचे मनावर बिंबलें नाहीं, तर पुढें ह्या गोष्टी करण्यास त्यांस कंटाळा वाटेल ह्यांत नवल नाहीं. लहानपणापासून जर ह्या गोष्टींचा परिचय असेल व त्या करण्याची संवय असेल, तर त्या करण्यास पुढें संकोच वाटण्याचा संभव कमी आहे; इतकेंच कीं, ह्या गोष्टींचें महत्व दुसऱ्या प्रकारच्या विद्येबरोबर आहे, ही गोष्ट मात्र त्यांचे मनांत पूर्णपणें ठसली पाहिजे व त्याप्रमाणें आपण पुढें वागलें पाहिजे. ज्यांच्याकडे शिक्षणाचें काम असतें त्यांस कार्यकारणाचें परीक्षण करण्याची संवय असली पाहिजे; विशेषेंकरून ज्यांकडे मुलांचे शिक्षणाचें काम असतें, त्यांस तर ती अवश्य असली पाहिजे. ज्या शिक्षकांस ही संवय नसते त्यांचे हातून मुलांचें हित होण्याचा संभव कमी असतो असें समजावें. ह्मणून पुष्कळ स्त्रियांकडून मुलांचे संगोपनाचें काम चांगल्या रीतीनें होत नाहीं. मूल कां रडतें, हट्ट कां करतें, तें कां रागावतें, हें शोधून काढून ज्या कारणांमुळें वाईट परिणाम होत असतील तीं कारणें प्रथम दूर केलीं पाहिजेत. कारण, वाईट परिणामांचीं कारणेंच जर वेळचे वेळीं काढून टाकीत गेलें नाहीं, तर वाईट परिणाम घडून येतील, हें उघड आहे. त्याचप्रमाणें मुलांस आनंद कशानें होतो, त्यांस सुख कशानें वाटतें, कोणत्या गोष्टींनीं त्यांचे मनास चांगला संस्कार होतो व कोणत्या गोष्टींनीं त्यांचे मनास चांगलें वळण लागतें, हें शोधून त्याप्रमाणें आचरण केलें पाहिजे. मुख्य गोष्ट ही कीं, प्रथम मुलांचे स्वभावाचें चांगलें परीक्षण केलें पाहिजे व कार्यकारणाचा विचार करून त्या धोरणानें शिक्षण दिलें पाहिजे. असें न करितां त्यांस उगीच धोपटीत सुटलें, अथवा दापीत गेलें, तर इष्ट हेतु कधींही सिद्धीस जाणार नाहीं, हें आनंदीबाईस माहीत होतें. बाळपणीं मुलांस खेळण्याची फार हौस

असते. खेळण्याकडे त्यांची फार प्रवृत्ति असते; परंतु अज्ञान आ-ईबापांची अशी इच्छा असते कीं, मुलांनीं खेळूं नये. एकाच्या मनाची प्रवृत्ति एकीकडे व दुसऱ्याचे मनाची प्रवृत्ति दुसरीकडे, असा प्रकार चांगला नाहीं. ह्यामुळें ओढाताण होते व ह्यापासून हित न होतां अहित होतें, हें आईबापांचे लक्षांत येत नाहीं. खेळण्यानें मुलांची आनंदवृत्ति राहते, त्यांचें शरीर सुदृढ होतें व बुद्धीचाही विकास होतो; इतकेंच कीं जे खेळ मुलांनीं खेळावयाचे त्यांत निवड केली पाहिजे. ह्मणजे कोणत्या खेळांनीं त्यांचे शरीरास सुख होऊन तें सुदृढ होईल अथवा मनास थोडथोडा बोध होऊन त्याचा हळू हळू विकास होईल, ह्याविषयीं विचार केला पाहिजे. आपण बाललीलांचें कौतुक केलें पाहिजे व केव्हां केव्हां मुलांबरोबर प्रेमानें खेळलेंही पाहिजे, असा आनंदीबाईचा समज असे. लहान मुलांपुढें खुळखुळा अथवा भांडें वाजवीत बसलें ह्मणजे, तीं स्तब्ध राहतात व त्यांची क्षुब्ध वृत्ति जाऊन तीं शांत होतात. ह्यावरून तीं नादलुब्ध असलीं पाहिजेत; व त्यांस चमत्कारिक ध्वनि ऐकून नवल वाटत असलें पाहिजे. त्याचप्रमाणें दिवा अथवा दुसरी चमत्कारिक वस्तु दृष्टीस पडली असतां तीं तिजकडे टक लावून पहात बसतात; व त्या वस्तूचें त्यांस कौतुक वाटत असावें असें दिसतें. परंतु ह्या दोन क्रिया होत असतां एकाग्रता ही आपोआप राहते; ह्मणजे लक्षपूर्वक ऐकणें व लक्षपूर्वक पाहणें ह्या ज्या दोन महत्वाच्या क्रिया, ज्यांच्या योगानें मोठमोठाले शोध होऊन सुधारणेस सहाय्य होत आहे, त्यांचा प्रादुर्भाव लहानपणीं होत असतो. एकाग्रतेशिवाय शिक्षण निर्फळ होतें. ही एकाग्रता लहान मुलांचे आंगीं असते; लक्षपूर्वक ऐकण्याचा व लक्षपूर्वक पाहण्याचा त्यांस नाद असतो; परंतु ह्या दोन गोष्टींची त्यांस संवय लावणें हें आपलें कर्तव्य आहे; व को-

णता चमत्कारिक ध्वनि त्यांजकडून ऐकवावयाचा व कोणत्या चमत्कारिक गोष्टी त्यांच्याकडून लक्षपूर्वक पाहवावयाच्या, व यामुळें एकाग्रता या गुणाची वृद्धि करावयाची, हें आपलेकडे आहे.

एकादी नवीन व चमत्कारिक वस्तु मुलांच्या दृष्टीस पडली असतां तीं नानाप्रकारचे प्रश्न विचारतात. या प्रश्नांचीं योग्य उत्तरें देऊन त्यांची जिज्ञासा अधिक न वाढवितां पुष्कळ स्त्रिया अथवा पुरुष त्यांस उलट दापतात, त्यांच्या आंगावर येतात व त्यांस झिटकारून टाकतात. हा असमंजसपणा आहे असें आनंदीबाईस वाटत असे. जो चौकसपणा सुधारणेचें बीज आहे व ज्याच्या अभावीं ज्ञानाची वृद्धि होत नाहीं, तो आपोआप मुलांमध्यें प्रथम दृष्टीस पडत असतां त्याचा कंटाळा करावा, व तो त्यांमध्यें यावा ह्मणून नंतर अनेक कृत्रिम उपाय करीत बसावें, व तो दृष्टीस पडला नाहीं ह्मणजे शीण मानावा ह्यांत अर्थ नाहीं. हें वर्तन कांहीं अंशीं हातचें सोडून पळत्याचे मागें लागण्यासारखें आहे, असें तीस वाटत असे. या संबंधानें जी मुख्य गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती ही कीं, मुलें तरकटी होणार नाहींत, एवढ्याविषयीं जपलें पाहिजे.

मुलांच्या आंगीं चळवळ फार असते. हें घे, तें घे; हें नास, तें नास; हें पहा, तें पहा; खडे गोळा कर; चिंचोके जमा कर; टाटोळ्याचा हौद कर; फेरेमारें काढ; वगैरे शतशः कृति ते करितात. त्यांच्या हाताला नेहमीं चाळा असतो. उगीच स्वस्थ बसण्याचा त्यांस कंटाळा वाटतो. कांहींच करावयास न सांपडलें, तर इकडून तिकडे दिवसांतून त्यांच्या किती खेपा होत असतात हें सांगतां येत नाहीं. ह्या सर्व कृति चांगल्या असतात असें नाहीं; परंतु ह्यांस चांगलें वळण लावणें हें आपलें काम आहे.

एकटें राहणें ही मुलांस मोठी शिक्षा वाटते. तुह्मी त्यांस

मारा हाणा, तीं दुसऱ्या मुलांत मिसळण्यास एका पायावर तयार असतात. जवळ कोणी नसलें ह्मणजे तीं बावरल्यासा-रखीं होतात व त्यांस चैन पडत नाहीं. ह्यावरून संगतीची त्यांस फार आवश्यकता असते हें उघड आहे. सोबतीची त्यांस इतकी प्रबल इच्छा असते कीं, कुत्रीं मांजरेंसुद्धां त्यांस चाल-तात. त्यांशींच तीं सलगीनें वागतात व खेळत बसतात. तेव्हां त्यांस कशा प्रकारची संगत असावी व त्यांचें मन कसें व्यापृत ठेवावें, हा विचार महत्वाचा आहे. कित्येक लोकांचा असा स-मज आहे कीं, मुलांस फक्त मुलांच्याच संगतीची आवड असते; परंतु हा कांहीं अंशीं चुकीचा समज आहे. मुलें खोड्या क-रितात हें मोठ्या माणसांस आवडत नाहीं. तीं त्यांस दापतात, रागें भरतात व जवळ उभीं करूं देत नाहींत. केव्हां केव्हां का-मामुळें त्यांशीं बोलण्यास सवड होत नाहीं, ह्मणून ज्या ठिकाणीं मुलांस विशेष मोकळीक मिळते, त्या ठिकाणीं जाऊन तीं करम-णुक करतात. जर त्यांस घरीं मोठ्या माणसापासून करमणुक होईल, तर तीं बाहेर जाऊन खेळावयास लागण्याचा संभव कमी आहे. त्यांस कांहीं तरी उद्योग लागतो व त्यांस कांहीं तरी करमणुक पाहिजे असते. हा उद्योग व ही करमणुक को-णती असावी हा विचार करणें जरूर आहे.

ज्यांकडे शिक्षण देण्याचें काम आहे, त्यांचें वर्तन कांहीं अंशीं माळ्यासारखें असलें पाहिजे. झाडांची वाढ भलत्याच दिशेला जाऊं लागून त्रास होऊं लागला, तर तो तसें करूं देत नाहीं. परंतु एरवीं त्यांचे वृद्धीस प्रतिबंध करीत नाहीं, इतकेंच नाहीं, तर त्यांस वेळचे वेळेवर पाणी घालतो; त्यांचे शेजारील तण अ-थवा घाण काढून सभोंवतालची जागा साफ ठेवतो; त्यांच्यावर नेहमीं सावली पडून तीं पिकुटणार नाहींत अथवा अतिशयित

ऊन लागून करपून जाणार नाहींत, अशाविषयीं खबरदारी घेतो; व ज्या योगानें त्यांचे सर्व अवयव सारखे वृद्धि पावतील तें नेहमीं करीत असतो. त्याचप्रमाणें मुलांचे संबंधानें आपलें आचरण असलें पाहिजे. त्यांच्या शरीराचे अवयांची वाढ सारखी होत गेली पाहिजे व त्यांच्या मानसिक शक्ति जागृत होऊन त्यांचा विकास झाला पाहिजे. त्यांस भलती दिशा लागत चालली आहे कीं काय, ह्मणजे ज्या मार्गानें त्यांनीं जाऊं नये असें आपणांस वाटतें त्या मार्गानें तीं जात आहेत कीं काय, ह्याविषयीं विचार करून त्यांस असन्मार्गानें न जाऊं देणें ही पहिली गोष्ट आहे. दुसरी गोष्ट ही कीं, त्यांच्या शारीरिक अथवा मानसिक शक्ति ज्या हळू हळू विकास पावत असतात त्यांस प्रतिबंध न करितां त्यांस सहाय्य केलें पाहिजे. ज्या योगानें ह्या शक्ति विशेष जागृत होतील व विशेष विकास पावतील तें तें केलें पाहिजे; ह्मणजे त्यांजपुढें निरनिराळे पदार्थ व निरनिराळीं चित्रें ठेवून व सृष्टींतील निरनिराळे देखावे त्यांजकडून अवलोकन करवून त्यांमध्यें जिज्ञासा उत्पन्न केली पाहिजे; त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें दिलीं पाहिजेत; व अशा रीतीनें त्यांचे मनास, त्यांचे करमणुकीस व त्यांचे उद्योगास वळण लाविलें पाहिजे.

शिक्षण देण्याचे बाबतींत घाई अथवा हवरेपणा बिलकूल उपयोगीं नाहीं. लहान झाडांच्या संबंधानें माळ्याचे मनाची जी स्थिति असते, ती लहान मुलांचे संबंधानें आपले मनाची स्थिति असली पाहिजे; क्रम कधींही सोडतां कामा नये. क्रमाक्रमानें व सावकाशपणानें शिक्षण चाललें असतां कांहीं एक हरकत नाहीं. ह्या योगानें दोन दिवस जास्त लागतील. परंतु हे दिवस व्यर्थ गेले असें मानणें चूक आहे. कोंवळ्या फांदीवर मोठें ओझें घातलें ह्मणजे, ती वांकून जाते व कधीं कधीं तीस अपाय होतो.

त्याचप्रमाणें कोंवळ्या शरीरावर अथवा मनावर भलताच भार घातला असतां, तें पिचण्याची भीति असते. अशीं उदाहरणें अलीकडे फार दृष्टीस पडतात. थोडक्या कालांत पुष्कळ आलें ह्मणजे लोक बरें ह्मणतात, व मुलें तरतरीत आहेत असें लोक समजतात, यामुळें कित्येकांस हावरेपणा सुटतो. कित्येकांस मुलांचे शरीराची व मनाची काय स्थिति होत आहे, हें समजत नसल्यामुळें त्यांचे हातून चालढकल होऊन मुलांस अपाय होतो. ही गोष्ट चांगली लक्षांत टेविली पाहिजे. मुलें अल्पायुषी होतात, ह्मणून प्रालब्धाला दोष ठेवण्यांत शहाणपणा नाहीं. ज्या कारणामुळें अलीकडील कांहीं मुलें अल्पायुषी होतात त्यांपैकीं शिक्षणाचे बाबतींत बापाचा अथवा शिक्षकाचा हावरेपणा हें एक होय. ह्या हावरेपणामुळें जें अनिष्टकार्य होत असतें तें हळू हळू होत असतें, ह्मणून तें नजरेस लवकर येत नाहीं. परंतु ह्या बाबतींत हेळसांड करणें अविचाराचें आहे. ज्या वेळेस शरीर व मन हीं दृढ होतात, त्या वेळेस त्यांवर थोडा जास्त भार पडला असतां एक वेळ चालतें. परंतु लहानपणीं, कोंवळ्या शरीरावर व मनावर फाजील भार कधींही असतां कामा नये; फाजील घाई कधींही असूं नये; क्रम सुटतां कामा नये; व फाजील सक्ती तर बिलकूल असूं नये. लहानपणीं शारीर व मानसिक यंत्रास फाजील गति देणें व त्याकडून जें काम होण्यासारखें नाहीं तें करविणें हा मोठा अविचार आहे, हें लक्षांत ठेवून शिक्षण असणें महत्त्वाचें आहे. ह्या बाबतींत शहाणे व अज्ञान ह्या दोहोंच्या हातून चूक होत असते. याबद्दल पुष्कळ समंजस व असमंजस आईबाप, शिक्षक व परीक्षक हे कांहीं अंशीं दोषास पात्र आहेत. परीक्षकाचे कृतीचा शिक्षकाचे कृतीवर, शिक्षकाचे कृतीचा आईबापांचे कृतीवर, व त्याचप्रमाणें आईबापांचे कृतीचा

शिक्षकाचे कृतीवर, व शिक्षकाचे कृतीचा परीक्षकाच्या कृतीवर परिणाम होऊन मुलांस त्रास होतो. या सर्वांचा खेळ होतो, परंतु मुलें मधल्यामध्यें चेंगरतात, ह्याचा विचार फार थोडे करतात.

मुलें रोज अनेक पदार्थ पाहतात, अनेक कृति करतात व अनेक खेळ खेळतात. ह्या योगानें त्यांचे मनास संस्कार होत असतो. गुरुमुखानें ते जें ऐकतात त्याचा अथवा पुस्तकांतून ते जें वाचीत असतात त्याचाही परिणाम त्यांचे मनावर होत असतो; परंतु प्रत्यक्ष पदार्थ पाहून अथवा हातानें कृति करून जसें त्यांस लवकर ज्ञान प्राप्त होतें तसें इतर रीतीनें होत नाहीं. पदार्थ मांडून अंक मोजण्यास शिकविणें, त्रिकोण चौकोन, वगैरे आकृति पुढें ठेवून त्यांविषयीं माहिती सांगणें व तशा आकृति त्यांकडून काढविणें, ह्यामुळें मुलांस एका प्रकारची करमणुक होऊन हातून क्रिया होते व सांगितलेली गोष्ट चांगली लक्षांत राहते.

ह्या सर्व गोष्टी लक्षांत आणून त्या धोरणानें आनंदीबाईनें बाळ्याचा शिक्षणक्रम चालविला होता. शिक्षणाचा कंटाळा न येतां त्याची गोडी लागावी व त्यापासून आनंद व्हावा ह्मणून तिनें त्यास गोष्टींचीं पुस्तकें, थोर पुरुषांचीं लहान चरित्रें, निरनिराळ्या जनावरांचीं चित्रें, नकाशे, लहान यंत्रें व हत्यारें, निरनिराळें वीं व धोंडे ह्यांचे नमुने, तसबिरी वगैरे घेऊन दिलीं होतीं. तात्पर्य, शिक्षण देण्यासाठीं जीं बाह्यसाधनें थोडक्यांत उपलब्ध होतीं तीं तिनें विकत घेऊन दिलीं होतीं. तिला माहीत होतें कीं, ह्या साधनांनीं शिक्षण सुलभ होऊन शिकणारास आनंद वाटतो व त्याचे बुद्धीस वळण देण्यास सवड सांपडते. या साधनांचा उपहास करणारे कांहीं असतात हें तीस माहीत होतें. परंतु लहान मुलांचे बाबतींत स्मरण व मननक्रिया ह्यांजपेक्षां प्रेक्ष-

णक्रिया जितकी प्रथम जास्त चालते व त्यांस निवड करण्याची संवय जितकी जास्त असते तितकें विशेष हित असतें, व हीं बाह्यसाधनें मुलांचे बुद्धीचा विकास करण्यास चांगल्या शिक्षकांस विशेष साहाय्यभूत असतात, हें तीस माहीत होतें; ह्मणून या बाह्यसाधनांचा तिनें विशेष उपयोग केला होता. यामुळें बाळ्याची खोली लहानसें पदार्थसंग्रहालय बनलें होतें. तींतील तसबिरी पाहून रमाबाईचे मुलींस कौतुक वाटलें. तें पाहून आनंदीबाई ह्मणाली, ज्यांच्या ह्या तसबिरी आहेत, त्यांचीं चरित्रें थोडक्यांत लिहून ठेविलीं आहेत व जीं वचनें तुमच्या दृष्टीस पडत आहेत त्यांविषयीं गोष्टीच्या रूपानें खुलासा करून लहान लहान पुस्तकें लिहून ठेविलेलीं आहेत. हीं तुह्मीं वाचिलीं असतां या तसबिरींचा उपयोग काय आहे, हें तुह्मांस समजून येईल. मुलांच्या डोळ्यांपुढें ज्या तसबिरी असावयाच्या, व जीं चरित्रें त्यांनीं वाचावयाचीं त्यांमध्यें चांगली निवड केली पाहिजे. असल्या चरित्रांत उगीच सर्व गोष्टींचा पाल्हाळ करण्यांत अर्थ नाहीं. चरित्रनायकाच्या चरित्रांतील महत्त्वाच्या चार गोष्टींविषयीं दिग्दर्शन केलेलें असून त्यांत जो विशेष गुण होता व ज्याचें अनुकरण मुलांनीं करावयाचें, त्याविषयीं विशेष खुलासा केलेला असावा. रमाबाई व तिच्या मुली ह्यांनीं राम, हरिश्चंद्र, बुद्ध, शिवाजी, वाशिंग्टन, ग्यारिबाल्डी, ग्ल्याडस्टन वगैरे थोर पुरुषांच्या तसबिरी पाहिल्या; व बाळ्यानें लक्षांत ठेवावींत ह्मणून थोर पुरुषांचीं जीं वचनें मोठ्या अक्षरांनीं लिहून आरशांत ठेविलीं होतीं तीं द्वारकानें मोठ्यानें वाचिलीं. तीं वचनें अशीं:—

नाहीं संतपण मिळत हें हाटीं । हिंडतां कपाटीं रानीं वनीं ॥
नये मोल देतां धनाचिया राशी । नाहीं तें आकाशीं पाताळीं तें ॥
तुका ह्मणे आहे आपल्या तें आंगीं । गवसेना जगीं दुजे ठायीं ॥

*दिली मान तरी नेघावी शत्रूची । शरण आलें त्यासी जतन जीवें ॥*
समर्थासी असे विचाराची आण । भलीं पापपुण्य विचारावें ॥
काकुळतीसाठीं सत्याचा विसर । पडिलें अंतर न पाहिजे ॥
तुका ह्मणे यश कीर्ति आणि मान । करितां जतन देव जोडे ॥

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें ।
मना बोलणें नित्य सोसीत जावें ॥
स्वयें सर्वदां नम्रवाचे वदावें ।
मना सर्व लोकांसि रे नीववावें ॥
तनु त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥
मना चंदनाचे परी त्वां झिजावें ।
परी अंतरीं सज्जना नीववावें ॥

नित्य नेम सोडूं नये । अभ्यास बुडों देऊं नये ॥
परतंत्र होऊं नये । कांहीं केल्या ॥
स्वतंत्रता मोडूं नये । निरापेक्षा तोडूं नये ॥
परापेक्ष होऊं नये । क्षणक्षणा ॥

दे दान गुप्त, उपकार करी न बोले ।
मानी प्रमोद जरि मान्य घरास आले ॥
दावी न गर्व विभवें, गुण घे पराचे ।
खड्गाग्र-तुल्य विषमव्रत हें भल्याचें ॥
आलस्य जें कार्यविघातकारी ।
असूं नये तो रिपु या शरीरीं ॥
उद्योग सद्बंधु तया न टाकीं ।
त्या सेवितां पावसि सौख्य लोकीं ॥

धन्यांत उत्तम दक्षता । धनांत उत्तम तो ज्ञातृता ॥
लाभ तो शरीर-आरोग्यता । तुष्टी तेंचि सुख जाण ॥

सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तेंचि परब्रह्म ॥
सत्यापाशीं पुरुषोत्तम । सर्वकाळ तिष्ठत ॥

उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मी-
र्दैवेन देयमिति कापुरुषा वदंति ॥
दैवं निहत्य कुरु पौरुषमात्मशक्त्या ।
यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः ॥

आत्मा नदी संयमपुण्यतीर्था ।
सत्योदका शीलतटा दयोर्मिः ॥
तत्राभिषेकं कुरु पांडुपुत्र ।
न वारिणा शुध्यति चांतरात्मा ॥
सहसा विदधीत न क्रिया-
मविवेकः परमापदां पदम् ॥
वृणुते हि विमृश्यकारिणं ।
गुणलुब्धाः स्वयमेव संपदः ॥
यस्मिन्कुले यः पुरुषः प्रधानः ।
स सर्वयत्नैः परिरक्षणीयः ॥
तस्मिन् विनष्टे स्वकुलं विनष्टं ।
न नाभिभंगे ह्यरका वहंति ॥

यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यंते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥
एकोऽहमस्मीत्यात्मानं यत्त्वं कल्याण मन्यसे ।
नित्यं स्थितस्ते हृद्येषः पुण्यपापेक्षिता मुनिः ॥

पापान्निवारयति योजयते हिताय ।
गुह्यं च गूहति गुणान्प्रकटीकरोति ॥
आपद्गतं च न जहाति ददाति काले ।
सन्मित्रलक्षणमिदं प्रवदंति संतः ॥

यावत् स्वस्थमिदं कलेवरगृहं यावच्च दूरे जरा ।
यावच्चेंद्रियशक्तिरप्रतिहता यावत्क्षयो नायुषः ॥
आत्मश्रेयसि तावदेव विदुषा कार्यः प्रयत्नो महान् ।
प्रोद्दीप्ते भवने तु कूपखननं प्रत्युद्यमः कीदृशः ॥

सतां सकृत्संगतमीप्सितं परं ।
ततः पुरं मित्रमिति प्रचक्षते ॥
न चाफलं सत्पुरुषेण संगतं ।
ततः सतां सन्निवसेत्समागमे ॥

ह्या सर्व तसविरी पाहून रमाबाई ह्मणाली, राम देव होता ह्मणून त्याची तुह्मीं तसवीर जवळ ठेविली आहे; परंतु ह्या बाकीच्या तसविरी ठेवण्यांत तुमचा हेतु काय आहे हें समजत नाहीं. हें ऐकून आनंदीबाईनें उत्तर केलें कीं, मुलांच्या डोळ्यांपुढें कित्ता पाहिजे. त्यांनीं नेहमीं कोणतीं वचनें लक्षांत ठेवावयाचीं तीं त्यांचे डोळ्यांपुढें पाहिजेत. कोणत्या थोर पुरुषांच्या आंगचा कोणता गुण त्यांनीं घ्यावयाचा व त्यांच्या वचनांतील कोणतें तत्त्व लक्षांत ठेवावयाचें, हें त्यांस समजून सांगितलें पाहिजे; व ह्या हेतूनें ही सर्व व्यवस्था केली आहे. रामाच्या आंगीं पुष्कळ गुण होते, परंतु त्यांपैकीं पितृभक्ति व एकपत्नीव्रत हे दोन मोठे होते. पित्यानें जें वचन दिलें तें आपणच दिलें, असें समजून त्यानें वनवास भोगण्याचें कबूल केलें; परंतु पित्याची आज्ञा मोडिली नाहीं. ऐश्वर्य, तारुण्य, सौंदर्य वगैरे सर्व गोष्टींची अनुकूलता असतां, शास्त्र व रूढि यांची संमति असतां व आपल्या पत्नीविषयीं जो व्यर्थ लोकापवाद होता त्यास न भितां, मरेपर्यंत त्यानें एकपत्नीव्रत कडकडित रीतीनें पाळिलें. ऐश्वर्याच्या मदामुळें, तारुण्याच्या भरामुळें, अथवा सौंदर्याच्या गर्वामुळें बेफाम होऊन कित्येक लोक आपल्या

[library stamp, illegible]

पत्नीस दिलेल्या वचनावर पाणी सोडितात; कित्येक, क्षुल्लक कारणांवरून त्यांचा त्याग करितात व कित्येक, पुत्रप्राप्तीसाठीं दुसरें लग्न करितात. ज्याप्रमाणें स्त्रियांमध्यें पातिव्रत्य हा गुण मोठा आहे, त्याप्रमाणें पुरुषांमध्यें एकपत्नीव्रत हा मोठा गुण आहे. हा प्राय: फार थोडे लोकांत दिसून येतो. या गुणाचा महिमा फार आहे, ह्मणून तो मुलांचे मनावर ठसविणें हें चांगलें आहे.

हरिश्चंद्राच्या संबंधानें पुराणकारांनीं अतिशयोक्ति केली आहे असें जरी मानिलें, तरी, तो सत्यप्रतिज्ञ होता ही गोष्ट निर्विवाद आहे. कसेंही संकट पडलें व कितीही नुकसान झालें, तथापि, मनुष्यानें आपलें वचन पाळणें हें त्याचें कर्तव्य आहे. कित्येक लोक वचन देण्यास तयार असतात; परंतु त्याप्रमाणें आचरण करण्याचें त्यांचे जिवावर येते. सर्व गोष्टींची अनुकूलता असतां वचन पाळणें यांत विशेष पुरुषार्थ नाहीं. संकट ओढवलें असतांही जे आपल्या वचनास जागतात, किंवा वचन पाळण्यासाठीं आपलें सर्वस्व जरी हरण होत असलें तरी डगत नाहींत, त्यांची थोरवी विशेष समजावयाची. वचनाची मातबरी मुलांस कळणें फार अगत्याचें आहे; बळाबळ न पाहतां वचन देणें हा मूर्खपणा आहे हें त्यांस कळूं लागलें पाहिजे; आपल्या वचनावर लोकांचा भरंवसा नसणें हें आपणांस लांछन आहे, असें त्यांस समजलें पाहिजे; व वचन पाळण्यासाठीं त्यांनीं नेहमीं तयार असलें पाहिजे.

शिवाजीविषयीं विचार करितां ही गोष्ट दिसून येते कीं, अनेक अडचणी व अनेक संकटें आलीं असतां त्यांस त्यानें जुमानलें नाहीं इतकेंच नाहीं, तर त्यांतून धिमेपणानें व शहाणपणानें पार पडून मराठी राज्याची स्थापना करणें हा जो त्याचा हेतु, तो त्यानें सिद्धीस नेला. मोठालीं कृत्यें सुखानें होत नाहींत. त्यांस शतशः अडचणी येतात; परंतु त्यांस भिऊन हातपाय गा-

ळून बसणें हें दुर्बलतेचें लक्षण आहे; व अडचणींतून धिमेपणानें पार पडण्याचें सामर्थ्य असणें हें फार हितावह आहे, हें मुलांस समजलें पाहिजे.

बुद्ध हा थोर कुलांत जन्मला होता. त्यास कोणत्याही गोष्टीची कमतरता नव्हती. त्याचे वेळीं धर्माचे बाबतींत फार बखेडा होता. त्या वेळीं जीं धर्मसंबंधीं मतें होतीं त्यांहून त्याचीं फार भिन्न होतीं. अशी स्थिति असतां तो लोकापवादाला भ्याला नाहीं इतकेंच नाहीं, तर त्यानें वेडगळ मतांचा व राज्यपदाचा धिक्कार केला; व आपणास जें खरें वाटलें त्याप्रमाणें चालण्याचा व लोकांस उपदेश करण्याचा क्रम चालविला. हें लहानसहान मानसिकधैर्य नाहीं. अशा प्रकारच्या धैर्याची आपल्या लोकांत मोठी उणीव आहे. ही उणीव कायम राहील, तर सुधारणेस धक्का बसेल. मानसिक धैर्य हा गुण असणें जरूर आहे.

अलीकडे देशाभिमान ह्या शब्दाचा ध्वनि अनेक ठिकाणीं व अनेक प्रसंगीं ऐकूं येतो. जो उठला तो ह्मणतो मी देशाभिमानी. देशस्थिति आहे तरी काय, याविषयीं देखील ज्यांनीं चांगला विचार केला नाहीं, तेसुद्धां आपणांस देशाभिमानी ह्मणवून घेण्यास इच्छितात. परंतु या देशाच्या पंचवीस कोटि प्रजेपैकीं पुष्कळ खरे देशाभिमानी आहेत किंवा नाहींत, याविषयीं संशय आहे. लोकांस प्रिय तेवढेंच नेहमीं बोलणारा, हा खरा देशाभिमानी नाहीं; खोट्या समजुती अथवा वेडगळ आचार व विचार घालविण्याविषयीं यत्न न करितां डोळे मिटून त्याप्रमाणें आचरण करणारा, अथवा आपले आचारविचार मात्र चांगले व दुसऱ्याचे वाईट, असें समजणारा, अथवा दुसऱ्याचे तेवढे चांगले व आपले सर्व वाईट असें ह्मणणारा, किंवा नेहमीं सरकाराविरुद्ध बोलणारा हा खरा देशाभिमानी नाहीं. असले देशाभिमानी शतशः सांपड-

तात. असल्या लोकांपासून देशाचें खरें हित होईल हें समजणें चूक आहे. आपणास भेसळ नाणें नको आहे, खरें नाणें पाहिजे आहे. आपणास पोकळ अभिमानी नको आहेत. आह्मांस बरें वाटावें ह्मणून आमच्या तोंडापुरतें गोड बोलणारे लोक आह्मांस नको आहेत. देशाभिमानाचें मिष करून आपलें हित साधणारे स्वकार्यसाधु आपणास नको आहेत. ब्राह्मण व परभू, हिंदु व मुसलमान, हिंदु व पार्शी ह्या परस्परांमध्यें द्वेष उत्पन्नकरणारे आपणास नकोत. देशाभिमान हा गुण फुकट येत नाहीं. ज्यास देशाभिमानी ह्मणावयाचें त्यास देशाची स्थिति होती काय व आहे काय, हें समजून त्याचें खरें हित कोणत्या उपायांनीं होईल, हें समजलें पाहिजे इतकेंच नाहीं, तर, निरपेक्ष बुद्धीनें ते उपाय करण्यास तो प्रवृत्त असला पाहिजे; मग ते उपाय लोकांस प्रिय असोत अथवा अप्रिय असोत, ते उपाय सरकारास रुचोत अथवा न रुचोत, ते उपाय करण्यासाठीं पदराला खार लागला तरी, अथवा देह झिजविण्याचें कारण पडलें तरी, अथवा प्रसंगवशात् हाल अपेष्टा सोसण्यास कारण पडलें तरी, त्याची तयारी असली पाहिजे. आपले देशांत चांगल्या गोष्टी कोणत्या व वाईट कोणत्या, सत्य कोणतें व असत्य कोणतें यांमध्यें निवड करून चांगल्याचें व सत्याचें दृढतर अवलंबन करणारा व आपल्या देशांतील चांगल्या गोष्टींविषयीं व सत्याविषयीं अभिमान बाळगून व त्यांचें रक्षण करून जें जें हितकर अथवा सत्य दुसरे ठिकाणीं असेल त्याचा स्वीकार करणारा तो असला पाहिजे. ज्या ज्या समजुती पोरकट आहेत, व ज्या ज्या चाली अपायकारक आहेत त्या घालविण्यास यत्न करून सुधारणा करणारा तो असला पाहिजे. तात्पर्य, जें जें अहितकर व असत्य त्याचा त्याग करणारा व जें जें हितकर व सत्य त्याचेंच अवलंबन करणारा, हा खरा देशाभि-

मानी आहे असें समजावें. सत्य ही चीज आपलेच देशांत आहे व दुसरे देशांत नाहीं ही समजूत, अथवा ती आपले देशांत नाहीं व दुसरे देशांत मात्र आहे ही समजूत चुकीची आहे. ही गोष्ट मनांत न आणितां व सत्ताधीशांस गोड वाटावें ह्मणून आपल्या सर्व गोष्टींचा उपहास करणारे, अथवा परकीयांपासून ग्रहण करण्यासारख्या पुष्कळ गोष्टी असतां केवळ लोकप्रियता संपादन करण्याचे हेतूनें ह्या गोष्टींचा उपहास करणारे खरे देशाभिमानी नाहींत. हे देशाचे हितकर्ते नसून देशाचें नुकसान करणारे आहेत असें समजावें. वरील गुण ज्यां मध्यें आहेत तेच देशाभिमानी या नांवास पात्र आहेत. असे देशाभिमानी थोडे सांपडतात. असले देशाभिमानी मात्र पूज्य आहेत असें समजावें. यांपैकीं इटलींतील प्रसिद्ध देशाभिमानी ग्यारिबाल्डी हा एक होय. स्वदेशांत अधिकाऱ्यांचा छल होऊन त्यास स्वदेशत्याग करावा लागला; आप्त व इष्टमित्र ह्यांस सोडून दूर जावें लागलें; तेथेंही शत्रूपासून त्रास होऊं लागला; खाण्यापिण्याची पंचाईत पडूं लागली; प्रियपत्नी मेली; तात्पर्य, मनुष्यावर जे जे प्रसंग येऊन गुदरतात ते ते प्रसंग त्यावर येऊन गुदरले; तथापि, धैर्य खचूं न देतां योग्य प्रसंग पाहून तो देशहिताकरितां आपला देह अर्पण करण्यास तयार झाला. त्याचे कृत्याबद्दल लोकांनीं त्यास नांवें ठेविलीं, परंतु त्याकडे लक्ष न देतां त्यानें देशसेवा केली, व संपत्ति मिळवून अथवा मान मिळवून स्वकल्याण करण्याचे जरी त्यास अनेक प्रसंग आले, तरी त्यांपासून तो अलिप्त राहिला. असले पुरुष विरळा सांपडतात. असले पुरुष ज्या देशांत जन्मतात तो देश धन्य; असले पुरुष ज्या माउलीच्या उदरीं जन्म घेतात ती माउली धन्य; अथवा ज्या स्त्रियांस असले पति प्राप्त होतात त्या धन्य स्त्रिया होत. असल्या पुरुषांचें चरित्र

मुलांनीं वाचणें व तें आपल्या डोळ्यांपुढें ठेवणें हितकर नाहीं काय ? त्यांची तसबीर डोळ्यांपुढें ठेवून त्यांचे गुणांची आठवण होण्यास साधन असणें चांगलें नाहीं काय ? असो. ह्याप्रमाणें ह्या थोर पुरुषांचे आंगांतील कोणते गुण मुलांनीं ग्रहण करावे याविषयीं विचार झाला. आतां द्वारकाबाईनें जीं वचनें वाचिलीं तीं डोळ्यांपुढें ठेवण्याचा हेतु काय असावा हें समजून सांगण्याचें कारण नाहीं, तथापि, मी फक्त एक दोन वचनांविषयीं सांगतें. "नाहीं संतपण मिळते हें हाटीं हिंडतां कपाटीं रानीं वनीं" असें साधु तुकारामाचें वचन आहे. त्यांतील तात्पर्य असें आहे कीं, मोठेपणा हा विकत मिळत नाहीं; तो कोठें अरण्यांत जाऊन अथवा एकांतवासांत बसून मिळत नाहीं; तो नुसतें द्रव्य देऊन मिळत नाहीं; तो मनुष्याचे आंगीं असावा लागतो. ज्याचें मन मोठें असून ज्याची कृतिही तशीच आहे, तो मोठा असें समजावें. नाहीं तर, क्षणिकबुद्धीचे अथवा चंचलवृत्तीचे, आंत एक बाहेर एक, अधिकार व संपत्ति यांनीं उन्मत्त, तामसी, दुसऱ्याचें छिद्र काढणारे व स्वतः कांहीं एक न करणारे, असे लोकही आपणांस मोठे ह्मणवून घेतात व मूर्ख लोक अशांसही मोठे समजतात, हा केवढा प्रमाद आहे ? यावेडे लोकांचे लक्षांत ही गोष्ट येत नाहीं कीं, ज्यांस आपण मोठे समजून मान देतों, त्यांस आपलीं मुलेंही मान देतात. खरोखर मोठे कोणते, हलकट कोणते, अथवा लुचे कोणते ह्याविषयीं स्वतः निवड करून तें मुलांस संभाषणाच्या द्वारें कळविणें चांगलें आहे. आतां द्वारकाबाईनें जीं वचनें वाचिलीं त्यांत "न वारिणा शुध्यति चांतरात्मा" असें एक वचन आहे. या वचनांतील तत्त्व किती जण लक्षांत ठेवितात ? स्नान केल्यानें आंग स्वच्छ होतें, मन शुद्ध होत नाहीं, ही गोष्ट लोकांनीं लक्षांत ठे-

विली असती, तर ते ठिकठिकाणीं केवळ स्नान करण्यासाठीं जातेना. या बाबतींत लोकांची चमत्कारिक समजूत असल्यामुळें ते शेंकडों रुपये खर्च करीत आहेत; व मुलांस तेंच वळण लावून देत आहेत. "न जायेचि काशी न जाये गयेशी" असा समर्थांनीं जो उपदेश केला आहे, त्याचा हेतु काय आहे, हें ते लक्षांत ठेवीत नाहींत; व देव जवळ असतां, त्यास शोधण्यासाठीं लांब लांबचा प्रवास करतात, शेंकडों रुपये खर्च करतात, व देहास विनाकारण कष्ट देतात, हें आश्चर्य आहे. क्षेत्रीं जाऊन चित्तशुद्धि होते, हें मानणें असमंजसपणाचें आहे. चित्तशुद्धि होण्यास बाह्योपचार फारसे उपयोगी नाहींत. भागीरथी अथवा यमुना, कृष्णा अथवा गोदावरी, पुष्कर अथवा बिल्वतीर्थ, ह्यांत स्नान केलें ह्मणजे चित्तशुद्धि होत नाहीं. आत्मा हीच कोणी एक नदी, संयम हाच जिचा घाट, सत्य हेंच जिचें उदक, सच्छील हाच जिचा तट, दया हीच जिची लाट, त्या नदींत स्नान करीत जा; दुसऱ्या नदींत स्नान केल्यानें अंतरात्मा शुद्ध होत नाहीं, हा जो उपदेश वरील श्लोकांत केला आहे तोच उपदेश मुलांस करणें, व त्याप्रमाणें त्यांकडून आचरण करविणें योग्य आहे. खरें तत्त्व लक्षांत न ठेवून उगीच भलभलते विचार त्यांचे डोक्यांत भरवून दिले, तर खरी शुद्धता न प्राप्त होतां त्यांचें नुकसान मात्र होण्याची भीति आहे.

घरांतील सर्व व्यवस्था दाखविणें झाल्यावर आनंदीबाई खालीं गेली. तिचे मागून सर्वजण आले. रमाबाई व तिच्या मुली ह्यांस कांहीं गोष्टींचें मोठें कौतुक वाटलें. त्या यशोदाबाईचे घरीं थोडे दिवस राहून मुंबईस परत गेल्या. मुलींनीं आपले बापास सर्व हकीकत सांगितली. रमाबाईस ज्या ज्या गोष्टी पसंत वाटल्या त्या त्या तिनें आपल्या नवऱ्यास कळविल्या. त्यावरून

आपल्या मुलींस जसें शिक्षण मिळावें तसें मिळालें नाहीं असें त्यास वाटूं लागलें. परंतु हा विचार जितका लवकर त्याचे मनांत आला तितका त्याचा विसरही लवकर पडला. चंचलवृत्तीचे लोकांची अशीच स्थिति असते. असो. आनंदीबाईचा शिक्षणक्रम पूर्ववत चालला. यशोदाबाईचे वर्तनांतही पहिल्यापेक्षां पुष्कळ बदल झाला. जरूरीच्या कारणाशिवाय ती उगीच बाहेर जात नसे. मुलांकडे तिचें लक्ष जास्त असे. त्यांजवर ती अधिक माया करूं लागली, यामुळें तिजवर त्यांचें प्रेम विशेष दिसून येऊं लागलें. मुलांची आपणावर ममता आहे, हें पाहून यशोदाबाईस विशेष सुख वाटूं लागलें; व आपण मूर्ख मैत्रिणींच्या नादीं लागून न राहतां आनंदीबाईसारख्या सुशील स्त्रियांचे सहवासास असतों, तर आपली स्थिति हल्लींपेक्षां निराळी असती, असें तीस वाटूं लागलें. आपणास आनंदीबाईचा सहवास घडला व त्यांची व आपली गांठ पडली, हें आपलें भाग्यच आहे, व ह्मणूनच हे दिवस आपले दृष्टीस पडले; परंतु सर्वांस आनंदीबाईसारख्या आस्थेवाईक व सुशिक्षित स्त्रियांचा सहवास कोठून घडणार ? त्यांच्यासारख्या स्त्रिया निपजण्यास बराच काल लोटला पाहिजे. चांगला समागम नसल्यामुळें ज्याप्रमाणें माझी स्थिति झाली होती, त्याप्रमाणें पुष्कळ स्त्रियांची झाली असेल, हा विचार मनांत येऊन तिला आपल्या मैत्रिणींचे आचरणाविषयीं वाईट वाटलें; व आनंदीबाईच्या सहवासानें आपण लवकरच शुद्धीवर आलों व आपलें कर्तव्य काय आहे व आपणावर जबाबदारी काय आहे, हें आपणास कळूं लागलें याबद्दल तिला समाधान वाटलें. जर आपण व्यर्थ कालक्षेप करूं, चैनींत दिवस घालवूं, वेड्या समजुतींप्रमाणें चालूं अथवा असन्मार्गानें जाऊं, तर त्यामुळें आपलीच हानि होईल असें नाहीं, तर मुलें-

ही आपलें अनुकरण करतील व त्या योगानें त्यांचीही हानि होईल, ही गोष्ट तिचे मनांत चांगली बिंबली होती. हल्लीं, आपणामध्यें जो बदल झाला आहे त्यास कारण आनंदीबाई आहे, असें समजून ती तिचे उपकार मानूं लागली; व आनंदीबाईचें अनुकरण करण्याचा तिनें निश्चय केला. आपण आनंदीबाई बनूं अशी जरी आतां आशा नाहीं, तरी त्यांनीं जो मार्ग दाखविला आहे, त्या मार्गानें आपण गेलों असतां, आपणास कांहीं गोष्टी तरी करितां येण्यासारख्या आहेत ह्यांत संशय नाहीं. हे विचार मनांत येऊन प्रपंचसंबंधी सर्व कामांत विशेष दक्षतेनें व मुलांविषयीं विशेष आस्थेनें ती वागूं लागली.

यशोदाबाईचे स्थितींत अशा प्रकारें बदल झालेला पाहून आनंदीबाईसही समाधान वाटलें. आपण राहिल्यासारखें आपणापासून यशोदाबाईस थोडा तरी उपयोग झाला, हें समजून तीस आनंद वाटला. पूर्वीप्रमाणें मुलांचे संगोपनाचा सर्व भार आपणावर न पडतां, यशोदाबाईची आपणास सोडणूक होऊं लागली आहे, व यशोदाबाईचें लक्ष प्रपंच व परमार्थ ह्या दोहोंत विशेष लागत चाललें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. यशोदाबाईचा हाच क्रम चालेल, तर मुलांचें विशेष हित होईल असें आनंदीबाईस वाटलें.

अशा रीतीनें कांहीं दिवस लोटले. एके दिवशीं आनंदीबाई निजली असतां आपला मुलगा व आपला पती हे जीवंत असून त्यांची आपली भेट झाली, व पती व आपण असे ओंकारेश्वर येथील नर्मदेचा रमणीय देखावा पाहत पाहत विश्रांतीकरितां बसलों आहों, व मुलगा पुरुषोत्तम हा त्या देखाव्याचें चित्र काढीत आहे, असें तीस स्वप्न पडलें. डोंगर फोडून नर्मदा मधून वाहत चालली आहे, हजारों भाविक लोक नदींत स्नान करीत

आहेत, थवेचे थवे ब्रह्मपुरींत, विष्णुपुरींत, व ममलेश्वराचे आसपास उतरले आहेत, कित्येक, 'नर्मदा माताकी जय' असा घोष-करीत येत आहेत, कित्येक होडींत बसून ओंकारेश्वराचे दर्शनासाठीं चालले आहेत, व कांहीं, नदींतील माशांपुढें दाणे टाकून मौज पहात आहेत, हा देखावा पाहून आनंदीबाई स्वप्नांत आनंदाचे भरांत होती. इतक्यांत पुरुषोत्तमाचा पाय धोंड्यावरून निसरला व तो नदींत पडेल कीं काय, अशी तीस भीति वाटली, व ती दचकून जागी झाली; परंतु पाहते तों, पुरुषोत्तम किंवा आपला पति, किंवा नर्मदा, किंवा ब्रह्मपुरी अथवा शिवपुरी यांपैकीं कांहींच नसून आपण आपल्या खोलींत आहों, व आपणास स्वप्न पडलें, असें तिला समजून आलें. तेव्हां तिला फार वाईट वाटलें. तिचें मन उदासीन झालें. तिला कांहीं केल्यानें झोंप येईना. स्वप्नावर तिचा विश्वास नसे, परंतु डोळ्यांपुढें तीस पुरुषोत्तम दिसूं लागला. तिला प्रथम थोडेंसें भय वाटलें, ह्मणून तिनें दिवा लाविला व ती वाचीत बसली; परंतु तिला वाचन गोड लागेना. तिच्या मनांत नानाप्रकारच्या कल्पना येऊं लागल्या. आपला पति व पुत्र यांचा वियोग होऊन तीन वर्षें झालीं, परंतु त्यांचा अद्याप पत्ता नाहीं, ही गोष्ट मनांत येऊन तीस वाईट वाटलें. ते जीवंत असतील का ? त्यांची व आपली भेट होईल का ? किंवा आपणास जन्मभर त्यां शिवाय दुसऱ्याचे घरीं दिवस काढावे लागतील ? आतां आपण रहावें किंवा त्यांचा तपास करण्यासाठीं कोठें जावें. बरें पण, तपास तरी कोठें करावा, जावें तरी कोठें ? यशोदाबाईपाशीं गोष्ट कशी काढावी ? ती जाऊं देईल असें वाटत नाहीं. येथें रहावें, तर आपले मनाला गोड वाटणार नाहीं. आपण लोकांचे घरीं उगीच राहिलों, याबद्दल लोक आपणाला काय ह्मणत असतील ? आतां

यशोदाबाई आपले मुलांची काळजी घेऊं लागली आहे; तेव्हां आपलें कारण दिवसेंदिवस कमी पडणार. शिवाय, यशोदाबाईनें आपला पसारा अटोपून धरणें व मुलांची व्यवस्था ठेवणें, हें तिला व मुलांना हितावह आहे. जबाबदारीचें काम वांटलेलें नसावें. इतके दिवस सर्व जबाबदारी मजवर होती. आतां यशोदाबाईस कळूं लागलें आहे; तिची स्थितिही सुधारली आहे; ती आई आहे; तेव्हां तिनेंच सर्व व्यवस्था आतां करावी हें चांगलें आहे, असें आनंदीबाईस वाटलें. आज आपले मनाची अशी स्थिति कां होत आहे, हें तीस समजेना. हें पुस्तक घे, तें पुस्तक घे, अशा रीतीनें मन शांत करण्यासाठीं तिनें बराच यत्न केला; परंतु कांहीं केल्यानें तिचें मन स्वस्थ होईना. शेवटीं तिनें दिवा विझविला व अंथरुणावर पडून झोंप आणण्याचा यत्न केला; परंतु तीस झोंप आली नाहीं. तीस कोणत्याही उपायांनीं चैन पडलें नाहीं. ती तशीच अंथरुणावर पडून राहिली; परंतु पुढें काय करावें, याबद्दल तिचा निश्चय होईना. आपल्या जाण्यानें यशोदाबाईस तर वाईट वाटेलच; परंतु मुलांस फार वाटेल व आपण एकाएकीं जाण्याचा बेत केला, याबद्दल यशोदाबाईचे मनांत निरनिराळ्या कल्पना येऊन ती आपणास जाऊं देईल असें वाटत नाहीं. तेव्हां यशोदाबाईपाशीं जाण्याची गोष्ट सवडीप्रमाणें काढावी, हें तिला बरें वाटलें. हे विचार तिचे मनांत घोळत आहेत, तों तिची उठण्याची वेळ झाली; ह्मणून ती उठली व नित्याचे उद्योगास लागली. परंतु तिला उद्योग करण्याचें सुचेना. आनंदीबाईचे मनाची स्थिति नीट नाहीं, ही गोष्ट प्रथम यशोदाबाईचे अथवा मुलांचे लक्षांत आली नाहीं. परंतु दोन तीन दिवसांनीं काशी आपल्या आईस ह्मणाली, आई, मावशीबाईंना चैन

पडत नाहीं का ? जेव्हां जेव्हां त्यांच्या खोलींत जावें, तेव्हां तेव्हां त्या विचारांत असतात; त्यांचें तोंड उतरल्यासारखें दिसत आहे; त्यांस कांहीं तरी होत असावें असें वाटतें.

यशोदाबाईचे मनांत ही गोष्ट येऊन चुकली होती व ती आनंदीबाईस विचारणार होती; परंतु काशीनें गोष्ट काढल्यामुळें ती आनंदीबाईकडे लागलींच गेली व कांहीं वेळ इकडल्या तिकडल्या विषयावर भाषण केल्यानंतर ती आनंदीबाईस ह्मणाली, तुह्मास अलीकडे बरें वाटत नाहीं असें दिसतें. त्यावर आनंदीबाईनें उत्तर केलें, मला कांहीं आजार आहे, असें मला वाटत नाहीं. यशोदाबाई ह्मणाली, तर मग तुमचें मन स्वस्थ नसावें असें वाटतें.

हें ऐकून आनंदीबाई स्वस्थ बसली. काय सांगावें याविषयीं तिला मोठा विचार पडला. शेवटीं ती ह्मणाली, यशोदाबाई, तुह्मास काय सांगूं. मला रोगराई कांहीं एक नाहीं. परंतु दोन तीन दिवसांपासून मनास स्वस्थता वाटत नाहीं.

**यशोदाबाई.**—तुह्मांला कोणी बोललें नाहीं ना ? घरांत तुमचा कोणी अपमान केला नाहीं ना ? मुलांनीं तुमची अवज्ञा केली नाहीं ना ? मजकडून कांहीं चूक झाली नाहीं ना ?

**आनंदीबाई.**—छे, छे, असें कांहीं एक नाहीं.

**यशोदाबाई.**—तर मग, तुह्मास कोठली दुःखकारक वार्ता समजली आहे का ?

**आनंदीबाई.**—तसाही प्रकार नाहीं.

**यशोदाबाई.**—मग ती गोष्ट मला सांगण्यासारखी नाहीं का ?

**आनंदीबाई.**—असें कसें होईल ? तुह्मी मजपासून कोणतीही गोष्ट गुप्त ठेवीत नाहीं; तर, मी एखादी गोष्ट कशी छपवून ठेवीन ? असें करणें मूर्खपणाचें वर्तन नाहीं का ? असें वर्तन मजकडून कसें होईल ? अलीकडे माझे मनांत कांहीं वि-

चार येऊन मन फार अस्वस्थ झालें आहे. हे विचार पूर्वी येत होते; परंतु दोन तीन दिवसांपासून अगदीं चैन पडत नाहीं. तुह्मास सांगितलें असतां वाईट वाटेल, ह्मणून तुमचेपाशीं गोष्ट काढावी किंवा नाहीं, याविषयीं मी विचारांत होतें.

**यशोदाबाई.**—अशी गोष्ट कोणती ?

**आनंदीबाई.**—यशोदाबाई, मी तुमच्या घरीं कोणत्या स्थितींत आलें, हें तुह्मास माहीत आहे. आज तीन वर्षें झालीं, वरच्यांची व मुलाची काय स्थिति आहे हें समजलें नाहीं. त्यांचा शोध लागत नाहीं, यामुळें मन स्वस्थ नाहीं. आज शोध लागेल, उद्यां शोध लागेल, या आशेवर इतके दिवस मीं काढिले. यशोदाबाई, माझें काळीज पोळून करपलें आहे. मी बाह्यात्कारीं मात्र आनंद दाखवितें. मुलें जवळ असलीं, ह्मणजे माझा वेळ कसा तरी जातो; परंतु मी एकटी असलें ह्मणजे, नानाप्रकारचे विचार मनांत येतात; व एकांतवास दुःसह होतो. आतां मुलाचा व त्यांचा तपास करण्यासाठीं आपणच जावें असें मला वाटत आहे.

हें ऐकतांच यशोदाबाईस वाटलें कीं, ज्या अर्थी आनंदीबाईचे मनाची अशी स्थिति झाली आहे, त्या अर्थी त्या बहुशा लवकरच जातील. ही गोष्ट मनांत येऊन तीस धसका बसल्यासारखें झालें. तीस वाटावयास लागलें कीं, आनंदीबाईच्या जाण्यानें आपला मोठा आधार नाहींसा होईल, व सर्व भार आपणावर पडेल. आपलें कसें होईल या विचारांत ती आहे, तों आनंदीबाई ह्मणाली यशोदाबाई, तुह्मी कांहीं विचारांत आहां असें दिसतें. यशोदाबाईनें उत्तर केलें, विचार कशाचा ? तुह्मीं जाण्याचा विचार मनांत आणिला हें मुलांस समजलें, तर त्यांस चैन पडणार नाहीं. तुमच्याप्रमाणें मजकडून त्यांची व्यवस्था होईल, असें मला वाटत नाहीं. तुह्मी

होतां, ह्मणून मला कोणत्याही गोष्टीची काळजी वाटत नव्हती. माझे घरीं कांहीं झालें असतां पुष्कळ मैत्रिणी जमा होतील; माझ्या तोंडापुरतें चांगलें ह्मणण्यास पुष्कळ निघतील; परंतु मजविषयीं खरी कळकळ बाळगणारी व माझें खरें हित सांगणारी तुमच्या-सारखी मिळणें कठीण. तुह्मी माझे घरीं येऊन राहिलां, यामुळें मी वेळेवर शुद्धीवर आलें. तुह्मी आलां नसतां, तर मी लो-कांच्या नादीं लागून पैसा घालवून बसलें असतें; व कदाचित् मला व मुलांस भीक मागण्याचा प्रसंग आला असता. हा प्रसंग तुमच्या योगानें टळला असें मला वाटतें. अलीकडे मुलांपासून मला फक्त आनंद होत आहे इतकेंच नाहीं, तर त्यांपासून कर्म-णूक व उपयोग होत आहे. हिशेबठिशेब ठेवण्याचे वगैरे हर-एक गृहकृत्यांत काशीपासून मला बराच उपयोग होत आहे. बाळ्या, पूर्वी मनस्वी हूड व तिरसट होता. तो आतां पुष्कळ निवळला आहे. माझी मर्जी संपादन करणें व जी गोष्ट मला अ-प्रिय आहे ती न करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें त्यास समजूं लागलें आहे. हें सर्व तुमच्या श्रमाचें फल आहे. तुह्मास जाऊं द्यावें, तर माझें कसें होईल, व जाऊं नका ह्मणावें, तर तेंही गैर दिसेल, ह्मणून काय उत्तर द्यावें या विचारांत मी आहें.

**आनंदीबाई.**—यशोदाबाई, मीं काय केलें असेल तें असो. त्याविषयीं आतां कांहीं बोलण्याचें कारण नाहीं. ज्याप्रमाणें तु-ह्मास वाईट वाटत आहे, त्याप्रमाणें मलाही वाटत आहे. परंतु ज्यास मीं जन्म दिलें त्या मुलाचा, व ज्यांनीं मला शिक्षण दिलें व सर्वप्रकारें माझा सांभाळ केला त्यांचा शोध करण्यासाठीं न जाणें, हें मनास दुःख देण्यास कारण नाहीं काय? जावें, तर ज्यांस आपण पोटच्या पोराप्रमाणें समजून शिक्षण दिलें त्यांस, व प्रसंगीं जी आपल्या उपयोगास आली तिच्या ऋणांतून आपण

मुक्त न होतां तीस सोडून जावें लागत आहे, ह्मणून माझें मन द्विधा होतें. एकटी वसलें ह्मणजे पुरुषोत्तमाकडे मन धांव घेतें, व मुलें दृष्टीस पडलीं ह्मणजे त्यांजकडे मन ओढवतें, अशी सध्यां माझी स्थिति झाली आहे. परंतु पुन: विचार मनांत येतो कीं, तुमच्या येथें किती दिवस रहावें. तुह्मास मी नकोशी नाहीं, हें खरें आहे; परंतु माझा मी विचार करणें योग्य आहे. माझें कारण पराकाष्ठा वर्षभर किंवा दोन वर्षें आहे. परंतु इतके दिवस आतां माझ्यानें काढवतील असें मला वाटत नाहीं. मुलें सज्ञान होत चाललीं आहेत; व तुमचें हिताहित तुह्मास कळूं लागलें आहे. एकटीवर भार पडला असें वाटून तुह्मास प्रथम अवघड वाटेल, परंतु संवयीच्या योगानें यांत विशेष कांहीं नाहीं असें दिसून येईल. मुलांचे संगोपनाचें काम तुमचें तुह्मीं करणें हेंच योग्य आहे.

**यशोदाबाई.**—तुह्मास काय उत्तर द्यावें, हें मला कांहीं सुचत नाहीं. तथापि, तुमच्या मुलाविषयीं व तुमच्या पतीविषयीं आणखी शोध करून पाहूं व नंतर तुह्मास काय करावयाचें असेल तें करा, हें मला बरें वाटतें.

हें ऐकून हो ह्मणणें आनंदीबाईस भाग पडलें. आपण इतके दिवस राहिलों व थोड्यासाठीं यशोदाबाईचें मन मोडणें हें योग्य नाहीं, असें तीस वाटलें. परंतु तिचें लक्ष मुलाकडे व पतीकडे होतें.

यशोदाबाईनें विनायकराव डाक्तर यांस सांगून अनेक ठिकाणीं शोध करविला. महिना झाला, दोन महिने झाले, चार महिने झाले, तथापि कांहींच शोध लागेना. यशोदाबाई फार खिन्न झाली. शोध लागत नाहीं, हें आनंदीबाईस सांगण्याचें तिचे जिवावर आलें. तिच्या मनाची अशी स्थिति असतां काय करावें हें तीस सुचेना. कांहीं दिवस लोटल्यावर एके दिवशीं विनायक-

राव अमेरिकेंतील एक वर्तमानपत्र वाचीत असतां जनार्दनपंत हे हिंदुस्थानांतील एतद्देशीय संस्थानें या विषयावर, व त्यांचे चिरंजीव फरदापूरच्यीं लेणीं या विषयावर व्याख्यान देणार आहेत, अशी जाहिरात त्यांचे वाचण्यांत आली. प्रथम त्यांस त्याचें विशेष वाटलें नाहीं. बाप व मुलगा असे दोघे अमेरिकेंत कोण गेले असावेत याविषयीं बराच वेळ त्यांनीं विचार केला; परंतु त्यांस असें वाचल्याचें व ऐकल्याचें स्मरलें नाहीं. पुढील आठवड्यास या व्याख्यानांचा गोषवारा त्यांनीं वाचला. तेव्हां त्यांस वाटूं लागलें कीं, ज्यांच्या शोधांत यशोदाबाई आहे, ते तर हे नसतील ना? असें ह्मणून त्यांनीं तो गोषवारा पुनः पुनः वाचिला; व त्या वेळेस त्यांस वाटावयास लागलें कीं, हे तेच असावेत. वर्तमानपत्र घेऊन ते लागलींच यशोदाबाईकडे आले. यशोदाबाई आनंदीबाईचे खोलींत होती. विनायकराव आल्याचें वर्तमान समजतांच ती लागलींच खालीं आली. विनायकरावांनीं सांगितलेला मजकूर ऐकून प्रथम तीस फार आनंद झाला; परंतु पुनः तीस कांहीं शंका आली. आनंदीबाईस खुद्द विचारल्याशिवाय या शंकेचें निवारण व्हावयाचें नाहीं असें समजून ती उदास झाली. कारण चांगला शोध लागल्याशिवाय गोष्ट काढून आनंदीबाईस त्रास द्यावयाचा नाहीं, असा तिचा हेतु होता. परंतु आनंदीबाईस विचारल्याशिवाय सोय नाहीं, असें समजून ती व विनायकराव आनंदीबाईचे खोलींत गेले. आनंदीबाई, ब्लाकीज सेल्फकल्पर हा ग्रंथ वाचीत होती. यशोदाबाई व विनायकराव हे उभयतां आलेले पाहून तिनें पुस्तक एकीकडे ठेविलें. विनायकरावांचे येण्याचें कारण न समजून तीस आश्चर्य वाटलें. ती यशोदाबाईस ह्मणाली, आज आपल्या येथें कोणी आजारी आहे

का ? आज डाक्तरसाहेब या वेळीं येथें कसे आले ? हें ऐकून विनायकराव ह्मणाले, मी आज कोणाची प्रकृति पाहण्यासाठीं आलों नाहीं. मला तुह्मास कांहीं माहिती विचारावयाची आहे, ह्मणून मी मुद्दाम या वेळीं आलों आहें. विनायकरावांचे तोंडचे हे शब्द ऐकतांच आनंदीबाई स्वस्थ बसली. तिचें चित्त गोंधळून गेलें; तिचे मनांत भलभलते विचार येऊं लागले. विनायकराव जी माहिती विचारणार, ती आपले मुलाचे संबंधानें तर नसेल ना ? परंतु हें कसें होईल ? त्यांस या माहितीचें या वेळीं काय कारण आहे ? अशा विचारांत ती असतां विनायकरावांनीं तीस सर्व माहिती विचारली. तिनें ती इत्थंभूत सांगितली. तेव्हां त्यांच्या मनाची खात्री झाली कीं, यशोदाबाई आज चार महिने ज्यांचा तपास करीत आहे, ते जीवंत असून अमेरिकेंत आहेत. असें समजून त्यांनीं खिशांतून वर्तमानपत्र काढिलें व तें आनंदीबाईपुढें ठेविलें. आनंदीबाईनें तें हातांत घेतलें; तिच्या हाताला कांप सुटला; तिचे पोटांत धडधड करूं लागलें; तोंडावरचा तजेला नाहींसा झाला; व सर्वांगाला घाम सुटला. हें पत्र आपणास काय सांगणार ? विनायकरावांनीं खोदखोदून प्रश्न केले, त्यावरून त्यांस मुलाविषयीं कांहीं तरी विलक्षण तर कळलें नसेल ना ? परंतु त्यांस कांहीं वाईट कळलें असावें असें दिसत नव्हतें; मग माझे मनांत हुरहुर कां वाटते ? बरें पण, चांगलें वर्तमान असतें, तर तें अगोदर बोलून दाखवितें; पत्र हातीं देण्याचें त्यांस कारण नव्हतें. असे विचार येऊन आनंदीबाईचें मन गोंधळून गेलें व तिचे डोळ्यांला अंधेरी आली. तिचे मनांत काय चाललें होतें हें यशोदाबाई व विनायकराव ह्यांस माहीत नव्हतें. परंतु आनंदीबाई खिन्न झाली आहे हें त्यांचे लक्षांत आलें. दोघांपैकीं कोणी कांहींच बोलला नाहीं. व्याख्यानाचा गोषवारा वाचून

आनंदीबाईचे तोंडावर टवटवी दिसूं लागली. परंतु पुनः तीस शंका येऊन ती निस्तेज दिसूं लागली. आपलें एवढें भाग्य कोठचें ? आपणास स्वप्न तर पडलें नाहीं ना ? आपण जागे आहों, तेव्हां ही कल्पना मनांत आणण्याचें कारण नाहीं. आपण जें वाचिलें तें खरें असेल, तर आपला पती व आपला मुलगा हे जीवंत आहेत यांत शंका नाहीं. असें वाटून तीस फार आनंद झाला. परंतु त्यांची व आपली गांठ कशी पडावी ? आपण बायको माणूस; आपल्याच्यानें इतका लांबचा प्रवास कसा होईल ? बरें आपण गेलों, तर ते एके ठिकाणीं राहतील, हें फारच थोडें. ते एके ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं फिरत असतील. ज्याप्रमाणें त्यांविषयीं आपण शोध करून दमलों व शेवटीं निराश झालों, त्याप्रमाणें त्यांचीही स्थिति झाली असेल. त्यांची भेट घेण्याचें मनांत आणिलें, तरी महिना दीड महिना पाहिजे. दिवसेंदिवस आपली प्रकृती क्षीण होत चालली आहे, तेव्हां समुद्र लागून जास्ती क्षीण होईल, व आपला हेतु सिद्धीस जाईल किंवा नाहीं, ही शंका मनांत येऊन तीस फार वाईट वाटलें. तिनें पुनः पत्र वाचिलें. तेव्हां सर्व खुणा पटल्या व तिचे मनाची खात्री झाली. फरदापूर येथील लेणीं पाहणें झाल्यावर पुरुषोत्तमानें जे उद्गार काढिले होते त्यांची, व एतद्देशीय संस्थानांचे संबंधानें जो अभिप्राय आपले पतीचा होता त्यांची तीस आठवण झाली. "या संस्थानांत ज्यांनीं पूर्वीं कारभार पाहिला अथवा हल्लीं जे पाहतात त्यांपैकीं बहुतेक आपणांस मुत्सद्दी ह्मणवून घेतात; परंतु ह्यांनीं मुत्सद्दी या नांवास शोभण्यासारखें काय केलें आहे ? दहा वीस शाळा घातल्या, पांच सहा कोडतें स्थापन केलीं, तीन चार लायब्ऱ्या स्थापन केल्या, पांच सहा इमारती बांधल्या व वार्षिक रपोट चांगला

लिहिला, ह्मणजे मुत्सद्दी बनला हें मानणें चूक आहे." हे शब्द वाचून आपले पतीचे उद्गारांची तीस आठवण झाली व आपला पती व मुलगा हे अमेरिकेंत जिवंत आहेत व त्यांची स्थितिही बरी आहे, हें समजून तीस हुशारी वाटली. तिनें पत्र एकीकडे ठेविलें व ती विनायकरावास ह्मणाली, डाक्तरसाहेब, तुमचे आभार मी मघाशींच मानावयाचे असून आतां मानितें, याबद्दल मला माफी करा. माझे मनांत नानाप्रकारचे विचार येऊन मन गोंधळून गेलें होतें. यशोदाबाईनें चार महिने शोध लावण्याविषयीं उद्योग चालविला, याबद्दल त्यांची तर सर्वांशीं मी ऋणी आहेंच; परंतु तुह्मींही त्यांस मदत केली व ही आनंदाची खबर आणिली, याबद्दल तुमचेही मजवर फार उपकार आहेत.

**विनायकराव.**—उपकाराचें नांव घेऊं नका. मी कांहींच केलें नाहीं, किंवा मला कांहीं श्रमही पडले नाहींत. ज्यांच्याबद्दल तुह्मांस काळजी वाटत होती ते खुशाल आहेत हें ऐकून मला संतोष झाला आहे; व यशोदाबाईसही त्याप्रमाणें झाला असेल.

**यशोदाबाई.**—डाक्तरसाहेब, मला संतोष झाला आहे हें काय विचारावें. आनंदीबाई पत्र वाचून स्तब्ध बसल्या, तेव्हां माझ्या जिवांत जीव नव्हता; त्या काय ह्मणतात याकडे माझें लक्ष होतें. जेव्हां त्यांच्या तोंडावर हुशारी दिसली तेव्हां मला आनंद झाला.

**आनंदीबाई.**—यशोदाबाई, तुह्मांस मजकरितां फार श्रम पडले याबद्दल मला फार वाईट वाटतें.

**यशोदाबाई.**—मला कांहीं श्रम पडले नाहींत. आतां ज्याप्रमाणें ही आनंदाची खबर ऐकिली, त्याप्रमाणें तुमची व तु

मच्या माणसांची हरिसत्तेनें गांठ पडून तुह्मीं सर्वांनीं माझे येथें कांहीं दिवस रहावें व मग जावें, एवढी माझी इच्छा आहे.

हे शब्द ऐकून आनंदीबाईचे डोळे पाण्यानें भरून आले; व असा योग ज्या दिवशीं घडून येईल तो सुदीन, असें तीस वाटलें. विनायकराव ह्यास बराच वेळ झाला होता, ह्मणून त्यांनीं आनंदीबाई व यशोदाबाई ह्यांचा निरोप घेतला व ते आपल्या घरीं गेले. यशोदाबाईला कोणी भेटावयास आले होते ह्मणून तीही खालीं गेली. आनंदीबाई एकटीच खोलींत होती. ती पुन: पत्र वाची व काय करावें याबद्दल विचार करी. शेवटीं, यशोदाबाईचा निरोप घेऊन अमेरिकेस जाण्याचा तिनें निश्चय केला. यापुढें आपणास फार दिवस वियोग सहन होणार नाहीं असें तीस वाटून, व आपण करतों हें आपलें कर्तव्य करतों हें समजून, तिनें लांबचा प्रवास करण्याचा हिय्या केला; व आपण जो चांगला निश्चय केला तो कदाचित् बदलेल, ह्मणून तिनें यशोदाबाईपाशीं लागलींच गोष्ट काढण्याचा विचार मनांत आणिला व ती खालीं आली. परंतु यशोदाबाई आंग धुऊन पूजा करण्यास लागली होती, ह्मणून तिनें गोष्ट काढिली नाहीं. दुपारीं जेवण झाल्यावर तिनें आपला निश्चय यशोदाबाईस कळविला. यशोदाबाईनें पुष्कळ प्रकारें सांगून पाहिलें; परंतु आनंदीबाईनें एकच गोष्ट सांगितली कीं, मीं सर्व गोष्टींचा विचार करून शेवटचा निश्चय केला आहे. आतां मला जाण्याविषयीं तुह्मीं परवानगी द्यावी एवढेंच पदर पसरून माझें मागणें आहे. माझेबरोबर जो ब्राह्मण आला होता तो येण्यास तयार आहे; खर्चापुरतें मजजवळ साधन आहे; कोठें कसें राहावयाचें काय काय गोष्टी करावयाच्या हें मला माहित आहे; व ज्या परमेश्वरानें आज हा सुदीन दाखविला, तो मला अडचणींचे

वेळीं सहाय्य करील, अशी माझी खात्री आहे. पुष्कळ ठिकाणीं प्रवास करण्याचे व अनेक अडचणी सोसण्याचे प्रसंग मला आल्यामुळें तुह्मास या प्रवासाचें जितकें भय वाटतें, तितकें मला वाटत नाहीं. मला जें वाईट वाटत आहे, तें हें कीं, मुलांचे शिक्षणाचें काम अर्धवट सोडून मला जावें लागत आहे. तुमच्या मुलांस तुह्मीं शिक्षण देणें हें कर्तव्य प्रथम तुमचें आहे, तुमचे पश्चात् माझें आहे. परंतु ज्या अर्थी तुह्मी आतां काळजी घेऊं लागलां आहां, त्या अर्थी मजवरची जबाबदारी कमी झाली आहे. या सर्व गोष्टी मनांत आणून माझा जाण्याचा विचार झाला आहे.

आनंदीबाईचें हें निश्चयाचें भाषण ऐकून यशोदाबाईचा इलाज चालला नाहीं. पती व मुलगा ह्यांचे संबंधानें आनंदीबाईचे मनाची जी स्थिति झाली होती, त्या स्थितींत तिला रहा ह्मणून ह्मणणें अगदीं अप्रशस्त आहे, असें तीस वाटलें; व आनंदीबाईनें विचारपूर्वक जो संकल्प केला आहे, तो कालत्रयीं फिरावयाचा नाहीं, हें तीस तीन वर्षांचे सहवासानें माहीत होतें, ह्मणून ती ह्मणाली, बरें तर तुमची मर्जी.

आनंदीबाई लवकरच जाणार हें वर्तमान मुलांस समजल्यावर, त्यांस फार वाईट वाटलें. बाळ्या ह्मणाला, आई, मावशीबाई आतां कधीं यावयाच्या नाहींत का ? तुझी हरकत नसेल, तर मी त्यांबरोबर जातों. काशी ह्मणाली, आई, तूं त्यांस रहा ह्मणून नाहीं का ह्मटलेंस ? तूं जर त्यांस आग्रह केला असतास, तर त्या राहिल्या असत्या. त्यांस एकाएकीं भीड तुटत नाहीं. यावर यशोदाबाईनें उत्तर केलें कीं, मीं जेवढी पराकाष्ठा होती तेवढी केली; आतां त्यांस राहण्याविषयीं आग्रह करण्यांत अर्थ नाहीं नंतर बाळ्या ह्मणाला, मावशीबाई माझें ऐकतील, मीच त्या

कडे जाऊन त्यांस ठेवून घेतों; माझें ह्मणणें त्या कबूल करतील. असें बोलून तो आनंदीबाईचे खोलींत गेला. ती पत्र लिहीत होती, ह्मणून तो उभा राहिला. बाळ्यास पाहिल्याबरोबर आनंदीबाईनें हातची लेखणी एकीकडे ठेविली व ती त्यास ह्मणाली, बाळ, तुझा धडा झाला का ?

हें ऐकून बाळ्या उगाच राहिला. त्यानें कांहीं एक उत्तर केलें नाहीं, ह्मणून आनंदीबाई ह्मणाली बाळ, तुला कोणी बोललें का? तुझा धडा तयार झाला नाहीं का ?

**बाळ्या.**—मावशीबाई, मला कोणी बोललें नाहीं; परंतु आज धड्याकडे माझें लक्ष लागत नाहीं.

**आनंदीबाई.**—कां बरें ?

**बाळ्या.**—आई ह्मणाली, तुह्मी लांब कोठें जाणार आहां, व ताई ह्मणते, तुह्मी पुनः परत येणार नाहीं. मावशीबाई, तुह्मी गेल्यावर आह्मांला कोण शिकविणार ? तुह्मी कधींच परत येणार नाहीं का ? जर तुह्मी रहात नसलां, तर मी तुमचेबरोबर येतों. ताई व माई आईपाशीं राहतील.

बाळ्याचें हें भाषण ऐकून आनंदीबाईस गहिंवर आला. तिचे डोळ्यांला पाणी आलें. तें पाहून बाळ्यासही रडूं कोसळलें. बाळ्याची समजूत कशी घालावी या विचारांत आनंदीबाई होती. शेवटीं, तिनें आपल्या पदरानें बाळ्याचे डोळे पुसले, व त्याचे तोंडावरून हात फिरवून त्यास जवळ बसविलें. त्याजकडे पाहत असतां तिच्या मनांत कांहीं चमत्कारिक कल्पना आल्या. आपले ठिकाणीं ज्या मुलाचें अशा प्रकारें प्रेम आहे, व ज्यावर पोटच्या पोराप्रमाणें आपली ममता जडली आहे, त्याचा वियोग लवकरच होणार, व त्याची आपली पुनः गांठ

पडेल किंवा नाहीं याविषयीं संशय आहे, ही गोष्ट मनांत येऊन तीस फार वाईट वाटलें. तिनें आपलें दुःख आवरून धरून बाळ्यास उगी केलें. ती ह्मणाली, बाळ, तुला टाकून मी गेलें नसतें, परंतु जाण्याची मला जरूरी आहे, वगैरे गोष्टी सांगून तिनें बाळ्याची समजूत घातली.

चार पांच दिवस लोटल्यावर आनंदीबाईनें जाण्याची तयारी केली. तिचे प्रयाणाचा दिवस जों जों जवळ येत चालला, तों तों मुलांस व यशोदाबाईस फार वाईट वाटूं लागलें. कोणास काम करण्याचें सुचेना. ज्या दिवशीं जावयाचें तो दिवस आला. जेवण खाण आटोपलें. बोचकीं बांधून आनंदीबाई गाडीची वाट पाहत बसली. गाडीचा शब्द ऐकूं आला. गाडी दारापाशीं येऊन ठेपली. त्यामुळें घरांत एकच धांदल झाली. ज्या बायका रोज आनंदीबाईकडे येत, त्यांचा निरोप घेतल्यावर आनंदीबाईनें यशोदाबाईचा निरोप घेतला. मी आतां येतें, मुलांना सांभाळा, हे शब्द उच्चारतांच तिचे डोळे पाण्यानें भरून आले. यशोदाबाईनें धीर धरून रडणें आवरून धरिलें. ती ह्मणाली, मी सांभाळणार कोण? त्यांचा सांभाळ करणार ईश्वर आहे. अन्नोदकाचा तुमचा ऋणानुबंध आज संपला. ह्यावर तुमच्या आमच्या गांठी पडतील तेव्हां खरें; पण आतां गांठी कशाच्या पडतात. तुह्मी कांहीं कारणांनीं येथें आलां होतां; तुमची मी उतराई झालें नाहीं; तुह्मांस मजपासून जें सुख व्हावें तें झालें नाहीं, याबद्दल मला राहून राहून दुःख होतें; परंतु उपयोग काय? असो. मुलांची तुह्मांस आठवण असूं द्या. तुह्मी लांबच्या प्रवासास जात आहां; परंतु वरचेवर पत्र पाठवून समाचार घेत जा. मनुष्य प्रवासास जाऊं लागला ह्मणजे रडूं नये, अशा सम-

जुतीनें आनंदीबाईनें पुष्कळ वेळां रडें आवरून धरण्याचा यत्न केला; परंतु वर सांगितल्याप्रमाणें ती बोलत असतां रडें कोसळलें. मुलेंही रडूं लागलीं. आनंदीबाईसही कांहीं बोलवेना. शेवटीं तिनें बाळ्याला पोटाशीं धरिलें; व आपल्या पदरानें काशी व माई ह्यांचे डोळे पुसले व धीर धरून ती ह्मणाली:—

यशोदाबाई, आतां वारंवार तुमचे उपकाराविषयीं बोलण्यांत अर्थ नाहीं. प्रसंग पडला असतां आपलीं माणसें आपणास विचारीत नाहींत. पाव्हणा झाला, तर एक दोन दिवसांचा, असें ह्मणतात. परंतु तुह्मी तर सख्या बहिणीपेक्षां माझा जास्त समाचार घेतला; व तो एक दिवस, दोन दिवस नाहीं, तर सतत तीन वर्षें एकसारखा घेतला. तेव्हां तुमचे उपकार किती ह्मणून सांगावे ? देहांत देह आहे, तोंपर्यंत तुमच्या उपकाराची आठवण वारंवार झाल्यावांचून राहणार नाहीं. आतां जास्त बोलण्याचें हें स्थळ नाहीं किंवा काळ नाहीं. तुमची माझी पुनः भेट होईल किंवा नाहीं, हें आतां सांगतां येत नाहीं; कारण, मी कांहीं अंशीं पराधीन आहें. जरी मी लांब जात आहें, तरी माझें मन या ठिकाणीं आहे, असें तुह्मी समजा. आठचार रोजांनीं तुमची माझी भेट होत जाईल. यांत अंतर पडणार नाहीं. मी जातें याबद्दल तुह्मांस वाईट वाटणें साहजिक आहे. परंतु तुह्मी आपलें कर्तव्य करीत गेलां, तर दिवसेंदिवस तुह्मास व मुलांस सुख होईल. सांप्रतच्या कालाविषयीं विचार केला, तर पुरुषांपेक्षां स्त्रियांवर मोठी जबाबदारी आहे. मुलांचें व त्यामुळें देशाचें हिताहित पुष्कळ अंशीं स्त्रियांचे आचरणावर अवलंबून आहे. सुधारणा एकदेशीय असून उपयोगीं नाहीं. नुसती पुरुषांची सुधारणा होऊन उपयोगीं नाहीं. स्त्रियांचीही झाली पाहिजे. आपल्या स्त्रियांस अज्ञानानें

असून टाकिलें आहे. हें अज्ञान घालविणें हें मोठें काम तुह्मी आपल्याच मुलांस शिक्षण देऊन काम होणार नाहीं. प्रमाणें तुमच्यामध्यें जागृति उत्पन्न झाली आहे, त्याप्रमाणें जाऱ्यापाजाऱ्या स्त्रियांमध्यें जागृति उत्पन्न झाली पाहिजे. तुमची कळकळ त्यांमध्यें उत्पन्न झाली पाहिजे. तुमचें आचरण त्यांनीं अनुकरण केलें पाहिजे. परंतु अनुकरण करण्यास तुमचें वर्तन शुद्ध व सरळ पाहिजे. ही गोष्ट सुलभ नाहीं; तथापि, स्थिरपणें, शहाणपणानें व निश्चयानें तुह्मी काम कराल, व त्याचप्रमाणें मुलांस करावयास लावाल, तर तुह्मास कठीण वाटणार नाहीं. उलट तुह्मास आनंद वाटेल. आतां मी येतें.

असें बोलून आनंदीबाईनें यशोदाबाईचा निरोप घेतला. परंतु जेव्हां ती मुलांकडे वळली, तेव्हां तिचा गळा दाटून आला व तीस कांहींच बोलवेना. इतक्यांत गाडीवाला आंत येऊन ह्मणाला, बाईसाहेब, टेम भरत आलें. हें ऐकून आनंदीबाईनें सर्वांस पुनः विचारून चोहोंकडे नजर फेंकिली, व हातीं घेतलेलें काम अर्धवट सोडून जाण्याचें आपणास कारण उत्पन्न झालें, याविषयीं तीस वाईट वाटलें. या विचारामुळें तिचा पाय वरांतून लवकर निघेना. जेव्हां गाडीवाला पुनः दृष्टीस पडला, तेव्हां ती गाडींत बसावयास गेली. गाडी चालती झाली. ती दिसेनाशी होईपर्यंत मुलें तिजकडे पाहत होतीं व नंतर घरांत आलीं. आनंदीबाई मुंबईस जाऊन तेथून विलायतेस कशी गेली; वाटेंत तिची व एका युरोपिअन सभ्य स्त्रीची कशी गांठ पडली; तिचा उपयोग तिला किती झाला; विलायतेहून ती अमेरिकेंत कशी गेली; तेथें गेल्यावर तिला किती शोध करावा लागला; किती वेळां तिची निराशा झाली; तीस किती हाल सोसावे लागले; व शेवटीं मुलांची व पतीची ब्रेझिल देशांत

जुतीनें गांठ पडली; साडेतीन वर्षांनीं प्रिय माणसांची गांठ पड-
केल्यावर तीस किती आनंद झाला; अमेरिका सोडून ती, आपला
सत्.: व मुलगा ह्यांसह जपान, चीन, ब्रह्मदेश पाहत पाहत पुन:
हिंदुस्थानास परत कशी आली; व कलकत्ता येथें कांहीं दिवस
क हिल्यावर तिचे पतीची, व ज्या संस्थानिकानें त्यास पूर्वी का-
मावरून दूर केलें होतें त्याची गांठ पडून त्यानेंच पुन: त्यास
बोलावून आपले संस्थानीं कसें नेलें; त्यास पूर्वीचें काम कसें
दिलें; व तेथें तो, आनंदीबाई व पुरुषोत्तम हीं आनंदानें राहून
मरेपर्यंत त्यांनीं कसा कालक्षेप केला, हें येथें सांगणें जरूर नाहीं.
तथापि, हें सांगणें अवश्य आहे कीं, तीं स्वस्थ बसलीं नाहींत.
सामाजिक सुधारणा व राज्यव्यवहार या बाबतींत साधारण रीतीनें
थोडीबहुत तरी चळवळ सुरू आहे, परंतु गृहशिक्षणाचे बाबतींत
लोकांची फारच अनास्था आहे, तेव्हां हा विषय हातीं घेऊन
आपणांकडून जें होण्यासारखें आहे, तें करण्याचा त्यांनीं निश्चय
करून तीं उद्योगास लागलीं, व या विषयाकडे लोकांचें लक्ष
लावण्यासाठीं दृढ निश्चयानें त्यांनीं उद्योग चालविला. असो.

वर सांगितल्याप्रमाणें आनंदीबाई गेल्यावर यशोदाबाईस व
तिचे मुलांस आठचार दिवस चैन पडलें नाहीं. आनंदीबाई-
वांचून सर्व घर उदासीन दिसूं लागलें. सर्व वस्तु जेथल्या
तेथें असून चालक शक्ति नसल्यामुळें निर्जीव दिसूं लागल्या. प-
रंतु हळू हळू विसर पडून यशोदाबाईस वाटूं लागलें कीं, आपण
असेंच स्वस्थ बसलों, तर कांहींच व्हावयाचें नाहीं. मुलांची
व्यवस्था पाहणें हें आपलें कर्तव्य आहे. हें कर्तव्य आपणासच
केलें पाहिजे. आनंदीबाईनें कित्ता घालून दिला आहे; आपणा-
सही त्यांच्या सहवासानें थोडी माहिती झाली आहे; व मुलांस
शिक्षणाची गोडी लागली आहे; तेव्हां आपणास तें काम कर-

ण्यास फार अडचण पडेल असें नाहीं. दुसरें असें कीं, ब कामास मोठी बुद्धि लागते असें नाहीं. कोणतेंही महत्त्वाचें का नुसत्या बुद्धीनें शेवटास जात नसून दृढ निश्चयानें तें शेवटा जातें, असें आनंदीबाईचे सहवासानें तीस कळून आलें होतें आपण दृढ निश्चयानें व शांतपणें आपलें कर्त्तव्य करूं, तर काले करून आपलें व मुलांचें हित झाल्यावांचून राहणार नाहीं. हा विचार यशोदाबाईचे व तिचे मुलांचे हितास कारण झाला ज्या स्त्रिया समजूतदार असतात, व मुलांना शिक्षण देण्याचें ज्यांमध्यें इच्छा उत्पन्न होऊन ज्या, उल्हासानें या कामाकडे लागल्या असतात, त्यांचें मन मुलांचे हिताच्या गोष्टी कोणत्या आहेत याचे शोधांत असतें; व ज्या ज्या उपयुक्त गोष्टी त्यांचे पाहण्यांत येतात त्या त्यांपासून त्या उपयोग करून घेतात. हाच प्रकार यशोदाबाईचे संबंधानें होता. प्रथम तीस अवघड वाटलें; परंतु जसजशी तीस संवय होत चालली, तसतसा तिला अधिक अधिक उत्साह वाटूं लागला.